मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


अनुक्रमणिका

युगवाणी



दीपावली विशेषांक, १९७६

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र



विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी ग्रंथालयाच्या समोरील वातायनीला बसविण्यात आलेल्या श्री शिवछत्रपतींच्या शलाकाशिल्पाचे उद्‌घाटन पंजाबचे मुख्य मंत्री ग्यानी झैलसिंग यांनी दि. १७-१०-१९७६ ला केले. या शलाका-शिल्पाचे रेखाचित्र मुखपृष्ठावर आहे. याची निर्मिती श्री. अनिल व सौ. नील संवतसर यांनी अपंग सेवा उद्योगाच्या कार्यागारात केली.

श्री. ग्यानी झैलसिंग हे अपंग कलाकार श्री. मोतीराम राऊत यांस विदर्भ साहित्य संघातर्फे भेट देत आहेत. छायाचित्रात डावीकडून – खासदार यशपाल कपूर, गो. स. देहाडराय, आ. रा. देशपांडे व त्रि. गो. देशमुख.

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभूः

दीपावली विशेषांक,
ऑगस्ट-सप्टेंबर-आक्टोबर १९७६
श्रावण-भाद्रपद-आश्विन शके १८९८

संपादक : मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक : वि. वा. प्रभुदेसाई

युगवाणी

मूल्य पाच रुपये

वर्ष ३२ अंक ५-६

– मनमोकळे बोल

युगवाणीचा दीपावली विशेषांक रसिकांना सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे ! कै. दादासाहेब खनहर्ट्यांचा एक अमोलिक विचारपरिप्लुत आत्म-व-पर-चरित्रपर लेख हे ह्या अंकाचे एक आकर्षण आहे. नव्या दमाच्या स्त्रीपुरुष तरुण लेखकांच्या नव्या ढंगाच्या पण मनाला ओढ लावणाऱ्या सामाजिक आशयघन लघुकथा हे दुसरे आकर्षण ठरावे. अनेक प्रथितयश कवींनी स्वयंस्फूर्तपणे युगवाणीवर आपला स्नेह प्रदर्शित केलेला आपणास आढळेल. गोंदियापासून गोव्यापर्यंत युगवाणीचा नवाजुना लेखकवर्ग युगवाणीचे अंतरंग नाजुक भावनांनी जोपासतो आहे. वैचारिक लेखांनी समृद्ध करतो आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र देखील युगवाणीकडे त्याच आस्थेने व आत्मीयतेने पहातो आहे. तिकडील लेखकांचेहि युगवाणीला सतत सहाय्य मिळत आहे. हा दीपावली अंक तर ह्याचे प्रतीक आहेच पण गतवर्षातील सर्व अंक चाळताच आपल्या सुजाण मनात ही गोष्ट केव्हाच ठसली असेल की युगवाणी विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असले तरी संपूर्ण महाराष्ट्रातून नव्याजुन्या लेखकांचे प्रेम तिला मनापासून लाभत आलेले आहे. युगवाणी विदर्भाची अस्मिता राखीत असली तरी तिची वृत्ति संकुचित नाही ह्याचेच हे फलित मी समजतो.

ह्या दीपावलीच्या शुभप्रसंगी मी सर्व महाराष्ट्रभर विखुरलेल्या युगवाणीच्या असंख्य नव्या जुन्या लेखकांना, कवींना व रसिकांना, मुद्रकांना व मार्गदर्शकांना, माझ्या कृतज्ञ सद्भावना व्यक्त करतो; असाच कृपालोभ सदैव असो द्यावा ही विनंती करतो व दीपावली व येते नवे वर्ष ह्या सर्वांना मंगलमय व प्रगतीकारक जावो ही शुभकामना व्यक्त करतो.

—संपादक

अनुक्रमणिका

अंतरंग

........एक काळ ऐसा होता!

श्री. ना. बनहट्टी

[गेल्या वर्षी दिवंगत झालेले महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यकार प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी, निधनापूर्वी काही काळ आपल्या आयुष्यातील आठवणी लिहिण्यास प्रारंभ केला होता. त्यामध्ये आपले आई-वडील, वडिलांचा विद्याभ्यास व विद्याव्यासंग, त्यांची वाङ्मयीन व अन्य कार्ये तसेच स्वत:चे बालपण येथपर्यंत त्यांनी मजल मारली. प्रा. बनहट्टींचे वडील वैकुंठस्वामी नारायण दासो बनहट्टी, हेही आपल्या काळातील विख्यात संस्कृत पंडित आणि प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते होते. त्यामुळे, तसेच लेखकांची मार्मिक निरीक्षणशक्ती व वर्णनशैली यामुळे या आठवणींना रोचक स्वरूप आले असून तत्कालीन काही प्रसिद्ध व्यक्तींची शब्दचित्रे आणि सुशिक्षित समाजाची स्थिती याचे मोठे मनोरम दर्शन या मजकुरातून घडते.

या आठवणी जशा स्फुरल्या व जशी सवड झाली तशा लिहिल्या गेल्या. प्रकाशनासाठी आवश्यक ते संस्कार मूळ लेखकाने त्यावर केले नव्हते. अर्थात् सर्व लिखाणात हेतुपूर्ण सुसंगति असली तरी क्वचित काही ठिकाणी विषयानुरोध व कालानुक्रम अगदी काटेकोरपणे पाळला गेला नाही असे आढळून आले. अशा ठिकाणी मूळ मजकूर थोडा मागेपुढे केला आहे; तसेच मुळातील काही तपशील सद्यस्थितीत अनावश्यक वाटल्यामुळे तोही गाळला आहे. या व्यतिरिक्त मुळातील मजकुरात कोणताही बदल केलेला नाही. मुळात नसलेला एकही शब्द जास्तीचा घातलेला नाही. लेखकाच्या निधनानंतर हा मजकूर प्रसिद्ध होत असल्यामुळे वरील खुलासा करणे आवश्यक वाटते. एकंदर आठवणींच्या मजकुराचा हा पहिला हप्ता येथे प्रसिद्ध होत आहे. पुढील हप्ता 'युगवाणी'च्या पुढील अंकात यथावकाश प्रसिद्ध होईल.

— संपादक]

माझे आयुष्य ही समाजाच्या किंवा राष्ट्राच्या जीवनात मोठी महत्त्वाची गोष्ट नाही. लोकांच्या दृष्टीने क्रांतिकारक किंवा चित्तथरारक अशा कोणत्याही गोष्टी माझ्या आयुष्यात घडलेल्या नाहीत. लेखक किंवा ग्रंथकार म्हणून म्हटले तरी मी काही लोकप्रिय लेखक नाही. अगोदर मी लिहितो कमी; गोष्टी कादंबऱ्या नाटके इत्यादि ललित वाङ्मय लिहिणारा लेखक पुष्कळ प्रसिद्धि मिळवू शकतो आणि लोकांना त्याच्याबद्दल कुतूहल असते. तसे माझ्याबद्दल असण्याचे कारण नाही. तेव्हा आत्मचरित्र लिहिण्याचा माझा विचार नाही. अलीकडे पुष्कळ सामान्य माणसे देखील आत्मचरित्र लिहू लागली आहेत. सत्काराची जशी एक फॅशन पडत चालली आहे – साठ वर्षे झाली की एक सत्कार ठोकून घ्यायचा, कुठून निवृत्त झाले की हाताखालच्या व आजूबाजूच्या लोकांकडून सत्कार वसूल करावयाचा; आणखी किती तरी निमित्ते सत्कार करून घ्यायला चालून येतच असतात! आत्मचरित्राचे तसेच! प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही घडतच असते; वय झाले म्हणजे अनुभवाची पुंजी साठते; तिचे प्रदर्शन करावे, आपण कसे व किती मोठे आहो हे सांगावे, अशी प्रवृत्ति उत्पन्न होते. ही काही तिजोरीत किंवा बँकेत साठविलेल्या रकमेसारखी पुंजी नव्हे, की जी लोकांपासून लपवून ठेवण्याचा कटाक्षाने यत्न करावा. तेव्हा थोडाबहुत सार्वजनिक आयुष्यात वावरलेला मनुष्य साठीला पोचला म्हणजे आत्मचरित्र लिहिण्याच्या उद्योगाला लागत असल्यास त्यात नवल नाही.

माझा उद्देश थोडासा निराळा आहे. ज्या मातापितरांच्या पोटी माझा जन्म झाला ती फार उच्च संस्काराची माणसे होती. ते संस्कार निखळ स्वरूपात त्यांच्या आचरणात उतरलेले होते. 'उपदेशापेक्षा उदाहरण बरे' या न्यायानुसार ते संस्कार इतरांवर

घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी होते. त्यांच्याविषयी आपणाला जे जे आठवते ते ते सांगावे आणि अशा रीतीने त्यांचे ऋणस्मरण करावे हा मुख्य हेतु हे सर्व लिहिण्याच्या बुडाशी आहे. त्यांच्या काळात जी समाजस्थिति होती, ज्या भावभावना जागृत होत्या आणि ज्या वर्तनरीति प्रचलित होत्या, ते सर्व आता फार बदलले आहे. तेव्हा त्या गतस्थितीचे वृत्तान्ताच्या ओघात जसे येईल तसे दिग्दर्शन करावे ही इच्छाही मनात वागत आहे हे सगळे करताना लिहिणारा जो मी त्याच्या जीवनाचे प्रतिबिंब ठायी ठायी उमटेल याची जाणीव आहे. उमटेल तेवढे उमटेल. ते मी मुद्दाम पुसून टाकणार नाही. जीवनाची सायंकाळ झालेली आहे. 'संध्या छाया भिवविति हृदया' अशी स्थिति नसून मन आत्मानंदात विहरत आहे. इतर आठवणींबरोबर हातून जे जे कार्य घडले त्या विषयीच्या आठवणी मनात घोळू लागणे अपरिहार्य आहे. कोणती कामे आरंभली, त्यात कितपत यश मिळाले, ती हाती घेताना आपले जे हेतु होते ते कितपत सफल झाले या विषयीचे विचार आयुष्याच्या या अखेरच्या अवस्थेत मधून मधून मनाच्या रंगमंचावर ये-जा करीत असतात. ते सगळे सांगावे असा निश्चित हेतु नसला तरी लिहिण्याच्या ओघात ते सहजगत्या येऊन जातील असे वाटते. मुख्य लक्ष आई आणि नाना यांच्याकडे ठेवणार आहे.

× × ×

न मातुः परं दैवतम् !

कालेजाला सुटी झाली की अगदी लगेचची गाडी पकडून घरी धाव घ्यायचा माझा शिरस्ता असे. इसवी सन १९१८, म्हणजे इन्फ्लुएंझाच्या भयंकर साथीचे वर्ष. मी स्वतः कालेजात आक्टोबरात ३।४ दिवस तापाने पडलोच होतो तरी शक्य तितक्या लवकर पुण्याहून निघून सकाळी मिरजेस घरी पोचलो. आलो तो लगेच माडीवर गेलो. आईने अंगावरून हात फिरवला ती काय बोलली हे आता ५० वर्षांनंतर काही स्मरत नाही. तिचे रूप अजून मनश्चक्षूसमोर येते. पण आवाजाची संवेदना अगदी बुजली आहे.

त्या सकाळी तिने माडी सारवायला काढली होती. पूर्वी घरातल्या जमिनी मुरूम टाकून चोपून तयार केलेल्या, त्या वारंवार शेणमातीच्या मिश्रणाने सारवाव्या लागत. सात खण जाप्ता आणि पुढे आलेले दोन खण मिळून नऊ खण माडी तिने बहुतेक सारवून संपविली असावी. वास्तविक ती फार थकलेली होती. माझ्याकरता तिने हे केलेले होते, पण ते पाहण्याची मला दृष्टी नव्हती.

नानांची पूजा झाल्यानंतर जेवण. श्रीखंड आणि कोबीची भजी केली होती. आम्ही वैष्णव असल्यामुळे आमच्या घरात कांदा वर्ज्य होता. आई समोर बसून आग्रह करून वाढत होती.

त्याच दिवशी संध्याकाळी तिने अंथरूण धरले. मोरीकडे जाऊन आली आणि दारातच पडली. तिथेच तिचे अंथरूण घातले. आगोदर पासून आजारी असूनही जुन्या बायकांच्या पद्धतीप्रमाणे तिने कुणाला सांगितले नव्हते. तिला स्त्रीविशिष्ट त्रास होत होता. आणि त्यात एन्फ्लुएंझावरून फुप्फुसदाह (न्यूमोनिया) झाला. दोन्ही फुप्फुसे पूर्ण रोगग्रस्त होऊन तिला भयंकर धाप लागली. तीन चार दिवस ती तशा वेदना सहन करीत होती. आश्विन वद्य दशमी म्हणजे दिवाळीपूर्वी चार दिवस ती गेली. गावात सर्वत्र एन्फ्लुएंझाची साथ येऊन गेली होती आणि घरटी एकदोन तरी माणसे मृत्यूने ओढली होती. आमच्या घरात इतर बायका बऱ्याच होत्या. त्या सगळ्या विधवा. सवाष्ण काय ती एकटी आमची आई. आम्हाला न नेता हिलाच कसं देवाने उचलले म्हणून त्यांनी जो आक्रोश केला तो हृदयविदारक होता.

भयाण रात्र ! मिरजेस गावाहून कृष्णा तीन मैल लांब आहे. कुणाचा अवेळी मृत्यु झाला तर त्याचे शव बैलगाडीत घालून नेण्याची पद्धत आहे. कृष्णेला पाणी बरेच होते. तिथे कृष्णेला मोठा भव्य आणि प्रशस्त घाट आहे. नानांना कृष्णा नदीचा, तेथील घाटाचा फार अभिमान ! असा घाट काशीपर्यंत कुठेही नाही असे ते म्हणत असत. आता सबंध भारतभर प्रवास केल्यानंतर त्यांच्या म्हणण्याची यथार्थता मला पटली आहे. घाटाच्या पलीकडे स्मशान. कृष्णेच्या घाटावर अगदी लहानपणापासून आम्ही कितीतरी वेळा स्नानाकरिता गेलो असू. पण लगेच पलीकडे स्मशान आहे याची काही जाणीव मला नव्हती, ती या प्रसंगाने झाली. मी लहान मुलगा. वडील तर बरोबर आलेच नव्हते. आईच्या देहाला आपल्या हातांनी मला अग्नि द्यायचा होता. त्या भयाण रात्री नदी मला गिळायला

येत आहे, पण आई वरून पाखर घालीत आहे असा भास होत होता. मी पुरता भानावर नव्हतो. बरोबरच्या मंडळींनी माझ्याकडून सर्व गोष्टी करविल्या.

आईचा मृत्यु म्हणजे काय याचे नीटसे आकलन होईपर्यंत कितीतरी दिवस लागले. जन्मापासून आई–बापांच्या प्रेमळ छत्राखाली सर्व वय गेले असल्याने आणि वडिलांची सांपत्तिक स्थिती चांगली, समाजात मानमान्यता मोठी, असे असल्यामुळे माझे तोपर्यंतचे आयुष्य सरासरीच्या मानाने पाहाता अतिशय सुखात आणि सुरक्षित गेले होते. आईचा मृत्यु फक्त कादंबरीत वाचून आम्हाला माहीत होता. 'पण लक्षात कोण घेतो' ही माझी अतिशय आवडती कादंबरी ! तिच्यातले 'आईचा मृत्यु'. हे प्रकरण वाचून मी रडलो होतो. पुढे पुढे ती कादंबरी वाचायला घेतली म्हणजे त्या प्रकरणावरून उडी मारून मी पुढे जात होतो. आता तेच प्रकरण मला येऊन भिडले. राहून राहून माझा जीव कावराबावरा होई. हा आघात आपणावर का, कशासाठी झाला असे वाटून आतून उमाळे येत. ज्या सोप्यावर तिने शेवटचे अंथरूण धरले होते त्या सोप्याकडे ती वारल्यानंतर किती तरी दिवस, मला वाटते वर्ष दीड वर्ष माझ्याने जाववत नसे.

"आई असे पर्यंत तिची किंमत वाटत नाही; पण ती गेल्यावर मग जगात कशाचीच किंमत वाटत नाही." असे आचार्य अत्र्यांनी म्हटले आहे. सर्वांच्याच बाबतीत हे खरे आहे असे मला वाटते. आई गेली तेव्हा मी अर्धवट अजाणच होतो. वरील उक्तीचा पूर्वार्ध माझ्या बाबतीत खरा होता. पुष्कळांच्या बाबतीत तसा असेल यात शंका नाही. लहानपणी ताठर व हूड स्वभावामुळे आईचे न ऐकणारी पुष्कळ मुले असतात त्यातलाच मी एक होतो. अर्थात तिच्या हातचा मार खाण्याचे प्रसंग विरळा नसत. मुलाला मारायचे आणि मग स्वतःच रडायचे ही जी आपल्याकडच्या आयांची तऱ्हा ती तिच्या ठायी दिसत असे, पण फार क्वचित. कारण ती मारीत असे फार विचारपूर्वक, दुसरा काही उपाय नाही अशी खात्री पटल्यावरच. तरी देखील मारल्याबद्दल तिला दुःख होत नसे असे नाही. सुमारे अकरा वर्षांचा असताना मारण्यासाठी तिने हात उगारला तेव्हा मी तिचे दोन्ही हात धरले. शेजारच्या बाई तिथे होत्या त्या म्हणाल्या "लक्षुमबाई आता हा तुमचा हात धरायला लागला, किती दिवस त्याला तुम्ही मारणार." ती थोडी खजील झाली, मी तिचे हात सोडून पळालो. पण त्यानंतर तिने केव्हाही माझ्यावर हात उगारला नाही. त्या वेळेस मला हे चांगले वाटले. आता असे वाटते की तिची मारण्याची माया आणखी काही दिवस लाभली असती तर फार बरे झाले असते.

मनावर तिने सुसंस्कार किती घडविले याची गणती नाही. सकाळ संध्याकाळ नियमाने संध्या करावयाची ही तिची शिस्त कडक होती. सकाळच्या संध्येनंतर नमस्कार. प्रत्येक नमस्कार घालून उठल्यानंतर सूर्याला हात जोडावयाचे असतात, व्यायामाकरिता नमस्कार घालावयाचे, प्रत्येक वेळी हात जोडायला कशाला पाहिजेत, अशी अस्मादिकांची भावना. पण तिने कटाक्षाने हात जोडायला लावावे. सामर्थ्या बरोबर उपासनाही पाहिजे नमस्कारांनी शरीर बळकट होईल. तर हात जोडण्याने उपासना घडेल. मनाचे बळ उपासनेने मिळेल; हे ती जाणत होती अगदी लहानपणी संध्याकाळी दिवेलागणी बरोबर वडील माणसांना नमस्कार करून शुभं करोति पासून सायंप्रार्थनेचे श्लोक, आर्या आणि वार, महिने इत्यादि व्यावहारिक ज्ञानाच्या गोष्टी न चुकता म्हणाव्याच लागत. अर्थात या सर्व गोष्टी, अडीचकीपर्यंत पर्वचा सुद्धा, तिला येत असत.

वाचनाची गोडी तिच्यामुळे लागली किंवा तिनेच लावली असे म्हणण्यात अतिशयोक्ति नाही. आमच्या घरी हरिभाऊ आपटयांची 'करमणूक' येत असे. नानांनी आई करिताच ती चालू केली होती. अगदी लहानपणी वाचायला यायला लागल्यानंतर वासुदेवराव आपटयांची बालरामायण, बालभारत इत्यादि पुस्तके आणि त्यानंतर हरिभाऊ आपटयांची करमणूक यांनी वाचनाची गोडी लागली. त्याला मुख्य कारण आईचे उत्तेजन हेच. मी सुमारे १० वर्षांचा असताना, आई दूर बसली असता चूल पेटवून चुलीवर भात आणि वईलावर पिठले करायला सांगत आहे, शिकवीत आहे आणि मधून मधून करमणुकीत मी काय वाचले; कोणच्या कादंबरीत कोणची पात्रे आहेत, त्यांचे स्वभाव विशेष कसे आहेत, त्यांच्यावर जे प्रसंग येतात त्यात काय खुबी आहे इत्यादी गोष्टी ती समजावून सांगत असे. त्यामुळे वाचनाची गोडी लागली, वाढली आणि वाङमयाची जाण उत्पन्न झाली.

जुन्या ग्रंथांचे वाचन तर तिचे पुष्कळच होते. चिपळूणकर आणि कंपनीने प्रसिद्ध केलेली रामायण, महाभारत आणि भागवत यांची भाषांतरे नानांनी विकत घेतली होती ती तिच्याकरिताच. त्यांना स्वतःला भाषांतरांची लवमात्र जरुरी नव्हती. हे महाग्रंथ भाषांतररूपात तिने वाचून काढले होते. आणि जेव्हा आम्ही सुटीमध्ये मिरजेला येत असू त्या वेळी आणि नानांनी पेन्शन घेतल्यावर नित्याकरिता ते मिरजेला आले त्यानंतर आजींना ती ते वाचून दाखवीत असे. श्रीधर महीपती यांचे ओवीबद्ध ग्रंथ तिच्या वाचनात असत आणि घरातल्या बायकांना ती ते वाचून दाखवीत असे हे सांगावयास नको. पूर्वी हे ग्रंथ घरोघरी वाचले जात आणि त्यांनी मनावर उत्कृष्ट संस्कार होत असत. ती मोठ्याने वाचीत असली म्हणजे कित्येकदा मी तिच्याजवळ बसून ऐकायचा. ते दृश्य अजून डोळ्यासमोर येते.

× × ×

आईच्या संबंधाने या आठवणी वाहावत गेल्या. स्थळकाळाचा अनुक्रम त्यात राहिला नाही. नाही तरी या लिखाणात तो पाळला जाईल असे नाहीच. पण मुळारंभ करायचा तो मला पुण्यापासून केला पाहिजे. जीवनाचा आरंभ पुण्यात झाला तसा शेवटही पुण्यात व्हावा असा रंग दिसतो. पहिल्या पहिल्या आठवणी पुण्यातल्या एका वाड्यासंबंधाच्या आहेत. स्मरणशक्तीची अशी मजेदार अवस्था आहे की अगदी जुन्या गोष्टी ठळकपणे आठवतात; जसजसे अलीकडे येत जावे तसतशी आठवण अधिकाधिक अंधुक होत जाते. याचे मानसशास्त्रीय कारण असे की प्रसंग जितके जुने तितके ते मनात अधिक वेळ वागून घट्ट प्रस्तरीभूत झालेले असतात.

भटांचा वाडा – ब्राह्मणी संस्कृतीची एक प्रतिमा !

तेव्हा अगदी पहिली आठवण पुण्यातल्या एका वाड्यात गुंतलेली आहे. हा भटांचा वाडा म्हणून प्रसिद्ध होता. तो अद्यापि भट घराण्यातील व्यक्तींच्याच मालकीचा आहे की काय, याची कल्पना नाही. तो डोलकर आळीत असून ४५९ नारायण पेठ हा त्याचा सध्याचा नंबर आहे. याची खूण अशी की त्याच्यासमोर रस्त्यापर्यंत चांगला रुंद ओटा आहे. सध्या त्यावर फरशी आहे ती पूर्वी नव्हती. आणि पुढच्या बाजूस दुकाने आहेत. ती तर नव्हतीच नव्हती.

हा वाडा म्हणजे सध्याच्या परिभाषेत कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसांचे एक लहानसे पण दाटीवाटीचे जग होते. खरे म्हटले असता ब्राह्मण जातीच्या नोकरी पेशातल्या अनेक कुटुंबांचा तो एक संच किंवा गुच्छ होता. त्यातील अनेक व्यक्तींची नावे वाङ्मयात येऊन गेलेली किंवा या ना त्या संबंधाने लक्षात ठेवण्याजोगी अशी होती. वाडा चौसोपी दुघई, तीन्ही बाजूंनी संपूर्ण माड्या असलेला. मागच्या बाजूस प्रशस्त अंगण, त्यात एका बाजूला उत्तम बांधून काढलेली भरपूर नितळ पाणी असलेली विहीर, तिच्या बाजूला धुण्यासाठी काळ्या कातळाची सुंदर फरशी आणि पलीकडे अगदी कोपऱ्यात उंचावर शौचकूप. नानांचे पहाणे फार मार्मिक. मुंबईहून पुण्याला बदली झाली तेव्हा पुष्कळ दिवस ते जागा पहात होते. वास्तविक त्या काळात पुण्यात भाड्याच्या जागांची टंचाई नव्हती. पण स्वच्छता, सौंदर्य आणि कौटुंबिक सोयी या सर्व दृष्टींनी त्यांच्या पहाण्यात फार खोल अर्थ होता. पुणे शहराची उत्तर बाजू म्हणजे मुठा नदीचा काठ. अर्थात तो फार सखल, गावाचे सांडपाणी वाहून येत असल्याने काहीसा दूषित. फार दक्षिणेकडे म्हणजे सदाशिव पेठेच्या पलीकडे जावे तर बागा व झाडी त्या काळी पुष्कळ असल्यामुळे सर्दपणा जास्त. म्हणून त्यातल्या त्यात नारायण आणि सदाशिव या दोन पेठांचे पूर्व पश्चिम जाणारे रस्ते हे सर्वांत उत्तम. त्यांना अतोनात पसंत पडलेला प्रस्तुत भटांच्या वाड्यातील गुण म्हणजे त्यातील संडास अगदी मागच्या कोपऱ्यात होते आणि त्यांच्या सफाईसाठी भंग्याला जाण्याची वाट पलीकडे एक दोन घरे टाकून असलेल्या बोळातून होती हा होय. नाही तर त्या काळात पुण्यातल्या बहुतेक सर्व घरांचे संडास समोरच्या दाराच्या बाजूला मोठ्या रस्त्यावर असून रस्त्यावरून रोज सकाळी भंग्याकडून त्याचो सफाई व्हावयाची. या ओंगळ प्रकाराचा आणि त्यांतून उद्भवणाऱ्या दुर्गंधीचा या वाड्याला संपर्क नव्हता. या शिवाय वाड्यातली नितळ पाण्याची विहीर हे मोठे सुखनिधान होते. पाण्याचा तुटवडा भासणे कधी शक्य नाही. मागे मोठे अंगण आणि वाडा चौसोपी, त्यामुळे हवा आणि सूर्यप्रकाश यांचा उत्तम लाभ प्रस्तुत वास्तूला होण्याची सोय होती. अंगणात थोडासा बगीचा. त्याच्यामुळे पूजेला अनायासे फुले मिळण्याची व्यवस्था होती रस्त्यापासून वाड्यापर्यंत रुंद ओटा असल्यामुळे रस्त्यावरील धुळीचा उपसर्ग त्या मानाने कमी होता.

हा वाडा पुरुषोत्तम नारायण भट यांनी बांधला. यांनी कोकणातून येऊन वऱ्हाडात नोकरी धरली होती. तिकडे ते स्मालकॉज कोर्ट जज्जाच्या हुद्यापर्यंत चढले. निवृत्त झाल्यावर पुण्यात स्थायिक व्हायचे या उद्देशाने त्यांनी हा वाडा बांधला. पण नोकरीत असतानाच ते उमरावती येथे १८९० साली २८ मार्च रोजी वारले. त्यांचे चिरंजीव कृष्णराव पुरुषोत्तम भट यांचीही नोकरी वऱ्हाड-मध्यप्रांतात रेव्हिन्यू खात्यात झाली. ते शेवटी शेवटी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर म्हणजे मुंबई इलाख्यातील त्या वेळचा डेप्युटी कलेक्टर या हुद्यापर्यंत चढले होते. या गृहस्थांना मी अनेकवेळा पाहिल्याचे स्मरते. रंगाने काळे सावळे, म्हणजे अगदी देशस्थी वाण. बंद कॉलरचा कोट आणि डोक्यावर गुलाबी पगडी. त्यांची भावजय काशीताई या चांगल्याच गोऱ्या होत्या. जिवणी पसरट, चेहेरा ठसठशीत आणि आवाज ताशीव. ताशा वाजल्यासारखा. या बाई बालविधवा, अर्थात सोवळच्या झालेल्या होत्या. सर्व वाड्याची व्यवस्था त्यांच्याकडे होती. सरळ, स्पष्टवक्त्या आणि रोखठोक. स्वतः आचरणाने अंतर्बाह्य निर्मळ, त्यामुळे स्पष्टवक्तेपणा त्यांना शोभून दिसत असे. स्वच्छतेबद्दल यांचा कटाक्ष फार. रोज सकाळी हातात खराटा घेऊन सर्व मोऱ्या साफ करणे, समाईक जागेचा केरकचरा काढणे आणि भाडेकरूंपैकी कोणी अस्वच्छपणा केला असल्यास त्यांना ताकीद देणे ही कामे त्यांची चालत. बाई जितक्या कडक तितक्याच प्रेमळ, उपयोगी पडण्यात तत्पर. आमची आई दूर बसली म्हणजे केव्हा केव्हा त्या पोळ्या वगैरे करून आणून द्यायच्या. त्यांचा दरारा असल्यामुळेच वाड्याचे राज्ययंत्र सुरळीत चालत असे, असे म्हणण्यात अतिशयोक्ति नाही.

वाड्यात जे बिऱ्हाडकरू होते त्यापैकी काहीजणांविषयी जरासे सांगितले पाहिजे. आग्नेय कोपऱ्यात राहणारे रंगोपंत अत्रे हे आचार्य अत्रे यांच्या कुळातले. त्यांच्या लिखाणात यांचा कुठे उल्लेख आला आहे की नाही, सांगता येत नाही. पण कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचे एक मित्र म्हणून रंगोपंतांचा कुठेतरी निर्देश झालेला आढळेल असे वाटते. अंगाने सडपातळ आणि स्वभावाने सौम्य असे हे गृहस्थ वाड्यात आहेत की नाहीत हे कळत नसे. दुसरे बिऱ्हाड ईशान्य कोपऱ्यात अण्णा वांगीकर यांचे. हे हरिभाऊ आपट्यांचे घनिष्ठ मित्र. त्यांच्या चरित्रात यांचा उल्लेख अवश्य आढळेल असे वाटते. हे शिक्षणखात्यात, डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणजे 'दिपोटी' असावेत. अगदी शांत प्रकृतीचे, सोज्वळ गृहस्थ. त्यांच्या पत्नी तितक्याच तिखट स्वभावाच्या. त्यांचे बोलणे सुरू झाले म्हणजे सबंध वाडा गर्जून उठत असे. त्यांना मुले दोन, बाबू आणि वेणी. पैकी बाबूची महत्त्वाकांक्षा डॉक्टर होण्याची, ती त्याने तडीस नेली. डॉ. बाबुराव वांगीकर यांनी जंगली महाराज रोडवर बंगला बांधला असून आपले वृद्धावस्थेचे दिवस तेथे ते शांतपणे क्रमीत असावेत. हे माझ्यापेक्षा दहा अकरा वर्षांनी वडील असतील. वाड्यातील आणखी अवश्य उल्लेखनीय कुटुंब जोशी यांचे. सुधारक पत्राचे संस्थापक गोपाळ गणेश आगरकर १८९५ साली वारल्यानंतर महादेव दिनकर जोशी नावाचे तरुण गृहस्थ त्याचे संपादक झाले. हे कोकणातून आलेले, मोठे तरतरीत व उत्साही होते असे म्हणतात. इ स १८९७ च्या सुमारास ते प्लेगला बळी पडले. तेव्हा त्यांच्या पत्नी पार्वतीबाई आपला लहान मुलगा जनार्दन उर्फ बाबू याला घेऊन या भटांच्या वाड्यात राहावयास आल्या. सुधारक पत्रातून (आणि पुढे कदाचित नामदार गोखले यांजकडून) त्यांना काही मदत पोचविली जात असावी, असे त्या वेळी कुणीतरी बोलले असल्याचे स्मरते. हे जनार्दन महादेव जोशी म्हणजे सध्याचे प्रसिद्ध कादंबरीकार श्री. ज. जोशी यांचे वडील, ही खूण अलीकडच्या वाचकांना पटेल. हे एका पायाने अधू होते. जनूभाऊंचे काही शिक्षण होऊन ते नोकरीला लागले, तेव्हा त्यांच्या मातुःश्री पार्वतीबाई यांना अत्यानंद झाला त्यांनी त्यांचे लग्न मोठ्या समारंभाने केले. कोकणस्थांमध्ये मंगल कार्यात बोडण भरण्याची चाल आहे. या जनूभाऊंच्या लग्नाच्या किंवा पुढील संस्काराच्या प्रसंगी वाड्याच्या सोप्यात एका मोठ्या परातीत बोडण भरण्यात आले होते, ते अजून मला चांगले स्मरते. त्या वेळेस मी सहा सात वर्षांचा असेन. परातीभोवती खूप बाया जमल्या असून परातीतले अन्नपदार्थ जोरजोराने कालवीत होत्या. अजून ते दृश्य आठवले म्हणजे कसेसेच वाटते. परातीत खूप वेगाने हात फिरवीत असता एका बाईच्या अंगात आले. तिचे डोळे तारवटले. चेहरा लाल झाला. घोगऱ्या आवाजात ती बडबडू लागली. शेजारच्या बायांनी तिचा मळवट भरला, भांगात कुंकु भरले. एकेकजण तिला

प्रश्न विचारू लागली. अमकीला मूल केव्हा होईल, तमकीला नवरा नांदायला केव्हा नेईल, अमक्या तमक्याला नोकरी केव्हा लागेल, इत्यादि. काही प्रश्नांची ती उत्तरे देई, काही वेळा घुम्यासारखी बसे, काही वेळानंतर ती गरगर डोळे फिरवू लागली. तिच्या अंगाला घाम फुटला तशी जवळच्या बायकांनी तिला बाजूला नेऊन निजवले. साधारणपणे इतके मला आठवते. इतक्या लहानपणी तो प्रसंग मला चित्तथरारक वाटला. म्हणूनच आजवर लक्षात राहिला आहे.

पार्वतीबाई फार सोज्वळ आणि सात्विक. सात्विकपणा त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत असे. प्रत्यक्ष सुधारक पत्राच्या संपादकाची पत्नी असल्यामुळे त्या सोवळ्या झालेल्या नव्हत्या. त्या काळात एकंदर ब्राह्मण समाजात विधवांचे केशवपन हा नियम होता. सकेशा राहणे हा अपवाद. अर्थात यांच्याविषयी अप्रत्यक्षपणे कुजबूज होत असे तिचे पडसाद एखादे वेळी आमच्या घरात उमटत असत. मला त्या काळात त्याचा अर्थ समजत नसे. खरे म्हटले तर असे आणखी काही अपवाद त्या वाड्यात नजरेस पडत होते. जानकीबाई पानसे, मिडवाईफ आणि नर्स, या अशाच होत्या. त्या संस्कृताचे प्रसिद्ध प्रोफेसर ना. स. पानसे, यांच्या निकटच्या नात्यातल्या होत्या. वांगीकरांच्या नात्यामुळे वाड्यात त्या नेहमी येत. कुणाचे बाळंतपण असले तर त्याच सुईणपण करीत. माझ्या धाकट्या भावाच्या जन्माच्या वेळी सुईण म्हणून त्याच होत्या. पण ही गोष्ट जरा पुढची.

तसा तर वाड्यातल्या पुष्कळ गंमती सांगण्याजोग्या आहेत. सगळी ब्राह्मण मंडळी. ब्राह्मण स्वभावत: भोजनप्रिय, अन्नधान्याची स्वस्ताई. बायकांमध्ये क्वचित भांडणे कटकटी होत असल्या, तरी शेजारधर्माचा प्रेमळपणा हाच स्थायीभाव. कुणाच्याहीकडे कार्यप्रसंग असला तरी सगळ्या बायका करायला लागायला जायच्या. फक्त पक्वान्नाकरिता आचारी बोलाविला की झाले. अर्थात वाड्यात जेवणावळी पुष्कळ उठत असत. कितीही सामान्य जेवणावळ असली तरी प्रशस्त केळीची पाने असावयाची, ताटे कधी मांडीत नसत. जेवणावळीत एक गंमत हटकून व्हावयाची. एक माणूस भराभरा पानांपुढे एकेक पैसा दक्षिणा ठेवून जायचा, त्याच्या मागोमाग दुसरा माणूस येऊन पैसा फंड, पैसा फंड' असे ओरडत ते पैसे उचलून घेऊन जावयाचा. मुंज होण्याच्या पूर्वी, अर्थात माझ्या पानापुढे पैसा ठेवला जात नसे. पण हे लोक पैसा का ठेवतात आणि एक माणूस पैसाफंड म्हणून सगळ्यांचे पैसे उचलून का घेऊन जातो, हे गौडबंगाल मला उलगडत नसे. स्नानाकरिता बंद न्हाणीघर ही वस्तूच त्यावेळी नव्हती. बायकांचे अंगधुणे खोलीतल्या मोरीवर व्हावयाचे. आणि पुरुषांनी बहुतकरून सोप्याच्या कडेला मोऱ्या होत्या त्यांवर आंघोळ करावयाची. बाबू वांगीकर, जनूभाऊ जोशी या मंडळींना अशा रीतीने आंघोळ करताना आम्ही नेहमी पहात असू. थंड पाण्याने स्नान करणारी मंडळी मागच्या अंगणात विहिरीशेजारच्या प्रशस्त फरसबंदीवर जात असत.

असा हा भटांचा वाडा — ब्राह्मणी संस्कृतीची एक प्रतिमा, चाकोरीतले मिळमिळीत जीवन जगणाऱ्या चाकरमान्या मंडळींचे एक खुराडें म्हणा पाहिजे तर. स्वराज्य मिळून पंचवीस वर्षे झाली तरी आम्ही पराक्रमहीन मिळमिळीत जीवन जगतो आहोत. मग त्या वेळची परिस्थिति कशी असेल !

या चाकोरीतल्या सपक जीवनाला अपवाद एक व्यक्ति त्या वाड्यात होती. ती म्हणजे आमचे नाना. ते माझे वडील म्हणून मी हे म्हणतो अशातली गोष्ट नाही. वाड्यात राहणाऱ्या त्या वेळच्या प्रत्येक व्यक्तीची प्रत्यक्षाप्रत्यक्ष अशीच साक्ष पडत होती. वाड्यात कितीही कलकलाट चाललेला असो, नाना बाहेरून आले की जिकडे तिकडे सामसूम होत असे, बायकांची टकळी बंद होऊन खाली मान घालून त्या चुपचापपणे आपआपल्या कामाला लागत. रंग काळा, पण आकृति भव्य. डोळे किंचित पिंगट करड्या रंगावर. वास्तविक चेहेरा किंचित हसरा, पण किंचित वळलेल्या रुवाबदार मिशांमुळे तो काहीसा उग्र वाटत असे. मला तो तसा कधीच, अगदी लहानपणीही वाटला नाही. पोशाख पांढरा शुभ्र. डोक्याला पांढरा जरीकाठी चापून चोपून बांधलेला रुमाल, अंगात चुणीदार पेशवाई पद्धतीचा खळणीचा सफेत अंगरखा आणि खाली स्वच्छ धुण्यामुळे किंचित गुलाबी छटा आलेले धोतर. अंगरख्याच्या आत जाकीट आणि त्याच्या आत साध्या बाह्यांचा सदरा. जाकिटाच्या खिशात रास्कोपचे घड्याळ साखळीसह. पायात पुणेरी जोडा. हा मनुष्य काही सामान्य नव्हे, असा त्यांना पाहताच कोणाचाही ग्रह

व्हावा इतका करारीपणा व तेजस्वीपणा त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत असे.

त्यांची शरीरयष्टि, उत्तम शरीरप्रकृति यांचा वारसा मला मिळालेला नाही. त्यांना पाहिलेले काही लोक अजून पुण्यात विद्यमान आहेत. महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार सभेमध्ये वगैरे माझ्याविषयी बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे माझ्या वडिलांविषयीच जास्त करून बोलतात. असे करण्यात त्यांचा हेतु आपले इतिहासाचे ज्ञान कसे सर्वव्यापी आहे, हे दाखविण्याचा कदाचित असेल; किंवा उद्दिष्ट व्यक्तीचे अल्पत्व सूचित करण्याचा असेल. कसेही असले तरी त्यांच्या वर्णनाने मला आनंदच होतो. ते देखील नानांची भव्य शरीरयष्टि, त्यांचा रुबाबदार चेहेरा, पांढरा शुभ्र पोषाख यांचे वर्णन करून माझ्या किरकोळपणाशी त्यांची तुलना करून विषम अलंकाराची चमत्कृति निर्माण करतात. नानांचे शरीर मुळात फार भव्य असेल असे वाटत नाही. कालेजात असतानाचे त्यांचे एक दोन फोटो मी पाहिले होते, त्यांवरून मी हे म्हणतो. शरीरयष्टि बळकट आणि साधारण मांसल; कालेजात असताना चांगली तालीम केलेली. संसारी बनल्यावर अशा माणसाचे शरीर पुष्ट व स्थूल बनते तसे त्यांचे झाले होते. पोट विशेष सुटलेले नव्हते, तर छाती रुंद आणि विशाल होती. त्यामुळे त्यांच्या आकृतीत बेढबपणा कधीही आला नाही. 'व्यूढोरस्को वृषस्कन्धः' हे कालिदासाने केलेले वर्णन त्यांना उत्तम लागू पडत होते. अत्यंत शुद्ध व नियमित आचरणामुळे त्यांची प्रकृति वृद्धापकाळातही उत्तम टिकून राहिली. त्यांची औषधे म्हणजे आलें व सुंठ. पेनसील तासताना किंवा बागेत काम करताना हाताला कुठे कापले म्हणजे ते मला दाखवून म्हणायचे, 'हे बघ, इथे कापले आहे, रक्त यायचे बंद झाले की खपली धरेल आणि उद्या बरे होईल.' आणि खरोखरी तसे व्हायचे. मलम नाही, बोरिक पावडर नाही, ड्रेसिंग नाही, अँटीसेप्टिक नाही, काही नाही. रक्तात क्षतपूरणाचे सामर्थ्य इतके दांडगे. कधी पोटदुखी नाही, आमांश नाही, घशात जळजळ नाही किंवा सर्दी पडसे, खोकला इत्यादि छातीचे आजार नाहीत. इ. स. १९१८–१९ सालची इन्फ्लुएन्झाची भयंकर साथ; घरातली बाकीची सगळी माणसे तिने पछाडली. पण नानांना काही झाले नाही. तसे ते कधीच आजारी पडले नाहीत असे नाही. दोषी तापाने एक दोनदा त्यांना गाठले होते. पण त्यातून ते लवकर बरे झाले. एक वैगुण्य त्यांच्या शरीरात राहिले होते. ते नसते तर ते शतायुषी झाले असते. त्यासंबंधाने पुढे योग्य स्थळी सांगेन.

माझी आई शरीरप्रकृतीने नानांच्या सारखी सुदृढ नव्हती. तिचे शरीर थोडेबहुत मांसल होते, माझ्याप्रमाणे किरकोळ नव्हते. आमांश, पोट दुखी, वगैरे व्यथा तिला होत्या आणि छातीचा अशक्तपणाही होता. तिच्या अशक्त प्रकृतीचा वारसा मोठ्या प्रमाणात माझ्याकडे आला आहे यात काही शंका नाही. तिला रूप अगदी नव्हते. तिच्या गुणांनी ती सर्वांना हवी हवीशी वाटे. गुणांनीच ती नानांना प्रिय झाली होती. तिचे दात थोडे पुढे आलेले होते व कपाळ लहान होते. भव्य कपाळ असलेली माणसे मोठी बुद्धिमान असतात असा एक समज आहे. माझ्या अनुभवावरून तो खरा ठरत नाही.

भटांच्या वाड्यातल्या रहिवाशांच्या वर्णनाचा हा कळसाध्याय असे आपण म्हणू. कारण त्या वाड्यात नानांच्या इतकी लक्षणीय व्यक्ति दुसरी कोणतीही नव्हती. त्यांच्यामुळे वाडा शोभिवंत होता, सनाथ होता. वाड्यातले ते एकुलते एक 'ग्राज्वेट' होते. आणखी पुष्कळ पुष्कळ होते. त्याचप्रमाणे आईची योग्यताही वाड्यातली सर्व मंडळी जाणत होती, मानीत होती; करणे सवरणे, शिवणे टिपणे इत्यादि गृहिणी–कृत्यांमधील तिची निपुणता कोणासही दिसून येण्याजोगी होती. ती कशीदा उत्तम काढीत असे. आजकाल ती कला कुठे दिसत नाही. तिची धार्मिकता स्तोत्रपाठ, कुळधर्म कुळाचारांचे श्रद्धापूर्वक पालन इत्यादिकांतून व्यक्त होत असे. प्रेमाने माणसे जोडण्याची कला तिला साधलेली होती, जी फार थोड्या लोकांना, विशेषतः स्त्रियांना, साधलेली असते. तेव्हा आई नाना ही त्या वाड्याची भूषणे होती असे म्हणण्यात काही अतिशयोक्ति नाही.

या भटांच्या वाड्यात माझा जन्म झाला. आम्ही या वाड्यात थोड्याशा अंतराने तीनदा होतो. मुंबईहून एल्फिन्स्टन कॉलेजातून बदली होऊन नाना इ. स. १८९५ साली पुण्यास आले. घरासाठी बराच शोध करून, अखेरीस या भटांच्या वाड्यात बिऱ्हाड करण्याचे त्यांनी ठरविले. एक सारखे १२ वर्षे, म्हणजे

१९०७ पर्यंत त्यांचे बिऱ्हाड या वाड्यात होते. घराची निवड त्यांनी सर्व बाजूंनी विचार करून केली असल्यामुळे बिऱ्हाड बदलण्याचा प्रश्न त्यांच्यापुढे कधी उपस्थित झाला नाही. १९०७ साली पुण्याहून बदली होऊन त्यांना धुळे नाशिक या ठिकाणी जावे लागले. १९०९ मध्ये आणि १९१० च्या सुरवातीस आम्ही पुण्यास आलो ते या भटांच्या वाड्यातच. आमच्याकरिता अगत्याने जागा रिकामी करून देण्यात आली. ती पूर्वीचीच नव्हती, पण पूर्वीप्रमाणे खाली आणि माडीवर दोन्ही ठिकाणी होती दुसऱ्या खेपेस जी माडी होती तिचा जिना फार अरुंद पायऱ्यांचा होता. त्याच्यावरून मी तर एकदोन वेळा पडलोच होतो; नानाही एकदा घसरले होते. त्यांची कंबरदुखी तेव्हापासून सुरू झाली असावी. निदान तिला ते एक कारण असावे, अशी माझी कल्पना आहे.

नानांची रसिकता

नानांनी संसार अतिशय रसिकतेने केला. सर्व इंद्रियांचे विषय त्यांना प्रिय असत. पण त्यांच्या उपभोगाकरिता शुद्ध धर्माच्या आणि नीतीच्या मार्गापासून ते यत्किंचितही विचलित झाले नाहीत. घ्राणेंद्रियाच्या तृप्तीसाठी त्यांना अत्तरे प्रिय असत, त्यांची त्यांना उत्तम पारख होती. हीना, वाळा, मोगरा, गुलाब इत्यादि देशी अत्तरांची पेटी कनोजहून दिवाळीच्या सुमारास मागविण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्या वेळी सुरंगी आणि मालती या नावाची विलायती सेंटपासून तयार केलेली अत्तरे लोकप्रिय होऊ लागली होती. त्यांचा उग्र वास त्यांना आवडत नसे, ते त्यांचा तिरस्कार करीत. अत्तरांप्रमाणे बेलिया, चमेली ही सुगंधी तेले धुळ्याला आम्ही असताना उन्हाळा पडला होता. तो पुण्यापेक्षा कडक. तिथे ताडाचे पंखे, वाळ्याचे पडदे वगैरे सरंजाम आमच्या घरी उपस्थित झाला असल्याचे मला आठवते.

कर्णेंद्रियाविषयी काय सांगावे? ते संगीताचे तज्ञ होते. गाणे ऐकावयाला नेहमी जात असत. त्यांच्या संगीतातील कार्याविषयी जरा विस्ताराने लिहिण्याचा माझा विचार आहे. तेव्हा इथे अधिक लिहीत नाही. भोजनासंबंधी त्यांच्या सारखा चोखंदळपणा मी दुसऱ्या कोणाचाही पाहिला नाही. पानात रोज डाव्या बाजूला चटणी, एक दोन कोशिंबिरी आणि उजव्या बाजूला एक दोन भाज्या; कढी केलेली असली तरी तुरीच्या डाळीची किंवा मिसळीची आमटी पाहिजेच. उत्तम आंबेमोहोर तांदुळाचा भात, की पानात वाढल्यावरोबर ज्याचा सुगंध दरवळावा; त्यावर घरी कढवलेल्या लोण्याचे भरपूर तूप; या प्रमाणे जेवणात पदार्थ असावयास पाहिजेत. सगळे अन्न व्यवस्थित, बेताचे शिजलेले असले पाहिजे. नाहीतर भात म्हणजे वैष्णवी भात, पोळ्या म्हणजे चामड्याचे तुकडे, असे विघडलेल्या पदार्थांचे वर्णन ते करीत असत. वैष्णवी भात म्हणजे कसा? वरती न शिजलेले तांदूळ म्हणजे अक्षता, मधे शिजून लगदा झालेला ते उगाळलेले गोपीचंदन आणि खाली करपून कोळसा झालेला तो अंगारा! भात कसा असावा, तर जणू मोगऱ्याच्या कळ्या. फार फडफडीत नव्हे, पण मोकळा आणि मऊ लुसलुशीत. चटणी म्हणजे वाटून वाटून तिचे गंध होता कामा नये, किंचित अर्धवोवडेपणा तिच्यात असावा, तर ती जास्तीत जास्त रुचकर होते. प्रत्येक तोंडी लावण्यामध्ये तिखट मीठ मसाला तेल इत्यादि योग्य प्रमाणात पडले आहे की नाही याची सूक्ष्म छाननी रोज व्हावयाची. काही कम जास्त झाले असल्यास त्यावर विनोदी टीका व्हायची हे ठरलेले. अशी त्यांची टीका नेहमी चालत असल्यामुळे घरातल्या बायकांना स्वयंपाक मन लावून उत्तम करण्याचे वळण लागले होते. 'अन्नं ब्रह्मेति व्यजानात्' हे उपनिषदातील वचन आणि 'अन्नमय प्राण, प्राणमय पराक्रम' ही आपली म्हण त्यांच्या तोंडी असे. हातून कर्तबगारी किंवा पराक्रम होण्यास जेवण उत्तम पाहिजे. याची अभावात्मक बाजू सध्या आपण पाहतच आहो.

त्यांना अन्नधान्याची पारख फारच उत्तम होती. त्या वेळेस धान्यही निरनिराळ्या प्रकारचे आणि चांगल्या दर्जाचे मिळत असे पुण्यासारख्या आंबेमोहोर तांदुळाच्या आगरात वास्तव्य असल्यामुळे आंबेमोहोराच्या निरनिराळ्या परी व प्रती यांची त्यांना उत्कृष्ट पारख होती.

उत्तम तांदुळाचा भात लागेल तितका, त्यावर वरण आणि तूप भरपूर, असे जेवण आता स्वप्नवत् झाले आहे. भात खाणे प्रतिगामीपणाचे लक्षण मानले जाऊ लागले आहे. पिढ्यान् पिढ्या ज्यांचे पिंड मद्यमांसापासून अलिप्त राहिले त्यांनी देखील मद्यमांसावर ताव मारून झोकांड्या खात फिरणे हे आज पुरोगामित्वाचे लक्षण आहे. म्हणजे सुमारे एक शतकापूर्वी सुधारकांनी सुशिक्षित वर्गाला जी अवस्था आणली होती तिची

पुनरावृत्ती आज मोठ्या प्रमाणावर होत आहे. असा स्वैर आचार करून हे कोणता पराक्रम गाजवीत आहेत तो अजून गुलदस्तातच आहे !

भोजनाच्या बाबतीत नानांचा चोखंदळ रसिकपणा या प्रमाणे वर्णनीय असला तरी जिभेचे चोचले त्यांनी कधीही केले नाहीत. त्यांचा आहार तसा चांगला होता. पण कोणताही पदार्थ कितीही चांगला झालेला असो किंवा कितीही आवडते पक्वान्न पानात येऊन पडो, ठरीव प्रमाणापेक्षा जास्त आहार त्यांनी कधीही घेतला नाही. मला जशी आठवण आहे तेव्हा पासून परान्न त्यांनी वर्ज्य केले होते. कार्यप्रसंगानिमित्त बाहेरची जेवण्याची बोलावणी येत. परंतु ते कधीही परघरी पंक्तीत जेवायला गेले नाहीत. परान्न वर्ज्य केले आहे म्हणून स्वच्छ सांगत असत. मी या बाबतीत कच्च्या दिलाचा आहे. मला भीड तोडवत नाही. वास्तविक माझी पचनशक्ति अधू. जेवणाचे बोलावणे शक्य तितके मी टाळतो. पण केव्हा केव्हा पंक्तीत जेवायला जाऊन पोटाच्या तक्रारींना जवळ करीत असतो.

' पवित्र ते कुळ '

' मुळारंभ मला पुण्यापासून केला पाहिजे ' असे मी म्हटले; कारण माझ्या सर्वांत जुन्या आठवणी पुण्याच्या आहेत. पण नानांच्या आयुष्यात पुणे बऱ्याच उशिरा, पसतीस सदतिसाव्या वर्षी आले. तेथपर्यंतच्या त्यांच्या आयुष्यातील घटना आणि अनुभव ते पुष्कळदा सांगत असत. स्वैरकथालापांमधून या गोष्टी गमतीदार रीतीने बाहेर पडत. त्या जशा आठवतात तशा जर मी सांगितल्या नाहीत तर त्यांच्या स्मृतीशी प्रतारणा केल्याप्रमाणे होईल आणि यशापयशाच्या उंचसखल वाटेने चालत गेलेल्या एका धीरोदात्त चरित्रापासून वाचकांना वंचित केल्याप्रमाणे होईल. शिवाय त्यांनी आपले संक्षिप्त जीवनचरित्र स्वत: लिहून ठेवले आहे. त्यात त्यांनी केलेल्या वार्तालापांची मिळणी करून एक गोड कीर्तन सादर करता आल्यास पाहावे असा मनोदय आहे.

पुणे नानांना आवडे, पण त्यांना खरा अभिमान मिरजेचा होता. आमचे पूर्वज बनहट्टीहून केव्हातरी, सुमारे दोनशे वर्षांपूर्वी, मिरजेस आले. बनहट्टी हा गाव जमखंडीहून सुमारे आठ मैलावर पश्चिमेस आहे. तेथून ते मिरजेस केव्हा आले आणि का आले या संबंधाची साधार माहिती उपलब्ध नाही. वडील वेळोवेळी जे सांगत त्याची तत्कालीन इतिहासाशी सांगड घालून मी काही अंदाज करतो. तो असा : कर्नाटकाचा मुलूख पेशव्यांनी जिंकला त्या पूर्वी तेथे पाळेगार देसायांचा अंमल चालत असे. असे पाळेगार दहा पंधरा कोसांचा मुलूख व्यापून त्यातील एखाद्या ठिकाणी गढी वगैरे बांधून जमेल तेवढी शिबंदी ठेवून अंमल करीत असत. कारभार चालविण्याकरिता त्यांच्या पदरी काही मुतालिक कारभारी इत्यादि मंडळी असत. पेशव्यांनी हा मुलुख जिंकला तेव्हा ठिकठिकाणच्या या देसायांना जिंकले; ते उध्वस्त झाले आणि त्यांच्या पदरची मंडळी दुसरीकडे आसरा मिळविण्याच्या उद्देशाने परागंदा झाली. आमचे पूर्वज बनहट्टी गावच्या देसायांचे मुतालिक किंवा कारभारी होते. तेथून ते मिरजेस येऊन स्थाईक झाले. मिरजेस त्यांनी सराफीचा व्यवसाय सुरू केला. त्या काळात हा तेजीत होता. निरनिराळ्या सरकारांची निरनिराळी नाणी, म्हणजे रुपये अस्तित्वात असत. त्यांची अदलाबदल करून देऊन त्यावर ही सराफ मंडळी वटाव घेत असत. याशिवाय सोन्याचांदीचा व्यवहार असेच, पण तो बेताचा. पुढे कंपनी सरकारचा अंमल सगळीकडे जारी होऊन त्याचा रुपया सर्वत्र प्रचलित झाला आणि बाकीच्या सरकारांचे रुपये प्रचारातून गेले, तेव्हा सराफांची स्थिती खालावली. काही घराणी बसली, काही इतर व्यवसायात शिरली.

आमची मंडळी बनहट्टीहून मिरजेस आली त्यानंतर एका पिढीच्या अवकाशातच हा बदल घडून आला असला पाहिजे. बनहट्टीहून आलेले म्हणून यांना मिरजेत बनहट्टी म्हणू लागले.

....माझ्या आजोबांचे नाव दास. दास नाव ठेवण्याची कर्नाटकात पद्धत आहे. अर्थात परमेश्वराचा म्हणजे विष्णूचा दास. परमेश्वराचे नाव अध्याहृत धरून विशेषणात्मक नावे ठेवण्याची पद्धत इतरत्र देखील आहे. सेवक, वल्लभ इत्यादि नावे आढळतात. पण नानांनी दास याचे संस्कृतात दशरथ केले. त्यांनी संपादिलेल्या संस्कृत पुस्तकांमध्ये स्वत:ला दशरथात्मज, दशरथसूनु असे म्हटले आहे.

सराफी व्यवसाय घसरल्यामुळे घरची परिस्थिती ओढघस्तीची झालेली. तेव्हा ह्या परमेश्वराच्या दासाला माणसांचे दासत्व पत्करणे भाग पडले. काही दिवस उमेदवारी केल्यानंतर दासोपंताना मिरज संस्थानचे

अधिपति पटवर्धन यांच्या खाजगीकडे नोकरी लागली. सुरवातीस त्यांना दरमहा तीन रुपये वेतन मिळत होते. पुढे चढत चढत अखेरीस ते खाजगीत चिटणीस झाले. शेवटी शेवटी १९०१ साली त्यांना दरमहा १२ रुपये मिळत, शिवाय महागाई १॥ रु. मिळत असे, असे त्यांच्या हातच्या जमाखर्चावरून दिसते. दासोपंतांना मुले पुष्कळ झाली. नानांनी तयार केलेला छोटासा वंशवृक्ष माझ्या डोळ्यासमोर आहे, त्यात दहाजणांचा निर्देश आहे. पैकी प्रौढ वयापर्यंत टिकलेली सहाजण दिसतात. मी पाहिलेली आणि ज्यांचे मला स्मरण आहे अशी नानांखेरीज फक्त तिघे, एक काका आणि दोघीजणी आत्या. दीर्घायुषी झाली फक्त दोघे, एक नाना आणि दुसऱ्या गोदू आत्या. या ६५ वर्षांच्यावर जगल्या. त्यांचे जावई प्रोफेसर त्र्यंबक कृष्णाजी देवळालकर यांच्या घरी त्या धारवाड येथे वारल्या. या पुष्कळ वर्षे आमच्या घरी होत्या, तेव्हा यांच्या संबंधी काहीना काही सांगण्याचा प्रसंग पुढील वृत्तांतात अनेकवार येईल.

नानांचा जन्म इ स. १८५८ मध्ये झाला की १८६२ मध्ये झाला याचे मला कोडे पडले आहे. सरकारात कागदोपत्री लागलेला त्याचा जन्मसन १८६२ हा. त्या प्रमाणे वयाची गणती होऊन ते सेवानिवृत्त झाले. पण नोकरीत पुष्कळांचे जन्मसन पूर्वी चुकीचे लागत असत. आम्ही बोलत असता ते असे म्हणाल्याचे आठवते की " मुळात इंग्रजी शाळेत जन्मसन चुकीचा लागला कारण तो त्या वेळी अंदाजाने दिला होता. पण आता जन्मपत्रिका घरच्या कागदपत्रात सापडली आहे त्यावरून जन्मसन १८५८ हा ठरतो. " त्यांनी आपला त्रोटक जीवनवृत्तांत लिहिला आहे. त्यात १८५८ आणि १८६२ असे दोन्ही सन दिले आहेत. पक्क्या प्रतीत प्रथम ६२ असे लिहिले असून त्यावर ५८ केले आहे. इतके जर आहे तर १८५८ या सनाविषयी शंका काय म्हणून ? पण संशोधकीय दृष्टि स्वस्थ बसू देत नाही. मॅट्रीकची परीक्षा नाना १८७९ साली उत्तीर्ण झाले, हे ठाम आहे. जन्मसन १८५८ धरला तर मॅट्रीक होईपर्यंत एकवीस वर्षे होतात. प्रत्येक वर्गात पहिला नंबर मिळविणाऱ्या, एक सारखा पास होत गेलेल्या मुलाचे मॅट्रीक होते वेळी एकवीस वर्षांचे वय असावे हे असंभवनीय वाटते. पाचव्या वर्षी शिकायला लागलेला सारखा पास होत गेलेला मुलगा सोळाव्या वर्षी मॅट्रीक होतो. म्हणजे पाच वर्षांचा गाळा उरतो. नाना मराठी सहावीतून इंग्रजीकडे गेले. ती दोन वर्षे वजा केली तरी तीन वर्षे उरतात. त्याकरिता पाचव्याच्या ऐवजी आठव्या वर्षी नानांच्या शिक्षणास सुरवात झाली असे मानावे लागते. १८६२ साली जन्म मानल्यास मॅट्रीकच्या वेळचे वय सतरा येते. यात काही असंभवनीयता नाही. दुसऱ्या एका दृष्टीने पडताळा पाहता १८५८ ला बळकटी येते. माझ्या समोर असलेल्या वंशवृक्षात नारायण आणि विष्णू या अपत्यांच्यामध्ये राम आणि भीम अशा आणखी दोन भावांची नावे लिहिली आहेत. विष्णूचा जन्म १८६६ हा निश्चित. तेव्हा नारायणाचा (नानांचा) जन्म १८६२ मध्ये होऊन मध्यंतरीच्या चार वर्षांत दोन अपत्ये झालेली असणे जवळ जवळ अशक्य. ह्या बाईचा पाळणा कमीत कमी दोन वर्षांचा दिसतो. कुठे कुठे तीन वर्षांचा खंड आहे. तेव्हा नारायण आणि विष्णु यांच्या मध्ये कमीत कमी सहा वर्षांचे अंतर असावयास पाहिजे. तेव्हा १८५८ या जन्मसनाचे आधार अधिक बळकट. 'शिक्षणाच्या दृष्टीने मध्यंतरी तीन वर्षांचा गाळा उरतो. घरच्या गरिबीमुळे आणि प्रकृतीच्या अशक्तपणामुळे शिक्षणाचा प्रारंभ होण्यास तीन वर्षे विलंब झाला असेच मानले पाहिजे. ते लहानपणी बरेच अशक्त होते आणि घरची सांपत्तिक स्थिति निकृष्ट होती हे सत्य आहे. तेव्हा असा विलंब होणे अगदी शक्य आहे.

वास्तविक इतका तर्क आणि साधक बाधक विचार करण्याची जरुरी पडण्याचे काही कारण नव्हते. नानांनी शेवटच्या दिवसात आपली जन्मकुंडली व पत्रिका मला दाखविली होती असे स्मरते. पण त्यांच्या मृत्यूनंतर आमच्या मिरजेच्या घरात पुस्तके, कागदपत्र यांचा मोठा विध्वंस झाला. त्यात त्यांची पत्रिका, पत्रव्यवहार आणि इतर पुष्कळ चरित्रोपयोगी सामग्री नष्ट झाली. सुदैवाने त्यांनी लिहिलेले तीन स्वविषयक लेख, वंशवृक्ष आणि काही जमाखर्च व तुरळक कागदपत्र एवढे हाती लागले. स्वत:च्या आठवणींमध्ये या सामग्रीमधून मिळणाऱ्या माहितीची भर घालून प्रस्तुत लेख सिद्ध केला जात आहे.

बनहट्टींच्या घराण्यात नाना कुलदीपक निघाले, यात शंका नाही. त्यांनी कुळाचे नाव उजळ केले, त्याला आर्थिक विपत्तीतून बाहेर काढले, त्यातील प्रत्येक माणसाला सुखी करण्याचा अटोकाट प्रयत्न केला आणि

सगळ्यांकडून धन्य म्हणवून घेतले. तीव्र बुद्धिमत्तेला अपार परिश्रमांची जोड देऊन केवळ शिष्यवृत्त्यांच्या आधारावर आपला शिक्षणक्रम नामांकित रीतीने तडीस नेला; निरपेक्ष ज्ञानोपासनेची वृत्ति बाळगून गाढ पांडित्य संपादन केले आणि मुक्त हस्ताने विद्यादान करून दुर्मिळ आदर्श समाजापुढे उभा केला. आपल्या समाजात कृतज्ञतेचा गुण खऱ्या रीतीने वसत नाही. त्यामुळे समाजावर काही एक विशिष्ट ठसा उमटवून गेलेल्या व्यक्तींचे स्मरण राखण्याचे काम नीटसे होत नाही. आम्ही एकतर विभूतिपूजक आहो किंवा ढोलके बडविणाराच्या भोवती गोळा होणारे तमासगीर आहो. नेतृत्वाच्या शिखरावर गेलेल्या महापुरुषांची आम्ही पूजा बांधतो. विवेचक बुद्धीने त्यांच्या चारित्र्याचा रस आपल्या जीवनात मुरविण्याचा आम्ही कधी प्रयत्न करीत नाही. आणि प्रसिद्धिसाधनांची सूत्रे ज्यांच्या हाती असतात अशी मंडळी ज्यांचे पडघम वाजवावयाचे ठरवितात त्यांचा वारेमाप गाजावाजा करण्यात आम्ही हिरिरीने सामील होतो. लाट येते आणि जाते. आम्ही आपले जियल्या तिथे !

नानांचा विद्याभ्यास – त्या काळातील गमती !

स्वतःच्या शिक्षणाचा वृत्तांत नानांनी मनोरम रीतीने लिहिला आहे. सन १८६३ साली नव्याने सुरू झालेल्या सरकारी शाळेमध्ये त्यांचे मराठी शिक्षण झाले हे आपणाला त्यावरून समजते. हे स्वतः शाळेत कोणत्या वर्षी दाखल झाले ते नक्की साल वृत्तांतात आढळत नाही. इथे वर्षांच्या गणनेचा काही तरी घोटाळा आहे. १८६३ साली हे शाळेत गेले असे मानिल्यास १८७५ पर्यंत १२ वर्षे होतात. वृत्तांतात लिहिल्याप्रमाणे मराठी शाळेच्या यांनी ५ यत्ता केल्या तरी मराठीच्या ५ व इंग्रजीच्या ३ मिळून ८ वर्षे होतात. तेव्हा शाळा ६७ साली सुरू झाली असली पाहिजे किंवा हे तरी शाळेत ६७ साली गेले असले पाहिजेत. आजारामुळे एखादे वर्ष वाया गेले असे मानिले तरी १८६६ हे वर्ष येईल. लहानपणी हे अशक्त व आजारी असत आणि घरची स्थिति गरिबीची, त्यामुळे प्राथमिक पाच आणि इंग्रजी तीन यत्तांचे शिक्षण संपवायला अधिक काळ लागला असणे संभवनीय आहे. या काळाचा उपयोग मात्र त्यांनी फार चांगला करून घेतला. जीवनचरित्रात लिहिल्याप्रमाणे उर्दू, फारसी व कानडी या भाषांचे ज्ञान यांनी करून घेतले. उत्तर वयात आम्ही पाहत होतो तेव्हा नाना उर्दू बोलू व वाचू शकत असत हे आम्हांला दिसे. कानडी बोलताना, वाचताना कधी पाहिल्याचे आठवत नाही. बोललेले समजत असे हे मात्र खरे.

इंग्रजी तिसऱ्या यत्तेच्या परीक्षेत नानांचा पहिला आणि त्यांचे थोरले बंधु अण्णा यांचा दुसरा नंबर आला. विठ्ठल उर्फ अण्णा नानांपेक्षा दोन वर्षांनी वडील. त्यांचे खेळण्याकडे लक्ष जास्त, अभ्यासाकडे कमी; म्हणून ते नानांच्या बरोबरीला आले. दोघांना कोल्हापुरास जाऊन पुढील शिक्षण घेण्याकरिता पाच पाच रु. ची 'एक्झिबिशन' म्हणजे शिष्यवृत्ति मिळाली. दोघे कोल्हापुरास गेले. अण्णा मॅट्रिकचा उंबरठा ओलांडू शकले नाहीत. नाना १८७९ साली मॅट्रिक होऊन १८८० च्या आरंभी कालेजात गेले.

कोल्हापूरच्या कित्येक गमती नानांच्या सांगण्यात येत. मिरजेहून ३० मैल. जायला दीड दिवस लागायचा पुण्याहून मिरजेला आगगाडीचा पत्ता नव्हता, तर कोल्हापूरला कुठली असणार? दोघा मुलांना घेऊन दादा कोल्हापुरास गेले. राहण्याची व्यवस्था कुठे केली हे सांगितलेले आठवत नाही. पण जेवणाची व्यवस्था एका काकूच्या खाणावळीत केली, हे नानांनी सांगितलेले आठवते. माणशी दरमहा दर ३ किंवा ४ रुपये होता. तुपाकरिता चार आणे जास्त. त्यावेळी कोल्हापुरात मिरजेच्या लोकांची खादाड म्हणून प्रसिद्धि झाली होती. मिरजेचे काही तरणे बांड कोल्हापूर पाहण्याकरिता गेले होते. एका खाणावळीत जेवायला गेले. पक्वान्न काय कराल म्हणून खाणावळीण बाईला विचारले. बेसनाचे लाडू ठरले. मिरजमल्लांनी बजावले, आम्ही जितके मागू तितके तुम्ही वाढले पाहिजेत, तक्रार करता उपयोगाची नाही; किती पैसे घ्याल सांगा. बाईला वाटले, खाऊन खाऊन किती खातील? दरेक जण फार तर १५/२० लाडू खाईल. तिने होकार भरला, पैसे सांगितले व त्या अदाजाने डाळीचे पीठ, तूप, साखर इत्यादि तयारी केली. मंडळी जेवायला बसली. प्रत्येकी पाच, दहा, पंधरा लाडू कोठच्या कोठे गेले. वाढायला आणा, म्हणून मंडळींनी कल्ला सुरू केला. त्यावेळी दिलेल्या शब्दाला जागणे पवित्र कर्तव्य समजले जात असे. पोटभर न वाढता पानावरून उठविणे हेही शिष्टाचाराला विरुद्ध. बाई म्हणाल्या, 'पीठ संपले, आता लाडू कुठचे करू?'

मंडळी म्हणाली, 'हरकत नाही, डाळ आणून दळून घ्या, आणि लाडू करा, तोपर्यंत आम्ही बसतो.' मंडळी तिष्ठत बसली आणि भरपूर जेवण वसूल करून घेतले तेव्हाच उठली. असा प्रकार घडल्यापासून कोल्हापूरच्या खाणावळवाल्यांना मिरजेच्या लोकांची दहशत बसली होती. नाना ही हकीकत मोठ्या चटकदार रीतीने सांगत असत.

पण दादांच्या (दासोपंतांच्या) कोल्हापुरात ओळखी होत्या. त्यामुळे त्यांना चांगली खाणावळ मिळण्यास विशेष त्रास पडला नाही. इंग्रजी शाळेत शिकणारी मुले, अभ्यासाखाली बेजार, ती कितीसे खाणार, असाही विचार खाणावळवाल्याने केला असेल. मुलांना शिळेपाके वाढू नका, तूप दूध भरपूर द्या, रात्रीच्या जेवणात दही देऊ नका असे खाणावळवाल्याला दादांनी बजावून सांगितले, आणि ते मिरजेला परतले.

मिरजेहून 'एक्झिबिशन' उर्फ शिष्यवृत्ति मिळवून अण्णा व नाना हे दोघे बंधु कोल्हापुरास गेले; आणि तेथील राजाराम हायस्कुलात प्रविष्ट झाले. पण तेथील शिक्षणाची तड एकानेच लावली. अण्णाचे लक्ष खेळण्याकडे जास्त. आटापाटचा हुतूतू वगैरे खेळणे, भटक्या मित्रांबरोबर हिंडणे, इत्यादिकातच त्यांचा वेळ जायचा. गंजिफा, सोंगटचा हे बैठे खेळ खेळण्यातही स्वारी प्रवीण. जेमतेम मॅट्रिकच्या वर्गापर्यंत पोचून स्वारी थबकली आणि मिरजेस घरी परत आली. त्यांना मिरज संस्थानात १८८० साली नोकरी लागली. अखेरपर्यंत त्यांचा काळ मिरजेच्या घरात गेला.

नानाने मात्र बुद्धिमत्तेला व्यासंगाची जोड देऊन शिक्षणाची तड गाठली. उत्कृष्ट अभ्यास करून वर्गात त्यांनी पहिला नंबर मिळविला आणि शेवटपर्यंत तो टिकविला. इतर सर्व विषयांतले प्रावीण्य कायम राखून संस्कृताचा विशेष अभ्यास त्यांनी केला. मॅट्रीकची परीक्षा होईपर्यंत संस्कृतातील कोण कोणचे ग्रंथ त्यांनी वाचून काढले याची माहिती त्यांनी स्वतः आपल्या जीवन चरित्रात दिली आहे. केवळ मॅट्रीक पर्यंत संस्कृताचे एवढे वाचन विस्मयकारक म्हटले पाहिजे. संस्कृतामध्ये कविता रचण्याची स्फूर्ति होऊन अनेक काव्ये त्यांनी या काळात रचिली. त्यापैकी काहींच्या हस्तलिखित प्रती मध्यंतरीच्या विध्वंसातून वाचून टिकून राहिल्या आहेत.

ही काव्ये कोणत्या प्रसंगाने रचिली त्याची हकीकत नानांनी दिली आहे तिच्यावरून मला नाटयाचार्य गोविंदराव देवलांवर लिहितांना त्यांच्या जीवनातील काही घटनांचा अनुक्रम निश्चित करता आला. कोल्हापुरास प्रयागतीर्थावर पौष अमावास्येला यात्रा भरत असे इ. स. १८७६ मधील यात्रेच्या प्रसंगी देवलांनी 'विधवादुःखवर्णन' या विषयावर कविता करून बक्षीस मिळविले होते. त्याच्या पुढच्या दोन्ही वर्षी म्हणजे १८७७ व ७८ साली अनुक्रमे 'दुष्काळवर्णन' आणि 'हिमागमवर्णन' या कविता संस्कृतामध्ये रचून नानांनी बक्षिसे मिळविली. कविता मराठीतच करावयाच्या असा नियम असूनहि तो यांच्या बाबतीत बाजूला सारण्यात आला, यावरून यांच्या व्यासंगाविषयी शाळेत किती आदर होता व यांच्या कविता किती चांगल्या होत्या याचे अनुमान होऊ शकते.

सर्व विषय उत्तम, सर्वांमध्ये अप्रतिहत गति, असे असता नानांनी संस्कृताकडेच विशेष लक्ष कसे वळविले असा प्रश्न उत्पन्न होतो. त्या काळी ब्राह्मणांच्या कुलांमध्ये संस्कृताची परंपरा जिवंत होती. आणि बुद्धिमान व अभ्यासू मुलांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्त्यांचे विशेष आकर्षण असे कोल्हापूर हे महालक्ष्मीचे स्थान, दक्षिण काशी अशी त्याची ख्याति, त्यात आणखी छत्रपतींचा आश्रय, त्यामुळे संस्कृत विद्येचे ते त्या काळी महत्त्वाचे पीठ होते. घरातले धार्मिक संस्कार आणि जुन्याला धरून चालण्याचे वळण यांमुळे संस्कृताविषयी आदर नारायणाला मूळचाच होता. तेव्हा त्याने कोल्हापुरातील वातावरणाचा व सोयींचा उत्सुकतेने फायदा घेतला. तिथे तो एका शास्त्रीबुवांच्या कडे संस्कृताच्या विशेष अध्ययनासाठी जात असे. (नाव माझ्या लक्षात नाही.) या वयात संस्कृताविषयी जी आवड त्याच्या मनात निर्माण झाली ती अखंड टिकली आणि वाढत गेली. अनेक क्लेशकारक प्रसंगांतून निभावून नेऊन तिने त्यांच्या मनाचे बळ कायम राखले.

कोल्हापुरामध्ये विधवा बाया आणि भिक्षुक वर्ग यांचा अनाचार कसा त्या काळात चालत असे याचे वर्णन नाना केव्हा केव्हा करीत. तो काळ अंधळ्या श्रद्धेचा असल्यामुळे धर्माच्या नावावर भिक्षुक वर्गाची चंगळ

अनुक्रमणिका

चालत असे. कोल्हापूर सुप्रसिद्ध क्षेत्र; धर्मकार्याकरिता तेथे येणारे लोक पुष्कळ. त्यांचा देकार सढळ हाताने चालावयाचा. अशा रीतीने परपुष्ट बनलेल्या भिक्षुक वर्गाला घाणेरडे चाळे न सुचले तरच नवल. सगळाच उपाध्याय वर्ग असा होता अशातला भाग नाही. सदाचारी वैदिक, भिक्षुक आणि शास्त्रीपंडित होते; आणि त्यांच्या आधाराने खरे ब्राह्मण्य जिवंत होते.

नानांचे स्नेही सोबती

नवी होतकरू पिढी उदयाला येत होती ती सदाचार आणि सद्विचार यांची बूज राखणारी होती. नानांच्या बरोबर किंवा त्यांच्या थोडे आगेमागे पुष्कळ तरुण मंडळी होती की जी नंतर कोल्हापुरास पुष्कळ प्रसिद्ध झाली व जिने तेथील जीवन समृद्ध केले. विश्वनाथराव गोखले बरेच पुढे होते. नाना कालेजात जाण्याकरिता निघाले तेव्हा ते बी. ए. ची पदवी घेण्याकरता चालले होते. हे पुढे एल्‌एल्. बी. होऊन कोल्हापुरास मुख्य न्यायाधीश झाले. भाऊराव पोतनीस, रामचंद्र नारायण पंगु हे नानांच्या अगदी बरोबरीचे. हे पुढे कोल्हापुरास प्रसिद्ध वकील झाले. कृष्णाजी नारायण पंडितराव हे थोडेसे मागे होते. हे बुद्धिमान व तरतरीत असून पुढे बी. ए. एलएल. बी. झाले व गोखल्यांच्या मागाहून संस्थानचे मुख्य न्यायाधीश झाले. हे सगळे नानांच्या स्नेह्यांपैकी. सर्वांशी त्यांचा स्नेह अखेरपर्यंत कायम राहिला. आणखी एक व्यक्ति विशेष उल्लेखनीय, जिने आपल्या ध्येयवादी जीवनक्रमाने महाराष्ट्राच्या इतिहासावर चिरस्थायी ठसा उमटविला. ती व्यक्ति विष्णु गोविंद उर्फ अण्णा विजापूरकर ही होय. यांचे संस्कृत उत्तम असल्यामुळे यांची व नानांची मैत्री जमली. स्वभाव सोज्वळ; पण धांदरट. वागणे देशस्थीपणाचे. काही कामासाठी बाहेर पडायचे म्हणजे अगोदर कपडे हुडकायचे; सदरा कुठे आहे, उपरणे कुठे आहे, रुमाल कुठे आहे, इत्यादि. आणखी एक मजेदार सवय म्हणजे कुठे कामासाठी बाहेर निघाले की अगोदर बहिर्दिशेला जाऊन येण्याची. बरोबरच्यांना म्हणायचे, 'अरे थांब आलोच'; आणि कानावर जानवे ठेवून तांब्या घेऊन पळायचे! 'काव्यप्रकाश' नामक साहित्यशास्त्राच्या ग्रंथाच्या सुरवातीस 'ग्रंथारंभे विघ्नविघाताय समुचितेष्ट देवतां स्तौति' असे वाक्य आहे. त्यावरून मित्रांनी या प्रकाराला 'ग्रंथारम्भे' असे नाव दिले होते. 'अण्णा, आपल्याला बाहेर जायचे आहे, ग्रंथारम्भे आटपून घ्या!' कुठे प्रवासाला जायचे असले म्हणजे शेवटपर्यंत यांचे आटपायचे नाही. अंगरख्याचे बंद बांधायचेच आहेत, डोक्याला रुमाल गुंडाळतातच आहेत अशा स्थितीत कसे तरी यांना गाडीच्या डब्यात कोंबायचे! असल्या त्यांच्या त्या काळातल्या गमती नाना प्रेमाने सांगत.

या लकबा नाना सांगत असत, त्यांवरून नानांना अण्णांच्या विषयी प्रेम नव्हते असे अनुमान काढायचे नाही. त्यांचा सोज्वळ स्वभाव आणि निर्मळ त्याग, देशभक्ति आणि कृतिशीलता यांच्याबद्दल नानांना जिव्हाळ्याचे प्रेम वाटत असे. मला तर त्यांच्याविषयी परमादर वाटत आला आहे. त्यांचा वैयक्तिक अव्यवस्थितपणा सदोदित उच्च विचारात मग्न असल्याचा निदर्शक होय.

> 'स्वधर्म स्वदेश स्वभाषादिकांचा'
> जगी मान व्हावा असा हेतु साचा ॥'

या हेतूमध्ये मन गढल्यामुळे बाह्य उपाधींकडे लक्ष नाही; असे ते देशभक्त साधु होते. अण्णांचा जन्म १८६३ सालचा; १८८० साली, म्हणजे नानांच्या नंतर एका वर्षाने ते मॅट्रिक झाले. त्या परीक्षेत दुसरी जगन्नाथ शंकरशेट त्यांनी हस्तगत केली. मध्यंतरी नोकरी करून ते १८८६ साली बी ए. झाले. त्यात भाऊ दाजी पारितोषिकाचे धनी झाले. त्यांनी पुढे फार मोठे कार्य केले. ग्रंथमाला मासिक (१८९४–१९०६), समर्थ वर्तमानपत्र, समर्थ विद्यालय आणि राष्ट्रीय शिक्षण, अशा त्यांच्या अनेकविध कार्य प्रणालीने राष्ट्राच्या प्रगतीत मोठी भर टाकली आहे. त्यांचे चरित्र इथे निवेदन करण्याचे कारण नाही.

अण्णांचा आणि माझा किंचित संबंध आला होता. अमदावादेस १९२१ साली कॉंग्रेस भरली होती. तिला, त्यावेळी कॉलेजरूपी महानीडातून किंचित पंख फुटून बाहेर पडत असलेला मी गेलो होतो. मंडपाकडे जात असताना एलिस पुलापाशी अण्णा विजापूरकर भेटले. मी नाना बनहट्टींचा मुलगा असे कळताच त्यांनी प्रेमाने माझ्याशी चार गोष्टी केल्या आणि नानांची विचारपूस केली. परत पुण्याला गेलास म्हणजे तळेगावास समर्थ विद्यालयात जरूर ये, म्हणून निमंत्रण दिले. रस्त्यात सहज केलेल्या सूचनेचा फायदा घेऊन मी काही दिवसांनी समर्थ विद्यालयात गेलो. अण्णांना

मागचे स्मरण होते. त्यांनी अगत्याने माझे स्वागत केले. एका सहायकाला सांगून सर्व विद्यालय दाखविण्याची व्यवस्था केली आणि जेवणाच्या पंक्तीत आपल्या जवळ मला बसवून घेतले. सर्व मुले सोवळ्याने बसली होती. त्यांची स्वत:ची घाबळी होती. मी सोवळ्याने होतो की ओवळ्याने होतो हे आता आठवत नाही. जेवताना प्रत्येकाने श्लोक म्हणायचा, असा नियम होता. सर्वांनी मराठी कविता म्हटल्या. माझ्यावर पाळी आली तेव्हा मी —

> कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां
> पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य ।
> विश्रामस्थानमेकं कविवर वचसां जीवनं सज्जनानां
> बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥

हा मोठा श्लोक म्हटला. त्यावर 'अरे, तुझ्या घरात चालत आलेलं संस्कृत तू इथं ओतलंस. पण आमची ही लहान मुलं; त्यांना काय कळणार? यांना मराठी पाहिजे. मराठी कविता, मोरोपंताची आर्या, वामनी श्लोक, काहीतरी म्हण.' मला वाटते, जेवण आटपत आले होते, त्यामुळे अण्णांची आज्ञा पालन करण्याचा प्रसंग टळला.

कोल्हापूरची दुसरी व्यक्ति म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले, यांचा आणि नानांचा बराच परिचय होता आणि यांच्यासंबंधी ते कित्येक गोष्टी सांगत. 'यांना कढीभात विशेष आवडायचा. जेवण अत्यंत जलद. पाच मिनिटांत जेऊन बाहेर पडायचे. इतकं घाईनं जेवणं चांगलं नाही, असं आम्ही पुष्कळदा सांगत असू, पण त्यांच्या या सवयीत बदल झाला नाही. सगळंच वागणं तातडीचं. स्वभाव चिरचिरा व तापट.' गोपाळराव पुढे फार वेगाने वर चढले. त्यांचा स्वभाव फार महत्त्वाकांक्षी; त्यावरोबर परिश्रम देखील दांडगा; बर्क, शेरिडन, मेकॉले इत्यादि विख्यात राजकारणी वक्त्यांची भाषणे त्यांनी पाठ केली होती. कित्येकदा आम्ही त्यांची पाठ केलेली भाषणे म्हणून घेतली आहेत, असे नाना सांगत असत. राजकारणात हे झपाट्याने पुढे आले आणि यांनी दिगंत कीर्ति मिळविली. इथे त्याविषयी अधिक लिहिण्याची जरुरी नाही.

नाना मॅट्रिकची परीक्षा देण्याकरिता १८७९ च्या नोवेंबरमध्ये कोल्हापुराहून सरळ बेळगांवास गेले. बेळगावास परीक्षेचे केंद्र नुकतेच सुरू झाले होते. तेथपर्यंतचा प्रवास बैलगाडीने चार दिवसांचा झाला. या प्रवासाचे आणि परीक्षेचे पेपर कसे लिहिले याचे वर्णन त्यांनी स्वत: केले आहे. परीक्षा देऊन ते परत कोल्हापुरास आले व निकालाची वाट पाहत बसले. त्याकाळात नोवेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात परीक्षा होई आणि निकाल डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात लागत असे. पेपर चांगले लिहिले असूनही जीव कसा टांगलेला होता याची अटकळ त्यांच्या लिहिण्यावरून होते. सर्व भवितव्य या निकालावर अवलंबून होते. त्यांच्या परिश्रमांना यावेळी दैवाची जोड मिळून निकाल चांगला लागला. कॉलेजमध्ये जाण्याची महत्त्वाकांक्षा मनामध्ये अंकुरली. पैशाचा प्रश्न भेडसावीत होता, तोही सुटला; आणि नाना २० जानेवारी १८८० रोजी मुंबईस एलफिन्स्टन कालेजात दाखल झाले. कोल्हापूरचे राजाराम कालेज तेव्हा सुरू झाले नव्हते.

नाना पुण्यास न जाता मुंबईस गेले, याची कारणे त्यांनी आपल्या जीवनचरित्रात सांगितली आहेत. पुण्यास त्यावेळी महामारीचा उपद्रव होता. शेजारचे कृष्णा रामू मुंबईस गेले होते. मिरजेस आमच्या घराशेजारी गोडबोले म्हणून राहत असत. त्यांच्या घरी अग्निहोत्र होते. त्यांचे मुलगे कृष्णाजी व रामचंद्र हे मुंबईस गेले होते. ते साधारणपणे नानांच्या वयाचे, एकदोन वर्षांनी आगेमागे असावेत. अग्निहोत्री बोवांचा आणि दासोपंतांचा विशेष घरोवा होता. दासोपंतांनी नानांना मुंबईला जायला सांगण्याचे विशेष कारण हे होते.

कालेजच्या खर्चाची सोय कशी झाली याची हकीकत नानांनी उत्तम रीतीने निवेदिली आहे. कोल्हापूरची आल्फ्रेड शिष्यवृत्ति द. म. २५ रु. ची होती आणि कॉलेजची शिष्यवृत्ति १० / १५ रु. ची असेल, याप्रमाणे द. म. ३५ / ४० रुपयांमध्ये कॉलेजचा खर्च, कसातरी का होईना, निभावून जाण्याजोगा होता. पण शिष्यवृत्त्यांची वार्ता नंतर कळली, त्याच्या अगोदर मिरजेहून मुंबईला जायचे म्हणजे खर्चाची तरतूद करणे अवश्यच होते. त्याकरिता त्यांच्या ताराआत्याने अंगावरचे दागिने कसे उतरून दिले याची हकीकत नानांनी सांगितली आहे ती हृदय हलवून सोडणारी आहे. त्या वेळी ताराआत्या व त्यांचे यजमान कोल्हापुरास होते असे दिसते. आपल्या दोघा भाच्यांना करून घालण्याकरिता अधून मधून त्या कोल्हापुरास येऊन राहत असत.

एलफिन्स्टन कॉलेज – नव्वद वर्षांपूर्वी

पुण्याच्या डेक्कन कॉलेजात न जाता नाना मुंबईस एलफिन्स्टन कॉलेजात गेले, हे अधिक चांगले झाले. डेक्कन कॉलेजातला टिळक, वामन शिवराम आपटे, आगरकर या तेजस्वी विद्यार्थ्यांचा जमाना ओसरला होता. त्यानंतरची विद्यार्थी पिढी डेक्कनपेक्षा एलफिन्स्टनमध्ये सरस होती. पण एलफिन्स्टनचा सरसपणा प्राध्यापकांच्या बाबतीत होता, तो म्हणजे मुख्यत्वेकरून प्राचार्य विलियम वर्डस्वर्थ यांच्यामुळे होता. विख्यात आंग्ल कवि विलियम वर्डस्वर्थ यांचे हे नातू होते हीच केवळ यांची शिफारस नव्हती. हे स्वत: अतिशय विद्वान आणि चारित्र्यवान होते. उंचीपुरी देहयष्टि, भरपूर दाढीमिशा आणि प्रशांत दृष्टि यांच्यामुळे हे प्राचीन ऋषिमुनींसारखे भासत असत. हिंदी जनतेविषयी यांना आपुलकी वाटत असे आणि तिच्यातल्या विद्याव्यासंगी उच्च वर्गाबद्दल त्यांच्या मनात फार प्रेम होते. हिंदु संस्कृतीविषयी यांना विशेष आदर होता. हे प्रथम हिंदुस्थानात इंग्रजी वाङमयाचे प्रोफेसर म्हणून आले, पण पुढे इतिहास व अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून स्थिरपद झाले. हे १८६२ साली हिंदुस्थानात आले ते १८६२ ते ७४ डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल होते. पुढे १८७४ ते ९० एल्फिन्स्टन कालेजचे प्रिन्सिपल म्हणून यांनी काम केले. त्या साली सेवानिवृत्त होऊन मायदेशी परत गेले. उत्तर आयुष्यात हे मुख्यत्वेकरून इटालीत राहत असत.

वर्डस्वर्थसाहेबांची विद्वत्ता विशाल होती, पण विद्यार्थ्यांच्या मनावर उच्च संस्कार करण्याचे त्यांचे सामर्थ्य त्यापेक्षाही दांडगे होते. ते निरपेक्ष ज्ञानोपासक होते. बढती आणि मानसन्मान याची त्यांना क्षिति नव्हती. ज्येष्ठतेच्या क्रमानुसार शिक्षणखात्याचे संचालकत्व त्यांना देऊ करण्यात आले होते, ते त्यांनी नाकारले. प्रशासकीय कामाचा त्यांना तिटकारा असे. त्यांची व्याख्याने नेमलेल्या पुस्तकांना आणि अभ्यासक्रमाला धरून असतच असे नाही. ती जिज्ञासा उद्दीपित करणारी, आणि विषयाच्या अभ्यासाची दिशा दर्शविणारी असत. त्यांच्या दाढीमिशांच्या जंजाळातून त्यांचे तोंडातल्या तोंडात बोलणे समजण्यास अगोदर पंचाईत पडत असे, आणि समजले तरी त्यात नियुक्त अभ्यासक्रमाला धरून फारसे काही नाही हे पाहून परीक्षैकदृष्टि विद्यार्थी हिरमुसला होत असे. कोणी विद्यार्थी जर धीर धरून असे म्हणाला, "सर, आपण सांगता हा भाग परीक्षेला नेमलेल्यापैकी नाही," तर ते चिडून म्हणत, "Why don't you leave the college and seek an appointment of five and forty?" ("तू बाहेर पडून पंचेचाळीस रुपयांची नोकरी का धरीत नाहीस?) तो प्रश्निक बिचारा कुठून आपण या भानगडीत पडलो अशा विचाराने थिजून जाई.

परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत ते फक्त चार प्रश्न विचारीत आणि त्यांपैकी एकदोन जर उत्तम सोडविलेले असले तर ते भरपूर गुण देत. अशी आख्यायिका सांगतात की एका विद्यार्थ्याने फक्त एकच प्रश्न सोडविला होता, आपण नापास होणार या भीतीने तो रडवे तोंड करून साहेबांकडे गेला. ते त्याला म्हणाले, 'तू तो प्रश्न उत्तम लिहिला आहेस, मी संतुष्ट झालो आहे.' त्याने गाऱ्हाणे केले की 'तुमच्या संतोषाचा मला उपयोग काय, प्रश्नांच्या प्रमाणात मार्क मिळणार आणि मी नापास होणार.' 'तुला किती पाहिजेत?' साहेबांनी विचारले, त्याने काही आकडा सांगितला. साहेबांनी तावडतोब तितके मार्क करून दिले.

वर्डस्वर्थसाहेब अनेक भाषा कोविद होते. इटालियन वाङमयावर त्यांचे विशेष प्रेम होते. डान्टे, टासो इत्यादि कवि त्यांचे विशेष आवडते होते. ते स्वत: कवि होते; सुनीते रचीत असत. पण त्यांचा मुख्य विषय इतिहास, त्या वरील त्यांची व्याख्याने विशेष बोधप्रद होत असत. फ्रेंच राज्यक्रान्तीवर बोलताना तर त्यांच्या उत्साहाला भरती येत असे. ते उदारमतवादी होते, पण जहाल, आमूल परिवर्तनवादी नव्हते. फ्रेंच राज्यक्रांतीवरील मिने Mignet, डी टॉकिव्हिली De Tocqueville हे ग्रंथकार त्यांचे विशेष आवडते, ते वाचण्याची ते विद्यार्थ्यांना शिफारस करीत. प्रसिद्ध इंग्रज तत्त्ववेत्ता आणि मुत्सद्दी बर्क याच्याप्रमाणे ते स्थितिप्रिय उदारमतवादी होते; उलथापालथवादी (Radical) नव्हते.

साहेबांची शिक्षणपद्धति कधी कधी प्रश्नोत्तररूप धारण करीत असे. विषय न समजल्यामुळे विद्यार्थ्यांनी काही भलतीच उत्तरे दिली की ते चिडत, चार शिव्या हासडीत आणि खुर्ची फिरवून घेऊन वर्गाकडे पाठ करून बसत. सुमारे पाच मिनिटांत प्रसन्नतेचे पुनरागमन होई आणि वर्ग सुरळीत चालू लागे.

वर्ड्स्वर्थविषयी नानांना अतिशय आदर. त्यांच्या विषयीच्या गोष्टी ते नेहमी सांगायचे. त्यातल्या जितक्या आठवल्या तितक्या इथे दिल्या आहेत. त्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाचा लाभ नानांना किती मिळाला होता याविषयी निश्चित सांगता येत नाही. पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाचे इंग्रजीचे व इतिहासाचे तास वर्डस्वर्थ यांनी काही घेतले असतील तर त्यांचा लाभ अर्थात नानांना झाला असणार. या शिवाय बी. ए. मध्ये गेल्यावर 'विषयाचा निश्चय करण्यापूर्वी प्रि. वर्डस्वर्थ यांची इतिहास व अर्थशास्त्र यावरील व्याख्याने काही दिवस ऐकली' असे त्यांनी लिहिले आहे, तेही जमेस धरले पाहिजे. त्यांच्या व्यक्तित्वाचा फार मोठा संस्कार नानांच्या वर झाला होता यात शंका नाही. वृत्तिसाम्य हे मोठे कारण असावे. वर्डस्वर्थप्रमाणे नाना स्थितिप्रिय उदारमतवादी होते; त्यांच्याप्रमाणे हे अभिजात वाङ्मयाचे भोक्ते होते. पण सर्वात मोठे साम्य म्हणजे वर्डस्वर्थप्रमाणे नाना निरपेक्ष ज्ञानोपासक होते. आर्थिक परिस्थितीमुळे परीक्षांमध्ये उत्तम यश मिळविणे ही त्यांना गरजेची बाब होती. तरी ते केवळ परीक्षार्थी कधीही बनले नाहीत.

नानांच्या बोलण्यात आणखी काही गोऱ्या प्रोफेसरांची नावे आणि त्यांच्या गोष्टी येत असत. ऑक्सेनहॅम हे इंग्रजीचे प्रोफेसर बरीच वर्षे डेकन कालेजचे प्रिन्सिपल होते. वर्डस्वर्थ एलफिन्स्टन कालेजातून निवृत्त होऊन गेल्यावर हे तिथे ४ वर्षे प्रिन्सिपल होते. तेथून १८९४ साली सेवानिवृत्त झाले. हसत खेळत विषय समजावून देण्याची हातोटी यांना साधली होती. वर्गात एक फार लठ्ठ मुलगा होता, त्याला पाहून हे म्हणायचे, "You there, you eat little and think more" (बाबारे, कमी खात जा आणि अधिक विचार करीत जा). आणखी एक कोटि नाना नेहमी सांगत असत. ती यांच्या तोंडची की दुसऱ्या एखाद्या इंग्रज प्रोफेसराच्या तोंडची, हे आता मला स्मरत नाही. धर्मासंबंधी बोलताना ते म्हणायचे, "मी २० वर्षेपर्यंत रोज तीनदा चर्चमध्ये गेलो. आता साठ वर्षांपर्यंत मला एकदाही चर्चमध्ये जाण्याचे कारण नाही."

आणखी काही गोऱ्या प्रोफेसरांसंबंधाने नानांच्या सांगण्यात गोष्टी येत असत. प्रोफेसर कर्कह्याम हे इंग्रजीचे प्रोफेसर होते. त्या काळी कित्येक गोऱ्या प्रोफेसरांच्या बाबतीत असा प्रकार दिसून येतो की ते विलायतेहून आले की प्रथम डेकन कॉलेजमध्ये काही वर्षे राहावयाचे; तेथे काम करून रुळले की मग एलफिन्स्टन कालेजात त्यांची बदली व्हायची व तेथून निवृत्त होऊन विलायतेस परत जायचे. वर्डस्वर्थ, ऑक्झेनहॅम यांचे असे झाले. तोच प्रकार कर्कहॅम साहेबाच्या बाबतीत दिसून येतो. नाना एका इंग्रजीच्या प्रोफेसराच्या बाबतीत अशी गोष्ट सांगत असत की त्याच्या शिकविण्याचा साचा अगदी ठरलेला असे त्या काळी वर्षानुवर्ष नेमलेली पुस्तके बदलत नसत. तेव्हा आदल्या वर्षी ज्या महिन्याच्या ज्या तारखेला जो भाग शिकविला, जसा शिकविला, तसाच तो पुढच्या वर्षाच्या त्या महिन्याच्या त्या तारखेला सांगायचा. माहिती आणि स्पष्टीकरणच नव्हे, तर विनोद आणि कोटया देखील नेमक्या त्याच असायच्या. आणि नाताळाच्या सुटीच्या आदल्या दिवशी लेक्चर संपविताना 'We shall now meet next year' ही ठरीव कोटि यावयाची. हा साचेबंदपणा बहुतकरून या कर्कहॅम साहेबांचा असावा. त्या वेळी इंग्रजी हा प्रत्येक परीक्षेला अवश्य विषय असे. नाना भाषाविषयाचे विद्यार्थी असल्यामुळे त्यांना ऐच्छिक म्हणून आणखी इंग्रजी वाङ्मयाचा भाग अभ्यासावा लागला होता.

त्या काळात पुण्यापासून मिरज अगर कोल्हापूर-पर्यंत आगगाडी नव्हती. ही इ. स. १८८८ नंतर झाली. तेव्हा नानांना पुण्यापर्यंत बैलगाडीने प्रवास करावा लागे. पुण्यापासून कोल्हापूर पर्यंत जो राष्ट्रीय हमरस्ता आहे तोच त्या काळातला प्रवासाचा मार्ग. सध्या ज्यांच्यावरून बसेस, ट्रक वगैरेंची धुडे सारखी धावत असतात ते मोठमोठे रस्ते पूर्वी इंग्रज सरकारने बांधलेले आहेत. सर्व ठिकाणांच्या राज्यकारभाराची सूत्रे केंद्रस्थानाहून बिनधोक चालविता यावीत म्हणून त्यांना या रस्त्यांची जरुरी होती. अर्थात प्रजेलाही त्यांचा उपयोग होई. पुणे ते कोल्हापूर बैलगाडीने सात दिवस लागत. पण प्रवास रमत रमत फार मजेचा होत असे. साधारणपणे मध्यरात्र उलटल्यानंतर उजाडायला दोन तीन तास अवकाश असताना गाड्या हाकायच्या, त्या सूर्य कासराभर वर येईपर्यंत, म्हणजे सुमारे ९ वाजेपर्यंत. नंतर धर्मशाळा किंवा वृक्षाचा चांगला तळ पाहून मुक्काम. बरोबर घेतलेल्या आचाऱ्याचा स्वयंपाक उरकेपर्यंत मंडळींचे जवळपासच्या विहिरीत

डुंबणे, आजूबाजूच्या शेतातला मेवा गोळा करणे इत्यादि उद्योग चालायचे. मोकळ्या हवेतल्या मनसोक्त हिंडण्या फिरण्यानंतर झुणकाभाकरीचे ते जेवण कसे अमृतासमान लागत असेल याची कल्पनाच केलेली बरी. जेवण यथास्थित झाल्यावर मंडळी सुस्तावायची. ऊन्ह कलल्यानंतर पुन्हा दोन तीन तासांचा प्रवास व संध्याकाळी कुठे तरी मुक्काम. बैलगाडीचा प्रवास म्हटला तरी बैलगाड्या बहुतकरून सामनाकरिता. सामान गाडीत टाकून बहुतेक मंडळी पायी चालायची. या पदयात्रेत वाटेवरच्या झाडांचे पाडाला आलेले आंबे पाड, चिंचा ओरवाड, असा खटचाळपणा तारुण्यातील अवखळपणाला अनुसरून चालावयाचाच. पुण्याला पोचले म्हणजे एका परीने हायसे वाटायचे, तशीच ही मौज संपली म्हणून थोडी हुरहुर पण.

'गायपर'

कालेजात जाईपर्यंत नानांनी आगगाडी पाहिली नव्हती. पुण्याच्या स्टेशनावर गेले आणि गाडीत बसले, तेव्हा जिकडे तिकडे G. I. P. R. ही अक्षरे पाहून ते बुचकळ्यात पडले. तिकिट कलेक्टराच्या आणि स्टेशन-मास्तरांच्या कोटांवर, टोप्यांवर, दिव्यांच्या काचांवर हे 'गायपर' (G I P R) काय, हे त्यांना उमगेना. जिज्ञासा स्वस्थ बसू देईना, कोणाला विचारावे तर हसतील ही भीति. अखेर मुंबईस पोचल्यावर हिय्या करून विचारले! 'गायपर' म्हणजे Great Indian Peninsula Rly. हे समजले तेव्हा सांगणारा व ऐकणारा दोघांच्यामध्ये मोठा हशा पिकला. नानांच्या तोंडून ही गंमत अनेकवार ऐकली आहे.

मिरजेला जायचे म्हणजे जायला सात दिवस आणि यायला तितकेच. निम्मा शिम्मा वेळ प्रवासातच. म्हणून उन्हाळ्याच्या सुटीमध्ये नाना कालेजातून दर वर्षी मिरजेला येत असत असे नाही. एका वर्षी मुंबईला रेसिडेन्सीमध्येच राहिले होते. इतर काही सोबत्यांनी तसाच बेत केला होता. निमित्त कोणते, तर अभ्यासाचे. त्याही गमती त्यांच्या सांगण्यात येत. रोज उठून सगळ्यांनी निश्चय करायचा की आज दुपारी झोप न घेता मनाला ताण देऊन अभ्यास करायचा. सकाळची तालीम होऊन जेवण भरगच्च झाले की दुपारी सुस्ती यायची. मग मनाच्या समजावणीकरिता एक एक सबबी : 'किंचित आडवे झाल्याने काय होणार आहे? नाहीतरी जेवण झाल्यानंतर थोडी विश्रांति पाहिजेच असते. इ. इ.' असा युक्तिवाद करीत स्वाऱ्या आडव्या झाल्या की डाराडूर! मग दोन तास कशाला जाग येते आहे! जागे झाल्यावर 'किती वेळ झोप लागली ही' म्हणून खंत करीत दुपारच्या फराळाला किती अवकाश आहे याची चाचपणी सुरू व्हावयाची! थोडा वेळ पुस्तकांची इकडून तिकडे चाळवाचाळव करून दुपारच्या खाण्याकरिता डाळ भिजत घातलेली असेल तिकडे मोर्चा वळायचा! आंबा वगैरे घालून खमंगशी डाळीची कोशिंबीर आणि पन्हे कलवातून बनवून आणून त्यांच्यावर ताव मारायचा आणि आता संध्याकाळ होतच आली आहे, तेव्हा अभ्यास कितीसा होणार असा पोक्त विचार करून पत्त्याचा डाव मांडायचा! याप्रमाणे रोज पवित्र निश्चय करून रोज त्याचा फडशा पाडीत सुटी संपली की पश्चात्ताप दग्ध होऊन लागले पुन्हा कॉलेजजीवनाच्या रिंगणात फिरायला!

× × ×

एलफिन्स्टन कालेजात नानांचे पहिले वर्ष फार आनंदात गेले. पैशाच्या अडचणीवर मात करून कालेज गाठण्यात त्यांनी यश मिळविले होते. मुंबईचे नवीन वातावरण, गोऱ्या इंग्रज प्राध्यापकांची प्रवचने आणि त्यांचा सहवास, निरनिराळ्या ठिकाणांहून आलेल्या अनेक तीव्र बुद्धिमान व्यासंगी विद्यार्थ्यांशी जुळलेली खेळीमेळीची मैत्री, यांमुळे त्यांचा काळ फार मजेत जाऊ लागला आणि त्यांनी मोठ्या उल्लासाने अभ्यास केला. या वर्षी इंग्रजीचा काही भाग त्यांच्या वर्गाला गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे यांनी शिकविला असे ते सांगत असत. दादासाहेब पुष्कळ वर्षे कालेजात होते आणि शेवटची तीन वर्षे 'ऑननरी फेलो' म्हणून होते. त्यांचे संस्कृत व इंग्रजी दोन्ही विषय उत्तम होते. शिकविण्याची पद्धत मार्मिक आणि विनोदी असे. शिक्षणाच्या बाबतीत खापर्डे घराण्याचा आणि आमचा शृंखलाबंध सांगण्यासारखा आहे. दादासाहेबांनी नानांना म्हणजे माझ्या वडिलांना शिकविले. दादासाहेबांचे चिरंजीव बाळकृष्ण गणेश उर्फ बाबासाहेब हे डेकन कालेजात असताना नानांनी त्यांना संस्कृत (काव्य-प्रकाश) शिकविले, हे त्यांनी स्वतःच मला सांगितले होते. नानांनाही याचे स्मरण होते. पुढे बाबासाहेबांचे चिरंजीव अरविंद हे नागपुरास मॉरिस कालेजात माझे विद्यार्थी होते. अशा रीतीने तीन पिढ्या शिक्षक विद्यार्थि संबंध आलटून पालटून चालू राहणे ही गोष्ट

अपूर्व नसली तरी जरा विरळा व गमतीची यात शंका नाही. पहिल्या वर्षाचे संस्कृत अंशत: यशवंत वासुदेव आठल्ये यांनी शिकविले. यांच्याविषयी नानांना फार आदर वाटत असे. यांची शिकविण्याची पद्धति गंभीर, पण विषयाचे ज्ञान सखोल आणि तो समजावून देण्याची पद्धत उत्तम. सरकारच्या विद्याखात्याने काढलेल्या मुंबई संस्कृत ग्रंथमालिके (Bombay Sanskrit Series) मध्ये यांनी तर्कसंग्रहाची आवृत्ति प्रस्तावना व टिप्पणी यांसह काढिली, त्याच्यासारखे उत्कृष्ट संपादिलेले पुस्तक या मालेत किंवा दुसरीकडे क्वचितच असेल, असे नाना नेहमी म्हणत असत.

कालेजात नानांचा बऱ्याच जणांशी स्नेहसंबंध जुळला. सर्व मंडळी बुद्धिमान, व्यासंगी, विद्यापीठीय शिक्षणक्रमात उत्तम यश संपादणारी अशी होती. नानांच्या बोलण्यात ज्यांची नावे येत असत असे म्हणजे श्रीधर केशव दामले, मल्हार खंडेराव चिटणीस, केशव गणेश आजरेकर, महादेव विष्णु गोखले, मोरो विश्वनाथ जोशी हे होत. केशवराव आजरेकर १८८३ साली पहिल्या वर्गात बी. ए. पास झाले, पुढे एलएल. बी. होऊन बेळगावास वकिली करू लागले. तेथील प्रमुख वकिलांमध्ये त्यांची गणना होत असे. पुढे महात्मा गांधींनी असहकारितेची चळवळ सुरू केल्यावर यांनी वकिली सोडली आणि अंधेरीला असहकारितावादी कार्यकर्त्यांकरिता आश्रम निघाला होता त्याचे संचालक म्हणून हे तेथे जाऊन राहिले. पेनशन घेतल्यावर नाना मिरजेस जाऊन राहिले, तेथे हे एक दोनदा त्यांना भेटावयास आल्याचे मला स्मरते. हे अतिशय बुद्धिमान, केवळ एकदोनदा वाचून परीक्षेत पहिल्या वर्गात यायचे असे यांचे वर्णन नाना करीत असत. नानांच्या आदल्या वर्षी म्हणजे १८८३ साली हे गणित घेऊन बी. ए. पहिल्या वर्गात पास झाले. यावर्षी एकंदर तिघेजण पहिल्या वर्गात आले होते. उरलेले दोघे महादेव विष्णु गोखले आणि लक्ष्मण रामचंद्र वैद्य हे होत. वैद्य संस्कृतामध्ये निष्णात, पहिल्यापासून स्कॉलर आणि पुढे एम्. ए. झाल्यानंतर यांची कामगिरीही मोठी झाली. यांनी संस्कृत–इंग्रजी कोश रचिला आणि तो वामन शिवराम आपट्यांचा कोश बाहेर पडण्याच्या अगोदर प्रसिद्ध केला. जगन्नाथ पंडिताचा 'भामिनीविलास' संपादिला. नानांच्या बोलण्यात यांच्याविषयीच्या गोष्टी फारशा येत नसत. महादेव विष्णु गोखल्यांच्या विषयी मात्र बरेच सांगत. हे बरेच बंधु होते. दिनकर विष्णु; महादेव विष्णु, नारायण विष्णु ही तीन नावे आठवतात. सर्वात अधिक बुद्धिमान महादेव विष्णु, सर्वच विषयात उत्तम तयार; पण इंग्रजीमध्ये विशेष. वर्डस्वर्थची यांच्यावर फार मर्जी. एम्. ए. झाल्यावरोबर प्रोफेसर म्हणून यांची नेमणूक झाली; आणि नवज्वर होऊन हे तडकाफडकी वारले. मागे तरुण पत्नी आणि वृद्ध आई! सर्वांना अतिशय दुःख झाले. वर्डस्वर्थना फारच! ते सांत्वनाकरिता त्यांच्या आईला घरी भेटायला गेले होते.

आणखी एका मित्राचे नाव नानांच्या तोंडून पुष्कळदा येत असे, ते श्रीधर केशव दामले यांचे. अभ्यासात उत्तम, स्वभावाने प्रेमळ, पण प्रकृतीने नाजूक असे यांचे वर्णन ते करीत असत. यांनी शंकरशेट शिष्यवृत्ति मिळविली होती. पुढच्या परीक्षांमध्येही पहिला वर्ग सोडला नव्हता. हे कविवर्य केशवसुतांचे सर्वात थोरले बंधु हे सांगितले म्हणजे यांचा संबंध विशेष लक्षात येईल. एम्. ए. झाल्यानंतर बडोद्याच्या कालेजात संस्कृताचे प्रोफेसर म्हणून गेले आणि तेथे अचानक त्यांना मृत्यूने गाठले (११ जानेवारी १८८३). नानांना त्यांच्या मरणाने फार दुःख झाले. त्यांच्यावर कविता करावी असे नानांच्या मनात घोळत होते. या वर्षीच्या काही दिवसांची डायरी नानांनी लिहिली आहे त्यात लिहिले आहे :

13–1–83 Heard about Damle's death. .....His glorious career & exemplary character. His wife and brothers unfortunate. Utter ruin of his family. General remarks on premature deaths of educated men. 14–1–83 Also resolved to write some poems in memory of my dear friend S. K. Damle.

भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य

सर्वांत अधिक उल्लेखनीय व्यक्ति भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य ही. नानांची यांची मैत्री कालेजच्या दिवसात जुळली ती आयुष्याच्या अखेरपर्यंत टिकली. तसे पाहिले तर दोघांच्या मध्ये पुष्कळ साधर्म्य होते, तसेच वैधर्म्यही होते. ज्ञानसंपादनाचा दोघांचाही हव्यास दांडगा. दोघेही निरपेक्ष ज्ञानोपासक

याचं वाईट वाटतं
मागचा 'मी' कळालो आहे. गळालो आहे.
पुढच्या प्रश्नांना मी कसा दिसेल ?
हा माझा प्रश्न आहे.
सांपडलेल्या उत्तराला माझा श्वास असेल कां ?
हा माझा प्रश्न आहे.
खरं तर तो प्रश्न माझा, माझ्या आयुष्याचा असेल का ?
हाही माझा प्रश्न आहे.
तो प्रश्न, प्रश्न आहे म्हणून बरे आहे.
उत्तर सापडल्यावर हताश होण्याची
सध्या तरी भीती नाहीय
वाओट वाटतं याचंच
की वास्तविक अपेक्षेइतकंही
मी माझ्याइतकं नसावं !

कविता

नागनाथ कोत्तापल्ले

किर्रर वाटा, क्वचित ऐकू येणाऱ्या अश्वासक हाका
काय खरं काय खोटं ? – आपण फक्त चालायचं असते

स्वप्नांवरून डोळे हलकेच ओढून घ्यावेत,
झड – पडझड वाढत जाते
बेगुन्हा आयुष्याची राखरांगोळी होत असताना
आपण फक्त पहायचं असते

दिशा घोंगावत येतात आक्रोशाचा उपयोग नसतो
ॐ काळोखाय नमः म्हणत सामोरे जावे
एवढेच केवळ हाती असते !

लय

वासंती इनामदार

असू दे ती लय
आभाळ छेडणारी
....तिला स्पर्श करू नका.. !
तिची व्यथा
समुद्र पिणारी... !

असू दे ती लय
आकंठ भिरभिरणारी
तिची पावलं वेचू नका
तिथली वाट
सूर्य जाळणारी !

संदर्भ

पद्मा लोकूर

संदर्भावांचून उचलली तर होतात वाक्यें अर्थशून्य
कधीतरी विपरीत अर्थाचीहि
सारेच कुठे इतके बाळबोध सोपे ?
तुला अलगद टिपून घेतले
तुझ्या मागच्या पुढच्या संदर्भाशिवाय.
तू केवळ संदर्भहीन; आणि मीहि
आशयपूर्ण तेव्हांच आपण, संदर्भ नसेल जर
विपरीत सारेच नाही तर !

झपाटलेली झाडे !

पद्मिनी विनीवाले

आजुबाजूला ही फुलताहेत फुलंच फुलं
पाकळ्या मिटताहेत उमलताहेत
एकमेकात मिटताहेत उमलताहेत गच्च,
हे सुगंधी वारे वेढून घेताहेत
या झाडाला त्या झाडाला
फांद्यांचे विळखे आणखी आणखी घट्ट होताहेत.
काजव्यांचं झुंबरच्या झुंबर
दीपतंय विझतंय
झाडांवर
तितक्यागणिक
तुडुंबलेल्या तळ्यातील ही प्रतिबिम्बे
तुझी – माझी, माझी – तुझी
राणी या साऱ्यात आहेत ना तू
अशी जवळ...

चंद्र निघून जात असेल...

उत्तम कोळगावकर

गावाला एकाकी सोडून आल्याचं दुःख

हे शहर ओसरू लागलं आहे रात्रीचं
दिव्याच्या खांबांची रांग
सर्व दिशांना
लांबत जाऊन जवळ जवळ येणाऱ्या पुन्हा लांबत
जाणाऱ्या
माझ्याच सावल्यांमधून
मी एकाकी चाललो आहे

माझ्याजवळ काहीच नाही आहे
माझ्याशिवाय.

खिडक्या बंद होताहेत
नंतर एकेक करून
दिवे विझताहेत

खिडकी बंद करावी अन्
दिवा विझवून शांतपणे झोपी जावं
असं माझं काहीच नाही या शहरात

स्टेशन एरियात रात्र डुलक्या घेत
जागत असते
एखाद्या हॉटेलात मीही दिसतो
कळकट चहा ढोसतांना
हरवून असतो....

गावातल्या घरापाशी
चंद्र थांबला असेल

पोटातल्या पोकळीला कवळून
आईच्या कुशीत
भावंडे झोपली असतील
त्यांच्या अंगावर हात फिरवून
शहाण्या माणसासारखा
चंद्र निघून जात असेल...

एक कविता

श्रीपाद भालचंद्र जोशी

इतिहासातून फाडून टाकले,
प्रकाशांच्या तांड्यांना दिशांचे गर्भ कधी फुटलेच
नसल्याचे दाखले,
तरी चिल्लर जादूगाराच्या पोतडीतून
केव्हाहि उपलब्ध व्हावे मेलेल्या सिंहाचे जिवंत कातडे
तसे जोपासून ठेवल्याच जाणार असलेल्या
काळोख्या रात्रीत ठेचाळलेल्यांच्या रक्तजखमा कोरलेल्या
सांगाड्यांच्या रांगाच
चालता चालता हे सांगून जातील
आणि संशोधनाअंती कदाचित प्रबंधकारांना हे कळेलहि
की अख्या काळोख्या रात्री ज्यांनी
सुर्यफुले संभोगलीच नाहीत
त्यांच्या जमातीचा हा प्रवास आहे
उसाच्या ताज्या रसाचाच हा वास आहे
आणि स्वदेशी गजांच्या मोकळ्या
प्रदेशातला हा श्वास आहे,
मात्र तेव्हा या सांगाड्याच्या शांतीकरता
त्यांच्या कब्रींना वंदन करून,
शोक पाळला तीन दिवसांचा
आणि तीन वळा म्हणावे 'भारत माता की जय' म्हणून
या 'जनतेच्या इच्छेचे' ते पालन करीत असतील!

सावली

सुलभा हेर्लेकर

गर्भवती केळीच्या कुशीत
धुमसणारी एक सांवली
सूर्याची.
सरकलेली आभाळे. मिटलेले डोळे.
अंधारात एकच क्षण
मी इथे
तू समजून
मलाच चाचपीत.

कविता : तुझ्या--

शेमा हराळे

अधीर जीव न्
उतावीळ देहभोग
कुडीचे भ्रमण
न् तुझा वियोग

●

पिंजारला देह सारा
अंधारब्याळा बुझाऊनि
थरथरली प्राणशाळा
तुझिया स्पर्शलावण्याने

●

आभासपायऱ्यांच्या
दरेक चढणीला
गुदमरत्येय माझे
एकेक प्राक्तन
अजाण होतो मी की
क्षणविहीन प्राक्तनाला
क्षमाच नाहीय

घरोबा

कल्याण इनामदार

फांदीवर ब्याले
कावळ्यांचे शाप
भुईवर बाप
तेच माझे.

अवसेने केला
आईचा घरोबा
वांझोटल्या नभा
झालो आम्ही.

कुणास ठाऊक

उषा लिमये

आकांक्षेला क्षितिज नसावे
औदार्याला नको किनारा
विवेकतारू पुढे निघाले
असु दे वादळ तुफानवारा ।।

आशेला कधि अंत नसावा
निराशेस घालावे कुंपण
जीवन वस्त्रच गर्भरेशमी
विरोधल्या धाग्यांची गुंफण ।।

वल्ही थकावी गात्रांच्यासह
परी किनारा क्षितिजावर जणु
कुणास ठाऊक कधी पोचणे
करी कुणाच्या असे सुकाणू ।।

पांगळा

कल्पना व्यवहारे

पंख पसरून झेपावलेला--
उंच निरभ्र आकाशात, पाखरांचा थवा
मी हा असा पांगळा
नसलेल्या पायांना, आधार लाकडी कुबड्यांचा
एक वेळ अशी होती
शरीराच्या अधूपणाला
जगण्याची उमेद होती
बुद्धीची चमक होती
आशेची जुई सदा फुललेली होती
पण..तुमच्या वांझोट्या सहानुभूतीने
अधिक जोपासले माझे पांगळेपण
माझ्याहि पेक्षा
आणि आज..
मनच पांगळेपण पांघरून बसले माझे
सारे आयुष्य कवडी मोलाचे झाले
कवडी मोलाचे झाले.

अनुक्रमणिका

क्रूस जागतात

बाळकृष्ण बन्नोरे

पाताळ गंगेच्या रुद्र शृंगारातून
उफाळतात घटोत्कच खडकांचे
घुप्प अंधाराच्या
शिकारी शिंगांनी
उधळलेले मन
घेत धडक...जाणीवा ठेचाळतात...
संकेत विव्हळतात
  वितळतो तळ...
आणि...सुरू होतो प्रवास...रात्रीचा...
प्रतिमाहीन...सीमाहीन...
धाड...धाड...धाड
काठ नसलेल्या फलाटावर
घुसलेल्या अजस्त्र इंजिनाने...
समोरच्या बेढब धमाल ढिगाऱ्यातून...
झोकल्या जाते आत
एक केविलवाणे अर्भक...सेंद्रिय...
वेळ-घालू रमीची डाव...
अध्यात्माच्या आवडत्या दरीकडे,
तावदानातून सकौतुक वळून बघणारी
तोल सावरणारी झिळमिळ पगडी
दरी...जीव आणि शिव यांतील...
जी कधी मिटणार नसते
पण मिटविण्याचा वेदान्त मात्र
  रवंथायला वाटतो गोड
एखाद्या रहस्य-कथेसारखा...
दरीत डुब डुब करणारे लोकापत
  एरिंग – मेरिंग
  लवंगा तेरिंग
  लवंगा तिरीचा
    डुब डुब बाजा
पण गाई गोपींचा
ब्रिल-क्रीमी मोरपिसांचा राजा
काही उतरतच नाही
रुळ सरकतात, सांधे बदलतात
तशी दरीही पुढे सरकते...
मग नाइलाजाने सुरू होते.
अधान्तरीची चिडकी धाबाधुवी.

रोटी की लंगोटी...
  या गारगोट्यांचा...
  चिलमी घेराव...
घुसमटलेले अर्भक थोडे किंचाळते...
रक्ताच्या डोळ्याने
  वर येते पाणी हृदयाचे...
  पण तहान काही शमत नाही...
विकास स्वतःच्याच आंसाभोवती
घुमत रहातो घालीत प्रदक्षिणा
  विरोधाला...
आणि रात्रीचा प्रवास काही संपला नसतो
मात्र क्रूस जागे असतात.
  भुजा विस्तारून
खऱ्या येशूच्या प्रतीक्षेत
प्रार्थना तीत...
  पश्चात्ताप-शून्य...येशूची

कविता पावसातल्या

नीळकंठ महाजन

◦ एक ◦

पाऊस सुरू होतो तेव्हा
  ती पेटविते दिवे
मिठीत घेतात तीला...
    विवस्त्र मेघांचे–
    हात नवे नवे !

◦ दोन ◦

शब्दांचे चांदणे
  तीच्या डोळ्यात उतरते.
काखेतल्या घागरी
  ती आसवांनी भरते.

◦ तीन ◦

शब्दांचे कंदील हातात घेऊन
ती कथा कादंबरीतुन हिंडते
साठवायचे नसते अशा वेळी
डोळ्यात ऊन. तिथेही तीच असते.

मिठी

बजरंग सरोदे

मिठीत घट्ट या — रंग रंगला
दिठी दिठीतुनि — गंध फाकला
सलिल सावल्या — नभास झाकती
ढगाढगातले — तेज प्राशिती
कधिच जाहले — शब्द हे मुके
तनू तनुवरी — हळूहळु झुके
मनास फुटले — देह हे नवे
नसानसातुनि — पेटले दिवे
अशात वर्षती — सरिवरी सरी
आग पेटली — दोहींच्या उरी !

हिरवळ

रमेश ललगूणकर

वसले उन्हाला रान
डोई मोहर झावळ
बांधाला अवघडली
नवी गर्भार हिरवळ

मनि तिच्या काही आले
आले डोळी मृगजळ
पोटी काही फिरले
रानी झाली धावपळ

मातेच्या कविता

मोहन पाटील

१

पाचोळ्याचे दिवस.
भटकंती चालू होती
तुझे रक्त दुपारी पेटायचे.
चौकात रक्तरांगोळी ओघळायची.
कुठे हमरस्ता स्मशानवाट—
तुझ्या मुठीतून उधळलेला अहंकार
उग्र होऊन चौकाचौकात गुरगुरायचा.
पाखरा. मला हे सहायचे नाही.
कसे सांगू रक्त सांडून मिळालेले घास.
मला नको होते.

२

तू माझाच. म्हणून मला गोड.
तू माझाच. म्हणून मला वेड.
तुझ्यात माझे रक्त. म्हणून मला प्रीति
तुझ्यात माझे रक्त. म्हणून मला भीति
तू माझा. म्हणून माझ्यासारखा हो.
तू माझा. म्हणून माझ्यातले घे.
तुझ्यातल्या रक्ताला प्रेमपूर्वक आव्हान
अरे, तुला माझी भीति वाटू दे.

३

मला आठवतो तो हरताळी दिवस:
(तू त्याच दिवशी गेलास)
तुझ्या खांद्यावर भार देऊन स्तब्ध राहिलेले
कामगार.
टाळा मिटून गप् बसलेला कारखाना.
मला आठवते
पोटातल्या आतड्यावर कावळ्यांनी ताव मारून
क्रांतिकारी ढेकर दिली. समानतेच्या नावाखाली.
तुला समानता हवी होती.
पण अरे, माहिती नसलेल्या गावचा रस्ता तरी
विचारायचास.
मला आठवते.
तू वाद खेळायचास.
पुराणातल्या तिळाच्या समान वाटणीवर.
द्रौपदीवर —

४ :

मला एकच हवे.
तू एकदाचा विश्वभरून शांत व्हावास.

सुखाविषयी विरक्तता निर्माण झाली हे आवर्जून सांगणाऱ्या लेखकाला पुढच्या शेकडो पृष्ठांतून स्वामींचे जे आपण वर्णन करतो आहोत ते वैराग्यदर्शक तर नाहीच, उलट अत्यंत सुखलोलुपतेचेच ठरते आहे हे कसे कळले नाही याची गंमत वाटते.

वैराग्यानंतर परमेश्वरी कृपा, दृष्टांत, वर वगैरे नेहमी येते. या घटना अर्थातच कुणाच्या समोर, साक्षीने होत नसतात. त्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय गत्यंतर नाही. मात्र या ईश्वरी कृपाप्रसादाची साक्ष पुढील काळात कोणत्या तरी प्रकारे लोकांना मिळायला हवी अशी अपेक्षा ठेवल्यास ती चूक ठरू नये. त्या दृष्टीने पुढील चरित्राकडे पाहणे उद्बोधक ठरते. इ. स. १६६३ मध्ये स्वामींना श्रीमंगलमूर्तीचा स्वप्नात दृष्टांत होऊन "जे कल्पना चित्ती धरशील ते मत्प्रसादे सिद्ध होईल" असे वरप्रदान मिळाले. यानंतर स्वामींनी काशीच्या ज्ञानेंद्रसरस्वतींचा अनुग्रह मिळवून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतले. म्हणजे ईश्वरी साक्षात्कार आणि गुरुकृपेने ब्रह्मज्ञान यांची प्राप्ती होऊन स्वामी सिद्ध पुरुष झाले. त्यामुळे त्यांच्या जीवनात इतर सामान्य लोकांच्या जीवनाहून काही निराळेपणा, काही निराळे सामर्थ्य आले काय? इतिहास सांगतो: १६८० सालानंतर स्वामी सातारा प्रांती आले. परंतु राजकीय परिस्थिती प्रतिकूल पाहून कोकणात चिपळूणजवळ पेढे गावी वास्तव्य केले. म्हणजे स्वामींच्या ठिकाणी काही खास सामर्थ्य दिसत नाही. या गावी असता स्वामींना एक साप चावला. परंतु त्यांना काहीच झाले नाही. हा चमत्कार वाटून अनेक लोक त्यांना सिद्ध पुरुष समजून त्यांच्या भजनी लागले आणि त्यांच्या नावाला प्रसिद्धी मिळाली. जो साप स्वामींना चावला तो विषारी होता की नाही याची लोकांनी खात्री करून घेतली होती का नाही हा प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. लोक असे करू लागले तर सिद्ध पुरुष, महाराज, बुवा जन्मालाच यायचे नाहीत.

चमत्कार कधी एकट्याने येत नाही. चमत्कारामागून चमत्कार येतात. स्वामींनी दुसरा एक चमत्कार दाखवला. त्यावेळी चिपळूण हे जंजिऱ्याच्या हबशांच्या ताब्यात होते. त्यांना भेटायला स्वामी खाडी ओलांडून येत. ऋद्धिसिद्धी प्राप्त झालेल्या स्वामींना सत्ताधाऱ्यांकडून आणखी काय मिळवायचे होते कुणास ठाऊक? कदाचित लोकांना चमत्कार दाखवण्यासाठी खाडी ओलांडण्याचे निमित्त हवे असेल. ही खाडी स्वामी केळीच्या पानावर बसून ओलांडत. हा पाण्यावरून नावेच्या आधाराशिवाय जाण्याचा चमत्कार येशू ख्रिस्तापासून आजपर्यंत अनेक सिद्धांच्या चरित्रात आढळतो. मात्र शेकडो लोकांना घेऊन जाणाऱ्या नावाबोटी बुडून शेकडो लोकांचे बळी जातात तेव्हा मात्र या सिद्धांपैकी कुणी आजवर त्यांच्या मदतीला गेल्याचे माहीत नाही. ही गोष्ट त्यांना महत्त्वाची वाटत नसावी. आणि खाडी ओलांडण्याची सिद्धी प्राप्त झाली तरी त्या सिद्धीने इतर कुठलीही गोष्ट साध्य होते असेही दिसत नाही. त्यासाठी पुन्हा प्रापंचिक पामरांचीच या सिद्ध पुरुषांना गरज लागते.

स्वामींचा हा चमत्कार पाहून श्रीवर्धनकर बाळाजी विश्वनाथ भट यांची त्यांच्यावर भक्ती जडली. अर्थात बाळाजी विश्वनाथांची भक्ती निष्काम नव्हती. भक्तांतही end-seekers म्हणजे काही लौकिक हेतू मनात बाळगून भक्ती करणारे असतात. हा हेतू सहसा राष्ट्रोद्धार, स्वातंत्र्यप्राप्ती यांसारखे उच्च व व्यापक असल्याने या end-seekers नाही भक्तात समाविष्ट करतात. बाळाजी विश्वनाथाची सकाम भक्ती अशी नव्हती. वैयक्तिक होती. मात्र बाळाजी विश्वनाथाचा भाऊ जानोजी याला स्वामींच्या कृपेचा लाभ झाला नाही. हबशांच्या नोकरीत राहून बाळाजीने कान्होजी आंग्र्याशी संधान ठेवले होते. बाळाजीवर स्वामींची कृपा असली तरी बाळाजीची ही फितुरी हबशांना कळलीच. त्यांनी त्याला पकडायला लोक पाठवले तेव्हा बाळाजी देशावर पळून गेला. स्वामींची भक्ती न करणारा त्याचा भाऊ जानोजी मात्र त्यांच्या हातात सापडला. त्यांनी जानोजीला गोणत्यात घालून समुद्रात बुडवले. हबशांना भेटायला जाण्याकरता केळीच्या पानावर बसून खाडी ओलांडणारे स्वामी गप्पच राहिले.

शाहूमहाराजांना स्वामींचा पत्ता कसा लागला ही कथाही मनोरंजक आहे. १७०७ मध्ये औरंगजेबाचे निधन होऊन शाहू मोकळे झाले आणि शाहू व ताराबाई यांच्यात यादवी सुरू झाली. स्वामींनी ही यादवी थांबवण्याचा प्रयत्न करायला हरकत नव्हती. पण सिद्ध पुरुषांचे हेतू सामान्याला कुठून कळणार? स्वामींना शाहूवर कृपा करण्याची इच्छा होऊन त्यांनी शाहूला कटिसूत्र

व कौपीन प्रसाद म्हणून पाठवले. शाहूला विजय मिळाल्यावर साहजिकच शाहू स्वामींचे भक्त झाले.

१७०७ मध्येच एकांत सोडून स्वामींनी लोकांत स्वीकारला होता. अर्थात देवाच्या कामासाठीच. परशुराम क्षेत्रातील भार्गवरामाच्या देवळाचा जीर्णोद्धार करावा असे स्वामींच्या मनात आले. सिद्धी प्राप्त झाल्यावरही अशा कामामाठी पैसा मात्र समाजाकडूनच मिळवावा लागतो असे दिसते. स्वामी भिक्षेसाठी निघाले. पैसा मिळू लागला आणि हळूहळू देवालयाचा 'कारखाना' सुरू झाला. (लेखकाने वापलेला 'कारखाना' हा शब्द आजही आम्ही देवालयाच्या संदर्भात पुन्हा सुरू का करीत नाही ?)

स्वामींच्या जवळ हिंदू-मुसलमान असा काही भेद नव्हता. शाहूवर कटिसूत्र व कौपीन पाठवून कृपा केली. इकडे जंजिऱ्याचा हबशी याकूदखान याने दर्शनाची विनंती करताच त्याच्याही भेटीला 'केळीच्या पानावरून' गेले. हबशीही खाडी ओलांडत होताच. पण ती नौकेतून. केळीच्या पानावरून खाडी ओलांडलेली पाहून खान साहजिकच 'विस्मित' झाला. भयही वाटले असणारच. आता नौका बांधायचे प्रयत्न सोडून स्वामींना केळीची पानेच मागावी असा विचारही खानाच्या मनात आला नसेलच असे नाही. स्वामींनी गोंधळलेल्या आणि भयचकित झालेल्या खानाला सांगितले : "चित्तात काही भय न धरणे. (जानोजी-विनोजीला खुशाला गोणत्यात घालून बुडविणे.) समुद्र तरणे आमची सहजवृत्ती. यात काही अगाध नाही." स्वामींनी स्वत: "यात काही अगाध नाही" असे सांगितले म्हणून काय झाले ? खानाने पेढे आणि आंबडस या गावच्या सनदा स्वामींना अर्पण केल्या !

पण सगळेच हबशी असे श्रद्धाळू नव्हते. त्यांनी स्वामींशी चवक तंटा करायला कमी केले नाही. स्वामींनीही असल्या श्रद्धाहीन हबशांशी भांडण नको म्हणून सरळ कोकण सोडून देशावर प्रयाण केले. हा तंटा १७२६ मध्ये हबशी सिद्दी सात याच्यावरोबर एका हत्तीवरून झाला आणि त्यात स्वामींना पंचवीस हजारांचा फटका बसला. स्वामींना याची कल्पना असावी आणि असल्या उन्मत्त यवनापुढे आपल्या सिद्धींचा काही पाडाव लागणार नाही याचीही कल्पना असावी. त्यांनी दूर दृष्टीने १७२० मध्येच बाळाजी विश्वनाथ मेल्यावर त्याचा पुत्र बाजीराव बाळाजी याची शाहू छत्रपतीकडे 'शिफारस' करून त्याला पेशवेपद मिळवून दिले होते. कृतज्ञ बाजीराव बाळाजीनेही 'विरक्त' स्वामींना धावडशी गाव इनाम मिळवून दिले. १७२६ मध्ये हबशाशी तंटा होऊन कोकणातला कारभार गुंडाळून देशावर येण्यापूर्वी स्वामींनी मराठ्यांकडून आठ गावे इनाम मिळविली होती. त्यामुळे कोकणातून देशावर कुठे जावे अशी काही अडचण नव्हती. हबशी ऐकत नाही हे दिसताच स्वामी देशावर आले.

या खुनशी हबशाला स्वामींच्या 'अगाध' सामर्थ्याची अजिवातच कल्पना नसावी. पुढे स्वामींनी 'केळीवरून तरून' जाण्याचे सोडले असावे किंवा ते या हबशाने पाहिलेले नसावे. स्वामींनी देशावर प्रयाण केल्यावरही हबशाची सूडबुद्धी शमली नाही. त्याने 'देवालयाचा कारखाना' आणि सर्व ब्राह्मणांची व कारकुनांची घरे लुटून जप्त केली

ऋद्धिसिद्धीनायक स्वामी काही गप्प बसले नाहीत. देशावर राहून त्यांनी प्रथम हबशाला शाप दिला. (पुढे हबशांचे राज्य लयाला गेलेच !) नंतर स्वामींचे अगाध सामर्थ्य पाहून भयचकित झालेल्या याकूदखान हबशी याच्याकडे तक्रार करून तंटा करणाऱ्या सिद्दी सात याचे पारिपत्य करायला सांगितले. ते याकूदखानाने मान्य केले. (आता स्वामींच्या सामर्थ्याचा आणखी पुरावा काय पाहिजे ?) पण सिद्दी सात ब्राह्मणांना त्रास देतच राहिला. ब्राह्मणही स्वामींचे अनुकरण करून देशावर पळून जाऊ लागले. केळीच्या पानावरून का नौकेतून हे मात्र ग्रंथात नाही.

विरक्त स्वामींना हत्तीच्या पायात बसलेला पंचवीस हजारांचा फटका फारच लागून राहिला. हबशी तर ऐकतच नव्हता. तेव्हा स्वामींचे कर्जदार कान्होजी आंग्रे यांनी आपले कर्ज आणि त्याबरोबर त्यांच्यासाठीच हा हत्ती आणण्याचा उपद्व्याप केलेला असल्याने हे पंचवीस हजारही द्यावेत म्हणून स्वामी आंग्र्याच्या मागे लागले. हा कान्होजी आंग्रेही मोठा विचित्रच दिसतो. आजच्याप्रमाणेच राजकारणी आणि सत्ताधारी लोकांना कुणाला उपदेश करावा याचे तारतम्य त्याही काळात नव्हते. कान्होजीच स्वामींना ब्रह्मज्ञान शिकवू लागला. संतांच्या घरच्या 'खुणा' 'उलट्या' हेच खरे. आंग्रे लिहितो : "ऋणानुबंधेकरूनच अवघे पदार्थ घडतात. ते गोष्टीचे सामान्यपक्ष असतील त्यांनी सुखदु:ख न मानावे. आणि स्वामी तो परमहंस, सुखदु:खा-

तीत स्वामी असतां, क्षणाक्षणा, फलाण्यानें फालणें जाहलें, हत्तीमुळें फलाणें गेलें याप्रकारें लिहून पाठवतात याचा विचार काय? हा मोह मनुष्यास न व्हावा. यास्तव याविशी कितेक श्रुतिस्मृति प्रवर्तल्या आहेत.

ऋणानुबंधिनः सर्वे पशुपत्निसुतादय :।
ऋणक्षये क्षयं यांति का तत्र प्रतिदेवता ॥

इत्यादिक शास्त्रार्थावरून कोणाचे काय गेले व कोणी नेले? या उपरि स्वामींस उचित नाही की, जाहले गोष्टीची क्षीत मानून लिहून पाठवावे. सर्व गोष्टीस भगवदिच्छा प्रमाण असे. वरकड, इकडेस तुलसीदल आहे त्याच्या व्याजाचा अर्थ लिहिला, तरी ऐसे विचार तोंडीच असत नाहीत. आमचे काही लिहिलें पुसलें स्वामींजवळ असलें तरी आम्ही व्याज देऊं; अन्यथा एक टक्काहि व्याज देणार नाहीं. आम्हां जवळून प्रतिवर्षी स्वामींस पावतें त्याचा आजतागायत हिशेब करून, स्वामीकडेस बाकी निघेल तें स्वामींस कळलीच आहे. गोठण्याचा मजकूर तरी, भटास दिली ओसरी तों भट पाय पसरी, हा लेख जाहला. असो. स्वामीपेक्षां आम्हास विशेष काय आहे? गोठण्याची सनद पाठविली आहे."

म्हणजे स्वामी व्याजवट्टा सावकारी करीत होते आणि लेखी काही नसले तरी व्याजाचा तगादा लावत होते! पण कान्होजीची आरमारी नौका 'केळीच्या पाना'ला घाबरणारी दिसत नाही. लेखी काही नसेल तर एक टक्काही व्याज देणार नाही असे तो खडसावतो. कोकणात अन् देशावर अनेक गावे इनाम मिळूनही स्वामी आणखी गावे मागतच आहेत. 'भटाला दिली ओसरी अन भट पाय पसरी' अशा शब्दात निषेध करूनही कान्होजी गोठण्याची सनद पाठवतो यावरून त्याला स्वामींच्या सामर्थ्याचे भय वाटत असावे. अर्थात असे म्हणून गाव दिले, म्हणून रागवायला किंवा झिडकारून टाकायला स्वामी काही सामान्य प्रापंचिक नव्हते. त्यांना देवकार्यासाठी संपत्ती हवी होती. त्यांनी सनद ठेवून घेतली.

हे सारे वाचत असता पाखांडी, धर्मलंड, श्रद्धाहीन नास्तिकाच्या मनात स्वामींच्या असामान्यत्वाबद्दल काही शंका निर्माण होतील अशी शंका लेखकाला येतेच. लेखक या अज्ञ जनासाठी स्पष्टीकरण करतो: "हबशांच्या त्रासामुळे स्वामींनी कोकणप्रांत सोडला असे जरी बाह्यात्कारी प्रसिद्ध झाले, तरी स्वामींचा इकडे येण्याचा मुख्य हेतू अत्यंत पवित्र अशा देशकल्याणाचा होता ह्यात तिळमात्र शंका नाही. जगाचा उद्धार हे ज्यांचे मुख्य व्रत, त्यांचा परोपकारावाचून दुसरा हेतु काय असणार?" आपल्या चरित्रात पुढेमागे पाचसहा ओळीतच सर्व तर्कदोषांची उदाहरणे देण्याची सोय व्हावी हाही एक हेतू असावा अशी आम्हांला शंका येते!

१७२८ मध्ये धावडशीला आल्यावर स्वामींनी एक देवालय आणि भव्य तलाव बांधला. स्वामी त्यात 'कदलिविहार'करीत होते काय हे ग्रंथात नाही. पण बहुधा नसावेत. कारण हे देवालय, तलाव अन वाडा बांधत असताना प्रथम ग्रामीण इरसालांनी स्वामींना 'फार उपद्रव' दिला असे लेखक सांगतो. 'कदलिविहारा'चा चमत्कार स्वामींनी दाखवला असता तर या खेडवळांना असे धाडस झाले नसते. पण स्वामींनी दुसरा एक चमत्कार दाखवून लोकांवर धाक बसवला. ही पद्धत आजही लोकप्रिय आहे. स्वामींनी शाहूकडे तक्रार केली. शाहूने अधिकाऱ्यांना आज्ञा केली. स्वामींचा वशिला राजधानीत आहे हा साक्षात्कार झाल्यावरोबर उपद्रव देणाऱ्यांचे अवसान खलास झाले. इतकेच नव्हे तर ते स्वामींच्या भजनी लागले. शाहूचे सरदारही स्वामींकडे येऊ लागले.

आपल्या सिद्धीपेक्षा राज्यकर्त्यांची सत्ताच अधिक खरी असे स्वामींनाही पटले असावे. आपल्या शापाने हबशांचे काही वाकडे होत नाही असे वाटून किंवा परमेश्वर झाला तरी तो कुणाला तरी निमित्त करूनच आपले कार्य पार पाडत असतो हा सिद्धांत अन स्पष्टीकरण लोकांना पटवावे म्हणून स्वामी शाहू, बाजीराव, आंग्रे यांना दुष्ट हबशांचे पारिपत्य करून त्यांचा मुलूख हस्तगत करण्याबद्दल तगादा लावू लागले. कोकणात स्वामींची इनाम गावे होती. त्या गावांवर यवनांची सत्ता असावी ही गोष्ट स्वामींना कशी सहन होणार?

हबशांचे पारिपत्य करण्यासाठी स्वामींनीच आपले दैवी सामर्थ्य वापरावे किंवा वाढवावे असा सल्ला त्यांना देण्याचे एकाही भक्ताला सुचले नाही. उलट, इंग्रज हळूहळू पाय पसरत आहे हे लक्षात न घेता हबशांचा सूड घेऊन स्वामींचे समाधान करण्यासाठी बाजीरावाने इंग्रजांना अनुकूल करून घेण्याची धडपड सुरू केली! कशी? तर इंग्रजांना 'स्नेहभावपर व स्तुतिपर' पत्रे पाठवून!

कोकण आणि देश या दोन्ही प्रदेशांचे कल्याण करण्याचे उगीच अवाढव्य काम कशाला म्हणून फक्त देशाचेच कल्याण करण्याकरता आलेल्या स्वामींना पुढे आपल्या हेतूचे विस्मरण झाले की काय समजत नाही. शिवाजीमहाराजांपासून बाजीरावापर्यंतचा काळ म्हणजे महाराष्ट्राच्या उत्तरोत्तर भाग्योदयाचाच असे म्हणणारे विद्वान काय खोटे बोलतात थोडेच? हे पटणाऱ्यांना काही अधिक पुरावा देण्याची गरज नाही. फक्त सामान्य माणसाच्या परिस्थितीकडे बोट दाखवले नाही म्हणजे झाले. मग सगळी प्रगती अन भरभराटच आहे हे सत्ताधाऱ्यांना अन त्यांच्या भाटांना सहज पटते. स्वामी स्वतः कल्याणार्थ देशावर मोठा वाडा बांधून वास्तव्य करीत असता कल्याण न होणे कसे शक्य होते? चिमाजी अप्पाचे पत्रच पहा: "स्वामींच्या आशीर्वादे करून सर्व गोष्टी उत्तम आहेत. मुलूख मात्र वोस होऊन यमुनेपलिकडे गेला. कोठे माणूस नजरेस पडत नाही....जेजुरी येथील तळयावर दोन पायली सराटे आसनास घालून अनुष्ठानास बसलेत आहा. पर्जन्य पडेल यांत संदेह नाहीं." 'सर्व गोष्टी उत्तम आहेत' याचा हा अर्थ अजब आहे!

अवर्षणाने मरू लागलेल्या जनतेला वाचवण्यासाठी दोन पायली सराटे पसरून त्या आसनावर अनुष्ठानास बसणाऱ्या स्वामींनी नेहमी सराटयावरच बसावे अशी अपेक्षा करणे म्हणजे दुष्टपणाचा कळस ठरेल. जरा चेंज म्हणून पालखीची अपेक्षा अस्वाभाविक नाही. शाहूची बायको सखवारबाई हिने स्वामींना लिहिलेल्या एका पत्रात आहे: "पालखीच्या सरंजामास गाव द्यावा म्हणोन लिहिले ऐशास राजश्री स्वामींनी एक चावर देणे म्हणून करार केला आहे. पांगारे गाव देत नाहीत व बाळंभट वैद्याचा मजकूर लिहिला, ऐशास हा राज्यकारभाराचा प्रश्न, आपण देवऋषी यांत मन घालावें ऐसें नाहीं." ही सखवारबाई म्हणजे कान्होजी आंग्र्याची बहीणच दिसते आहे! ही पालखी स्वतःकरता होती का देवाच्या उत्सवासाठी होती हे या पत्रात नाही. पण स्वामी स्वतःसाठी पालखीचा तगादा लावत होते याचा पुरावा आहे. पालखी आणि त्याच्या सरंजामासाठी इनाम गावांच्या सनदा पाठवण्यासाठी स्वामींनी विरूबाईलाही रागाने पत्र पाठवले आहे. स्वामी लिहितात: "राजाचे वचन खरे करणे असेल (व) मजला पालखीत बैसविणे असेल, तर कोथळेच्या सनदा केरोजीजवळ करून पाठविणे. नाही तरी मजला पालखी नलगे. पालखी पाठवू नये." मंत्र्यांशी मैत्री असेल तर एखाद्या संस्थेच्या प्रमुखपदाच्या पालखीसाठी धडपडणाऱ्या विद्वानावर, तसेच इंपोर्टेड मोटार दिलेली असेल तर तिला शोभेलशा इतर सरंजामाचा आग्रह धरणाऱ्या बिचाऱ्या मंत्र्यावर आम्ही टीका करतो! आमच्या थोर भारतीय संस्कृतीच्या परंपरेचे काय हे घोर अज्ञान!

राज्यकर्त्यांकडून काही मिळवायचे असेल तर एकाच वेळी अनेकांना हलवावे लागते, सारखा अर्जांचा, धाकदपटशाचा मारा करावा लागतो, एक गोष्ट हवी असेल तर दहा गोष्टींची मागणी करावी लागते म्हणजे एक गोष्ट पदरात पडते हे ज्ञान काही आजचे नाही. स्वामी बाजीरावाला लिहिलेल्या पत्रात म्हणतात: "कोथळाच्या सनदा वेगी पाठवून देणे व काही वस्त्रे पाठवून देणे. वस्त्रे औरंगजेबा २, सकलाद उत्तम १, पशमी थान दुलई व कुडती करावयास २ येणे प्रमाणे पाठवून द्या म्हटले होते. बाजी, आज्ञा मोडू नको. काय, राहो येथे की जाऊ एखादेकडेस?" 'आजच्या पक्षांतराचे जुने धागेदोरे' अशा विषयावर कुणी संशोधन करीत असल्यास त्यांनी या आध्यात्मिक बाजूकडे लक्ष द्यावे.

आध्यात्मिक सिद्धी लाभल्या तरी पृथ्वीवरच्या लौकिक गोष्टीसाठी पृथ्वीवरच लौकिक मार्गानेच कार्य रेटावे लागते हे विसरून आध्यात्मिक आणि लौकिक गोष्टींची गल्लत करणाऱ्या मूर्खांच्या डोळयात स्वामींनी एका पत्राद्वारे झणझणीत अंजन घातले आहे. विरूबाईलाच लिहिलेल्या एका पत्रात स्वामी म्हणतात: "लाकडे तुमच्या राज्यात न तोडावी तर कोठून आणावी? स्वर्गीहून आणावी की काय?.. जेथे लाकूड डोंगर असतील तेथे तोडावी ऐसे आपले मुद्रेनिशी चिठी पाठवावी." सिद्ध पुरुष, अवतार, भगवान, आचार्य यांना मोटारी आणि पॉश फ्लॅट मात्र भक्तांच्या पैशातूनच का मिळवावे लागतात अशी टीका करणाऱ्या अडाण्यांना काय म्हणावे?

तुकारामासारख्या अल्पसंख्य संतजमातीतील बावळट संतामुळे संतांना व्यवहार नसतो, त्यांना प्रापंचिक लौकिक गोष्टींची काळजी नसते, हिशोब कळत नाही अशा प्रकारचे अनेक बावळट समज

प्रचलित आहेत. हे सारे समज किती खोटे आहेत याची उदाहरणे पाहा :

वसई फत्ते झाली ही केवळ स्वामींची कृपा असेच पेशव्यांना वाटत होते आणि स्वामींचीही तशीच खात्री होती. वसई फत्ते झाली ती कशी याविषयीचे बाजीरावाचे पत्र असे : "स्वामींचे आशीर्वादे वसई फत्ते जाहली हे मोठीच गोष्ट जाली. परंतु लष्कराची खरावी जाली व कर्ज जाले ते लिहिता पूर्वत नाही." म्हणजे कमालीची मनुष्यहानी व वित्तहानी याची किंमत देऊन वसई मिळवली अन श्रेय स्वामींना ! स्वामी स्वतःच लिहितात : "जरी दहा कोटी फौज घेऊन कोकणात जातेत तरी ऐसे यश कोकणचे न येते ऐसे पुर्ते आपले ठायीं समजणे. रावणासारिखा दैत्य मारिला ! नाही तर मजला राग आला तर मी तुमचा नव्हे."

रावणासारखा दैत्य मारणाऱ्या स्वामींना आपला अपमान करणाऱ्यांचे पारिपत्य मात्र करता येत नाही. त्यासाठी पुन्हा त्यांना राज्यकर्त्यांकडेच धाव घ्यावी लागते. स्वामी चिमाजीस लिहितात : "शेणवी याणे आमचा अपमान केला आहे. त्यापासून पंचवीस हजार रुपये घेणे. आम्हास नानाप्रमाणे म्हणत असत तर चौवीस हजार खर्च करून एक हजार आम्हास पाठवून देणे. निळो पतकी चिपळूणकर याणे हवशी याकडे आमच्या चाड्या सांगोन परशरामीतून आमचे भांडी, दरवाजा, नगारे नेविले आहेत. त्याच्या लोकाचा धंदा नारायणगडी आहे. त्यास दूर करून कचेश्वर गोविंद (यास नेमणे). माझा अपमान शेणवी याणें केला आहे, त्याचे पारपत्य केलेच पाहिजे. (न) कराल तर परशरामाची आण असे."

यात फक्त भाषेशिवाय काय जुने आहे ? वसई फत्ते व्हावी म्हणून स्वामींनी आध्यात्मिक शक्ती वापरली. लगेच त्याचा मोबदला त्यांनी मागितला. जे सैनिक मेले त्यांच्या कुटुंबियांचे काय झाले स्वामीच जाणे. स्वामींनी सव्वाशे पुतळ्या आणि भुलेश्वरास सव्वाशे रुपयाचा मुगुट अशी मागणी केली. पेशव्यांनी पुतळ्या पाठवल्या पण त्यांना फासे नव्हते. व्याजवट्टा करून, देणग्या घेऊन, इनामी गावे मिळवून गडगंज संपत्तीचा संचय करणाऱ्या स्वामींनी पुतळ्यांना फासे नाहीत ही गोष्ट काही नजरेआड केली नाही. त्यांनी बाजीराव–चिमाजीला खडसावून लिहिले : "श्रीनिवास केदार याजबरोवर नवस देवाचा सवाशे पुतळी निफांशी व सव्वाशे रुपये मुगुटाचे पाठविले. त्यास निफाशी पुतळीया घेत नव्हतो. त्यास श्रीनिवास केदार यांणी अर्ज केला जे, स्वामींनें पुतळ्या घ्याव्या. फांशाचे सोने पाच तोळे व सव्वाशे मोत्ये, रुपयास एक प्रमाणे, आपणांस सांगोन, सोमाजीवरोवर पाठवून देतो. त्यावरून पुतळ्या ठेविल्या. तरी पाच तोळे फाशाचे व मोत्ये सव्वाशे रुपयाचे एक प्रमाणे, आधी पाठवून देऊन मग वरकड देवांचे नवस देणे. जाणिजे."

बिचारे पेशवे. त्यांनी सोमाजीवरोवर सदरहू पाच तोळे सोने पाठवून दिवे. आपण केलेली मागणी भक्तांनी पुरी केली पाहिजे एवढाच स्वामींचा आग्रह नव्हता. इतर सारी कामे सोडून प्रथम ती पुरी केली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यासाठी पत्रावर पत्रे लिहिण्याचा स्वामींनी कधीही कंटाळा केला नाही. सदाशिव चिमणाजीस स्वामी लिहितात : "मज कोप आणू नका. कोप आणल्यास कोणाचे बरे झाले नाही. नानाची काय गत व महादाजी बल्लाळ याची काय गत व विरूबाईची गत काय झाली हे तुम्हास कसे न कळे ! आठ दिवस पैका पाठवून देतो म्हणून नेम केला त्यास दिवस किती जाहले ? तुम्ही तो पुरातन श्रीचे आणि असे करिता हे काय ? पुढील जन्मी येईल की काय ? पालखीकरिता कितेकवेळां लिहावे ? अतःपर लिहिणार नाही. तुम्हास संसाराची चिंता आहे. पालखीची चिंता याजहून विशेष असावी."

स्वामी सदाशिवपंत भाऊ यास लिहितात : "अनंत जन्मांच्या राशी, मेदोनी गेल्या गगनासी, मर्यादा नाही भाग्याशी, ऐसेच घडले. सहस्रायु चिरंजीव सदाशिवपंत भाऊ यांसी आज्ञा ऐसीजे: पाच हजार रुपयाची पावती पाठविली ते आपण फिरोन पाठविलें; आणि खंडोजीबरोबर सांगोन पाठविले की, मुद्दल पैकी पाच हजार पावले ऐसी पावती द्यावी. तरी आजपर्यंत व्याजाचा हिशेब काय होतो तो तुम्ही फडनिसाजवळ पुसावें. पांच हजार जाजती होतील. पुढे व्याजाचा हिशेब द्याल, त्यामध्ये पांच हजार वजा करावे. पावती काल पाठविली तेच पावली असे. विल्हेस लावून ठेवावी. वरकड, हेमगर्भाविसीं लिहिलें होतें. त्यास आपण लिहिलें की, यत्न केला परंतु मिळाला नाही. तरी आम्ही वैद्याकडून हेमगर्भ दोन तोळे आणविला आहे. रुपये वीस पडले. तरी वीस रुपये किंमत पाठवून दिली पाहिजे. वरकड, तुम्ही मजशी दोन भाव धरिता, हे गोष्ट कामाची

नाही. माझे शरीरीं किमपि ताकद राहिली नाही. हाडे निघाली ती तुम्ही आपले डोळ्यांनी पाहिली. ऐशास, मजला तवाना करणे असेल, तरी एक म्हैस दुभती, चांगली, ऐसी खिल्लारातून आणवून पाठवणें. वरकड, आम्ही तुम्हासी काडीभर प्रपंच धरीत नाही. आजपावेतों तुम्हाकडे मागेपासून उसनवटे बहुत होती. त्यांचा हिशेब म्हणावा तरी बहुतच होईल. वर्ताळा अलीकडे जाहला. परंतु माझे धैर्य थोर आहे काल तुम्ही दर्शनाला आलेत तेव्हा एक शालजोडी तरी लांबसी आणावी होती ! वृद्धापकाळी स्नानसंध्या करितो. मागे लग्नाची पाठविली तेही आम्हायोग्य पाठविली नाही. ऐसे दोन भाव धरू नका."

आहे की नाही गंमत ! अन स्वामीच 'पुढिले जन्मी येईल की काय' असे लिहितात. वृद्धापकाळ येऊन शरीरी त्राण राहिले नाही की स्वामींनाही सिद्धीपेक्षा हेमगर्भाचीच आठवण होते. तोही भक्ताने दिला पाहिजे. दुभती म्हैस दिली पाहिजे. वर पुन्हा 'आम्ही तुम्हासी काडीभर प्रपंच धरीत नाही' आहेच ! दर्शनाला रिक्त हस्ताने भक्त आलेला खपत नाही. आणलेली भेट मनाजोगी नसेल तर राग येतो.

कुणाकडून किती व्याज येणे आहे, मुद्दल येणे आहे, कुणी काय द्यायचे वचन दिले आहे, त्याप्रमाणे केले की नाही, ते वसूल कसे करावे, कुणाला पत्रे लिहावी, कुठे माणसे पाठवावी याचीच अहर्निश चिंता करणाऱ्या स्वामींना ईश्वर चिंतनाला कसा बरे वेळ मिळत असेल ? गोवे प्रांतातल्या भक्तांना स्वामी लिहितात : " चिरंजीव सदाशिव व भवानीदास मु. गोवे यांसी. तरी तुम्ही माळ पोवळियाची पाठवितो म्हणून आमचे पायाची क्रिया केलीत, याजकरिता माणसे मागे पाठविली होती. त्यास माळ न पाठविली. आमचा तुम्हांस कंटाळा आला ! बाळकृष्ण भुतशेटीचा लेक यणे पाचसाशे असर्फी आमचे बुडविले, त्याचे आम्ही काय केले ? तुम्ही तिकडे दुरस्थ. येथून तुमचा समाचार घ्यावयास अनुकूल पडत नाही."

म्हणजे स्वामींचा प्रभाव पोर्तुगीजांच्या मुलखात पडत नव्हता. नाना, विरूबाई वगैरे बिचारे जवळ होते हे त्यांचे दुर्दैवच !

म्लेंच्छ, फिरंगी यांच्याप्रमाणेच भुते पिशाच्चे यांच्यापुढेही स्वामींच्या सिद्धीची मात्रा चालत नव्हती असे दिसते. ग्रंथकार सांगतो : " धावडशीकर अंबाजी पाटलाने स्वामीशी वाकडे आल्यावर स्वामींच्या वाड्यात व कारकुनावर भुते घातली. कारकून आजारी पडले. गुरेढोरे मेली. स्वामी वाडा सोडून रागाने कृष्णाकाठी जाऊन राहिले." हेच स्वामी रावणासारखा दैत्य आपणच (पूर्वावतारात) मारिला म्हणून पेशव्यांना दम देतात !

स्वतःच्या प्रकृतीची वृद्धापकाळी काळजी घेण्यासाठी हेमगर्भाची मात्रा अन दुभती म्हैस यांचा आधार घेणारे स्वामी इतरांना मात्र आपल्या कृपेने वाचवू शकतो असे सांगतात. चिमाजीला लिहिलेल्या पत्रात स्वामी म्हणतात " भक्तराज खंडेराऊ यांस बरे वाटत नव्हते. त्याचा समाचार जाता घेतला. त्याणें अतिशयें लीन होऊन श्रीस संतोषी केले. पाचसात वस्त्रें श्रीस दिली. ते बहुतच अपूर्व दिली. द्रव्यही उत्कृष्टच दिलें."

पण खुद्द चिमाजीला मात्र स्वामींच्या कृपेचा काही उपयोग झाला नाही. १७४० च्या कार्तिक महिन्यात चिमाजी आप्पा आजारी पडले. मार्गशीर्षात स्वामी लिहितात : " चिरंजीव रा. आपाचे शरीरी व्यथा जाहली होती यास्तव चित्त स्वस्थ नव्हते. तन्निमित्य श्रीची प्रार्थना केली. आपास आरोग्य होईल. चिंता न करणें."

चिमाजी आप्पा पौष महिन्यातच वारले !

इकडे आपल्या सामर्थ्याची सारखी प्रौढी मारायची आणि व्याज वसूल करणे, अपमानाचा बदला घेणे यासाठी राज्यकर्त्यांकडे धाव घ्यायची ही विसंगती कुणालाच समजत नव्हती असे नाही. पण अविश्वास दाखवायची छातीही होत नव्हती. श्रीनिवास परशराम प्रतिनिधी यांनी स्वामींना लिहिलेले पत्र नमुना म्हणून पाहावे : "...कित्येक विषादे लिहिली. ...आपण नाहक आमचा संशय धरून चित्तात विपर्यास आणावासा नाही. आमचे चित्ती तिळतुल्य नाही... आम्ही काही कजियात नाही. तुम्ही आणि तो जाणे. आंगरीयाने त्याची हिमात केली तरी आम्ही काय करावे ? आंगऱ्या आमच्या हुकुमात आहे ऐसे नाही. आपण समर्थ आहा. जे चित्तास येईल ते करावे. श्रीकडे गाव इनाम सहा आहेत. त्याच्या सनदा द्याव्या म्हणजे श्री कार्यसिद्धी करील म्हणून लिहिले त्यावरून

सनदा दिल्ह्या आहेत. या उपरी सत्वर कार्यसिद्धी होय ते स्वामींनी केले पाहिजे."

म्हणजे, हवशाने त्रास दिला तेव्हा त्याचा मुलूख हस्तगत करा म्हणून आंग्र्याच्या मागे तगादा अन आंगऱ्याने पैसा बुडविला म्हणून त्याचे पारिपत्य करा असा प्रतिनिधींच्या मागे तगादा! हा सारा पैसा, त्यासाठी या उलाढाली, राजकारण स्वामींनी करू नये तर काय करावे? स्वामींचा हा सारा पैसा 'निढळाच्या घामाचा'च होता! स्वत: स्वामीच म्हणतात : ' माझे निढळाचा घाम पैका कान्होजी आंगरे यांणी काही बुडविला, कष्टी केले. व शामलानेही कष्टी केले." आता 'निढळाच्या घामाचा' पैकाच म्हटल्यावर स्वामींना सतत चिंता असणारच. मग तो बाजीरावासारखा परमभक्त का असेना. सावकारांपुढे मस्तक घासून टेंगळे आली म्हणून बाजीराव विषाद करीत होता. पण इतर सावकारांप्रमाणे स्वामीही त्याचा पिच्छा सोडीत नव्हते. बिचारा बाजीराव स्वामींना लिहितो : "महाराजांनी पत्र पाठविलें तें पाऊन अर्थ सविस्तर कळला. त्यास, भलते गोष्टीची तांतडी न करावी. जें होणें तें स्वामींचे मनोगतानुरूपच होईल. जितकी सेवा केली तितकी निर्फळ आहे. आता देशत्यागास जावे, किंवा घरीं कवाडें अडकावून बसावें, किंवा ईश्वर चरण जवळ करावे ऐसे अर्थ दिसतात. जो अर्थ घडेल तो लिहून पाठवू" सत्ता, शौर्य श्रेष्ठ असली तरी शेवटी सत्तेच्या नाड्यासुद्धा भांडवलवालेच आवळू शकतात! स्वामी वर "आम्हास द्रव्याची इच्छा नाही तुमची कीर्ति ऐकोन परम सुखी आहो" असे म्हणतातच! आणि त्याच्याकडचा पैसा नव्हे तर इतरांकडचा पैसाही त्यानेच वसूल करून भरावा असे टुमणे लावतात— बाजीराव लिहितो : "राम ठाकुरवाडीकर याजपासी पूर्वी आम्ही पालकी-निमित्त पन्नास रुपये दिल्हे होते, तो वारला, पालकी आली नाही. त्याचा पुत्र गोविंद राम ठाकुर प्रस्तुत तुम्हाजवळ आला आहे. तरी याजपासून पन्नास रुपयांचे सासे रुपये घेऊन पाठवणे म्हणून लिहिलें ते कळलें. ऐशास, गोविंद राम ठाकुर यास बोलाऊन स्वामींचे आज्ञेप्रमाणे सांगितलें. त्यास त्यांणी उत्तर केलें की बावांनी पालकीनिमित्य पन्नास रुपये राम ठाकुर यापाशी दिल्हे होते ते आपणास काही ठावके नाहीं. आपला बाप निवर्तला तेव्हा आपण साता महिन्यांचा होतो. आपला वडील भाऊ नारो राम वाडीस होता तेव्हा बावांचे चरण दोन तीन वेळां वाडीस पाहिले; परंतु ते वेळेस बावा काही बोलले नाहीत. हंबीरराव मोहित्यापासून बावांचे येणे वाडीस न जाहले, परंतु अलीकडे चौदा वर्षे देशांत नांदतो. परंतु बावा काही बोलले नाही. आपला वडील भाऊ नारो राम मरून सात वर्षे जाली. त्यांणी काही एक मजकुर कधीही बोलिला नाही. बेल तुळशी उचलून द्यावयाचा अर्थ, तर आपण कशावरून बेल तुळशी उचलून द्याव्या? आपणास काहीच ठावके नाही. बावा ईश्वरस्वरूप आहेत. आज्ञा करितील तर पन्नास रुपये पाठवून देईन म्हणून उत्तर केले. विचार करून पाहता गोविंद रामास काही ठाऊक नाही. यांणी बेल तुळशी कैशा उचलून द्याव्या? स्वामींची आज्ञा उल्लंघन न करावी या विचारे स्वामी आज्ञा करतील तर पन्नास रुपये याजपासून घेऊन पाठवून देऊ." बाजीरावावर स्वामींचे प्रेमही फार होते. बाजीरावाच्या मृत्यूनंतर चिमाजीने लिहिले आहे : "बाजीरावासारिखा शिष्य गेला, या उपर या मुलखातून जावे किंवा प्राण सोडावा, काय करावे ते लिहिणे म्हणून पत्री लेहून पत्र चिरंजीव रा. दादोबाजवळ दिल्हे ते त्यांनी पाठविले ते काल पावले. त्यावरून आम्ही दु:खाच्या सागरात मग्न जालो. एक तीर्थरूप मस्तकीं आमच्या होते ते गेले! बरे! होणारास ईलाज नाहीं! स्वामी रायाच्या आमच्या सर्वांच्या मस्तकीं आहेत. त्या आश्रयें करून आजपावेतों कालक्रमणा केली. यश कीर्ति सर्व प्राप्त जालें. आता स्वामींनी येविसीं उदासीनता चित्तीं, आणल्यावर आम्ही या मुलखात राहून काय करणार आणि आमचा परिणाम काय लागणार ते कळतच आहे! तेव्हा स्वामी जातील तिकडे उठोन जावे, अगर स्वामींच्या समागमे कोठे येवेल? यावयाचे सामर्थ्य कैचे? तेव्हा सर्वस्वास पाणी सोडून आयुष्याचे दिवस मात्र घालवावे ऐसे आम्हांस प्राप्त जालेंसें जालें."

पैसा आणि सत्ता यांचे संबंध असे असतात! सिद्धांनाही प्रापंचिकांसारखी दु:खे होतात! पराक्रमी सत्ताधाऱ्यांची केवढी अद्भुत श्रद्धा! मराठी राज्याचा भाग्योदय व्हावा म्हणून स्वामींनी मराठ्यांच्या मुलखात वास्तव्य केले. देवस्थानाचा 'कारखाना' चालवला. स्वामींच्या हयातीत जे झाले ते स्वामींच्याच

आशीर्वादाने झाले असे लेखकाला वाटते. सुरवातीलाच रामदासांशी स्वामींची केलेली तुलना उल्लेखिली आहे. रामदास स्वामींच्या पश्चात मराठी राज्याचे काय झाले हे माहीत आहेच. खुद्द 'ईश्वरस्वरूप' स्वामींच्या संस्थानाची काय गत झाली! चरित्र-लेखक सांगतो : "कोकणातील पेढे येथील परशुराम व गोठणे येथील भार्गवराम ह्या स्वामींच्या देवस्थानात पेशव्यांनी फारच घोटाळा केला व ती निरनिराळ्या लोकांकडे चालविली. ह्या सर्वांचा पुढील वृत्तांत अत्यंत भानगडीचा व वादग्रस्त असल्यामुळे तो स्वामींच्या पवित्र चरित्रात दाखल करण्याची आमची ईच्छा नाही."

हे ठीक आहे. पण स्वामींच्या पश्चात असे घोटाळे होतात यात स्वामींच्या सामर्थ्याची आणखी एक मर्यादा स्पष्ट होते त्याची काय वाट? स्वत: स्थापन केलेल्या देवस्थानांचे व्यवहार सुरळीत चालू राहावे इतकीही तरतूद करता न येणाऱ्या स्वामींनी आपल्या कृपासाहाय्याने मराठी राज्याचा अभ्युदय केला यावर विश्वास कसा बसावा?

बाकी आमच्या विश्वासाला विचारतो कोण? आणि या टीकेला तरी विचारतो कोण?

भाषा आणि विचार...

येथ अलंकारिले कवण कवणे...

"देहाच्या पाशातून सुटलेल्या आत्म्याचे हास्य मृत्यूच्या कल्पनेमुळे जसे भयाण भासते त्याप्रमाणे सुधेच्या या उत्तरातील धाडसाने सुधाकरांचे अंत:करण दुभंगून गेले. एक विधवा पाण्यात बुडाली तर जगाचे काही बुडत नाही. खरेच काही बुडत नाही का?.... प्रत्येक जीव हा भावनांचा सागर व बुद्धीचा गिरि असतो. या सागरातून इतरांचा दाह शांत करणारे अमृत अथवा या पर्वतातून भूमि धनधान्यसंपन्न करणारी सरिता उत्पन्न होणार नाही म्हणून कोणी सांगावे?.... माकडाने रत्न दूर भिरकावून दिले म्हणून जवाहिऱ्याच्या दुकानात त्याचे मूल्य कमी होईल का? सतारीचे मोल गवईच करू शकतो; कुंचल्याची किंमत चित्रकारालाच कळते; जीवाचे महत्त्व एकट्या देवालाच माहीत असते.... आपल्या हास्याने गृहमंदिरात पौर्णिमेचे चांदणे फुलवायला, आपल्या अश्रूंनी प्रिय मनुष्याच्या हृदयातील आग विझवायला, आपल्या मृदु स्पर्शाने निरुत्साही मनाला संजीवनी पाजून उत्साहपूर्ण करावयाला समर्थ असलेली ही सुंदर मूर्ति पाण्यात बुडवून टाकण्याकरिताच देवाने उत्पन्न केली असेल तर देव आणि राक्षस यांच्यात फरक काय राहिला?.... वीरकन्या, वीरपत्नी अथवा वीरमाता होणाऱ्या एका जीवाला विहिरीत बुडण्याखेरीज दुसरा मार्गसुद्धा मोकळा न ठेवणे म्हणजे कल्पवृक्षाचा उपयोग सर्पणाकडे करण्यासारखे आहे. कपाळीचा कुंकवाचा टिळा पुसला म्हणून डोक्यातील बुद्धि, हृदयातील भावना, मनातल्या आशा आणि आत्म्याच्या आकांक्षा काही लोप पावत नाहीत. चंद्र नसला तरी रजनी विश्वाला शांति देऊ शकते; वसंत नसला तरी जुईची वेल फुलते; वर्षाकाल नसला तरी पर्वतातून जलप्रवाह वाहत असतो."

—**विष्णु सखाराम खांडेकर, 'कांचनमृग', १९७६ मुद्रण, पृष्ठ १२३.**

शरश्चंद्रांची एक अद्वितीय मानसकन्या – कमल

मालती पाटील

कमल म्हणजे "जशी काही पावसाळ्यांतली जंगली वेल. दुसऱ्या कुणाचीच गरज नाही. स्वतःचं संरक्षण करायला स्वतः समर्थ असलेली – त्या सामर्थ्याच्या जोरावर माती फोडून माथें वर करून उभी राहिलेली. आजूबाजूच्या कुणाच्याच विरोधाची भीती नाही की भावनाही नाही! कांटेरी कुंपण घालून बचाव करायचा प्रश्नच तिथं उद्भवत नव्हता"[१]– अशा जंगली वेलीचं दर्शन घेण्यासाठी व घडवण्यासाठी शरश्चंद्रांनाही नेहमीची परंपरेनं मळलेली, रुळलेली पाऊलवाट सोडून नवविचारांच्या आडरानात शिरावं लागलं. 'शेषप्रश्न' वाचताना, ठराविक चाकोरी सोडल्याची ही जाणीव शरत्साहित्याच्या अभ्यासकांना, सतत होत राहते.

नुकत्याच उमललेल्या कमलपुष्पाप्रमाणे सदैव टवटवीत वाटणारी 'शेषप्रश्न' कादंबरीची नायिका कमल शरश्चंद्रांच्या वाङ्मयसृष्टीत केवळ अद्वितीय व अपूर्व वाटते. शेषप्रश्न ही शरश्चंद्रांची सतरावी कादंबरी. यापूर्वीच्या व नंतरच्याही सर्व कादंबऱ्यातून ('पथेरदाबी'चा अपवाद सोडल्यास) शरदबाबूंनी तत्कालीन बंगाली समाजातील 'आदर्श स्त्री'चे प्रातिनिधिक स्वरूप आपल्या कथा, कादंबऱ्यातून रेखाटलं आहे. त्यांच्या सर्वच नायिका सुंदर आहेत, सद्गुणी आहेत. पातिव्रत्य, विनयशीलता, भावनात्मकता, क्षमाशीलता, ऋजुता, स्वार्थनिरपेक्षता, बुद्धिमत्ता इत्यादी गुणांनी त्या विनटलेल्या दिसतात. घराच्या चार भिंतीत त्या वावरणाऱ्या आहेत. त्यांचं विश्व म्हणजे त्यांचं घर. कुठलाही क्रांतिकारक, बंडखोर विचार त्यांना सोसत नाही. परंपरेनं आदर्शवत मानल्या गेलेल्या गुणविचारांनी घडवलेल्या त्या सुंदर व सजीव पुतळ्या वाटतात.

शरदबाबूंच्या समग्र साहित्यात सुमित्रा, भारती व कमल या तीनच स्त्रियां आगळ्यावेगळ्या वाटतात, त्यांनी प्रदर्शित केलेल्या क्रांतदर्शी नवविचारांमुळे! पथेरदाबीतील सुमित्रा ज्यू आहे तर भारती ख्रिश्चन आहे. राजकारणाच्या पार्श्वभूमीवरं त्या वावरतात. शरदबाबूंच्या बहुतेक कथा, कादंबऱ्या सामाजिक व विशेषतः कौटुंबिक जीवनावर लिहिल्या गेल्या आहेत. या दृष्टीनं कमल ही सामाजिक – कौटुंबिक पार्श्वभूमीवर उभी केलेली एकमेव बंडखोर व्यक्तिरेखा! जातीनं ख्रिश्चन. तिची आकृती आहे पौर्वात्यांची पण प्रकृती आहे पाश्चात्यांची. प्रत्येक प्रकारच्या महत्त्वाच्या सामाजिक समस्यांचे उद्घाटन करणारी ही केंद्रवर्ती व्यक्ती. अशी अप्रतिम व अलौकिक व्यक्ती शरदबाबूंनी घडवली तरी कशी याचीच नवलाई वाटते. आपलं सारं कौशल्य पणाला लावून, कमालीच्या हलक्या हातानं ही मानसकन्या त्यांनी रंगवली.

कमलची आई असते बंगाली हिंदू–वैद्य जातीची पिता युरोपियन ख्रिश्चन. आसामात चहाच्या मळ्यात तिचा जन्म होतो. तिच्या मनाची घडण, विचारांची पद्धत तिच्या वडिलांनी घडवली असते. तिचा पहिला पतीसुद्धा आसामी ख्रिश्चनच. त्याच्या मृत्यूनंतर तिचा शिवनाथशी संबंध येतो. शिवनाथच्या विधवा मोलकरणीची ही विधवा मुलगी, त्याच्याशी शैवपद्धतीनं लग्न लावते. आशुबाबूंच्या घरी भरलेल्या गायनाच्या मैफलीच्या प्रसंगी शिवनाथनं तिच्या गैरहजेरीत करून दिलेला हा तिचा परिचय. कादंबरीच्या कथानकपटावर शिवनाथची पत्नी म्हणूनच ती प्रथम पदार्पण करते. कमलची प्रत्यक्ष ओळख शरदबाबूंनी मोठ्या काव्यात्मक रीतीनं करून दिली आहे. जननिंदेनं बुजलेला शिवनाथ कमलला झाडाखालीच उभं ठेवून आशुबाबूंच्या घरात शिरतो. पण परत जाताना दोघेही पावसात चिंब भिजतात. आशुबाबूंसाठी मनोरमा दोघांनाही घरात बोलावते. कमल अगदी पहिल्यानंच त्या घरात पाऊल टाकते. तिच्या अप्रतिम तेजस्वी सौंदर्यानं

---

१. शरश्चंद्र चट्टोपाध्याय, शेषप्रश्न, [अनुवादक भा. वि. वरेरकर, आवृत्ती दुसरी १९५३, पान ३५२.]

केवळ आशुबाबूच नाही तर मनोरमाही थक्त होते. तिच्या तोंडाकडे बघून पूर्वीच्या कवींनी रमणीच्या मुखाला दिलेली शिशिरयुक्त कमलाची उपमा त्यांना सार्थ वाटू लागते. अविनाशबाबूंना ते कमलबद्दल सांगतात – "पोर म्हणजे नुसती लक्ष्मी आहे बरं ! अशी देखणी मुलगी शोधून सापडावयाची नाही.[१]" ताजमहाल पाहायला गेलेल्या व्यक्तींना [कमल] या अपरिचित रमणीच्या सर्वांगावर एक अत्यंत सजीव अशी विस्मयजनक ज्योती व्यापून राहिली असल्याचं दिसून येतं व तिच्यासमोर थोडयाच अंतरावर दिसणारं ते संगमरवरी स्वप्न क्षणात विरून गेल्यासारखं वाटतं. हरेनच्या मते राजाची राणी व्हायचीच तिची लायकी. नीलिमाही तिच्या सौंदर्यानं दिपून गेलेली. अजित. शिवनाथ तिच्या सौंदर्यामुळंच तिच्याकडे आकर्षित झाले. आपल्या लावण्याची जाणीव खुद्द कमललाही दिसते. आपली तेजस्विता दर्पपूर्ण असली तरी ती अजिंक्य आहे असा तिचा अढळ विश्वास ! 'शेषप्रश्न'ची नायिका अशी सुंदर आहे व तिच्या देहसौंदर्याचं कुठेही उत्तान किंवा भडक वर्णन न करताच, तिच्या सुंदरतेचं सुंदर चित्र शरदबाबूंच्या लेखणीनं अगदी सहज चितारलेलं दिसतं.

केवळ सौंदर्य हेच कमलचं खास वैशिष्टय नाही. तिचं आगळेपण आहे तिच्या स्वभावात. आशुबाबू हे शेषप्रश्नातील एक प्रमुख पात्र. कमलच्या बाबत ते सांगतात – "या पोरीचं बाह्यस्वरूप पाहिल्याबरोबर माणूस जेवढा दिपून जातो, तितकाच तिचं अंतरंग पाहू शकला तर थक्कच होतो."[२] वाचकांना चकित करून सोडणाऱ्या कमलच्या अंतरंगात लेखक अगदी खोलवर डोकावून बघतो. त्या तळाशी चमचमणाऱ्या विविध पैलूतूनच तिच्या स्वभावाचं रेखाटन साधलं जातं.

कमलचं स्त्रीत्व तीव्र बुद्धिमत्तेनं, सूक्ष्म विचारशक्तीनं, चिंतनशील मनोवृत्तीनं भारलेलं दिसतं. तिची बुद्धिमत्ता सर्वगामी असल्याचं नीलिमेचं सांगणं एकदम पटतं. स्त्रीजीवनाशी संबंधित असणाऱ्या विवाहविधी, वैवाहिक जीवन, परित्यक्तेचं जिणं, वैधव्य, सहगमन, समान हक्क, स्त्रीची नीतिमत्ता, विवाहबाह्य स्त्रीपुरुषसंबंध, सनातनमूल्ये आदर्श समजल्यानं होणारा स्त्रीमनाचा कोंडमारा, अशा विविध विषयांवर तिची प्रज्ञा लीलया स्वैरसंचार करते. या विविध विषयांवर तिनं कथन केलेल्या मुद्देसूद विचारांवरून ती विद्वान वाटते.

कमल बंडखोर व क्रांतिकारक विचारांची उद्‌गाती आहे जणु 'जुनं ते सोनं नाही' हे पटवून देण्यासाठीच तिचा अवतार.[३] मानवी जीवनप्रवाह गतिमान असावा हे कमलचं प्रामाणिक मत. भरधाव वेगानं दौडणाऱ्या मोटारीत अजित शेजारी बसलेली कमल त्याला सांगते– "सपाटयाच्या वेगांत मोठा आनंद असतो – मग तो वेग गाडीचा असो कीं जीवनांतला असो."[४] तिच्या दृष्टीनं झरा पाझरणं हेच जीवनाचं मूल्य. इथूनच सदोदित जीवनातल्या आशा, आनंद आणि रसाचा पुरवठा होत असतो. परंतु यासाठी परंपरेचं पूजन टाकलं पाहिजे. आचारविचार खोटे म्हणून ते सारे उधळून लावावे असं तिचं म्हणणं नाही. तिला हवा आहे तो त्यात बदल. कालच्या धर्मात आज जे 'अचल' होऊन बसलं आहे त्याला फटका मारून 'चालतं' केलं पाहिजे. केवळ म्हणून ती जुन्याची हेटाळणी करते. या गतिमान जगात मनुष्याच्या गतिमान चित्ताला जे सत्य सदोदित नव्या स्वरूपात पावलोपावली दिसून येतं त्याची ओळख सर्वांना सहज पटते. मग कळतं तसं वळायला काय हरकत आहे ? कमल नवसत्याचा पुरस्कार करते. मात्र हे नवविचारांचं विश्व साकारताना कमलच्या नशिबी प्रत्येक क्रांतिकारकाच्या वाटयाला येणारं सामाजिक उपहास, अवहेलना व छळाचं विलक्षण दुःख सामोरं आलेलं दिसतं. अक्षय, हरेन, अविनाश, अजित सारेच तिला टोचून बोलतात. आशुबाबूंसारखा समतोल, शांत मनुष्य, कमलनं बेदरकार, निर्भय वृत्तीनं मांडलेल्या उघडयानागडया स्वरूपातील सत्यदर्शनानं

१. शेषप्रश्न, पान ४६.

२. शेषप्रश्न, पान २४३.

३. महाराष्ट्रातील आधुनिक कविवर्य केशवसुत व शरश्चंद्र यांच्या, सनातन जीवनमूल्यांकडे पाहण्याच्या दृष्टीत विलक्षण साम्य आहे. तुतारी प्राणपणाने फुंकून केशवसुतांनी "जुनें जाऊं द्या मरणालागुनी, जाळुनि किंवा पुरूनि टाका,... नियमन मनुजासाठी, मानव – नसे नियमनासाठी जाणा" दिलेल्या ह्या दिव्य संदेशाची कमल ही सुद्धा प्रभावी पुरस्कर्ती होती असं दिसतं.

४. शेषप्रश्न, पान ८१.

रुदन : एक दुर्लक्षित संगीत प्रकार

सुरेश गजेन्द्रगडकर

महाराष्ट्रात अलीकडे संगीताचा व संगीत-प्रकारांचा अत्यंत सखोल अभ्यास सुरू झाल्याचे आमच्या लक्षात आले आहे. केवळ संगीताच्याच नव्हे तर त्याच्या अंतर्गत असलेल्या सौंदर्यकृतींच्या मुळाशी ज्या काही तत्वांचे अधिष्ठान असण्याची शक्यता आहे, अशा तत्वांचे मूलगामी अन्वेषण तथा त्यांचा इतर ललितकलांशीं व कलातत्वांशीं असलेला संबंध ह्याचाहि अभ्यास होत आहे. त्यासाठी प्रयत्नपूर्वक संगीत प्रकारांचे संशोधन केले गेल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे. आमचा व संगीताचा कित्येक वर्षांचा संबंध लक्षात घेता आम्हीहि ह्या विषयावर संशोधन करणें स्वाभाविक होते. तेव्हां आम्ही एक उपेक्षित, दुर्लक्षित संगीत प्रकार शोधून काढला आहे. व त्याचे सांगितिक स्थान त्यास पुन: मिळवून देण्यासाठी हा लेख लिहीत आहोत. [कुठल्याहि कलांतर्गत सौंदर्यशास्त्रविषयक विशेषत: संगीत समीक्षेविषयक लेखन हे अत्यंत क्लिष्ट व गोंधळ करणारे असावे असा अलिखित नियम असल्याने ह्या लेखाची भाषाहि शक्यतो इंग्रजाळलेली, कठीण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्याची यशस्विता ही वाचकांनीं ठरवणे.]

रुदन हा महान संगीतप्रकार आजवर महाराष्ट्राने, भारताने, व साऱ्या विश्वाने नीटपणे कधीच समजून घेतला नाही. किंवहुना गेल्या काही शतकांत त्यास मान्यता देण्याचेहि टाळले आहे. आमच्या मते संगीताचे मूळ स्वरूप रुदन हेच होते व त्यापासूनच आजचे शास्त्रीय – अशास्त्रीय, सुगम – दुर्गम, शब्दानुगामी–स्वरानुगामी, स्वरशब्दताल यासहित वा ह्या विरहित (प्रसंगी एक, दोन वा एकसमयावच्छेदेकरून सर्व) घरेलू – अंगणीय तथा प्रांगणीय – इ. सर्व प्रकार निर्माण झाले आहेत.

आता विषयाची सुरवात करताना रुदन ह्याने आपल्यास नेमके काय अभिप्रेत आहे हे कळण्यासाठी एक रुदन ह्या शब्दाची सांगितिक कामचलाऊ व्याख्या करू. नंतर ती टाकून दुसरी करू. [असें कां करायचे ? एकदमच दुसरी कां करायची नाही ? असे प्रश्न वाचकांनी मनातच ठेवावेत. आम्हालाही हे प्रश्न नेहमी येतात परंतु संगीताच्या सौंदर्यशास्त्र विषयक चर्चेत असेच करायचे असते कारण इंग्रजींत असे करतात. आता भारतीय संगीताविषयी विचार करताना ही इंग्रजी पद्धत का असा आक्षेप कुणी घेईल. परंतु आम्हास त्याच्याशी कर्तव्य नाही कारण आमचा विषय वैश्विक पातळीवरून हाताळत आहोत]

तेव्हां रुदन म्हणजे रडणे. अशी पहिली व्याख्या करूं. ती टाकून देऊं व दुसरी अशी करूं या. " विशिष्ट भावावृत्तींच्या दर्शनार्थ (वा प्रदर्शनार्थ) काढलेला आवाज म्हणजे रडणे. "

एका मोठ्या परदेशीय संगीतज्ञानें म्हटले आहे की Every creation of arts is a personal act but must be prompted and supported by collective needs with relation to History and Geography तेव्हां रुदनाचे ऐतिहासिक व भौगोलिक संदर्भ प्रथम तपासून पाहू.

रुदनाविषयी ऐतिहासिक माहिती फारच थोडी उपलब्ध आहे. जुन्या काळी कसे रडत ह्याविषयीचे लेखनहि विशेष नाही. शिवाय त्याच्या ध्वनिमुद्रिकाहि उपलब्ध नाहीत. त्यामुळे पूर्वीचे रुदन व आजचे रुदन ह्यांतील फरक दाखवून ह्या झालेल्या प्रवासाचा आलेख काढणें शक्य नाही. इतर संगीत प्रकारांबाबत निदान गेल्या पंचवीस वर्षातील ध्वनिमुद्रिकांच्या आधारे ही अडचण दूर करता येते परन्तु ह्या संगीत प्रकाराकडे कमालीचे दुर्लक्ष झाल्यानें त्याच्या इतिहासाविषयी लिखित गोष्टींकडे वळावे लागते.

रुदन हे आदिसंगीत आहे. त्याची सुरवात अॅडमची बरगडी फोडून ईव्ह ह्या जगांत आली त्याक्षणीं झाली. प्रथम अॅडम रडला की ईव्ह ह्या-

विषयी मतभेद आहेत. प्रथम अॅडम रडला व नंतर ईव्ह हे मत आम्हास मान्य आहे. स्त्रीजन्मापासून पुरुषाच्या तोंडी रुदन आले असे समजण्यास हरकत नाही. (संगीताचा सामाजिक संदर्भ असाहि आहे) तेव्हांपासून मानव हा जन्मास आल्यापासून रुदन हा संगीत प्रकार आळवतो. जन्माला आलेल्या अर्भकाच्या तोंडचे ते स्वर नैसर्गिक, अकृत्रिम, शुद्ध, कुठल्याहि बाह्य परिणामांविरहित (व्हर्जिन) असल्याने कुणाहि रसिकास मोहवून टाकतील. पहिल्या मानवांचा हा रुदनाचा आवाज जेव्हा पृथ्वीवर उमटला तेव्हा त्याचे सौंदर्य अत्यंत परिणामकारक असले पाहिजे. निसर्गाने निर्माण केलेल्या अनेक आवाजाशीं तुलना केल्यास लक्षांत येते कीं ह्या रुदनातच साऱ्या संगीताची बीजे सामावली आहेत. मूल जन्माला आले की 'टचॅंहॉं' करतें (पहा : कुठलीही कथा वा कादंबरी) 'ट्' 'य्' 'ह' ही तीन व्यंजने व दोन अनुनासिके ह्यांच्या जोरावर निघणाऱ्या ह्या स्वरावलीतून एक अनुपमेय असा सांगितिक अनुभव मिळतो.

भौगोलिक दृष्टया विचार करतांना आपल्या लक्षांत येते की ह्या प्रकारास स्थलाचें वा कालाचे बंधन नाही. किंबहुना Music is a Universal Language असे म्हटले जाते ह्या प्रकाराइतके दुसऱ्या कुठल्याहि प्रकारास लागू होत नाही. किंबहुना ह्या प्रकारावरूनच हे म्हटले असावे. रुदन हा प्रकार जगातील सर्व धर्माचे, रंगाचे, जातीचे लोक आळवताना दिसतात तसेच रुदनाची संकल्पना सर्व जगभर थोडया फार फरकानें एकच आहे. पौर्वात्य, पाश्चात्य, उत्तर–दक्षिण असले दिशावलंबित फरकहि ह्या प्रकारात संभवत नाहीत.

आता आपण थोडे थांबू व आतापर्यंत आपण काय पाहिले ते पाहूं या! (१) रुदन हा एक संगीत प्रकार आहे. (२) ते आदिसंगीत आहे. (३) रुदन हा प्रकार प्रत्येकजण जन्मकाळापासून गातो. (४) त्यास स्थलकाळाचें बंधन नसते. तें वैश्विक असते.

आता आपणास आणखी संकल्पनांचा विचार करावयाचा आहे. उत्क्रान्तीच्या तत्वानुसार (evolution) सर्वात प्रगत प्राणी म्हणजे मानव. म्हणजेच माणसाचा आवाज हा सर्वांत उत्क्रान्त. भारतीय संगीतशास्त्राप्रमाणे (व कॅलिफोर्निया येथील अभ्यासूंच्या मतेहि) प्राण्यांच्या आवाजात कांहीं स्वर आहेत. कोकीळेचा पंचम लोकमान्य (पॉप्युलर) आहे. हत्तीचा निषाद, मोराचा षड्ज वगैरे. तेव्हा उत्क्रान्ति तत्वानुसार आम्हास असे वाटते की माणसाचा पहिला आवाज हा सप्तस्वरांयुक्त (कीं बारा?) असावा. ह्याविषयी अधिक संशोधन होण्याची गरज आहे. तेव्हां "ट यॅं हॉंऽ" मध्ये निदान सात तरी स्वर असून सप्तकाच्या संकल्पनेची गंगोत्री मानवी रुदन आहे.

ह्यानंतर विचार करायचा तो रुदनप्रकारांचा व त्यांत अंतर्भूत (Involved) असलेल्या संगीतविषयक संकल्पनांचा. सामान्य श्रोतेहि रुदनात दोन प्रकार मानतात. (इथे सामान्य विशेषणाने श्रोत्यांना कमी लेखण्याचा हेतू नाही. सामान्य म्हणजे बहुतेक सर्व. अर्थात् ज्या कांही श्रोत्यांना आपण असामान्य आहोत असे वाटते. त्यांचीही सोय व्हावी हा हेतू आहेच.) ते म्हणजे. (१) सुरेल रुदन (२) बेसुरे रुदन. सुरेल रुदन हे आनुवंशिक असावें असें अनुमान लोकसाहित्याच्या मंथनावरून काढता येतें (पहा : म्हण :– गवयाचे पोर सुरांत रडणे.) अर्थात् ह्याचा अर्थ रियाझ केल्यावर बेसुरी रुदन सुरेल होत नाही असे नाही. लहानपणी अत्यंत बेसुरे रुदन करणारी मुले कित्येक वेळां मोठेपणी सुरेल रडतांना ऐकलीं आहेत. व कित्येकांनी शास्त्रीय गायनांत महान् स्थान पटकवल्याचीही नोंद आहे.

ह्या पुढील चर्चा करण्या आधीं आपण सूर ह्या संकल्पनेपाशीं आहोत तेव्हढयांत त्याविषयीं थोडें पाहूं या. सूर ही संकल्पना बरेच वेळां हवी तशी अनेकांनीं राबवल्यामुळें सर्व चर्चेत एकसूरीपणा येण्याची शक्यता आहे. सूर म्हणजे विशिष्ट स्वर चौकटीचा किंवा स्वरसोपानाचा पाया वा आधारभूत स्वर. ह्याशीं प्रामाणिक राहून जें गायले जाईल तें सुरेल रुदन. जें सुरेल नव्हे ते बेसुरें रुदन. इतकी चर्चा करून हा भाग संपवू या.

कुठल्याहि सांगीतिक संकल्पनांचा साधक विचार करतांना आणखी एक संकल्पना तपासून पहावी असा संकेत आहे. ती म्हणजे लय किंवा ताल. लहान मुलांच्या रुदनांमधली लय ही सागरांच्या लाटेमधल्या लयी सारखी आहे. ती सांपडणे कठीण. परंतु रुदन संगीताचा आविष्कार वाढत्या वयात होत असतांना त्याची लय जाणवते. हुंदक्यांनीं कधीं काल व सम दाखवली जाते. 'उं' किंवा तत्सम शब्दांनी मात्रा

भरण्याचे कौशल्य काहीं वेळां दाखवण्यात येते. आणखी एक म्हणजे अलीकडे तालमाला म्हणून जो प्रकार ऐकवला जातो तो काहीच नव्हे अशा प्रकारे अनेक तालांतून व लयीतून हे रुदन संगीत आळवले जाते. चटकन् ताल बदलला जातो अथवा लय बदलते परंतु रुदन चालूच असते. त्याची अंतर्लय सुटत नाही की तालावरची पकड ढिली होत नाही.

प्रत्येक संगीत प्रकार हा सुरवातीस वैयक्तिक असतो व नंतर तो सार्वजनिक होतो. ह्या विषयी एक सोपान किंवा मांडणी अशी (१) **वैयक्तिक** : स्वतः- साठीं. (२) **खाजगी बैठक** : थोडया श्रोत्यांसाठी. (३) **मोठी बैठक** : बऱ्याच लोकांसाठी. (४) **फार मोठी बैठक** : काही निमंत्रित, काही तिकीट काढून आलेले, काही सभासद ह्यांसाठीं कलामंडळें संगीत- मंडळें (Art and Music Circles) ह्यांनीं ठेवलेल्या बैठकी. (५) **जाहीर उरूस** : सरकारी वा खाजगी पातळीवरून, कुठल्याहि कारणासाठीं पुण्यतिथी षष्ठ्यब्दि शतसांवत्सरिक उत्सव वगैरे घडवले जाणारे कार्यक्रम. येथे हजारो लोक ऐकण्याच्या निमित्ताने एकत्र येतात.

ह्या सोपानमांडणीत अंगणीय – प्रांगणीय दोन्ही प्रकार अंतर्भूत आहेत हे गेली कित्येक वर्षे गाणें ऐकणाऱ्यास सहज उमगेल.

संगीताची वाटचाल (Cyclic) चक्राकार अस- ल्याचा आमचा सिद्धांत आहे. म्हणजेच वैयक्तिक → खाजगी → मोठी — फार मोठी — उरूस हा मार्ग कालांतराने उरूस → फार मोठी → मोठी → खाजगी→ वैयक्तिक ह्या मार्गात रूपांतर पावतो. कुठलाहि संगीत प्रकार सुरवातीस खाजगी असून हळूहळू तो उत्सीय बनतो. परंतु जेव्हां उत्सीयाचा कंटाळा येतो तेव्हा परत उलटी मार्गक्रमणा सुरू होते. अर्थात एकाच वेळी सर्व प्रकार अस्तित्वांत असतील परंतु हळूहळू इतर लोप पावतात व एका प्रकाराचें प्राबल्य जाणवते.

रुदनाबाबत नेमके हेच घडले असावे असा आमचा निर्णय आहे. सुरवातीस वैयक्तिक असलेले रुदन हळूहळू नातेवाईक मंडळी व जवळची मंडळी ह्यासमोर येऊ लागले. नंतर निमंत्रितासमोर याचा आविष्कार झाला व शेवटी सार्वजनिक ठिकाणीहि अत्यंत मुक्तपणे रुदन घडू लागले. कालौघात हा प्रकार उलटा फिरू लागला व आज तो जवळ जवळ वैयक्तिक बनला आहे. तो सार्वजनिक होता व पैसे देऊन कार्यक्रम होत असत. ह्याविषयीं एक बिनतोड पुरावा आमच्या हाताशीं आहे. नाट्यसंगीत हे भारतीय संगीतांतील सर्व प्रकारांतील कांहीं भाग घेऊन त्यास योग्य तो हवा तो आकार देऊन तयार झाले आहे हे सर्वमान्य आहे. तेव्हां आजच्या नाटकांत रुदन संगीताचे जे अवशेष आहेत त्यावरून हे सिद्ध होणे कठीण नाही. हा प्रकार अत्यंत प्रभावीपणें नाट्यांत वापरला जातो. इतकेच नव्हे तर बरेच लोक केवळ ह्या संगीता- साठींच नाटकास जातात असेंहि आम्हांस खात्रीपूर्वक कळले आहे. हा संगीतप्रकार आळवला जात असतांना श्रोत्यांतहि हा राग सहज उत्स्फूर्तपणे आळवला जातो. व कलांमधील Participatcon of listeners हाहि गुण ह्या प्रकारांत प्रकर्षानें असल्याचे जाणवते.

संगीतांतील रागरागिण्यांचा विचार केल्यास आम्हास वाटते की सर्व रागरागिण्यांची उत्पत्ति रुदना- पासूनच झाली. आजहि काही गायक कुठलाहि राग गातांना रुदनच आळवीत आहेत असे वाटते. तेव्हा आणखी एक मांडणी हाताशी लागते. रुदन → राग- संगीत → रुदन.

रुदन प्रकाराचा भावदर्शनाशी असलेला संबंधही विचारात घेणे आवश्यक आहे. भारतीय संगीतात संगीताचा भावदर्शनाशी संबंध मानला आहे. आमचा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यादृष्टीने त्या संकल्प- नेचा विचार केल्यास आणखी एका संकल्पनेपाशी आपण येतो. ती म्हणजे अश्रू. रुदनप्रकाराचे दृश्य स्वरूप अश्रू. रुदन व अश्रु ह्यांचे दृश्य–श्राव्य संबंध हे तोंडाचे आकार, चेहरे विचित्र करणे ह्यांच्या इतकेच घनिष्ट आहेत. (अश्रू म्हणजे डोळ्यातील ग्रंथीतून विशिष्ट वेळीं वा प्रसंगी निघालेले पाणी.) भावदर्शना- विषयी वा रसचर्चेविषयी विधाने करतांना अश्रूविषयीं केलेलीं विधानें सापेक्षपणे व साकल्यानें रुदनास लागू व्हावीत.

रुदनाचा संबंध करुणरसाशी असतो हे पुनः सांगण्याची गरज नाही. परंतु रुदनाचा भयानक, रौद्र, वीर या रसोत्पत्तींशीं असलेलें नातें विचारांतीं लक्षांत येते. ह्या रसाविष्कारानंतर परिणाम अश्रू – रुदनरूपानें दिसतो. 'हंसून हसून डोळयात पाणी आले' हे हास्य- रसाचें अश्रूंशी व पर्यायाने रुदनाशीं नातें दर्शवते. तसेच नाट्यांतून रुदन राग आळवला जातांना काही वेळां

हास्याची लाट प्रेक्षागृहांतून जाते हेहि हा संबंध वेगळ्याप्रकारे अधोरेखित करते.

Throughout all human life we find the leader and the lead. Throughout all music there is Solo and Chorus.

रुदनांतहि एकाचें व संघाचे अशी गीतें असतात. संघगीतांचे अवशेष आपल्याला दोन प्रसंगांत पहावयास मिळतात. पहिला म्हणजे मुलगी सासरी जातांना. ह्यावेळीं स्त्री–पुरुष दोघांचेहि आवाज वेगवेगळ्या पट्टीत असून हुंदके–शब्द असा हा प्रकार आळवतात.

दुसरा प्रकार हा मृत्यूनंतर. स्त्रीपुरुषांचा एकत्रित रुदनाचा हा अनुभव भावप्रधान असतो हें नाकारतां येणार नाही. काही विशिष्ट जमातीत पैसे देऊन रुदनासाठीं बाहेरची माणसे बोलावण्याची पद्धत आहे. म्हणजे ही एक छोटी बैठकच झाली (पहा : चक्राकार आकृति.)

ह्या चर्चेनंतर हा संगीतप्रकार नेमका कसा व त्याचे स्वरूप कसें होते ह्याची साधारण कल्पना वाचकास आली असावी व त्यांतील सौंदर्यशास्त्रविषयक संकल्पनांची कल्पनाहि पक्की ठरली असावी. तेव्हां आपण सुरवातीस केलेली व्याख्या टाकून दुसरी करूं. रुदन म्हणजे रडणे. ज्यावेळीं कुठल्याहि कारणाने अश्रूंसह, मुखांतून आवाज निघतो त्यावेळी रुदनाचा आविष्कार झाला असे म्हणावे.

आतां रुदनाविषयीं आणखी लिहिणें म्हणजे वाचकाला (व नंतर लेखकाला) रुदन संगीत प्रकार आळवण्यास उद्युक्त करणे ! तेव्हां ह्या विषयाचें संशोधनाची दिशा दाखवून हा लेख संपवू या !

रुदनाविषयी खालील मुद्यांवर संशोधन होणे गरज आहे. त्यांची घराणी, स्त्रीपुरुष रुदनांतील फरक, रडणे-ओरडणे-किंचाळणे ह्या मांडणीचा अभ्यास व्हावयास हवा.

कंठ संगीताप्रमाणेच नेत्रसंगीताशी असलेले नाते कसें व काय हेही पाहिले पाहिजे. हा प्रकार केव्हां विखुरला, पसरटला व टोकदार झाला व त्यावेळीं त्याचे कसकसे विखुर, पसरट व टोकदार परिणाम झाले ? हा प्रकार पांढरपेशी कीं अ–पांढरपेशी की तृतीयपंथी ? रुदनांचे सामाजीकरण होण्या न होण्यामागें ह्यातील कुठली वृत्ति कारणीभूत आहे ?

शेवटीं, रुदनप्रकार आळवतांना नृत्याचा आधार काही वेळां घेतात. (संगीताच्या आद्यव्याख्येत नृत्य अंतर्भूत आहे हे विसरूं नये !) तेव्हा त्याचें नेमकें नृत्याशीं नातें काय हेहि तपासून पहावें.

संगीताचा एकूण साकल्यानें, एकत्रित, सखोल, दीर्घकाल, अभ्यासपूर्ण, मूलगामी विचार केल्यानंतर आमचे मत आहे की रुदन संगीताचें भविष्य अत्यंत उज्ज्वल आहे. व आजच्या संगीताची परिस्थिती पाहतां हें अंगणीय व खाजगी असलेले संगीत लवकर पुन: लोकप्रिय होऊन प्रांगणीय व उरुसीय ठरेल असा माझा विश्वास आहे.

फुलत्या सकाळी

प्र. द. जोशी

धुसर सकाळी
दंवदाट पाणी
पानावर कुणी . . .
हिंदोळले ?

कोवळ्या सकाळी
किलबिल गाणी
मधुर छेडूनी .
कोणं गेले ?

सोनेरी सकाळी
दाट कवडसे
तरूतळी कैसे . . .
सांडलेले ?

फुलत्या सकाळी
पाते डोलविले
जल झुलविले
कुणी . . . कुणी ?

मर्ढेकरांच्या काव्यातील वैफल्याचा शोध

अक्षयकुमार काळे

(१)

सदासर्वकाळ मानवी जीवनाची संगत करीत असलेल्या दुःखाचा अनुभव कुणाला नाही ? गुलाबाच्या झाडाजवळून जातांना सुंदर फुले पदरांना चिकटत नाहीत पण काटे मात्र माणसाला अगदी सहजगत्या थांबवतात, मागे वळवितात. मानवी जीवनात दुःखही असेच आहे. ते पदोपदी माणसाला थांबविते, अंतर्मुख करते. 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे' या तुकारामोक्तीचे रहस्य हेच आहे. मानवी जीवनाची चिर वेदना त्या उक्तीत सामावलेली आहे. सुखाच्या मखमली पायघड्या फार कमी लोकांच्या समोर उलगडलेल्या असतात. सर्वसामान्यांच्या नशिबी जन्मभर फुफाट्यातूनच चालणे लिहिलेले असते. दुःख सदैव साथ देणारे असते. माणसाला खऱ्या जीवनाचे आकलन होते ते दुःखामुळेच. या दुःखाच्या परी अनेक असतात. आणि त्याचा अनुभवही व्यक्तिसापेक्ष असतो.

जीवनातील दुःख सर्वसमावेशक सर्वव्यापी असते. त्याच्या करुण छायेत प्रत्येक प्राणीमात्र अवतरतो आणि अंतर्धान देखील पावतो. दुःखाच्या दारातून गेल्याशिवाय जीवनातील रहस्याचा शोध लागणे अशक्य आहे. साहित्य जीवनापासून भिन्न नाही. स्वानुभवातून काव्यनिर्मितीच्या दिशेने प्रतिभावंत आपली पाऊले टाकतो. विविध पातळ्यावरून घेतलेल्या शोकात्म अनुभव संपन्नतेने निर्माण झालेले काव्य श्रेष्ठतेच्या पातळीवर जाते. म्हणूनच, 'Our sweetest songs are those that tell us of saddest thought' असे शेलेने लिहिले असावे. करुण रस हाच एकमेव महत्त्वाचा रस; "एको रसः करुण एव निमित्तभेदात् । भिन्नः पृथक् पृथगिवा श्रयते विवर्तान् ।।" हे भवभूतीचे उद्‌गार या दृष्टीने किती अर्थपूर्ण आहेत ! दुःखाचे आद्य स्फुरण जिवंत स्वानुभवाचे असते. दुःख हा जीवनाचा गाभा आहे. दुःखाच्या दर्शनाने अंतःकरणातील पारुषता विरघळते. व्यक्तिजीवनाला विलक्षण कोवळीक येऊन दुसऱ्याच्या दुःखाला स्पर्श करण्याची ऋजुता व संवेदनक्षमता अंतःकरणात निर्माण होते. आदिकाव्य रचणाऱ्या शुद्धमनस्क महात्म्याच्या सजल नेत्रांना क्रौंचवधाचे दुर्दैवी करुण दृश्य दिसल्यावर त्याच्या मुखातून सहजगत्या,–

'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वती समाः
यत् क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ।।'

अशी शापवाणी बाहेर पडली याचे रहस्य हेच आहे.

दुःखाच्या रेषा ज्याच्या तळहातावर कोरल्या गेल्या नाहीत असा मानव अजून तरी या पृथ्वीतलावर अवतरला आहे काय ? मग प्रतिभावंतही अपवाद कसा असणार ? प्रश्न आहे तो दुःखभाराने क्रंदन करणाऱ्या या आयुष्यात सुस्काऱ्याशिवाय काहीच नाही काय हे जाणून घेण्याचा. मग त्या दुःखाच्या आवर्तात फिरून आपले दुःख उगाळावयाचे, की त्याच्या उदात्तीकरणाने जीवन उजळून टाकावयाचे ? ज्यांनी दुःख उगाळीत बसण्याचा ध्यास घेतला ते शरीरानेच नव्हे तर सर्वार्थाने जगाआड झाले. ज्यांनी या दुःखाचे उदात्तीकरण केले ते स्मृतिरूपाने चिरंजीव झाले. जगाच्या या व्यवहाराचा न्याय काव्यप्रांतातही लागू आहे. या प्रांतात देखील स्वतःची दुःखे गोंजारीत बसणाऱ्या कवींना जगाने विस्मृतीच्या पडद्याआड ढकलले आहे. स्वतःची बाजूला ठेवून जगाच्या दुःखाची जाणीव ज्यांना झाली, जनसामान्याच्या जीवनातील दुःख, दैन्य, वैफल्य यांचे ज्यांना आकलन झाले आणि स्वतःच्या स्वयंसिद्ध प्रतिभेने त्याच्या पायावर ज्यांनी आपले काव्यशिल्प कोरले त्यांच्या काव्याला रसिकांनी आपल्या हृदयात कायमचे स्थान दिले आहे. मर्ढेकरांचे काव्यही नेमके याच जातीचे आहे.

(२)

मर्ढेकरांच्या काव्यात वैफल्य आहे हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. पण हे वैफल्य एकाच प्रकारचे आहे काय ? कारण मुळात मर्ढेकरांची कविता एकसूरी

नाही. तिला काव्यगत अनेक परिमाणे असल्यामुळे कवितेतील वैफल्यही वेगवेगळचा पातळचांना स्पर्श करणारे आहे. म्हणूनच या वैफल्याचा शोध घेण्यापूर्वी मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचा शोध घेणे आवश्यक ठरते. साहित्यात व्यक्तित्वाचा आणि काव्याचा संबंध जोडणे धोक्याचे असते हे सत्य असूनही मर्ढेकरांच्या बाबतीत ते अत्यंत आवश्यक आहे. कारण मर्ढेकरांच्या काव्याचा आणि .व्यक्तित्वाचा संबंध अन्योन्य व समवाय स्वरूपाचा आहे. मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचा परिचय झाल्यास त्यांच्या कवितेतील निराशेवर, आणि वैफल्यावर चांगला प्रकाश पडू शकतो. मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचा शोध घेणे म्हणजे मर्ढेकरांचे चरित्र लिहिणे नव्हे. मर्ढेकरांचे काव्य व्यक्तित्व ज्या जीवनामुळे संपन्न झाले त्याचा शोध थोडक्यात इथे घ्यायचा आहे. यामुळे मर्ढेकर आपल्या जीवनाचा काळा कोळसा उगाळीत राहिले की स्वदु:खातून परदु:खाकडे आणि परदु:खातून पारलौकिक दु:खाकडे मर्ढेकरांच्या प्रतिभेने झेप घेतली याचाही अदमास घेता येईल.

सुसंस्कृत मध्यमवर्गीय प्राथमिक शाळामास्तराच्या घरात प्रचंड बुद्धिवैभव लाभलेल्या मर्ढेकरांचा जन्म झाला. अभ्यासू वृत्ती जात्याच असल्यामुळे समवयस्कांमध्ये मिसळून सर्व सामान्यांप्रमाणे बेधुंद आयुष्य घालविण्याकडे मर्ढेकरांचा कल नव्हता. त्यांचा स्वभाव काहीसा घुमा, मनस्वी आणि अबोल होता. इतरांमध्ये मिसळण्यापेक्षा पुस्तके वाचण्यातच त्यांचा सारा वेळ जाई. या वेडामुळेच जीवनविषयक अंतर्मुखता त्यांच्या व्यक्तित्वाचे प्रमुख अंग झाले. अत्यंत तरल बुद्धिमत्ता असूनही मर्ढेकरांना पहिला वर्ग आयुष्यात कधी मिळविता आला नाही. त्याचे दु:ख मर्ढेकरांना सतत ग्रासून टाकीत असे व उच्च शिक्षणात तर त्यांना भयंकर आपटी खावी लागली. पदवी परीक्षेला मलेरियाने आजारी पडून फर्स्टक्लास गमवावा लागला. कर्ज .काढून उच्च शिक्षणासाठी मर्ढेकर विलायतेला गेले. पण आवश्यक संख्येइतकेच अधिकारी निवडण्याच्या पद्धतीमुळे मर्ढेकरांना नामोहरम व्हावे लागले. केंब्रिजमध्ये मॉडर्न लिटरेचरचा अभ्यास करावा ही त्यांच्या मनातील दुर्निवार इच्छा. पण केवळ कारकुनी चुकीमुळे त्यांना भाषाशास्त्र हा किचकट विषय घ्यावा लागला. आय. सी. एस. तर सोडाच, पण इंग्लंडमधील बार–अॅट–लॉ वा बी. ए. चीही पदवी त्यांना तेथील चार वर्षांच्या वास्तव्यात प्राप्त करून घेता आली नाही. हिंदुस्थानात परतल्यावर त्यांनी पुण्यात राहून 'इंडियन ऑडीट अॅण्ड अकाउंटस' ची परीक्षा देण्याचे ठरविले. वर्षभर झटून अभ्यास केला. पण परीक्षेच्या काही दिवस आधी त्यांना शैक्षणिक पात्रतेच्या अटीनुसार परीक्षेस बसण्यास तुम्ही लायक नाही असे कळविण्यात आले. त्यांनी काही दिवस वर्तमानपत्रातही काम केले. तेव्हा त्यांना एखाद्या करंट टॉपीकवर अग्रलेख लिहिण्याचे काम असे. पण पुढे बातमीदाराचे व मुलाखतीचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आले. ते त्यांच्या अभ्यासू वृत्तीला मानवणारे नव्हते. त्यांनी राजीनामा दिला व ते मोकळे झाले.

अध्यापकाच्या पेशातली वर्षेही अशीच निराशाजनक होती. त्यांनी ज्ञानाचे बहुमोल भांडार विद्यार्थ्यांपुढे खुले केले. पण त्यांचे शिकविणे विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जाई. विद्यार्थ्यांना ज्ञानाची आस नसलेली पाहून व आपला विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद घडून येत नाही हे पाहून त्यांचे हृदय विषादाने भरून गेले. अखेर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. याच दरम्यान मर्ढेकरांनी स्वत:च्या होमाय नुल्लासेठ नावाच्या पारशी विद्यार्थिनीबरोबर सर्वांचा विरोध पत्करून विवाह केला. पण दुर्दैवाने हे विवाहबंधन फार काळ टिकले नाही. आणि मर्ढेकरांनी तयार केलेल्या पुराव्यावर आधारलेले घटस्फोट प्रकरण सुरु झाले व शेवटास गेले. या आघातातून मर्ढेकर सावरत नाहीत तोच त्यांच्या 'काही कविता' वर मुंबई सरकारने अश्लीलतेचा खटला भरला. हा मर्ढेकरांच्या वैयक्तिक आणि काव्यजीवनावर घणाघाती आघात होता. या आघाताने ते अत्यंत अस्वस्थचित्त झाले. मर्ढेकरांच्या साहित्यिक, सामाजिक, वैय्यक्तिक प्रतिष्ठेचा हा प्रश्न होता. या प्रकरणात त्यांना विलक्षण मनस्ताप आणि आर्थिक झीज सोसावी लागली. मर्ढेकरांनी तत्त्वनिष्ठेने आणि निर्भयपणे त्याशी सामना केला. आणि त्या भयानक वादळाशी सामना करून ते जिंकले.

'५२ साल उजाडले. मर्ढेकर या हल्ल्यातून सावरू लागले होते. दुसरे लग्न होऊन 'राघव'च्या जन्मानंतर सुखाचे काही दिवस त्यांच्या वाट्याला आले. पण हे सुख फार काळ त्यांच्या नशिबी नव्हते. कामाचा असह्य ताण, प्रकृतीची हेळसांड, आणि

लौकिक जीवनातील अपार दुःख यांचा एकत्रित परिणाम होऊन मनस्वी, अबोल, अंतर्यामी निरिच्छ व संन्यस्त असलेले मर्ढेकर निघून गेले.

मर्ढेकरांच्या लौकिक जीवनाचा आलेख असा दुःखपूर्ण आहे. तरी या दुःखाचाच पाढा त्यांनी आपल्या कवितेत वाचला आहे असे नाही. पण या सर्व गोष्टींचा परिणाम मर्ढेकरांच्या काव्यव्यक्तित्वावर होणे अशक्य नव्हते. मर्ढेकरांच्या जीवनातील विचित्र दैवयोगांनी निर्माण झालेल्या गडद निराशेने मर्ढेकरांच्या काव्यातही पिच्छा पुरविला. जीवनावरचा विश्वास उडाल्याने मानव्यावरचा विश्वास उडणे अस्वाभाविक नव्हते. मर्ढेकरांनी या दुःखपूर्ण वैयक्तिक जीवनाला शब्दबद्ध केले आहे असे नाही. त्यांचा पिंड वैयक्तिक भावानुभवांबरोबरच एकंदरीत जीवनविषयक अस्सल प्रचितीवर पोसलेला होता. मर्ढेकरांच्या या दुःखी बाह्यभावजीवनाचा तुटक आलेख त्यांच्या कवितांतून काढता येईलही. पण त्याची काही आवश्यकता नाही. त्यांच्या वैफल्यग्रस्त कवितेला प्रेम, समाज व अध्यात्माचे जे परिमाण लाभले आहे ते त्यांच्या आंतरिक पण समाजसापेक्ष भावजीवनाचे निदर्शक चिन्ह होय. त्यांच्या कवितेत वैयक्तिक बाह्यजीवन फारसे नाही, तर आंतरिक भावजीवनावरच ही कविता पोसली आहे. म्हणूनच जीवनाचे अनेक संदर्भ सौंदर्यपूर्ण पातळीवरून त्यांच्या काव्यात प्रगट झालेले दिसतात.

(३)

'शिशिरागम' मर्ढेकरांचे पहिले काव्यपुष्प होय. 'शिशिरागम' हे मर्ढेकरांच्या शोकांतिकेला दिलेले नाव त्यांच्या निराश, वैफल्यग्रस्त मनोवृत्तीवर प्रकाश टाकण्यास पुरेसे आहे. शिशिरात वृक्षवेलींचा डौलदार पर्णसंभार गळायला लागतो. सगळ्या सृष्टीत एक प्रकारचे उदास कारुण्य भरून राहते. झऱ्यांचा प्रवाह मंद होतो. वृक्ष वेली केविलवाणी दिसू लागतात. एक रिक्त उदासी, चैतन्यहीनता आणि वैफल्य यांनी सृष्टी भारून जाते. मर्ढेकरांच्या मनाचीही नेमकी अशीच अवस्था त्याकाळी झाली होती. त्यांच्या 'शिशिरागमा'त प्रीतीचे उत्फुल्ल करणारे प्रणयी रंग नाहीत. ती प्रेमकळी फुलण्या आधीच कोमेजून गेली आहे. तिच्या सहवासातले मधुर क्षण त्याच्या वाट्याला आले नाहीत. आली आहे ती, 'व्यर्थ येता का ? प्रेम कधी माझे— शक्य नाही' अशा शब्दांनी केल्या गेलेली वंचना. या वंचनेचा तीव्र बाण अंतर्हृदयाला लागून मर्ढेकरांच्या मनाचे विद्ध पाखरू सतत भिरभिरत राहिले आहे. प्रेयसी व आपल्यातील अंतर त्याला कळले आहे. धरेच्या आकर्षणाने रात्र कापीत निघालेल्या तेजस्वी ताऱ्याला काळा फत्तर होऊन खितपत पडावे लागले आहे.

प्रेमनिराशेतील वंचनेमुळे मर्ढेकरांना दुःखाऐवजी उपहास आणि अपमानच विशेष जाणवत आहे. जगाच्या उपहासाने त्यांच्या दुःखात अधिकच भर घातली आहे. ज्यांना संकट, दुःख, भीती, चिंताच नाही त्यांनी संतप्त कष्टी मर्ढेकरांना हिणविणे स्वाभाविकच होते. म्हणून टक्के टोणपे न पचविलेल्या जीवनानुभवशून्य समाजाच्या बेगडी प्रेमाला बोल लावताना ते म्हणतात—

"घामाने भरले कपाळ,—सुकली ही जीभ ! शोधी जला
आशेने, हळू ओठ लागति जरि शेवाळल्या फत्तरा
प्रीतीची नच आंच ! सावधपणे सांभाळणे कातडी
सर्वांनाच अशी करामत कुठे । — जाती जळूनी मढी"

आपल्यावर कोसळलेल्या या परिस्थितीत ते प्रेयसीला बोल लावीत नाहीत. हा "देवाच्या घरचाच न्याय असला ! प्रश्नास हे उत्तर" असे प्रेयसीला बजावितात. मी जन्मजन्मांतरी काही पाप केले असेल त्याचे प्रायश्चित म्हणून तर हे कटुसत्य माझ्या वाट्याला आले नसेल ना ? असा प्रश्न त्यांना पडतो. या प्रेमभंगात मर्ढेकरांचा अहंकार दुखावल्याची जाणीव जास्त प्रकर्षाने प्रतीत झाली आहे. ह्या प्रेमभंगातून उफाळलेल्या वैफल्याने अगदी शेवटचे टोक गाठलेले आहे. मर्ढेकरांची ही निराशा इतकी प्रबळ आहे की त्यांना जीवनातील सुंदर गोष्टींचा उबग येऊन मृत्यूचीच प्रकर्षाने आठवण येऊ लागली आहे. 'आपल्याला आता कुठे आसरा मिळेल ?' असे विचार त्यांच्या कवी मनाला डिवचित असताना,

'अपघात घडून देह हा पडला एक रुळावरी इथे
बघुनी क्षण शांति मन्मनी न कळे का
परि खास वाटली'

परक्याचा मृत्यु असा शांतिदायक वाटतो.

मर्ढेकरांच्या या वैफल्यातही. मर्ढेकरांची भूमिका अत्यंत कणखर आहे. मी आत्महत्येसाठी सुरा खुपसला तर माझी रक्तगंगा दिक्काल ओलांडून वाहील

आणि देवांनी तिचे पवित्र जहरी आचमन घेतले तर ते तरून मानव होतील अशी गाढ श्रद्धाही त्यात व्यक्त केली आहे. आपल्या प्रेमनिराशेवर प्रेम करण्याची आपले दु:ख वारंवार उगाळण्याची प्रवृत्ती मर्ढेकरांनी अंगिकारली नाही. प्रत्यही प्रेयसीची आठवण होऊन तीव्र जखमेने हृदय रक्तबंबाळ झाले असले व वाटेतील फुफाट्याने पाय पोळून निघाले असले तरी,

स्थितधी न जरी मी, माती तरि मानिनी
नच अवाक्षर ही एका
काढीन कधी भाषणी
निष्प्रेम–निराशा दु:सह जीवन तरी,
याचना न केविलवाणी
मम वदेल कधि वैखरी

असा आपल्या तरल भावनांना, कडुगोड स्मृतींना – विस्मृतीच्या खोल गर्तेत जरबेने कायमचे गाडून टाकण्याचा मनोनिश्चय ते करतात.

मर्ढेकरांच्या आत्मशोधाचा हा पहिला टप्पा असा वैफल्यग्रस्त आहे. पण त्या आत्मशोधात जळके, विद्वेषाचे काळोख रंग नाहीत. प्रेयसी बेइमान निघाली म्हणून आत्यंतिक निराशेच्या आहारी जाऊन सर्व स्त्रीजातीस दूषणे देण्याचा आततायीपणा नाही. प्रेयसीवर केलेल्या प्रेमाचा अन्योन्यधागा मातेच्या प्रेमाशी अलगदपणे जुळविला आहे, 'मात्र असते बाईल जरी नाही, प्रेमवंता तशि प्रेमवंचिताही' असा मातृप्रेमावर मर्ढेकरांचा विश्वास आहे. या प्रेमावर विसंबूनच जीविताच्या उन्हाला तोंड देण्याची सिद्धता मर्ढेकरांनी केली आहे. जगाच्या रंगभूमीवर विदूषक ठरून गेलो तरी मरणोत्तर दान्ते आणि शेक्स्पिअरच्या संगतीत जाऊन बसेन हा मर्ढेकरांचा आशावाद या दारुण वैफल्याच्या गर्द काळोखात एखाद्या तेजस्वी विद्युल्लतेप्रमाणे चमकून जातो.

'शिशिरागमा' नंतर मर्ढेकरांनी प्रेमकविता फारशी लिहिली नाही. 'शिशिरागमा'त प्रेमनिराशा असली तरी तिचे स्वरूप काहीसे रम्योद्भुत होते पण पुढच्या प्रेमकवितात तेही राहिले नाही. तिचे स्वरूप अधिक करुण आणि निराशाजनक झाले.

भटकत फिरलो भणंग आणिक
मिळेल तेथे पाणी प्यालो
जुळेल तेथे खूण जुळविली
तरि होतो हा तसाच उरलो. – पृ. ११९

अशी त्याची अवस्था झाली. पूर्वप्रेमातील सर्व खुणा पुसट होऊ लागल्या, तिथे अनोळखी गतजन्मीची ओळख देणार तरी कशी? असा प्रश्न त्यांना पडतो. आता तर हृदयातल्या कोमल ओल्या आठवणींची रांग देखील बुजत चालली आहे. मर्ढेकरांची प्रेमकविता व्याकुळतेकडून अधिक व्याकुळतेकडे जाणारी आहे. हृदयाचे उसवलेले तंतू नीट सांधून घेण्याचा प्रयत्न तीत नाही. तीत आहे ते प्रेमवंचनेमुळे दाटलेले औदासिन्य. उत्कट प्रेमासाठी तृषार्त असलेले मर्ढेकरांचे अंत:करण सहजतेने या प्रेमव्याकुळ कवितेत प्रतिबिंबित झाले आहे.

(४)

मर्ढेकरांचे विद्ध झालेले अंत:करण प्रीतिनिराशेच्या गुंतावळ्यात फार काळ गुंतून राहू शकले नाही. त्यांच्या मनाने प्रीतीकोशातून समाजाच्या विशाल प्रांगणात झेप घेतली. पण इथेही 'सौंदर्याचे नव्हाळे आणि प्रेमाचे लव्हाळे' शोधणाऱ्या त्या मृदु अंत:करणाला काही वेगळेच दिसले. सुमनांचे पराग खुलण्याऐवजी बंदुकीच्या गोळ्यांचे पराग इथे फुलत होते. युद्ध पिपासूंच्या महत्त्वाकांक्षी लालसांमुळे मुडद्यांची रास जमत होती. कुणालाही मूल्यविवेक राहिला नव्हता. केवळ पोटाला अन्न मिळावे म्हणून एकमेकांच्या जीवावर उदार होणारे भाडोत्री सैनिक पाहून मर्ढेकर उद्विग्न झाले. संपूर्ण समाजात एकप्रकारचा अंतर्विरोध मर्ढेकरांना दिसला. मानव्याविना असलेले विज्ञान, कामगारांच्या रक्तावर फुगत चाललेली श्रीमंत बांडगुळे, हिंसाधर्माचा वीट असणारा पण युद्धसाहित्याचा कंत्राट घेणारा शेट, तलम पारदर्शी वस्त्रे घालून ताणून देणारा ढेरपोट्या आणि लक्तरे घालून चाचपडणारा आंधळा, अशी विरोध चित्रे पाहून ते अंतर्मुख झाले. हा सर्वच दुसऱ्या महायुद्धाचा अटळ परिणाम होता. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य मिळाले पण ते फाळणी होऊन. एकमेकाजवळ गुण्यागोविंदाने राहणारी माणसे एकमेकाच्या नरडीचा घोट घेण्यास सहज सिद्ध झाली. भांडवलशहांना तर ही वेळ अत्यंत सोयीची होती. सामान्य मजुरांना वेठीस धरून त्यांनी इमल्यावर इमले उभारले.

जाणे भांडवली वृत्ती । नष्टचर्य पिकवी चित्ती
आणि कामगारा हाती । करवंटीच
येथ शब्द नाही विज्ञाना । हे अवघे मानव्याविना
नरमेध वाटे नरांना । धन्य जेथे

समाजाला चढलेला हा 'विषमज्वर' पाहून ते हताश

झालेले आहेत. एकीकडे सामान्य माणसांच्या श्रमावर अमर्याद वाढत जाणारी धनलोभी माणसे व दुसरीकडे तितक्याच वेगाने किंबहुना त्याहीपेक्षा कितीतरी अधिक अशी पिचलेली शोषित दरिद्री माणसे. हा अंतर्विरोध मर्ढेकरांना सतत दिसतो. या विरोधाची अनेक चित्रे मर्ढेकरांच्या कवितेत प्रतिबिंबित झाली आहेत.

१) कुणी मारावे, कुणी मरावे
कुणी जगावे खाऊनि दगड;
वितळून कुणि आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड

२) या जन्मातुनि असेच जाणे
आज उद्याची लावित संगत
कुणि पेरावा घाम आणखी
झोडावी कुणि अखंड पंगत

३) तसूतसूतुन आसूं निथळे
महान करुणा कोणाची ही
दिसा दिसांचा कीस पाडुनी
कुणास विकतो कोण मिठाई ?

या विषम समाजरचनेत सामान्य माणसांच्या साध्या-साध्या आकांक्षा फळत नाहीत. एक माडी बांधण्याचा विचार करावा तर तो विचार करता करता करताच 'वरची माडी' मिळण्याची शक्यता अधिक. रोजच्या रोज त्याच त्या चक्रात माणसे झिजून जातात. ती जात्यावरील ओव्यांच्या रूपानी उगवणारी पहाट आता उगवणे अशक्य. पहाट उगवते ती दैनंदिन भोंग्याच्या रूपाने; आणि माणसे वेगाने सकाळच्या प्रहरी गिरण्यां-कडे धावू लागतात. तीच बस, तीच लोकल, तेच ते अळणी जीवन कायमचे त्याच्या वाटयाला येते. त्यापासून त्याला कधी सुट्टीच मिळत नाही. या विस्कळीत जीवनात जगण्याच्या भावना आधाररहित राहतात. प्रेमाने कुणाला हलो हलो म्हणावे तर तिकडून हलकट उत्तर ऐकावयास येते. माणसाला हे जीवन बदलवून घेता येत नाही. कारण 'दुसरी टायर' या अवकाशात नसते. वाट्याला जे आले तेच जन्मभर ओढत न्यावे लागते आणि माणसाच्या जगण्याचे गणित, चुकून जाते.

अशा येथल्या संसारात
जगण्याचाही चुकला पाढा
आणि शेवटी परिस्थितीचा
गळ्याखालती उतरे काढा

भोगलोलुप माणसांना तर या सर्वांचा विचार करावयाला फुरसदच नसते. ते आपल्या दैनंदिन सुखोपभोगात बुडून जातात. आपल्या भोगाचा त्यांना इतका अभिमान असतो की आपली सर्व इंद्रिये झडून गेली तर त्यांना त्याचे वैषम्य नसतेच, पण ते त्याकडे बोट दाखवून अभिमानाने आपल्या कर्तृत्वाचा पाढा इतरां-समोर वाचतात. त्यांची अवस्था पिपात पडून मेलेल्या आसक्तीविहीन उंदरांसारखी होते.

वेश्यांकडे पाहून मर्ढेकरांचे हृदय अपार सहानु-भूतीने भरून येते. तारुण्याची रात्र संपून म्हातार-पणाचा दिवस उगवलेल्या वेश्या जीवनाचा, तिरप्या भिवया, उलटे केस फिरवलेल्या आणि तारुण्यरस उतरून गेलेल्या उन्नत उरोजांना दाखविणाऱ्या वेश्यांच्या प्रदर्शनाचा पाढा वाचताना मर्ढेकर उद्विग्नपणे उच्चार-तात—

काय हलाखी स्त्रीत्वाची ही
माणुसकीचे काय विडंबन !
भोगशून्य करि भोगव्यथेचे
लिंग गंड प्रच्छन्न प्रदर्शन !

हे सर्व पाहून मर्ढेकरांचा जीव,

कुठे तरी केव्हा तरी
जाते असे हे चुकून
आणि तवंगतो जीव
विना रंग, विना ऊन

असा गलबलून जातो व त्यांना काय करावे हे सुचत नाही. मर्ढेकरांचे समकालीन मुक्तिबोध. पण त्यांचे असे होत नाही. दुसऱ्या महायुद्धाचा व यंत्रयुगीन संस्कृतीचा महाभयंकर परिणाम दोघांनीही सारखाच अनुभविलेला आहे. भांडवलशाहीमुळे सामान्य माण-साची होणारी परवड मर्ढेकर मुक्तिबोधांनी सारख्याच जागरूकतेने आणि तन्मयतेने अभिव्यक्त केलेली आहे. पण इथेच नेमका मुक्तिबोध आणि मर्ढेकर ह्यांच्यात फरक आहे. मर्ढेकर आत्यंतिक सश्रद्ध असल्याने या गोष्टींचा शेवट होऊ दे अशी परमेश्वराजवळ आर्त विनवणी करतात.

परिस्थितीचे पिऊन अॅसिड
लिबलिबली ही मने हडकुळी
लागतील रे कधी तर का
यावरही तव नारळ-बकुळी

किंवा,

असशिल भोळ्या कुठे भैरवा
उघड तुझे तर तिनही डोळे
भस्म करी गा आता तरी हे
हे हाडांचे खडे सापळे !

मुक्तिबोध मात्र अशी मागणी परमेश्वराजवळ करीत नाहीत. कारण तो 'जन्मबहिरा' असल्याची त्यांना खात्री आहे. प्राप्त परिस्थिती परमेश्वरनिर्मित नाही, मानवनिर्मित आहे. समाजातील अन्यायाला ही विषम-वर्गव्यवस्था, भांडवलशाही वृत्ती कारणीभूत आहे हा त्यांचा ठाम सिद्धांत आहे. ते म्हणतात--

सुकुमार मानवाचा झाला चोळामोळा
पोटासाठी विकतात पोटचाच गोळा
नरक नी या जीवनी कुठे तो फरक
समाज साम्राज्याचा चालतो चरक
--नवी मळवाट

व म्हणूनच साम्राज्यवादी भांडवलशहांवर मुक्तिबोध घसरतात. या साम्राज्यशहांच्या नाशासाठी समाजातील सामान्य माणसाच्या हृदयस्थ परमेश्वराला जागविण्याचा प्रयत्न करतात. त्याच्यातील पराक्रमाला, पौरुषाला आवाहन करतात. क्रांतीचा संदेश देतात. मर्ढेकर हे अजिबात करीत नाहीत असे नाही. मर्ढेकरांमध्ये कवडीचाही आशावाद नाही असेही नाही; उदाहरणे द्यायचीच झाली तर खालील उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.

१. सांगा सांगा हो, उत्तर । अजुनी ना शून्याकार
मरा लावा अटकेपार । चीड झेंडे ॥
२. नंग्याचाच आता । येथे कारभार
कोंडी आरपार । फोडाया ही
३. फिरवा फिरवा रे दांडी । आणि मारा ही गचांडी
४. अखेर घेता टक्कर जरि मग
युगायुगांचे फुटेल भाल
अशाश्वताच्या समशेरीवर
शाश्वताचिही तुटेल ढाल

पण हा साम्यवाद सदृश क्रांती पोषणाचा भाव मर्ढेकरांच्या कवितेत फारसा नाही. त्यामुळे त्यात तीव्रता जाणवत नाही. ही मर्ढेकरांची एकुलती एक मर्यादा. मुक्तिबोधांच्या काव्यात या आशावादाला एक स्वतंत्र परिमाण प्राप्त झाले आहे. ह्या आशेचे जळत्या आगीत रूपांतर झालेले आहे. जनसामान्यांच्या मनात स्फोट करून देण्याची ताकद आपल्या शब्दांत आहे आणि ही क्रांती अटळ आहे असा आत्मविश्वास त्यांच्या कवितेत आहे. मुक्तिबोधांची कविता आत्यंतिक आशावादी आहे. मर्ढेकर मुक्तिबोधांसारखे आशावादी कधीच नव्हते. ते जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ आहेत. जे स्वप्न मुक्तिबोधांनी पाहिले ते स्वप्नच राहिले. जी वस्तुनिष्ठ जाणीव मर्ढेकरांनी दाखविली तिचे प्रत्यंतर पुढील काळात सातत्याने येत गेले. मर्ढेकरांची निराशावादी वैफल्यग्रस्त वस्तुनिष्ठा,–

१) जगून थोडे अखेर मरणे
उघडझाप हो डोळ्यांचीच
अंधारातून राडाराचा
किरण चालला सलत पुढेच
२) पंक्चरलेल्या रबरी रात्री
गुरगुरवावी रबरी कुत्री ! !
३) जिथे जिथे धूर तेथे आहे अग्नी
आम्ही जमदग्नी प्रेतरूपी
४) जुन्या पुराण्या उत्साहाचे
खलास झाले कालच तेल
अवसानाचा उसन्या क्लच का
किती दावला तरी पावेल
५) नळीतले जग नळीत जगते
उगाच रुसवा रसायनाचा
उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा

अशी जागोजाग त्यांच्या काव्यातून प्रगटलेली दिसते. पिटचा आकांक्षा, किरट्या आशा आणि खुजे जीवन असलेल्या समाजाचे विदारक चित्रण मर्ढेकर रेखाटत जातात. मर्ढेकरांना हे सारे जीवनच मग अर्थशून्य भासू लागते. रडणारे रडत आहेत, रडविणारे हसत आहेत; विकृती हीच प्रकृती झालेली आहे. माणसाला वित्त, वनिता, वारुणी यापलीकडे काही दिसत नाही हे पाहून मर्ढेकरांचा जो वाङ्मयीन वैफल्यग्रस्त तडफडाट होतो तो त्यांच्या काव्यात सार्थ उपरोधासह प्रकटतो. माणसाच्या ढासळलेल्या अंतःसृष्टीची कितीतरी चित्रे रेखाटली जातात. त्यात उपरोध असला तरी तो अलिप्तपणाने केलेला नसतो.

दायित्व आणि समकालीन धर्मबोध ह्यांच्यावर आपल्या वेगवेगळ्या कवितांत प्रकाश टाकला आहे. बच्चन आत्मानुभूतीतून निर्माण झालेल्या साहित्याला श्रेष्ठ मानतात. त्यांचे म्हणणे आहे–

(अ) मी आपल्या पुष्कळ कवितांच्या खोलात जाण्याचा प्रयत्न करतो तेव्हा वाटते की त्यांचा जन्म माझ्या अनुभवांतून झाला आहे.

(आ) चांगल्या कवितेतली सर्वश्रेष्ठ कविता ही प्रयत्नांती निर्माण झाली नसते. तिचा जन्म प्रेरणेतूनच झाला असतो.

(इ) ते उत्पन्न केले जात नाही. ते भेटते. ते दिले जाते. त्यासाठीही इंग्रजीत एक फार चांगला शब्द आहे – ते 'रिव्हिल्ड' असते. त्याच्यासाठी कोणीतरी दिव्यदृष्टी प्रदान करतो.

(ई) कवीसाठी आदर्श परिस्थिती तर हीच असू शकते की जीवन आणि साहित्य ह्यांच्या चिंतनातून परिपक्व होऊन त्याने स्फूर्तीची वाट पाहावी आणि आपल्या कुवतीनुसार लिहिण्यास मुखत्यार असावे.

जवळजवळ ह्याच तत्त्वांचे साहित्यसृजनाच्या संदर्भात डॉ. आष्टीकरांनी प्रतिपादन केले आहे–

"नित्यनूतनत्व हे कोणत्याही कलेचे सनातन अंगभूत मूल्य आहे, हे मान्य. पण त्यासाठी अनुभूतीचे क्षेत्र व्यापक करायला पाहिजे. प्रतिभेचे साक्षात्कार प्रखर होण्यासाठी सतत अभ्यास, चिंतन व चर्चा करायला पाहिजे."

बच्चन ह्यांच्या 'जालसमेटा' काव्यकृतीची एक रचना आहे – "सन् २०६२ की हिंदी कक्षा में" !! – आजच्या प्रचार युगात अनेक साहित्यिक कीर्तीच्या लालसेने आपले सत्कार समारंभ घडवून आणतात. आपल्या अनुचरांकडून स्वागतसाहित्य पाडून घेतात. वेगवेगळ्या अभ्यासक्रमात स्वतःला लावून घेतात. त्यांची संकुचित दृष्टी समाजहिताकडे पाठ फिरवते. परिणाम असा होतो की सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय जवाबदारी बाबत त्यांत तटस्थता व उदासीनता निर्माण होते. मात्र आत्मसुखात रममाण होताना त्यांना कृतकृत्य वाटते.

"बडा दुःख है
दुर्भाग्य बडा है
इन कवि का केवल
अभिनंदन ग्रंथ प्राप्य है !
कोई पुस्तक नही
किसी पुस्तकागार में
अभिलेखालय में
और किसी को याद नहीं
दो चार पंक्तियाँ भी इन कवि की !
....
कितने नकली, कितने छिछले
और गलत मूल्यों का होगा युग वह जिसमें
जिसके साथ........
.....नेतागण भारी भरकम
अपने फोटो खिंचवाने को
लुलुवाते थे !
उसकी कोई रचना
नहीं खरीदा या बाँचा करते थे
....
कहाँ देशसेवा, समाजसेवा से उनको
दम लेने की फुरसत होगी !
ओ' उनकी सेवा लेने में,
और प्रशंसा और चाटुकारी
उनकी करने मे लपटी–
रहती होगी जनता सारी–!
....
कुछ अपने मतलब की बात करा लेने में
किसी दिशा दे सकती होगी
हिंदी की कविता दयमारी–!

× × ×

पाश्चिमात्य विचारवंतांची दृष्टी पूर्वेकडे

'प्रवास की डायरी' ही बच्चन ह्यांची ती कृती आहे की जिने आधुनिक हिंदी साहित्याच्या इतिहासात एक नवे पर्व समाविष्ट केले. हिंदीच्या आजच्या प्रकाशित प्रवासवर्णनांमध्ये ह्या साहित्यकृतीची श्रेष्ठता निर्विवाद आहे.

प्रसिद्ध विद्वान डॉ. लूकस ह्यांच्या झालेल्या त्यांच्या भेटीचा प्रसंग ह्या दृष्टीने विशेषेकरून मनन करण्याजोगा आहे. ज्या पाश्चात्य कवींना आदर्श मानून आज भारतीय कवी आपल्या काव्यनिर्मितीत मग्न आहेत ते पाश्चात्य कवी आपल्या रसिकांना कोणती महत्त्वाची

वा मौलिक सामुग्री प्रदान करीत आहेत ? आता इंग्रजी साहित्याच्या भूमीतच त्यांच्या आधुनिक कवितेच्या रसिकांची संख्या गळतीला लागली आहे तर त्यांपासून प्रभावित अशा परभृत काव्याने भारतीय रसिकांच्या बुद्धी आणि हृदयाला कोठवर तगवून धरता येईल ? बच्चन म्हणतात–

"मी डॉक्टर लूकसला सांगितले की यीट्सचे मी जे अध्ययन करीत आहे त्या व्यतिरिक्त मला आधुनिक इंग्रजी कवितेचेही वाचन करावयाचे आहे. त्यावर लूकस म्हणाले की, वर्तमानकाळ इंग्रजी कवितेला फार दुर्भाग्याचा आहे. बायबलमध्ये आपण वाचलेच असेल की इस्रायलची संतान चाळीस वर्षेपर्यंत वाळवंटात बेपत्ता होती. (The children of Israil were lost in the wilderness for forty years.) इंग्रजी कविताही गेल्या चाळीस वर्षात कोण्या ओसाडीत हरवलेली आहे. मी कोण्या मोझेसच्या प्रतीक्षेत आहे (I am looking for some Moses). अर्थशास्त्राचे नियम साहित्यालाही लागू होतात. (डॉ. लूकसचे हे निष्कर्ष पुढे येणाऱ्या डॉ. आष्टीकरांच्या वक्तव्यांशी पडताळून पाहण्याजोगे आहेत.) लोक कविता वाचत नाहीत तर कवी लिहीतही नाहीत. जे लोक स्वतःच्या आंतरिक प्रेरणेने लिहितात ते पहिलेपासून हे समजून की त्यांना कोणी वाचणार पण नाही. त्यांनी ते अधिकाधिक आपले आंतरिक भावविचार आणि जीवनसमस्यांना मुखरित करतात. जे वाचायला जातात त्यांना कोणा लेखकात आपले काही सापडत नाही. कवी आपला स्वर सोडून कोण्या दुसऱ्याचा स्वर नाही होत. लोक कवीपासून दुरावले. अशा परिस्थितीत जशी कविता लिहिली जाते तिची आपण कल्पना करू शकता.

"प्रकाशक कवितांची पुस्तके छापत नाही. कारण कवी आपल्या कवितेसाठी लोकांत आवड निर्माण करायला असमर्थ ठरतात. एक अजब दुष्ट वर्तुळ (vicious circle) तयार झाले आहे आणि, कोणत्यांही प्रकारे ते काबूत आणणे असंभव वाटू लागले आहे. कवीसाठी आणि कवितेसाठी आणखी लाजिरवाणी कोणती गोष्ट असू शकेल ? कवितेने तर लोकांना आपल्याकडे ओढून घ्यायला हवे. आज ओढ आणि ओढणारे, दोघांचाही अभाव आहे.

"बोलता बोलता लूकस उठले आणि त्यांनी आपल्या खोलीतून एक कागद आणला. 'ब्रिटीश इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनियन' ने काही दिवस अगोदर हे विवरण एकत्र केले होते की इंग्रजी शिकलेल्या लोकांना कोणत्या तऱ्हेचे साहित्य वाचायला आवडेल. ह्या उद्देशाने समाजातल्या प्रत्येक श्रेणी आणि प्रत्येक थरातल्या २००० लोकांना हे विचारले गेले की, आपल्याला कोणत्या तऱ्हेचे पुस्तक वाचायला आवडेल. आनुपातिक दृष्टीने हे दोन हजार लोक समाजाचे प्रातिनिधिक रूप उपस्थित करू शकले. जे परिणाम नोंदले गेले ते आश्चर्यचकित करणारे होते:–

लोक	वर्तमान	भविष्य (टक्के)
क) काहीच न वाचणारे	४७	६३
का) कादंबरी	३५	२३
कि) चरित्र	३	२
की) युद्धकथा	३	१
कु) प्रवास वर्णन	२	१
कू) शास्त्रीय	३	१
के) राजकारण	४	४
कै) धर्म	१	४
को) कविता	१	०
कौ) इतर	१	१
	१००	१००

दिसून येईल की इंग्रजी समाजात हल्ली कवितेला १ टक्का वाचक मिळतो भविष्यकाळात शून्य राहील !

डॉ. लूकसनी आश्चर्याने बच्चनना सांगितले की, तरीही कविता उदंड प्रकाशित होताहेत; नाना प्रयोग होताहेत. पुष्कळ प्रयत्न होत आहेत की साहित्याचा हा प्रवाह सुकून जाऊ नये.

मेकॉलेच्या शब्दांत – काय आम्ही सभ्यतेच्या त्या विकासबिंदूवर पोहोचलो आहोत की जेथे कवितेचा ऱ्हास होतो ? बहुधा आमचे सर्वात मोठे दुर्भाग्य ते आहे – आमची बौद्धिकता; आमची वैज्ञानिकता !

कविता लिहायला आणि तिचा आनंद उपभोगायला पुष्कळ आदिम प्रवृत्तींची (primitiveness) जोपासना करणे आवश्यक आहे, पूर्वेकडे सुदैवाने ती

शिल्लक आहे. पश्चिम पूर्वेकडे काही प्रेरणेच्या आशेने पाहत आहे.

एझ्रा पौंडचे 'चायनिज् कॅंटोज' काय इकडेच संकेत करीत आहे ? यीट्सचा पूर्वेकडे कल; टागोरांचा पश्चिमेत सन्मान; ह्याच प्रवृत्तींचे द्योतक आहेत का ? टी. एस. इलियटही अतिशय अर्थपूर्ण दृष्टीनी कधी कधी पूर्वेकडे पाहतो.

डॉ. बच्चननी विचारले, 'इंग्रजीत गत्यवरोधा-खेरीज जे काही होत आहे त्यावर आपली प्रतिक्रिया काय आहे ?'

डॉ. लूकसने उत्तर दिले–

"जगातल्या सगळ्या वहलपहलीकडे काणा-डोळा केला तर आज जेवढी निष्क्रियता (Passivity) जीवनांत आहे तेवढी कधीच नव्हती. व्यक्तित्व चेतनेने फुलण्याऐवजी साचेबंद होऊ लागले आहे. अशा प्रक्रियेत निर्मात्यांचा जन्म नाही होऊ शकत. लोक साचेबंद व्यक्तित्वाच्या कथा ऐकायला तयार होत नाहीत. त्यांना स्वतःलाच त्याची उबग आली आहे."

प्लेटोच्या रिपब्लिक प्रमाणे काय प्रत्येकाने कवीला, कवितेला आपल्या जीवनातून, आपल्या मनो-विश्वातून हद्‌पार केले आहे ?

× × ×

नवीन वाङ्मयाचा विचार करताना डॉ. आष्टी-कर आपल्या भाषणात म्हणतात की, आज चांगले साहित्य निर्माण होत नाही, असे नाही ; पण, त्या साहित्याच्या परिघात अर्थशास्त्राचे नियम कार्यरत आहेत. अनायासे डॉ. लूकस आणि डॉ. आष्टीकर ह्यांच्या वक्तव्यांत आश्चर्यकारक सारखेपणा आढळतो. आष्टीकर म्हणतात,

"काही लोक विचारतात, की काय हो, हे आज-कालचे वाङ्मय इतके वाईट आहे तर लोकांना ते आवडते कसे ? ते ते वाचतात कसे ? ह्यावर एका अगतिक तरुणीची गोष्टच उत्तर म्हणून देता येते. परमेश्वर प्रसन्न झालेल्या तरुणीने परमेश्वराला म्हटले, 'देवा ! माझं ज्याच्यावर प्रेम आहे तो मला पती म्हणून मिळू दे !' परमेश्वर म्हणाला, 'हे न झाले तर दुसरे काय मागतेस ?' ती म्हणाली, 'माझं ज्याच्या-वर प्रेम आहे तो पती म्हणून मिळत नसेल तर निदान जो कोणी पती म्हणून मिळणार असेल त्याच्यावर प्रेम तरी करू दे.' अगतिक वाचक म्हणतो, जे आवडते ते मिळत नसेल तर जे मिळते ते तरी आवडू दे !

"याचा अर्थ असा नाही की आजकाल चांगले वाङ्मय निर्माणच होत नाही. ते होत आहे. पण वाईट वाङ्मयही मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. आणि त्यामुळे अर्थशास्त्राच्या नियमानुसार धोका निर्माण झाला आहे. कारण अर्थशास्त्रात असे म्हणतात की– Bad money drives good money out of circulation. तसं वाईट साहित्य चांगल्याला चलनातून चटकन घालवील ह्याचा धोका असतो. म्हणून वाईटाच्या निर्मूलना करिता प्रयत्न व्हावा लागतो."

डॉ. आष्टीकरांच्या मनांत पूर्व-पश्चिम ह्यांच्या मधली विभाजन रेषा

"आशय आणि अभिव्यक्ती ही साहित्याची दोन प्रमुख अंगे होत. दुर्दैवाने आज ह्यांच्या बव्हंश प्रेरणा पाश्चात्यांकडून घेतल्या जात आहेत. पाश्चात्यांची संस्कृती वेगळी; सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक व्यवस्था वेगळी..... महायुद्धांनी दुभंगलेली कुटंब व्यवस्था; शस्त्रास्त्रे व अतिसांपत्तिक सुबत्ता; उपभोग्य वस्तूंची विपुलता; विलासप्रियता आणि मानसिक विकृ-तींचे भयानक वाढते प्रमाण – ह्यांमुळे काही पाश्चात्य देशांत आढळणारे नैराश्य, वैफल्य, असहिष्णुता, मरगळ, व्यर्थत्व, अविश्वास व आत्यंतिक अतिरेक, ही सार्वजनिक प्रवृत्ती बनू पाहत आहे. समाज व कुटुंब-व्यवस्था त्यामुळे धोक्यात आलेली दिसत आहे. मान-वाच्या कर्तृत्वावर नव्हे अस्तित्वावर देखील व्यर्थत्वाचे अर्थ तिकडे लावले जात आहेत. त्यामुळे पाश्चात्य लेखकांच्या अनुभूतीचे विश्वच अगदी वेगळे बनले आहे. त्यांचा सामाजिक चित्‌शक्तीचा अविष्कार करणारे, प्रस्फुरण त्यामुळेच अगदी आगळे वेगळे आहे. भारतीय सामाजिकाला व साहित्यिकाला पाश्चात्य साहित्य वाचून ह्या अनुभूतीचा परिचय असला तरी प्रत्यय मात्र येत नाही. आणि साहित्यनिर्मिती केवळ परिचयातून नव्हे तर प्रत्ययातून होत असते, हे सनातन तत्त्व आहे. त्यामुळे साहित्यात आशय व अभिव्यक्तीचे केवळ अनुकरण घडत आहे. त्यातही सरळसरळ अनुवाद काही श्रेष्ठ कलाकृतींचे व्हावेत हे मी समजू शकतो. पण, ऋणही मान्य न करता होणारी सरळसरळ

हिणकस साहित्यतस्करी, इथले पारंपारिक समाज-जीवन, नीतिमूल्ये व स्वदेश निर्माणाचे महान प्रयत्न, धोक्यात आणीत आहे. चोरलेला साहित्यिक आशय स्वदेशीला देशोधडीला लावत आहे."

डॉ. आष्टीकरांनी भारतीय साहित्यप्रेमींना आणि साहित्यिकांना आपले हे उपाय त्यांच्यापुढे मांडून त्यांना पश्चिमेच्या अंधानुकरणापासून वचावण्याची प्रेरणा दिली हे योग्यच झाले. मला आठवते, बहुधा १९६० साली, धर्मयुगचे तेव्हाचे उपसंपादक, प्रसिद्ध कवी आणि कादंबरीकार, ज्यांच्या प्रतिमेची प्रशंसा खुद्द प्रेमचंदांनी केली होती, ('क्रांतीदूत'चे लेखक वीरेंद्रकुमार जैन), 'सृजन के पीडित क्षणों मे' ह्या कवितासंग्रहावर आपले मार्मिक समालोचनात्मक मत-प्रदर्शन करताना म्हणाले होते—

"हिंदी कवितेत कधी काळी जे चेतनेचे नवे आकाश, सामर्थ्याची नवी परिमाणे उघडलेली दिसत होती ते सारे दृश्य आज अचानक एकसूरी साचेबंदतेत लुप्त झाले आहे.

"आज जी नवीन कविता लिहिली जाते ती एकतर पश्चिमेकडल्या पराजयवादी कवितेची नक्कल असते किंवा नवतेच्या नावाखाली ॲब्सर्डिटीचा अजव-बंगला असते.

"मौलिक कविव्यक्तित्वाचा प्रकाश क्वचितच दिसून पडतो.

"ह्या अराजकात आणि एकांगी एकरसतेत मला पुरुषोत्तम खऱ्यांच्या कवितेत त्यांच्या आत्म्याचे मौलिक, नैसर्गिक आणि नितांत सच्चे, सौंदर्य-संवेदना दिसून आले."

पूर्वी निवेदिलेल्या डॉ. बच्चन आणि डॉ. लुकस ह्यांच्या भेटीतील एक महत्त्वाचा प्रसंग सांगायचाच राहिला.

डॉ. लूकस ह्यांनी बच्चन ह्यांच्या पुढे आपल्या वैचारिक द्वंद्वालाही सादर केले.—" कधी कधी विचार करतो. जर आमचा विकास त्याच दिशेने होत राहिला जिथे आज – कविते पासून; उद्या – कलेपासून; आणि परवा – जीवनातील इतर सुंदर सुकुमार वस्तूपासून आमचा संबंध तुटत गेला तर काय आमचा विकासच मुळी चुकीच्या तऱ्हेने होत नाही का ? "

सौंदर्यद्रष्टे कवी बच्चन ह्यांनी 'सृजन के पीडित क्षणों में' मधील कवितांचे मूल्यमापन करताना लिहिले होते—

"ज्या नवीन कवींनी अनुभूतीचा परीघ वाढवला आणि अभिव्यक्तीच्या नव्या शैलीला समर्थ केले त्यांत 'सृजन के पीडित क्षणों में' च्या कवीचे नाव सन्मा-नाने घ्यावे लागेल. अनुभूतीतील भावप्रखरता, मार्मि-कता, खोली जेवढी मला पुरुषोत्तम खऱ्यांच्या कवितेत सापडली तेवढी नवकवितेत कमी आढळते. माझी खात्री आहे कवीबाबत समालोचक लिहीत की, त्यांनी पुष्कळ 'असहृय को उधारा है, अछूते को छुआ है, और अन-गढे को गढा है.' कवीत आशा, विश्वास अणि आस्थेचा उदात्त स्वर ध्वनित होतो."

× × ×

सनातन काळापासून चालत आलेल्या भारतीय परंपरेच्या आलेखात डॉ. आष्टीकरांच्या वर सांगित-लेल्या विश्लेषणातला हा निष्कर्ष ध्यानात ठेवण्या-सारखा आहे की पाश्चात्य साहित्याप्रत आपला आदर असू द्यावा; परंतु आपण आपल्या नैसर्गिक भावभूमीचा परित्याग करून बाह्य आवरणे ओढत चालत राहावे, हे भारतीय समाजाला ना श्रेयस्कर ना स्वीकारणीय.

जसे त्यांनी स्पष्ट केले आहे – पाश्चात्य समाज-व्यवस्था, रीतिरिवाज आणि नैतिक मानवी मूल्ये ही त्यांची त्यांच्या भूमीतली आणि वातावरणातली उपज आहे.

ह्या देशातला स्वाभिमानी नागरिक, आत्म-दृष्टिप्रणित उपनिषदांच्या ठेवीचा उत्तराधिकारी चिंतक आणि साहित्यस्रष्टा; धर्म आणि तत्त्वज्ञान ह्या संबंधा-तील विपुल संस्कृत साहित्यकोशाचा रक्षक; –किती आश्चर्य आहे पाहा; तो विश्वविख्यात अमेरिकी राष्ट्राध्यक्षाच्या हत्येमुळे दोन आसवे ढाळतो पण, त्याच्या विधवेच्या प्रेमप्रकरणांवर आणि पुनर्विवाहावर आपली लेखणी चालवत नाही ! जगप्रसिद्ध राजनाय-कांच्या प्रेमप्रसंगाची नायिका क्रिस्टना कीलर हिच्यावर कादंबरी लिहिण्यासाठी त्याची लेखणी कुंठित होते. कलेला समग्र नग्नतेसहीत अंगिकरणाऱ्या पाश्चात्य रसिकांच्या मनोवृत्तीवर आपल्या नैतिकतेची दृष्टी पवित्र राखण्यासाठी एक वेळ ती पाण्याने धुवून टाकतो पण, 'माताहारी'चे चित्र आपल्या सारस्वताच्या अंगणात प्रविष्ट होऊ देत नाही.

भारत आणि पश्चिम ह्यांच्या कुलीनतेची पारख सर्वथा भिन्न निकषांवरच राहील. शाश्वत साहित्यातील अमृत तत्त्वाच्या दोन थेंबांसाठी अतृप्त तृषा राखणाऱ्या ह्या देशात 'मारग्रेटच्या प्रणयकथां'ना लेखणीची सोबत मिळणे जवळजवळ अशक्य आहे. हे इंग्लंडमध्येच होणे शक्य आहे. जिथे सामाजिक जीवनात राजघराण्यातली ४३ वर्षांची राजकन्या आपल्या कुलवंत पतीचा तिरस्कार करते आणि २५ वर्षांच्या कोण्या प्रेमिकाला आपल्या जाळ्यात फसवते किंवा फसते. मग तिचा प्रियकर 'रॉडी ल्योलिन' ही आपल्या प्रेमव्यापाराला समाजाची नैतिक संमती (?) मिळवतो.

ह्या देशातल्या शिष्ट साहित्याच्या जिज्ञासूंनी दुर्दैवाने नानावटी प्रकरणाचीही शेवटी निर्भर्त्सनाच केली. साहित्यात असे प्रसंग पावसाळी पुराच्या अवशेषांसारखेच लाख आले असतील – काळाने त्यांचे होते की नव्हते अशी अवस्था करून टाकली.

'एकशेएक'ची नव्हे; तर 'एकसे एक'ची गरज

"फॅशनमुळे दुर्बोधता येते हे आपण अनुभवतो आहोत. बायकांनी केस कापायचे तर पुरुषांनी वाढवायचे! बायकांनी पँट घालायचे तर पुरुषांनी गोल साडीची लुंगी! आणि मग लिंगबोध दुर्बोध व्हायचा! आज विनयभंगाचं पाप पदरात पाडून घेतल्याशिवाय नुसत्या कपड्यांवरून बाई ओळखणे कठीण झाले आहे."

"तसेच साहित्यात घडू लागले आहे. कविता, कथा, नाटक ह्या वाङ्मयप्रकारांतले भेद ओळखणे दुरापास्त झाले आहे. चिटाचे कापड शर्टिंगचे लेबल लावलेले म्हणूनच त्याचे बुशशर्ट शिवायचे नं? तसेच कादंबरी, लघुकथा, कविता, निबंध, नाटक, असले लेबल लेखकच लावतो म्हणून त्याला तो तो वाङ्मयप्रकार म्हणायचे, असे आज होत आहे. कारण त्यांची व्यवच्छेदक लक्षणे लुप्त होत आहेत.

मी एकदा एक नवकथा – लघुत्तम लघुकथा लिहिली—

"एक होती बुढी; ती गेली कुपकुप; तिला सापडला पैसा; पैशाची आणली भाजी; चिरू कशी – खसखस; शिजू कशी – गदगद; खाऊ कशी – मटमट; निजू कशी – डाव्या कुशी; वगैरे..."

"आणि रात्री बायकोला ती सुवाच्य अक्षरांत लिहून काढायला सांगितली आणि मी झोपलो. बायकोच्याही डोळ्यात झोप झेपावत होतीच. कागद शोधणे तिला जमले नाही. जवळच एक उभट कागदाचा चिटोरा सापडला तोच तिने वापरला. एका ओळीत दोन तीन शब्द मावत. तिने त्याचा विचार केला नाही. ती गोष्ट तिने दोन तीन शब्दांच्या ओळीत झोपेच्या तारेत लिहिली ती अशी—

'भाजी होती बुढी
कुपकुप पैसा
निजू कशी आणली
सापडला चिरू तिला
पैशाची खसखस
डाव्या कुशी गदगद
एक कशी मटमट—'

आणि मी ती तशीच न पाहाता एका क्रांतिकारी नवमतवादी मासिकाकडे पाठविली. त्याने ती अशीच छापली. वर फक्त लिहिले – नवकाव्य!

आणि मग ह्या पंथातले अनेक नवकवी जन्माला आले.

निबंधांच्या अशाच लघुकथा होतात आणि लघुकथांचे निबंध. एकदा एकाने आत्मचिंतन केले की, माझे शेजाऱ्याशी भांडण का झाले? कालव का झाले? माझे झाले की शेजाऱ्याचे झाले? शेजाऱ्याचे त्याच्या शेजाऱ्याशी का नाही झाले? भांडण्यासारखे तर काहीच नव्हते. भांडायलाही कुणात दम नव्हता. मग जे झाले ते काय झाले? जे झाले त्याला भांडण म्हणता येईल का? मग भांडण का झाले; की भांडण झाले का? हाच मला प्रश्न पडलाय. कारण शेजारी विचारतो, काहो, लोक म्हणतात तेव्हा खरेच आपले भांडण झाले का? आणि असे हे आत्मचिंतन मासिकांच्या कंपूने नवलघुकथा म्हणून छापले आणि अनेक नवकथांचे छापे पाडले तेव्हा रूढार्थाने कथा नसलेल्या लघुकथा, काव्य नसलेल्या कविता आणि नाटच नसलेले नाटक आज निर्माण होत आहे.

वाङ्मयप्रकारांच्या कृत्रिम सीमारेषा पुसट झाल्या किंवा मिटल्या त्याचा खेद नाही. हे स्वागतार्हही होईल. ह्या सगळ्या प्रकारांना एकच नाव देता येईल— 'काव्य' म्हणून; आणि पूर्वी होतेही तसे. संस्कृत

साहित्यात काव्य, नाटक, कादंबरी, चरित्र वगैरेंना काव्य म्हणूनच ओळखले जाई. पण काव्य म्हणून तरी त्याची काही व्यवच्छेदक लक्षणे असत आणि ती आजही असायला हवीत. आणि त्याच्या प्रेरणा व धारणा निश्चितच स्वदेशी, भारतीय परंपरेतील समाजवादाशी सुसंगत असाव्यात.

तशी आज साहित्यिकांची कमी नाही. शेकडा नव्हे, अगदी एकशेएक हजारागणिक मिळतील पण आज गरज आहे, ती एकशे एकची नाहीतर 'एकसे एक'ची !! "

हिंदी आणि मराठी साहित्याच्या सजग, रसिक आणि बुद्धिजीवी वाचकांना माहीत आहे की गेल्या दहा वर्षांत जे हिंदी आणि मराठी काव्य आपल्या विविध रूपात समोर आले आहे त्याचे विषय, त्याचे हेतू डॉ. आष्टीकरांनी, वर दिलेल्या संदर्भापेक्षा काही भिन्न नाहीत. ह्या विद्वान वक्त्याने, संस्कृत आणि मराठी साहित्याच्या एका विचक्षण समीक्षकाने साहित्यपंडित आणि साहित्य-जिज्ञासूंना ज्या गंभीर बाबींचे चिंतन करण्याचे दिग्दर्शन केले आहे; जे सामंजस्य सुचविले आहे, त्यांना आपण प्रतिष्ठा द्यायला हवी. एरवी कवितेच्या नावावर वैचित्र्य, भ्रष्ट विचार, अनादर्श आणि प्रवंचनाच आमच्या हाती लागतील.

आता तर लोकांनी आपल्या कंपूंत शिष्टसाहित्य रचणाऱ्या साहित्यिकांना (इतकेच नव्हे, विकृत साहित्याबद्दल जागरूक असणाऱ्या विचारवंतांनाही) 'साठोत्तरी' म्हणून; किंवा जुनाट म्हणून 'बुझर्वा' लोकांची संज्ञा देऊन त्यांची निर्भर्त्सना करणारी चळवळही सुरू केली आहे.

डॉ. लूकस कोण्या 'मूसा'च्या शोधात आहेत. डॉ. बच्चनही डॉ. आष्टीकरांप्रमाणे प्रचारवादी प्रवृत्तींपासून आपल्या वाचकांना जागरूक राहण्याचे उद्बोधन करीत आहेत.

कलम के कारखाने हैं
स्याही की फॅक्टरियाँ हैं
(जैसे सोडा वाटर की)
कागज़ के नगर हैं
और उनका उपयोग-दुरुपयोग सिखाने के
स्कूल हैं
कॉलेज हैं
युनिवर्सिटियाँ हैं
और उनकी पैदावार के प्रचार के लिए
दुकानें हैं
बाज़ार हैं
इश्तहार हैं
अखबार हैं !!
पर अब भी एक दीवार है
जिसपर
अपने खून मे उँगली डुबोकर
एक
सीधी
खड़ी
लकीर
खींच सकने वाले का
एक दुनिया को इंतज़ार है !

संदर्भ :–

१) 'प्रवास की डायरी'– बच्चन : दिल्ली.
२) 'जालसमेटा'– बच्चन दिल्ली.
३) डॉ. मधुकर आष्टीकर विदर्भ साहित्य संमेलन, अचलपूर; नागपूर. [अध्यक्षीय भाषण]
४) 'सृजन के पीडित क्षणों मे' पुरुषोत्तम खरे : जबलपूर.

[*मूळ लेख हिन्दी; अनुवाद : प्रा. शिरीष देशपांडे*]

दुपारचा मी

वा. रा. सोनार

दुपार जळते गिरवीत इवली ऊरात थकली घार
कोण प्रार्थी चरण अवेळी माथां मिरवत कंटक भार
वाऱ्याच्या पदराशी हलते पान दिशांचे छळवादी
गात निघे तो नकळत गाणी मरणाशी संवादी.

शीड नभाला रेलून हसते पायतळी संथ जळा
प्राण-वाहुला मुठीत घट्टसा, सर्वांगावर जरी शळा
ज्योत पेटता धूळ उन्हाची प्रवासास कावून निघे
कापूर जगता देहातून एका ठिणगीची तो वाट बघे.

पळसाची पानं

मालती निमखेडकर

शुऽक शुऽक !

लवणातून आवाज आला, 'कोन व्हय रे रांड-लेक ? आडून काऊन बोंबलतं. येनं अस्सा म्होरं. पड माहृया म्होरं पासला. दावतो तुले सुऽक सुऽक कसी असते त्ये.' गिर्जानं पळसाच्या पानाची चवड एका मोठ्या गोट्याखाली ठेवली अन् कमरेवर हात ठेऊन तिनं आवाजाच्या दिशेनं तोंडाचा पट्टा वळवला.

उन्ह तडकलं होतं. नाल्याच्या काठावरचा पळस हिरव्या नवतीने नटलेला. चिंचेच्या झाडाचा चिगूर वाऱ्याबरोबर अल्याडल्या काठावर हळूच सडाशिंपण करीत होता. माध्यान्हीच्या त्या सडासंमार्जनावर गिर्जा पळसाची पानं तोडून टाकत होती. मधूनच त्याची चवड करीत होती.

चिंचेच्या खोडामागून बाबूराव समोर आला. अंगात चौकटीचा मनिला. गळ्याला तांबडा रुमाल. डोळ्याला गॉगल्स.

लवण ओलांडून तो तिच्याकडे आला. पैसे मागा-वेत तसा एक हात कमरेवर ठेऊन दुसरा हात तिच्या छाती समोर नाचवीत तो म्हणाला 'कवा देनार हायेस मापलं देनं ?'

गिर्जानं नाकाचा शेंडा उडवला. पायातल्या वहा-णेनं पायाखालची माती उकरली. त्याच्याच समोर कासोटा आवळून घट्ट खोचला. आणि ओचा सारखा करीत त्याला पाठमोरी होऊन ती पुन्हा भराभर पळ-साची पानं तोडूं लागली.

'गिर्जा ! ढूंगणानं ढकलू नको. माहृयावालं देन टाक अगुदर.'

'बाप्पा ! पैशाच्या पिवशीचं तोंड उघडूनच बसली जसी. जवा मांगाल तवा द्याले.'

'मंग माहा कमरेचा कसा ढील्ला केला आनं रुपयाची चवड रचली तुझ्या म्होरं तवा. पंचांगात वेळवखत पाहृयली व्हती कावं तुनं ?'

गिर्जा काही न बोलता पानं तोडू लागली. बाबूरावनं तिच्या पदराला हात घातला.

'बाबूराव दूर व्हा. आज बजाराचा दिस हाय. पत्तरवाळ्याचा लावाच्या हायेत आन् हलवायाले मिठाई आन् चिवडा विकाले पानं न्यून द्याचे हायेत. रिकामी न्होय म्हनलं गिर्जा !'

'बाप्पा ! वज्जरच कामाची. माहृया दहा रुप-याच्या नोटेले किंमतच न्हाई जसी.'

'धूप जयते धाच्या नोटेनं. पोट्ट्याले सूया द्याच्या हायेत. उंद्याच्या उंद्या डॉक्टरच्या मढ्यावर घाला लागन पैसे. इतक्या सस्तात एका बाईले इकत घेता येत न्हाई बाबूराव.'

'हे घे पाच रुपये. आन् रातच्याले येऊन चार पायली जवारी घेऊन जाय. चाल आता त्या झुडपा मांगं.'

गिर्जा गर्कन् वळली. त्याच्या हातातली पाचाची नोट तिनं वरच्यावर उचलली. त्याची घडी करून पोटी ठेवली. आणि पळसाच्या पानांचा गठ्ठा उचलून ती म्हणाली 'चाला.'

चार पावलं चालल्यावर तिनं चिंचेच्या झाडाकडं टक लावून पाहिलं आणि ती ओरडली 'बाबूराव ! भल्लामोठा जात सर्प. त्यो पाहा. लोंबकाळून राहृयला.' भीतीनं कापत ती मागे सरली. बाबूराव गोंधळून समोर पाहू लागला. तेवढ्यात गिर्जानं धूम ठोकत बोंब ठोकली 'धावा हो धावा ! ययसा भल्ला मोठ्ठा सर्प हाये धावा हो धावा !'

सप्पाटून पळत ती गाडरस्त्यावर आली. गोंधळून बाबूराव पण तिच्या मागे पळत सुटला. रस्त्यावरून बाजारासाठी येणाऱ्यांची वर्दळ सुरू झाली होती. एका बंडीतून भाजीपाला घेऊन एक मुसलमान चालला होता. तिनं हाकारून बंडी थांबवली. तशी रहीमनं कासरे आवळून धरले. हातातला पानाचा गठ्ठा बंडीत भिरकावून गिर्जा पटकन चढून बसली. तोंडावरचा घाम

पुसत ती म्हणाली 'रह्यमदा! चाल विगी विगी. बजार भरला असन्.'

गाडी भरधाव निघाली. गिर्जानं मागे पाहृयलं. चाकोलीच्या फुफाट्यात बाबूराव उभा होता तिच्याकडे जळजळीत दृष्टीनं पहात तो दातओठ खात म्हणत होता 'जाते कोठं रांडकाड. पुरती वसूली करतो. आजच.'

'गिर्जाबाय्! इतनी कडी धूप, कायले मस्तक तापवत वं.'

'पोट जायाले. थे तं गेले वरती. माह्यामवती लावून देल्ला घोंय. फेंगडी म्हतारी, फुटकी पोट्टी आन् वायला पोट्टा. त्यायच्या उरावर कुटका घालाले असं पांदीपांदीनं हिंडा लागते मले.'

'बाबूराव कायले आला व्हता वं यवड्या उनाचा.'

'मले काय मालूम! आला असन् वावराकडे. बोलूं नको माह्यासंगं आता, डुलकी काढतो एक गावापावतर.'

गाडीनं नदी ओलांडली. थडीपासूनचं तिसरं खोपटं तिचंच. बैल पाणी प्यायला खाली वाकले. तशी तिनं गाडीखाली उडी घेतली. पानाचा गठ्ठा डोक्यावर घेतला.

'रह्यमदा! माह्या सारख्या रंडीमुंडीले सांभाळून घेतं रायजो. तुह्यावाला ममद्या मोठ्ठाजात व्हईल. अल्ला तुले काई काई कमी करनार न्हाई.'

रहिमनं धी ऽ केलं. गाडी निघून गेली. नदीच्या बारक्या धारेतलं पाणी गिर्जानं तोंडावरून फिरवलं. ती झपाट्यानं घरी आली. छपरीत सासू वाळवण वाळवीत बसली होती. हातात लांब काठी घेऊन ती बसल्या जागेवरून कावळे चिमण्या हाकलीत होती. बाजूला तरट्याच्या तुकड्यावर झोपलेल्या नातवाच्या तोंडावरच्या माशा डाव्या हातानं वारत होती.

गिर्जानं पळसाच्या पानाची चवड बुढी समोर आदळली. 'द्या, द्या लवकर लवकर पत्तरवाळी लाऊन. पंचीस तरी द्यायले पायजे आज बामनाच्या घरी. तेवढ्याच लावा झटपट. उरलेली पानं हलवायाले नेऊन देतो. चारपाच आने तेवढेच व्हतील.'

'उलीसा चिवडा मांगजो त्याले. जिभेले चवच न्हाई माह्या. पोट्टच लडत होतं मिठाईसाठी. उलीसी मांगजो लेकरासाठी.'

'द्यायले बसला थो? सतरा गोष्टी सुनवन् आन् चार आन्याच्या जागी दोनच आने दिन. मंग मीठ मिरची कायची आनू?'

'पिठ आनलं चक्कीवरुन? इंदूच्यापासी संगयलं असन् नं काई?'

'आत्तातं झाली चक्की सुरूं. आजकाल लोकय बुहाऱ्या बानाचे झाले. पोट्टी गयावया करते त निस्ते हात झटकतेत लमचे. गाडग्यात असन् त पाहय नं. लवकर दे भाकर टाकून. कालची व्हती त इंदूले आन् बाबूले चारली. माह्या पोटात त उन्नाय माजवला भूकेनं.'

गिर्जा खोपटीत शिरली. चूलखंडात तिनं धांडे सरकवले, एवढसं मातीचं तेल ओतलं. बोटभर ज्योतीवर ती आग पेटवू लागली. इकडे म्हातारीनं धांड्याच्या चोया काढल्या. तिनं भराभर पत्रावळी लावल्या. गिर्जानं दोन भाकरी केल्या. एक भाकर पितळीत ठेऊन त्याच्यावर चार मिठाचे खडे अन् एक मिरची ठेवली. पितळी म्हातारीच्या समोर ठेवली. दुसरी भाकर हातावर घेऊनच स्वत: खाल्ली. थालीभर पाणी घटाघटा पिऊन तीच थाली विसळून भरून आणून सासूला दिली.

'कवा दिली बाबूले अफीन्. मी जाऊन यतो तो ठावकर उतरन तर नाही नं?'

'अव आत्ता तं देल्ली. जाय. तू आपलं काम करून ये. येताना मिठाई आनाले भूलू नोको. न्हाईतर काढन त्वाह्या कांडात यो.'

गिर्जानं पत्रावळी बाम्हनाच्या दारात टाकल्या. बाम्हनीन गरजली 'गिर्जा! पन्नास पायजे होत्या. श्राद्ध आहे उद्या. तू तर पंचवीसच दिल्या.'

'पायटेच देतो नाजी आनून. पितर काय उजाडालेच जेवतेत काय तुमचे? तुमची शिप्पत पाहृयटेच आनतो.'

तशीच ती पुढे सटकली. बाजारात खरेदी विक्री सुरू झाली होती. पिंपळाच्या झाडाखालच्या ओट्यावर हलवायानं दुकान थाटलं होतं. बाजूच्या भट्टीवर गरम भजे आणि जिलब्या तयार होत होत्या. तिनं पळसाची पानं चिवड्याच्या ढिगाच्या बाजूला ठेवली. गिऱ्हाईकाला चिवडा बांधून देता देता हलवाई गरजला 'लयच

जलदीन आली वं. बजार उठाच्या वक्तावर याचं होतं; माहचा तोंडाले पानं पुसाले. चंपी पाहघटेच देनार व्हती पानं आनून तं तुहचा शब्दाले जागलो मी. कीव कराले गेलो त तू तर जीवच घेतं.'

'झाला जरासाक उसीर त कितलं तोंड करून राहघला गा बापू ! चंपीले काय व्हते माहा गिन्हाईक तोडाले. ते तर टपूनच बसली असते मले बुडवाले.'

हलवाई तिनं दिलेल्या पळसाच्या पानात भराभर चिवडा मिठाई बांधून देत होता. गिन्हाईक येत होते जात होते. गिर्जा तशीच उभी होती. तळण्याच्या वासानं तोंडाला सुटलेलं पाणी आतल्या आत गिळत वाट पहात उभी होती.

'देनं गा बापू पैसे. बाबू उठल माहचावालं.'

'कायचे पैसे ? तुह्या आंगावरच त आहे मांगलले.'

'ते राहू दे तंसेच, आज दे मीठ मिरचीले. कोड्डी भाकर जात न्हाई नड्डुघाखाली.'

'मांग न तुहचा बाबूरावले. तुले काय कमी आहे. खजानाच त भेटला तुले.'

'वापू कायले रगत काढतं आनखिन. आताच येळ हाये का चिमकोटे घ्याची. नाव नोको काढू त्याचं माहचा म्होरं.'

'काऊन वं ? फाटलं वाटते त्याच्यासी. आता कोनता लाल धावणार हाये तुले ?'

'हो ! हो ! धंदाच त मांडला मिनं बजारात. ते आलं गिन्हाईक. त्याच्या समोर माही लाज नको उघडी करू. दे दोनचार आने द्याचे असतीन त.'

वापूनं तो वसलेल्या पोत्याखालचे २० पैसे काढून तिच्या हातावर ठेवले.

'उलीसा चिवडा आन् मिठाई देन गा लेकरायसाठी.'

'बाप्पा ! दिवाय वाजवशीन कां माहा. पानाच्या वदल्यात कानं कोराची हिंमत हाये तुही.'

हलवायानं थोडासा खाली सांडलेला चिवडा अन् अर्धा पेढा एका पानात बांधून दिला. तो गिर्जानं घोळात ठेवला. त्यानं दिलेल्या पैशात तिनं मीठ मिरची अन् चार कांदे खरीदले. दिवस सरत आला होता. आता तिला घाई झाली होती.

इंदूला चक्कीवरून घरी घेऊन जायचं होत, बारा तेरा वर्षाची ती आंधळी पोर होती म्हणून त्यांना रोज भाकरीचा तुकडा तरी मिळत होता. रोज चक्की सुरू झाली की इंदूला ती किंवा म्हातारी एक अॅल्यूमियनची वाटी अन् एक फाटकी पिशवी देऊन चक्कीच्या जवळ एका कोपऱ्यात नेऊन बसवायची. गिरणीवर दळायला येणारे तिच्या वाडग्यात पीठ टाकत. संध्याकाळपर्यंत जेवढं पीठ जमे त्याच्यावर चौघांचे पोट अवलंबून असे.

गिर्जाचा नवरा गेल्यापासून चार वर्षं झाले. हा नित्यक्रम चालला होता. इंदू आता न्हातीधुती झाली होती. गिर्जाच्या हृदयात लप् लप् होत होतं. तिच्या डोळ्यांच्या खाचापेक्षा छातीवर फुटलेल्या डोळ्याकडे लोकांचे लक्ष जाऊ लागले तशी गिर्जा खचली होती. तिच्या उभारीच्या एकेक बुरुजाला तडा जाऊ लागला होता.

ती पदरातल्या वस्तू संभाळत रस्त्यानं चालली होती. बाजार आता उठू लागला. रस्त्यावर गर्दी उसळली होती. त्या गर्दीतून ती नदीच्या पुरातून वहात आलेल्या काटकीसारखी बाहेर पडली. तिच्या समोरून एक व्यक्ति झपाटयानं पुढे सटकली; तो बाबूराव होता. तिच्या अंगावर सरसरून काटा आला.

आज त्याचं देणं द्यायलाच हवं. पुष्कळ दिवस झाले उधारी फेडलीच नाही. तो आपली वसूली केल्याशिवाय राहणार नाही. किती दिवस हुलकावण्या देणार ? त्यानं तिच्यावर हक्क कमावला होता. तो तिला तसा थोडाच सोडणार ?

तिला अगदी किळस आली. बाजूला तोंड करुन ती पचकन थुंकली. असं थुंकून काय होणार ? एकदा गयी सो गयी.

ती लगवगीनं चक्की जवळ आली. चक्की केव्हाच बंद झाली होती. बाहेरच्या भिंतीला टेकून इंदू हातात पिशवी घेऊन उभी होती. उडालेल्या पिठानं तिचं अंग माखून निघालं होतं आणि तिच्या जवळ बाबूराव उभा होता. तिला कवटाळत होता. मुके घेत होता. इंदू हसत होती. तिला गुदगुल्या होत होत्या.

गिर्जानं ते पाह्यलं. पायातली वहाण काढावी अन् मारावी. पण पायात वहाणच कुठे आहे ? तिनं आवंढा गिळून हाक मारली, 'बाबूराव ! हे काय चालल म्हंतो मी.'

'तेच. जे तुझ्याशी चालते ते. त्वा नाही म्हनलं. वसुली तर करालेच पायजे. तू नाही त आहेच तुही पोरगी. कोरी कंच.'

'म्या कवा न्हाई म्हनलं वाबूराव. मंगाची काय येळ होती व्हय. जवाचं तवाच सोभते. त्या लेकराले काय समजते. अजाण लेकरू. त्यातून भोकणी. या ना रातचं घराले तुमची सोय करतो नं मी.'

बाबूराव दूर झाला. कोणाची तरी चाहूल आली. गिर्जानं इंदूच्या दंडाला धरून जवळ जवळ ओढतच घरी आणलं. तिला आता रहावेना. वळचणीला लावलेला लिंबाचा फोक तिनं बाहेर काढला. एक. दोन. तीन. तिनं इंदूला झोडपायला सुरुवात केली.

'हासत होती न्हाई त्याच्या चायाले. त्यानं हात लावला त लावू देत होती सांडी. लई हरीख येत होता तुले. काढू का त्वा हरीख साजरा.' गिर्जा इंदूला झोडपत होती. इंदू आक्रोश करीत होती, वुढी विचारत होती, 'काय झालं वं. काऊन झोडपतं तिले. माय व्हय की कैदाशिन हाये वं तूं?'

म्हातारी धडपडत उठली. पण लुळ्या पायात कळ येऊन धपकन खाली बसली. गिर्जानं हातातला फोक फेकला. पदरातल्या वस्तू तिनं जमिनीवर ओतल्या आणि खाली बसून तिनं गुडघ्यात मान घातली.

रडून रडून इंदू बसल्याजागी आडवी झाली. बाबूची अफीन अजून उतरलीच नव्हती. वुढीचं तोंडाचं बोळकं सतत हलत होतं. तिनं कमरेची पिशवी काढली. मघाशी कोणीतरी आणून दिलेली आंबेहळद आणि कुचल्याची बी तिनं चाचपून पाहिली. 'टोंगळा लय सुजला. माळच्याच्या पार्वतीनं या दोन जिनसा दिल्या. उगायून देतं कां? लेप लावून टाकतो उलीसा.'

गिर्जानं डोळे पुसले. केस सावरले, इंदूनं आणलेली पिठाची पिशवी घरात नेऊन ठेवली. मध्येच धास्तावल्या सारखी दूर रस्त्यावर नजर देऊन एकदा पाहून आली.

'कोनाची रस्ता पाहुचतं वं? आज काय झालं तुले? काऊन मारलं इंदूले? आवं बोलनं खोलपोटे, कायले बोलशील, शेंदूर खाल्ला जसा बुहारीनं.'

'गिर्जा! तू माही माय आन मी तुही माय. तुह्याविगर आमाले कोन? पुढच्या जल्मी तुह्या पोटी जलम घेईन मंग तं झालं.'

'सामूबाई! गिन्हान लागलं सोमाराले. बाबूराव एक रोज इंदूले नासवून टाकल्याविगर न्हात नाही."

'काऊन नजर गेली त्या दुधपित्या लेकराकडं त्याची. असा कोनसा अपराद केला म्हंतो मी.'

'मिनं त्याची वसूली देल्ली नाही म्हून तो सूड घेतो म्हंते' गिर्जानं वळचणीच्या तुऱ्हाट्या अंगणात झोकत म्हंटलं.

'अस्स! गाव बोंबलते ते खरीच दिसते मले. त्वा पासली पडली वाटते त्याच्या म्होरं. इझवली आपली आग?'

'इझवू नोको त काय करूं? तुमच्या आन् पोट्टचायच्या पोटाची आग कायनं बुझवू. त्या रोजी बाबू तापानं बेसूध पडला, पुतना मायवानी माहे यानं वढून वढून गाठी आनल्या पोट्टयानं..वज्जर दुखू होतं. घरात दाना न्हाई. नेसाले घडोत न्हाई. डॉक्टरच्या हातापाया पडाले गेलो. तिथसा बाबूराव भेटला. त्यानं औसिधाचे पैसे देल्ले, सूया घेऊन देल्या. करोट घेऊन देल्लं. आन् त्याच्या बदल्यात'—

'तरी म्हनलं पयसाच्या पानावर यवढी गाजरावानी कसी झालीस तूं. मंग आता तुही जवानी पूरी पडत न्हाई वाट्टे त्याले. मुक्क्या कग्रीवर झडप घालूनं राह्यला त्यो.'

'भोसडीचा! रातदिन मांगं मांगं फिरतो. येळ न्हाई वखूत न्याई. चार दोन रुपये फेकले की करतो माहा खूर्दा. आज देल्ली चाट त उलटला सर्प, माहा कोकरू गियाले पाह्यतो अजगर.'

'गियू दे नं. पैसेच घेतं त्याचे. तुले आन् तुह्या पोट्टचायले जगवते ना थो. व्हा दोघीबी मायलेकी एकाच जाराच्या रांडा.'

'सासुबाय!' गिर्जा किंचाळली.

'अगीन अगीन व्हते ओ आंगाची. त्या मस्त्याउदाचा मुडदा जावो. त्याचं तयपट होओ. एखांद दिवसी दोन्ही पोरायले घेईन आन् करीन् एखांदा आड जवड.'

'आन् मी मांगच राहू काय. मले कोन पुस्ते. लूत भरलेल्या कुत्र्यागत उकंड्यावर लोया लागन मले. तू साराय साराय दाट्याकडं काऊन पाहयतं वं? बाबूराव येनार हाये कां?'

ते पुराणं चार मजली मकान. .अद्यापी ढळल्यालं नाय. . त्यानी तं आपली माती केली. माय बाप तोडलं. काही आठवत नइ, हाय का नायीत त्यायची बी गत केली आसनार. . बस्. आगुदर त्येला पेटवाचये. . .घासलेटानं . .पिटरोलानं. नाय तर बारुतीनं उडवाचये. . .

—ती विचारात. . नाराजीत असलेली पाहून आता मावशीनंच तिचं घ्यान ओढलं. "सारजा, ए सारजा – आतं तूच सांग बाई या सोंग्याले. तो काय बोलताय आयीक. यानं घरणंच घरलं आज. तू बोलल्या विगर हा नइ जावाचा."

सोगारामचे हे फुकट चाळे सारजीला ठावं होते. चढली म्हंजीतर तो जास्तीच टकळी वाजवी. आता ती बोलली—

"मावशी मी त्येला नवरा कराय तयार हाय. पर माजी एक अट हाय."

"घा आटी सांग. मले कबूल. आवो सारजा, माजी कत पाहू नोको, तुझ्यासाठी डोईवर डोंगर बी उचलून आणून दीन." —सोगाराम बूड उधाणत बोलला.

"माला संग देतो – चालतो माज्यासंग ?"

"व्हय. चाहे जहनममधि ने – येतो. सांग कुटं जायाचं ?"

"घराला आग लावाचीए. आग नाय लागली तं सुरुंग लावाचीए. बोल, हाय तयार ?"

—आता सोगारामची नशा पारा घसरावा तशी झर्रकण् उतरली. "आग ! मजाक सोड सारजा. कुटं जायाचं ते सांग."

"मी बोलली ते खरं हाय. तू बोल ? . .बग, समदी तयारी करून ठेवली हाय मीनं." – सारजीनं खरोखरच एका संदुकातनं बारुदीची हात हात लांब वातीची गुंडाळे लागलेली नळकांडे बाहेर काढली. तो चकरावून पहातच राहिला. ...दबल्या घाबरल्या आवाजात हिंमत आणून त्यानं विचारलं– "कोण्या घराले – कोणाच्या ?"

"भुजंग बारदात्याच्या."

"भु. .भुजंग. .अरे बापरे – त्याच्या ? तो. . तो लय डेंजर माणूस हाय सारजा. महाभयंकर हाय. तो लाखोपती. त्येचा अड्डा–"

"माला ठावं हाय."

"पर तू हे का–"

"ते आतं नाय सांगणार. सांगीन मांगनं."

—आता घामाघूम झालेला सोगाराम तंडगळत उठला. चूपचाप बाहेरच्या दाराकडे जाऊ लागला. . .

सारजाने ती बारुदीची नळकांडे परत संदुकात न ठेवता त्यांची कागदात जुळी बांधून एका थैलीत ठेवली.

तिच्या तारठलेल्या लालघुराळ डोळ्याकडे मावशी भयचकित नजरेनं अवाक् होऊन पहातच राहिली.

बऱ्याच वेळापास्नं तापत ठेवलेला तावा आता लाल–अंगार झाला होता. सारजा त्यावर चटचट पोळ्या भाजू लागली.

सुरांचे तारुण्य

उमा पद्माकर दादेगावकर

सुरांचे तारुण्य
केव्हाच ओसरलेले
ओठावरी धून तरीही
आठवातच रंगलेली
नेत्रांच्या पापण्या
कधीच्याच थकलेल्या
गोठलेली स्वप्नं तरीही
काजळरेखेशी साठलेली–

स्मितामधल्या स्पर्शरेषा
कधीच्याच पुसलेल्या
ओशाळवाणे हसू तरीही
कोपऱ्याशी अडखळलेले–
मैफल कधीचीच संपलेली
चाळ थंडावलेले
सवयीने हात तरीही
तयारीतच गुंतलेले–

नवे चित्र !

सुनीति आफळे

तारा.....!

हो. नक्कीच ती तारा होती. तेच काळेमोर डोळे....सावळा रंग....काळे दाट कुरळे केस... हनुवटीवरचा तो मोठा काळा तीळ ..आणि कपाळावरची ती वाजवीपेक्षा जास्तच मोठी गोंदलेली चंद्रकोर ! या चंद्रकोरीमुळं आणि चंद्रकोरीसारख्या वाकड्या स्वभावानं शाळेत प्रसिद्ध असलेली हीच ती तारा....'

जीवनसोपानाच्या १५ / २० पायऱ्या झरझर उतरून माझं मन ताराच्या स्मृतीत अडखळलं....

' याच कां त्या....?– ' खाली मान घालून उभ्या असलेल्या ताराकडे पाहून मी कुसुमताईंना विचारलं....

" हो. याच ताराबाई आमच्याकडे स्वयंपाक करतात....कामाची गरजय् त्यांना. करीन म्हणाल्या दोन्ही वेळेला तुमच्याकडे. शिवाय तुमचे पापड लोणची मसाला....वर्षाचं सगळं सामानहि छान करून देतात...."

ताराची नजर खालीच....

ती बेडर नजरेची धीट ...नव्हे गर्विष्ठ तारा ती हीच कां ?....

अशी फाटक्या कपड्यात....दीनवाणी लाचार झालेली.....

कल्पनातीत गोष्ट होती !

पण ती ताराच होती.

मी कमालीची गोंधळले....काय बोलावं तेच कळेना. ओळख द्यावी की न द्यावी ? .... प्रेमानं बोलावं की रागानं....?

' उद्यापासून येते. पन्नास रुपये घेईन मी....' बोलून तीच आत वळली. परत कुसुमताईंच्या पोळ्या लाटू लागली.

मला उगीचच सुटल्यासारखें वाटलें.

ताराला बघताच इतकं मी अस्वस्थ कां व्हावं ?.. तिची स्मृति देखील तिच्या व्यक्तिमत्वासारखीच होती ...भेदरून टाकणारी....दुसऱ्याला एकदम हीन दीन लेखणारी....

छे ! छे ! पण आतां मी हीन दीन नाहीय. मी केविलवाणी लाचार नाहीय.... मी खूप मोठी झालेय.....खूप मोठी....मला वाटलं आंत जाऊन ताराच्या दंडाला गच्च पकडावं....तिला जोरजोरात सांगावं....बघ. ..मी एम्. ए. बी. टी. झालेय.. ..आज एका शाळेची मुख्याध्यापिका आहेय मी. माझा नवरा गांवातला एक बडा डॉक्टर आहे.... मुलं हुषार आहेत....स्वतःचा बंगला आहे.... ॲम्बॅसिडर कार दारात आहे....

अन् तूं....

तिचं तें फाटक...विटकं लुगडं माझ्या डोळ्यापुढं फडफडत राहिलं....उघड्या कपाळावरची उघडी चंद्रकोर क्षणभर चमकून गेली....त्या उर्मट चेहऱ्यावर आज इतकं लाजरवाणी हसूं कसं ?

' विचारीचा नवरा लवकर मेला. शिक्षण कांही नाही. पदरात एक पोर आहे. शिकतेय. तिच्यासाठी कष्ट करते बापडी....' कुसुमताई सांगत होत्या. " मुलगी यंदा एस्. एस्. सी. ला गेलीय. पुढं कॉलेजात देखील घालणार म्हणतेय. पैसा हवा ना ?– मोठीमोठी कामं हुडकत होती. तुम्ही काल बोललात– ! चला तुमचीहि गरज भागली. बाई चांगली आहे. स्वच्छ काम. परत स्वभाव शांत गरीब "...तारा आणि शांत ! गरीब !!

कुसुमताईंना सगळा पूर्वेतिहास सांगावा असं मनात आलं. पण घरातले पाहुणे....मुलांच्या होत आलेल्या शाळेच्या वेळा....माझं उद्या असलेलं इन्स्पेक्शन....सगळं एकदम आठवलं .... लगेच निघायलाच हवं होतं....

अनुक्रमणिका

घरी जातांना मन ठिकाणावर नव्हतं..तारा.. माझी बालमैत्रिण उद्यापासून माझ्याकडे स्वयंपाकाला येणार....!

तिला ठरवण्यात मूर्खपणाच केला असं तीन-तीनदां मनात येत होतं. किती फटकळ अन् विचित्र आहे तिचा स्वभाव ! कसं जमणार आपल्या घरांत... प्रत्येकाचे वेगवेगळे ताल ! जरा मनाविरुद्ध झालं की हे ओरडणार...मुलं तर सळो की पळो करतात सैंपाकिणीला.. हे तिखटच झालं हे गोडच झालं .. ते खारटच झालं...शंभर तारे शेरे ताशेरे...ही बया भांडून मोकळी होणार अशी कजाग ! तिला ठरवण्यात काही एक अर्थ नव्हता. पण दुसरी कोण मिळणारय लगेच ? वेळ फार अडचणीची होती. उद्यापासून इन्स्पेक्शन होत शाळेचं...घरात दोन पाहुणे होते. पुढच्या आठवडयात सिव्हिल सर्जनना सेंड ऑफ पार्टी द्यायलाच हवी होती...स्वयंपाकीण हवीच होती

घेऊं झालं जमवून ..! घेऊं तिच्या कला-कलानं...थोडसं...

कां ? पण कां घ्यायचं तिच्या कलानं मी ? पूर्वी फार घेतलं जमवून तिच्याशी मी...खूप मनधरण्या केल्या...खूप अजिजीनं वागलेय तिच्याशीं...आतां कां ? काय गरजय मला असं दीनवाणं होण्याची तिच्यापुढं ?.. ती एक यःकिंचित विधवा दरिद्री सैंपाकीण..मी शिकलेली...श्रीमंत..बंगलेवाली.. शाळेची मुख्याध्यापिका एका...

माझं मन एकाएकी खूप बंड करून उठलं...! हे इन्स्पेक्शनचे चार दिवस जाऊ देत गडबडीचे...! मग दुसरीच बघते. सरळ हात धरून हिला बाहेर घालवून देईन...! अगदी अपमान करून काढून टाकीन तिला...! लहानपणी मला असंच अपमानित केलं होतस नां...! रडवलं होतंस ना पदोपदी... थांब...!

तारा मला डोळयापुढं खरोखरच नको होती. पंधरा वर्षानंतर तिला पहाताच तिच्यावद्दलची चीड व भीति माझ्या मनांत पुन्हा एकदा डोकावूं लागली. तिचा मला भयंकर संताप येत होता व त्याच वेळेला मी तिला मनोमन अतिशय घाबरतहि होते. ताराचं व्यक्तिमत्वच तसं होतं विचित्र...!

ती आणि मी बालवर्गापासून बरोबर. प्रारंभापासून दोघींच्या स्वभावाची दोन टोकं...! मी कमालीची भित्री तर ती तितकीच धीट. नव्हे बाजवीपेक्षां जास्तच धीट ! हुशार असूनहि मी पहिल्यापासून जरा लाजरी बुजरी...कुणाशी जास्त न बोलणारी...तर ही अभ्यासात अगदीच बेताची पण सगळयांवर हुकमत गाजवणारी ! अंगानं पहिल्यापासून दुहेरी हाडाची दणकट. डोळयात सतत मग्रुरी. आवाजात विलक्षण जरब. आम्ही एकाच गल्लीत राहत असूं. वयानं सारख्याच. पण तरी शाळेत निघाल्यावर माझी आई ताराला म्हणायची 'हिला जपून घेऊन जा हो तारा तुझ्याबरोबर...' आणि एकाद्या मोठ्या माणसासारखी ही बया माझा हात गच्च पकडून मला शाळेत न्यायची – घरी आणायची...! जाता येता.. एकाद्या भित्र्या कोकरासारखी मी ताराच्या मागेमागे दडून दडून जाणार येणार ! नोकरानं मालकाला वचकून असावं तशी मी तिला घाबरून असायची. मीच काय – सगळयाच मुली तिला वचकून रहात. वर्गसेक्रेटरीचा मान सतत तिचाच. दुसरी कुणी वर्गसेक्रेटरी असली तरी तिचं मुली ऐकत नसत. ती मग बापडी सरळ ताराच्या हातात छडी देऊन मोकळी होई ! तारानं एकदां गर्जना केली कीं ब्र बोलायची कुणाची छाती नसे ! इतर मुलींची तर नाहींच पण खुद्द बाईंची देखील पत्रास ठेवीत नसे. बाई कांहीं बोलल्या तर उत्तराला प्रत्युत्तर या दांडगोबाचं तयार !

उशीरा आली कधीं तर बाई विचारीत—

'तारा उशीर कां झाला ?

'बाई – चिंचा पाडायला गेले होते !' खरं बोलायला कुणाची भीति आहे ? ताराच्या शब्दकोशात तर 'भिति' या शब्दाला स्थानच नव्हतं.

'कां गेलीस चिंचा पाडायला ?'

'आईला म्हटलं पैसे दे तर दिले नाहीत मग काय करावं ?'

'पण हव्या कशाला चिंचा.'

'मला फार आवडतात.'

'आणि खोकला झाला तर ?'

'मला होतच नाहीं.'

'पण झालाच तर...'

'पण मला कधीं झालेलाच नाहीं...'

छडी घेऊन बाई उठत. त्यांची सहनशीलता आतां संपलेली असे. लालबुंद होत त्या किंचाळत–' अगं पण झालाच खोकला उद्या समज तर...'

'तर येणार नाहीं शाळेत. औषध खात बसीन घरामधे...!'

हे ताराचं सरळ उत्तर !

पुकळदा चांगला चोप मिळे पण तिच्या वर्तनात काही फरक होत नसे. पुढे पुढे बाईंनीच तिचा नाद सोडला. कारण मार खायला ती निमूटपणे हात पुढे करी...डोळ्यात पाण्याचं टिपूस न आणतां छड्या खात राही...! दोन छड्या मिळाल्या तरी आम्ही मुली तासभर मुळुमुळूं रडत बसत असूं – अन् म्हणूनच ताराचं हे असामान्य धैर्य पाहून आम्ही स्तंभित होत असूं. नकळत मनोमन तिचा आम्ही आदर करीत होतो. तिला रडतांना आम्ही कधीं पाहिलंच नव्हतं, एक दिवस पेन्सिलीला टोक करतांना तिच्या बोटाला ब्लेड लागलं अन् चांगला चिंचोक्या एवढा टवका उडाला. पण ती पोरगी डोळ्यात टिपूस न आणतां बोट तोंडात घालून निमूटपणे बसून राहिली होती – ते मला अजूनहि आठवतं. वर्गाचं नेतृत्व तिनं या आपल्या असामान्य गुणांमुळे बळजवरीनं मिळवलं होतं आणि अभावितपणे आम्हीहि ते देऊन बसलो होतो !

कुणापुढे कधीं पड न खाण्याचा तिचा स्वभाव मोठा विलक्षण होता. एकदा गणितात कमी मार्क्स मिळाले तर बाई म्हणाल्या,

'जरा कमी हुंदडा ताराबाई.'

'कधीं हुंदडले मी ?'

'मग मार्क्स बघा एकदा. जेमतेम काठावर...!'

'मग ठीक आहेत की. नापास तर नाहीना झाले ?'

तिच्या खणखणीत बोलण्यानं बाई देखील खूप वेळा चूप्प होत. मग आमच्या नजरेत ताराबद्दल नितांत भीतियुक्त आदर !!

पण पुढे मास्तर आले आम्हाला. ते थोडे कडक अन् रागीट होते. एकदा आम्ही शाळेत जरा लवकर पोचलो. म्युनिसिपालटीची ती शाळा. बसायाला जाजमाच्या पट्ट्या असत. घंटा व्हायची होती. पाचसहा जणी होतो आम्ही. इतक्यात मास्तर तिथे आले व म्हणाले, 'आज मोलकरीण येणार नाहीय. तुम्ही या पट्ट्या झाडून घाला जा आपल्या वर्गात.'

मास्तरांनी सांगताच आम्ही साऱ्या उठलो व पट्ट्या झाडूं लागलो. पण तारा तशीच बसून राहीली.

'तारा – तूं पण झाडू लाग –' मास्तर म्हणाले.

'मी नाही झाडणार.' ताराचें हेकखोर उत्तर.

'कां नाहीं ?'

'माझा फ्रॉक आज नवीन आहे. तो मळेल.'

'या मुलींचे कपडे नाहीं मळत ?'

'त्याचे थोडेच नवे आहेत आज ?'

'आणि नवे असते तरी त्यांनीं तुझ्यासारखीं अशीं उर्मट उत्तरं दिलीं नसतीं. समजलीस ?'

'हो. त्या घाबरतात तुम्हाला.....मी नाहीं घाबरत ..'

मास्तरांच्या अंगाचा तिळपापड झाला. पण ताराहि हट्टाला पेटली होती. ती पट्ट्यांना हात लावीना. आम्ही इतर मुलींनी पट्ट्या झाडून घातल्या सुद्धां.

मास्तर संतापून ओरडले – 'ऐकायचं नसलं तर उभी रहा वर्गात आज.'

तारा उभी राहिली. घंटा झाली. पहिला गणिताचा तास झाला...

मास्तरांनीं इतिहास शिकवायला घेतला...

तोहि संपला...

मास्तर व्याकरण शिकवूं लागले.

तारा अद्याप उभीच.

त्या दिवशीं संबंध दिवस ती उभी होती.

मास्तर तिला बस म्हणाले नाहींत.

तिनंहि बसू कां म्हणून विचारलं नाही.

शाळा सुटल्यावर घरीं जातांना मलाच तिची दया आली. पाय उचलवत नव्हते पण तरी हूं का चूं न करतां ती निमूटपणे चालली होती. मी तिला म्हटलं – "तारा – मास्तरांची क्षमा माग आणि बसूं कां म्हणून विचार उद्या तरी."

" शहाणीच आहेस – मी कशाला जाऊं क्षमा मागायला ?–"

अन् दुसऱ्या दिवशीं बाईसाहेब घंटा झाल्यावरोबर मास्तर यायच्या आंत स्वतःहून उभ्या !

मास्तरहि हट्टाला पेटले होते ! बस म्हणाले नाहींत !

दुसरा दिवसहि तसाच गेला.

तिसऱ्या दिवशीं मात्र तारा शाळेंत येऊं शकली नाहीं. बघायला गेले तर पाय हे ऽऽ एवढे सुजलेले !

दोन दिवस ती कां येत नाहीय म्हणून मास्तरांनी चौकशी केल्यावर मीच त्यांना तिचे पाय खूप सुजल्याचें सांगितलें होते.

" हट्टी मुलगी ! क्षमा मागितली असती तर एका शब्दानं !"

–मास्तर पुटपुटले होते.

दोन दिवसांनी ती शाळेत आली तरी स्वतःहून परत उभीच. मास्तर शिकवूं लागले पण मला चैन पडेना. वर्गांत लक्ष लागेना. वाटलं परत हिचे पाय सुजतील...दुखतील. कळ लागेल...

मी हळूच तिच्या पायाला पेन्सिल टोचली... म्हटलं —

'तारा, विचार ना मास्तरांना बसूं कां म्हणून ..!'

तिनं लक्षंच दिलं नाही...

मी परत परत पुटपुटत होते...

'तारा विचार ना...'

'काय चाललं आहे ?...' मास्तर ओरडले.

" अं...? अं... ? काही नाही." आधीच भित्री असलेली मी पुरती घाबरले.

'उभी रहा.'

मी निमूटपणे उभी राहिले.

'काय बोलत होतीस ?'

'कांहीं नाहीं...ही तारा...ही तारा किनई उभी आहे अजून...'

'मग तुझं काय जातं ?'

'नाही..पण तिचे पाय अवघडले असतील..'

'मग ती सांगेल तें. तू कशाला बोलतेस मधे ? काय गं तारा ?' – '

" काही नाही मास्तर. हिला उगीचच चोंबडे-पणा करायची संवय आहे. फुकटची वकीली करतेय उगीच." अन् मग वर्गातल्या सगळ्याजणी मला फिदी-फिदी हंसल्या होत्या. आणि त्यानंतर माझी चीड 'वकील' म्हणून पडली ती कायमचीच !

त्यानंतर मास्तरांनीं तिला खाली बस म्हटलं आणि विजयी मुद्रेनं ती खाली बसली होती. मास्त-रांचा सपशेल पराभव झाला होता. पण त्यांना तो अपमान झोंबला नसेल इतका तो प्रसंग माझ्या मनाला लागला होता. त्यानंतर शाळेत सगळ्याजणी 'वकील' 'वकील' म्हणून माझी टर उडवू लागल्या. तारा तर त्यात अग्रगण्य होती. मी अगदीं रडकुंडीला येई.

पुढे शाळेत जायलाच मी घाबरूं लागले... ताराची विलक्षण भीति माझ्या मनानं घेतली होती...

आईवडलांनीं पुष्कळ आर्जवं केली....अखेर शाळाच बदलली. पण गल्लीतदेखील तारा मला चिडवून हैराण करीत असे...तिला घाबरून मी शाळा बदलली ...मी चिडकी आहे...मी रडूबाई आहे...हजार विशेषणांनीं मला तिनं छळलं...गल्लीत खेळायला जायला देखील मी तयार नसे...

वाटे ताराला खूप वेदम झोडावं.....खूप खूप मार द्यावा...रडवावं...!

पण शरीरानं तर मी दुबळी होतेच पण मनानं देखील !

पुढे लवकरच बाबांची बदली झाली आणि मी ताराच्या तावडीतून सुटले ! मोठ्या गांवीं...नवीन चांगली शाळा....नवीन मैत्रिणी.....मी ताराला हळूंहळूं विसरूनहि गेले. पण कधीं काळीं 'वकील' या शब्दावर माझं मन ठेचकाळे...स्मृतींनीं रक्तबंबाळ होई...अपमानाची एक शिरशिरी थेट मेंदूपर्यंत जाई ....वाटे ती तारा कधींतरी भेटावी.....! तिला चांगलं रडवावं...अपमानित करावं...

ती तारा खरोखरच भेटली होती. उद्या नोकर म्हणून माझ्या घरांत येणार होती....एक सैंपाकीण म्हणून ! मन खूपखूप सुखावलं क्षणभर !

वाटलं हिला चार आठ दिवसातच चांगली

सुनवायची. अन् चक्क हकलून द्यायची...! मिजासखोर !

ही इन्स्पेक्शनची गडबड संपली की दुसरी बाई बघायची ! या निर्णयानं मनाला सुखवीत मी तो दिवस पार पाडला. दुसऱ्या दिवशीं तारा आली....

दीन दीन...दुबळी भासणारी...लाचार... खालच्या मानेनं वावरणारी...मोजकेच शब्द अदबीनं बोलणारी...मला अहो जाहो करणारी....पूर्वीचं तें ताराचं उर्मट चित्र पार बदलून गेलं होतं. चौकट फक्त कायम होती. रंग सगळे उडाले होते.

तिनं मला ओळखलं होतं....मीहि तिला. पण दोघीही जणी ओळख मात्र दाखवत नव्हतो.

दिवस गडबडीत जात होते. ती नियमित येत होती. दोन तीन दिवसातच तिनं सैंपाकघराचा पुरा तावा घेतला होता. यांना निघतांना ग्लासभरून ताजं ताक लागतं हें तिला ठाऊक झालं होतं. माझी कमी तिखटाची भाजी–आमटी आठवणीनं ती वेगळी काढून ठेवत होती. धाकट्याला गोड आवडतं हें तिनं लक्षात ठेवलं होतं. सकाळी त्याच्यासाठीं कधीं एकादं गोड घावन तर कधीं चटकन् एकादा पोळीचा लाडू करून ती त्याला डब्यात देत होती. थोरला मुलगा तिच्या मऊशार पोळ्यांवर खूष होता. यांना तिच्या भाजी आमटीची चव खूप आवडली होती...सिव्हिलसर्जन आले तेव्हां त्यांना आवडतात म्हणून मुद्दाम पुरणपोळ्या झाल्या...अशा पोळ्या कित्येक वर्षांत खाल्या नाहींत म्हणून यांच्यासकट सगळ्यांनीं तिला प्रशस्तीपत्रक देऊन टाकलं होतं...

सगळे खूष होते...!

खूष नव्हते ती मी एकटीच. पाहुणे गेले – इन्स्पेक्शन संपले मी दुसरी सैंपाकिण हुडकत होते... ताराला मला हकलून द्यायचं होतं....रडवेलं करून हकलून द्यायचं होतं...तिला चेचायचं होतं...खाली पहायला लावायचं होतं...!

कधीं कधीं विचार करूं लागले कीं माझी मला लाज वाटे. शिक्षणानं – पैशानं...अधिकारानं..किती मोठी होते मी आज ! एका शाळेची मुख्याध्यापिका ...हजारो मुलांवर संस्कार घडविण्याच्या गप्पा मारणारी...मुलांना उद्याचे आदर्श नागरिक बनविण्याची ध्येयवाक्यें तोंडावर फेकणारी...मी...मी हे कसले क्षुद्र विचार उराशीं बाळगत होते.... ! कसला कुठला मानापमान हा ! वाटे सगळं विसरावं ताराला ओळख द्यावी...ये बस म्हणून जवळ बसवून घ्यावं.. तिच्या दुःखावर हळूंच फुंकर घालावी.... तिच्या मुलीची चौकशी करावी...पण छे ! मन ते जुने प्रसंग... ते मानापमानाचे जळमट विसरायला तयार होत नव्हतं...

तारा रोज येत होती...निमूटपणे सगळं सगळं करीत होती. प्रत्येकाच्या आवडीनिवडी लक्षात ठेऊन तसे तसे पदार्थ सकाळ संध्याकाळ प्रत्येकाच्या पानात वाढत होती..खालच्या मानेनं..कधीं कांहीं न बोलता. कधीं कधीं मला या ताराच्या दीनवाणेपणाचीच खूप चीड येई... मला ती गर्विष्ठ ताराच हवी होती. तिला चेचायचं होतं...तिला रडवायचं होतं...

मग तिला मी मधून मधून उगीचच कांहींवाहीं बोलूं लागले....वाटे आतांतरी ती एकादं प्रत्युत्तर देईल...

अन् मग मी सरळ म्हणेन .."चालती हो माझ्यापुढून....मिजासखोर....घमेंड पहा केवढी आहे...कोण समजतीस तूं स्वतःला ? अं ?..."

रोज ते वाक्य मी दहा एक वेळा तरी घोळत होते. माझी मलाच शरम वाटूं लागली होती. माझ्या शिक्षणाला. ..पेशाला....प्रतिष्ठेला न शोभणारे विचार होते ते सगळे ! पण माणसाचं मन किती विचित्र असतं....कुठंतरी सांधीकोपऱ्यात दडलेलं ते मानापमानाचं जाळं जळमट मला कांहीं केल्या झटकून टाकता येत नव्हतं. झटकून टाकायला जावं तर ते अधिकाधिकच चिकटून बसत होतं. एवढेसे ते २/४ घाणेरडे धागे पण कांहीं केल्या तुटून पुसून जात नव्हते. चिकटून बसून उगीचच मनाला ओंगळ ओंगळ करीत होते...!

असे अस्वस्थपणातच दोनचार महिने गेले. ना तारा कुठे चुकत होती ना मला कुठे बोलायची संधि मिळत होती. तिचा अपमान करायची माझी इच्छा दिवसेंदिवस लांबणीवरच पडत होती.

अन् एक दिवस उगवला.

तारा आली ती सैंपाकघरात न जाता सरळ माझ्यापुढे येऊन उभी राहिली.

माझी मुद्रा प्रश्नांकित.

'बाई चार दिवस रजा पाहिजेय...'

'चार दिवस ?'

'होय. मुलगी आजारी आहे. टायफॉईड म्हणताहेत डॉक्टर...'

डोक्यात उलट सुलट चक्रे फिरली. ही संधि छान होती. आजपर्यंत ती कधीं रजेवर राहिली नव्हती कीं कधी उशीरा आली नव्हती. खरं तर मलाही आता दिवाळीची सुटी लागली होती. मुलांच्या शाळा बंद होत्या. हे सेमिनॉरसाठी दिल्लीला गेलेले होते. घाई कसली नव्हती. मी चार दिवस सहज घरात करूं शकले असते. पण नाहीं. तें समजूतदार मन नेमकं त्या कोपऱ्यातल्या जळमटात घुटमळलंच !

"छे ! छे ! चार दिवस कोण करणार सारं ? सणाचे दिवस आहेत. चकल्याची भाजणी अजून भाजलेली नाहीत कीं अनरशाचं पीठ तयार नाहीं ! सुट्टी अजिवात चालायची नाहीं मला. मी आधीच बजावून ठेवते. परत कधीं रजेचं विचारूं नका "

मला वाटलं आता ती म्हणेल –' आजवर कधीं गैरहजर राहिले नाहीं ...पहिल्यांदा मागतीय सुट्टी– ती सुद्धा मुलीला बरं नाहीं म्हणून ! इतर बायका महिन्यातून चार चार खाडे करतात...'

मग मी पण तिला पढून ठेवलेलं माझं तें वाक्य ऐकवीत सरळ म्हणीन – "तुला होत नसेल तर सोडून दे काम....मला गरज नाही....चालती हो आजपासूनच....हे तुझे पैसे – उद्यापासून येऊं नको... दुसऱ्या छप्पन मिळतील सैंपाकिणी मला...."

पण यापैकी कांहीं एक बोलायची संधी तारानं मला दिलीच नाहीं...

ती निमूटपणे आंत गेली. सैंपाकाला लागली.

दुसऱ्या दिवशी आली...

तिसऱ्या दिवशी आली...

मला मात्र सारखी रुखरुख लागून राहिली... हिच्या मुलीची तब्येत कशी असेल ? घरीं तिच्याजवळ कोण असेल ?

वास्तविक भांडीवालीला ८।८ दिवस खाडा केला तरी मी कांहीं बोलूं शकत नव्हते. तिनं बोलून घेतलंच नसतं...

पण तारा...!

मी फार बेचैन झाले...ती आली कीं उगीचच मला अपराध्यासारखं वाटूं लागलं...ती यायच्या आधीं मी स्वत: भाजी चिरून ठेऊं लागले...कणिक मळून ठेऊं लागले...कधीं कुकर देखील लावूं लागले ...हेतु हा कीं तिला लवकर घरीं जायला मिळावं !

पण तिनं हून कधीं सुट्टी मागितली नाहीं.... माझी मदत निमूटपणे ती स्वीकारत राहिली...

मग कधीं कधीं मी स्वत:वर उगाचच चिडे. कशाला या ताराच्या पुढे पुढे करायचं आपण...? कोण ती...

य:किंचित सैंपाकिण....दरिद्री विधवा...!

आदल्या दिवसाच्या कोशातून दुसरा दिवस फुटत होता...गळून पडत होता...कालचक्र चालले होते...

अन् एक दिवस तारा आलीच नाहीं.

सकाळीं ८ ला येणारी तारा १० वाजून गेले तरी आलीच नाहीं.

मी अस्वस्थ झाले होते.

मुलीची तब्बेत सुधारल्याचं ती मागेच म्हणाली होती.

मग कां उशीर असेल ?

'काय हा उशीर ! सणाचं काय आम्ही चुलीपुढं बसायचं ?.. मग तुम्हा लोकांना पैसे कशासाठीं द्यायचे ?...जास्त झालेत आमच्याकडे ! जमत नसलं तर करूं नये...हजार बायका मिळतील दुसऱ्या...'

मी एकेका वाक्याची घोकंपट्टी करीत होते... मुलांना कांहींतरी खायला करून दिलं. पण सैंपाकाकडे लक्ष लागत नव्हतं. ताराला कसं बोलायचं फाडफाड आणि कसं घालवून द्यायचं याचाच विचार सारखा सुरू होता...अन् तितक्यात ती आली.

मी तिच्याकडे पाहिलं.. आणि मनांत चर्रर्रं झालं...! चेहरा कमालीचा ओढलेला, उजवा पाय घोटयापर्यंत भाजलेला...केवढाले फोड तरारले होते त्याच्यावर ! कांहीं फुटलेले.. पाणी गळत होतं... रात्रभर झोप नसावी...डोळे लालभडक झालेले...

'काय झालं गं...' मी अभावितपणे माझी सगळी घोकलेली वाक्यं विसरून गेले !

अनुक्रमणिका

'काल बर्वेकाकूंकडे चकल्या करतांना तेल सांडलं उकळतं...'

मला वाटलं ती आता रजेचं विचारील.

पण ती आली ती सरळ पदर खोचून चुलीकडेच वळली. कांहीं न बोलतां कामाला लागली

मी डोळयापुढं पेपर धरला पण दारातून दिसणाऱ्या ताराच्या पायाकडेच सगळं लक्ष होतं मधूनच ती पायावर पदरानं वारा घालीत होती... फुंकर घालीत होती...डोळयातलं पाणी टिपत होती .तारा रडत होती...ते भडक चित्र पार फिकं झालं होतं...

मी चोरून बघत होते

पण कां ही अशी गुपचुप? कां नाहीं रजा मागतय? कां नाहीं कांहीं बोलतय धीटपणानं?

कुठं गेली ती धीट उर्मट गर्विष्ठ तारा?

कुठं गेलं तें भडक चित्र? कुठे आहेत ते तिच्या स्वभावातले गडद वेधक डोळे दिपवणारे रंग?

तो दुखरा पाय घेऊन उभी असलेली ही तारा...

अन् शाळेत उभी राहिलेली तारा...

तेंच चित्र...तेंच...पण त्यातले रंग आता किती सौम्य झालेत ..किती दीनवाणे ..लाचार...

तें बोलणं.. हंसणं .किती हीनदीन...

कुठंय तें ताराचं चित्रं?...ही तर नुसती चौकटच उरलीय...

दाराबाहेर पावलं वाजली...

मी पाहिलं अन् ताडकन् उठले...!

डोळयावर विश्वासच बसेना...

तीच ती...शाळेतली तारा..हो तीच...

'आई आहे कां इथं?...'

मी कांही उत्तर देण्यापूर्वीच तारा लगबगीनं बाहेर आली होती...

'मला वाटलंच! डॉक्टरांकडे जाते म्हणून सांगून निघालीस घरातनं अन् इथे आलीस ना?'

'अग डॉक्टरांचं बील द्यायचं राहिलंय तुझ्याच आजारपणातलं ..आतां कुठले पैसे आणायचे.... लावलीय कोरफड मी.. होईल बरा पाय...'

'तूं आधीं घरी चल...'

'अगं वेड्यासारखं करूं नकोस. यांना खाडा आवडत नाहीं. माझं उगीच काम सुटेल तुझी फॉर्म फी भरायची आहे ना पुढच्या महिन्यात...'

"खड्डयात गेलं माझं शिक्षण. अन् यांना खाडा आवडत नाहीं म्हणे! सोडून दे काम असलं. नको आपल्याला. झालेल्या दिवसांचे पैसे घे अन् आधी डॉक्टरांकडे चल...तुला उशीर लागला म्हणून बघायला गेले दवाखान्यात तर तिथे तू नाहींच! आधीं पैसे माग त्यांच्याकडे अन् चल..."

"काय बोलतेस हे पोरी...कुणापुढं बोलतेस हे – अगं काम सोडून कसं चालेल मला...माझं एक आयुष्य शिक्षणाविना वाऱ्यावर गेलं... तुला शिकायला पाहिजे... तूं तरी मानानं जग या जगात पोरी...! माझी काळजी सोड...माझा पाय अगदीं ठीक आहे. तूं जा...क्षमा माग यांची..."

एका चित्रात रंग भरण्यासाठीं दुसरं चित्रं रितं होत होतं...

ती ताठ तारा आपल्या मुलीनं ताठ मानेनं जगात जगावं म्हणून स्वतः वाकत होती...वाकत वाकत पुरती मोडणार होती...तिला त्याची पर्वा नव्हती. तिला आपल्या प्राणांतले सगळे रंग एकवटून एक नवं चित्र रंगवायचं होतं...

मी एकदम सावध झाले...तें कोपऱ्यातलं जळमट एकदम् तटकन् तुटलं...

त्या मुलीकडे वळून मी म्हटलं..."अग वेडे क्षमाबिमा कसली मागतेस आपल्या मावशीची... तुझ्या आईची बालमैत्रिण मी...चल...तारा... कामाची अजिबात काळजी करूं नकोस...आधी डॉक्टरकडे जाऊं आपण..."

अन् शोफरला हाक मारून मी गाडी बाहेर काढायला सांगितली!

अनुक्रमणिका

स्तन्याचे ओठ
पिचक्या छातीवर माळून
ग्रीष्मतप्त खडी
उरासह फोडणारे वात्सल्य
कसे व्हावे समरस
मेहरपी मनोऱ्याशी ?

× × ×

वांझोटे उदक ढोसलेल्या उदरांना
रात्रीची शय्यासोबत
काजव्यांच्या पणत्यांची

× × ×

समृद्धीच्या मंचावरील
मोसमी नेतृत्वांच्या
रुपेरी शब्दांनी
भरणार कशी खाई
काविळलेल्या नशिबांची.

दैनंदिनी

निरंजन उजगरे

तो रोज सकाळीच उठतो.
देवाला स्मरून उंबरठा ओलांडतो....

ओळखीच्या रस्त्यांवर,
भुलवला जातो, खेळवला जातो.
नागवला जातो, चिरडला जातो....

पिवळट दिव्यांच्या थरथरत्या प्रकाशात,
दवा धरल्या एकाकी रस्त्यावर.
फरफटणारे,
पाऊलठसे उमटवीत रक्ताचे,
तो रोज घरी येतो....

चोहोकडची चाहूल घेऊन,
पोथी झालेलं स्वप्नांचं पुस्तक,
पुन्हा एकदा वाचून काढतो--
झोपी जातो....

तो रोज सकाळीच उठतो,
देवाला स्मरून उंबरठा ओलांडतो....

एक कविता

बबन चहांदे

एका निर्ढावलेल्या शहराला
हळूच निपचित करित एक रात्र
सुरु धरते.
त्या कुंपणापलीकडे क्षणापूर्वी
आळसावून निश्चिन्त पडलेली
एक बोगनवेल, गर्भगाळीत
उभी आहे. स्वतःचे उसासे
तिने स्वप्नाच्या तळघरात
कोंडून ठेवले आहेत म्हणून बरे.
हो ! नाही तर एकांत वेरात्री
घोषणा करित रक्तबंधाला तडा देत
बंड करून उठायचेत ते.
तसे काहीच बिघडले नसते म्हणा !
नग्न शरीरावर उन्हं टिपतांना
चारदोन घर्मबिंदू गळतात...
तसे, निलघन गहिवरले असते.

पाखरांच्या सोबतीला

प्रभाकर सोमकुवर

पाखरांच्या सोबतीला पाहुणे आले किती
संपले सारे तरीही थांबले येथे किती ?

बांधले आयुष्य सारे पिंड त्याचे पाडिले
वाट काळचा कावळ्याची पहायची आता किती?

दर्भ आभाळात गेले प्रेत झाले स्वातिकी
एक अस्थी सापडाया राख मोजावी किती ?

साद येता मांजरांची वाहते आकाश कां
देह गळल्या पाकळ्यांचे फूल हुंगावे किती ?

सूर सांडत चालणारे गीत हाती घेऊनी
कोवळे गांधार ओठी आत रुतवावे किती ?

तुम्हाला ते फार सोपे वाटेल

अविनाश विष्णू वाडेकर

तुम्हाला अेक सत्य कबूलच करावे लागेल
ही जगण्याची गती वेदना पचवित
क्षणाक्षणाला मृत्यूकडे नेणारी आहे
आणि मी हा इथे तुम्हाला ओढ लावीत
जगण्याचा प्रयत्न करीत आहे. जखमा होणे
हा आपल्या आयुष्याचा गुणधर्मच आहे.

माझ्या अंगावर जेव्हा टपटप फुले पडतील
म्हणजेच मी फुलांच्या अगदी जवळ जाईन
मी फुले पांघरूनच झोपी जाईन
तेव्हा पोटउगाळी मायेने
तुम्ही किती जखमी व्हाल ?

माझ्या डोळ्यातील सगळा प्रकाशच संपून जाईल
माझे डोळेच अंधाराचे होऊन जातील
तेव्हा तुमच्या डोळ्यातून पाण्याची
एक, थेंबरेच तरी येईल काय ?

चितेवर पडल्यावर झर्रकन जळून जाणे
फार सोपे असेल असे बाटते
थकलेल्या कायेस ज्वालांचा स्पर्श
फार मुलायम, सोसणारा वाटेल काहो ?
तुमच्या मनात माझ्यासाठी त्यावेळी
एक दबलेला उमाळा तरी असेल कां ?

तुमच्या बरोबरच संथसंथ पावले टाकीत
माझ्या धुमसत्या अग्नीचे ओझे संभाळणारा
माझ्या अंतिम यात्रेचा सूत्रधार चालत असेल
तेव्हा तुम्ही मनात खोल कुठे तरी
आपणच गदगदून याल का ?

दोस्तहो, मी सांगू ? तुम्ही माझ्यासाठी
आतून जखमी वगैरे काही होणार नाहीत.
तुम्ही धारण कराल त्यावेळी मनात नसताही
एक अस्सल, निशब्द दुःखी मुखवटा. आणि

तुम्ही मला न परतिच्या वेगळ्या वाटेने घेऊन जाल
तिथे मी क्षणाक्षणाला दिसे न दिसे तागायत आलो,
तरी तुम्हाला मान असेलच, मला तिथेच एकटे टाकून
शांत चित्ताने आपआपल्या घरट्यात परतण्याचे
आणि दोस्तहो ! तुम्हाला ते फार सोपे वाटेल
तुम्हाला ते फार सोपे वाटेल.

खूळ

वसंत गिरटकर

रानातील रानभोरी झाली आज पोर
डोळा नाही तिच्या डोळा धपापतो ऊर

नवतीची बहरली लहडली तूर
पिवळले अंग तिचे मनोमनी चूर...

कपाशीच्या ओठावर पांढुरके हसे
कमरेची काडी तिच्या पुढे शेव खोसे

नवलाचे पाखरू ये घाली कुणा शीळ
पाडी अंतरास पीळ ...बसे दात खीळ !

–घरी दारी पोरीबाळी नाचवती नीळ
अजूनही तिच्या कानी घुमतसे शीळ !

नाही खात, नाही पीत बसे ईळ ईळ
मंतरले धागे दोरे तरी जपे खूळ !

कविता

राजा मुकुंद

लाल चुटुक रंगाची येता हिर्वाळून कळ
जळ अभ्रकी हसले हल्के सांवरीत तळ
दूर जांभळाच्या बनी चिव् चिव कल्लोळली
शिवारातली पोपटी गर्द शीळ चिवोरली
हिरवी उलुशीच शाळू आली दूधाळ रंगात
इला बघू नये कोणी ओली न्हाताना दंवात
मुनशानच धुक्याने घातलेय मोती कडे
झांकु लागला डोंगर उगवतीचे तांबडे
डोई घेऊन पदर करी स्वागत जास्वंदी
अन भूपाळी चालते खपरेली घरांमंदी......!

सांज

धों. वे. जोशी

आज अनोखी सांज पाहिली
मंतरलेली रूप सावळी
नवी नवेली जगावेगळी
आज अनोखी सांज पाहिली
लाज लाजरी ओठ भर्जरी
नयनामधली जादु केशरी
आज अनोखी सांज पाहिली
रान फुलांचा गजरा ल्याली
गंध तनुचा धुंद सावली
आज अनोखी सांज पाहिली
निळ्या ढगाने मोहरलेली
रूपगर्विता अजिंठ्यातली
आज अनोखी सांज पाहिली
पवनासंगे ती झुलणारी
आकाशाशी कुजबुजणारी
आज अनोखी सांज पाहिली
छळणारी ती मोहविणारी
हृदयपक्षीला वेडावणारी
आज अनोखी सांज पाहिली
अव्यक्तातली स्वप्नपरी ती
अगम्यातली रंगावली ती
आज अनोखी सांज पाहिली

गर्व गीत

श्रीपाद गंगाधर कावळे

झोकांत शीड उभारून
विमाखाने लाटा सारीत जाणारी जहाजे
किनाऱ्यावर उघडे अंग वाळवीत
वाळूत विसावलेल्या जीर्ण नावा
अंगावरची जीर्ण वस्त्रे सावरता सावरता
निघून गेलेले आयुष्य
अर्धनग्न माड
सागराचे ढवळलेले अंतर्मन
अशांतीच्या काळ्या डोहावर
सरत्या प्रकाशाच्या क्लान्त रेषा
क्षितिजाच्या कुशीत भयभीत
दडलेले विस्तीर्ण बर्फाळलेले प्रदेश
गोठलेले मनोगत अंतर्मन जोपासीत
युगे युगे.......
जेथे हिरवळ नाममात्र
केवळ आकाशाची ओलसर नजर
सूर्यही गोठून निघावे
एव्हढे घोर अधान्तर

उगाचच कोलंबसाचे गर्वगीत
युगाना साक्षी ठेउन
आपल्या नादान अस्तित्वाची
साक्ष देत......

वांझ माझ्या वेदना

अविनाश वरोकर

स्निग्ध ओल्या वाळुतल्या मी मांडलेल्या स्वप्नराशी
लाट आली...पुढे निघाली...मी कधीचा इथे उपाशी ..!

गर्भ कुंतीचा गळाला ओल राधेच्या उरी
देवकीच्या आसवांना साद देते बासरी....!

आतड्यांना वंचित माझ्या...संदर्भ कां मिळतो नवा
सांगा कुणी कधी थांबला कां आसवांसाठी थवा ?

एकतारी माझ्या उरीची गात फिरते वैखरी
उत्नावली गर्दी कधी कां रक्ताळल्या रस्त्यावरी ?

करपलेला क्रूस माझा साक्ष देती लक्तरे
ज्ञात नव्हती अज्ञात मजला ही अनोखी मन्वंतरे...!

निखळल्या पंखात झरती वांझ माझ्या वेदना
निळे किनारे भोवती मी झुरतो इथे थेंबाविना...!

सांजवात

प्रमिला भिरूड

तुझ्या डोळ्यात फुलते
माझ्या प्रीतीचे चांदणे
माझ्या ओठावर सख्या
तुझ्या अंतरीचे गाणे –!

भाग्यानेच लाभे मला
जन्मोजन्मीची सोबत
माझ्या अंतरी नांदते
तुझ्या स्वप्नांची दौलत – !

तुझ्या सहवासी माझ्या
स्वर्गसुखाचा सोहळा
ओटी भरून लाभल्या
तुझ्या माझ्या प्रीतकळा – !

तुझ्या बाहूवर जेव्हा
क्षणभर विसावते
साऱ्या जन्माचे साफल्य
रोमरोमी फुलू येते – !

तुझे माझे एकपण
जसे आभाळ तळ्यात
गाते सौभाग्याचे गीत
लावतांना सांजवात – !

दयित तोच परि ध्यास नवा

ज्ञा ने श्व र सा धु

अस्ताचल हर्षात दिसे
दिवाकरा नावरे हसे ।।
मैत्री दोघांचीहि जुनी
आविष्कृत जी प्रेमखुनी ।।
निरपेक्षताच भरुनि उरे
पोटि तिच्या ती दिव्य ठरे ।।
भेट न ही पहिलीवहिली
रोज एकदा ठरलेली
काय जाहले मग हसण्या ?
परस्परांस खुणा करण्या ? ।।१।।

कोण सरकले दारात
मृदुच लाजले गालात ? ।।
वयहि लाजण्याचेच असे
रुसणे फुगणे खुलून दिसे ।।
प्रतीक्षेतली आतुरता
पाहण्यातली मादकता ।।
लाजण्यातली विलोलता
चालण्यातली पेलवता ।।
काय कळावी इतरांना, जावे त्यांच्या वंशाना ।।२।।

संध्याराणी नवखी का ?
दिनकरराणा नवखा का ? ।।
नवखे का मीलन त्यांचे
अस्तगिरीच्या साक्षीचे ? ।।
स्थलात का पालट झाला
छे ! घ्या पुसून मित्राला
वेळ अटळ ही नित्याची
रीत चिरंतन प्रीतीची ।।
रमणागमन अपेक्षेचे
रसिकजनांच्या आवडीचे
संध्येच्या गालि मग का
सुषमा-साज हसे नवखा ? ।।३।।

हो ! कळले मजशी कारण ते
वर्षा-दिन अजि सरले ते ।।
वर्षा कसली सवत मुळी
विरस घडविण्या टपलेली ।।
शारद येता ऋतु आता
वृत्तीला ये पल्लवता ।।
आकाशाला निरभ्रता
समीरणाला सुगंधता ।।
कोठे जाइल हे सारे ? नवतेला फुटलेत तुरे ।।४।।

दयित तोच परि ध्यास नवा
घरि येण्याचा वेग नवा ।।
नवीनता हसण्यात डुले
मुग्धन्हसितभावहि खुलले ।।५।।



रानस्वर आणि सावल्या

पो प ट सा त पु ते

२६

डोंगरमाथ्यावरून कलणाऱ्या काळचा खिन्न रात्रीसारखी
सर्वभर पसरणारी उदासिनता हाकलण्यासाठी
झाडाझुडपांच्या नसानसातून भडकलेला चैत्र
आता लीलीच्या घराकडे निघून गेलेल्या घोगऱ्या वाऱ्यासारखा सैलसर मिटून गला
आणि जिव्हाळ्याचा विषय होऊन राहिलेली अभेदाची ही अनन्वित सळसळ
सावल्यांच्या कातर हृदयातून पुढे सरकली.

२७

भयानकाची सुप्ति चाळविल्याप्रमाणे हे रान आता जळजळू लागले
दगडाआड सरकणाऱ्या चंडोल पक्ष्याच्या उघड्या चोचीतून
आता कुठलाही स्वर प्रकट होणार नाही.
तरी पण नांगरटीमुळे कुशीवर वळून झोपलेल्या शेतांच्या पायथ्याशी
असलेले हे स्मशान मात्र कुणाची तरी वाट पहात असल्याप्रमाणे
सदैव जागेच राहिल.

२८

अनंतकाळ भटकून दमलेला घोगरा वारा
भर्रकन येऊन रानभेंडीच्या झाडात विसावला
आणि एका मागून एक विस्तारत जाणाऱ्या विक्राळ ढगांप्रमाणे
काजळी छाया भाराने गळाठलेले रान जड जड झाले.

२९

वस्तुतः गोरक्ष चिंचेतल्या चंद्राला हसण्यासारखे काहीच नव्हते
तरीही लीलीचे दात स्तनाला लागल्याप्रमाणे ती निर्भर शहारली
आणि अंगणात नाचून नष्ट झालेल्या कितीतरी छोट्या पावलांचे
दडलेले आवाज बुलबुल पक्ष्याच्या गायनासारख्या ह्या तरलतेतून मुसमुसत वर आले

३०

वर्षा आणि शीत ऋतुच्या संधिकालात उघड्या वाघड्या शेतांच्या
कल्पनेने दुखावलेला घोगरा वारा तुरीच्या रांगांमध्ये निपचित पडून असला
तरी एकट्याने विहिरीच्या कट्ट्यावर बसून शीळ घुमविण्यात मोठी मजा असते
तरीही माणसांनी आपल्याविषयी कोणत्या भावना बाळगल्या आहेत
ह्याची ह्या शीत ऋतुतील शेतांना पर्वा असणार नाही
कारण संधिप्रकाशाच्या लालसर आभाळनृत्यानंतर
भय गंभीर पसरत जाणारा अद्भुत काळोख त्यांनी अनंतकाळ पाहिला आहे.

अनुक्रमणिका

३१

आता सिसमच्या झाडांतून पसरलेली अबोल संध्याकाळ
रानाच्या अंतर्मनातील अंध एकाकीपणा होऊन रूप बदलते,
खुरटचा गवताच्या पुंजक्या पुंजक्यांतून रात्रीच्या वेळी निवांत प्रकाशणाऱ्या
कीटकांच्या धडपडीतून हिवाळा बाहेर पडत असतो
आणि शतकानुशतके भय ओढून निजणाऱ्या मानवजातीच्या इच्छाशक्तीवर
गूढ समारोपाच्या विपर्यस्त स्वप्नांचा भेदक काळोख वेताल झुलू लागतो.

शहर

पुरुषोत्तम बोरकर

हे शहर मला वडिलोपार्जित वारसाहक्कानं मिळालेय.
जन्म होताच काही दिवसांनी
त्यांनी मला रस्त्यावर आणून उभे केले.
मग मी बापाची जाहीरात झालो
आणि या शहराच्या रस्त्यावरून हिंडू लागलो.
रस्ते : कॉलेजेस् : हॉटेल्स : मंदिरे : वेश्यालये
आणि दारूच्या गुत्त्यासह तमाम सारे काही
माझ्या पायाखालून गेले--
तेव्हा कुठं मी क्वालिफाईड झाल्याचे त्यांनी जाहीर केले.
मग माझी अगोचर पावलं रस्ते पिंजून काढू लागली
अन् त्याचवेळी त्यांनी मला शहराची परंपरा पाळायचे
आवाहन केले.
मग मी वेश्याधर्म स्विकारला
आणि प्रत्येकाशी जुळवून घेऊ लागलो.
वाट सापडत नसेल तर पळवाट शोधू लागलो.
अचानक एक दिवस भिंतींवर पोस्टर्स लागलीत की,
प्रत्येक घरात असावा एक नरभक्षक वाघ
किंवा दर दोन बायांमागे असावी एक बांझोटी बाई !
तसाच मी लगबगीनं घरी आलो--
मोठ्या मुलाचा हात धरला
आणि त्याला वारसाहक्क बहाल करून रस्त्यावर
आणून उभा केला.
आता तो बापाची जाहीरात होऊन शहराच्या
रस्त्यांवरून हिंडतो आहे.

ट्रान्सप्लांट

नरेंद्र भगत

ट्रान्सप्लांट झाल्यासारखे हे शहर माझ्यांत रुजत नाहीय.
इथल्या रस्त्याने वाहतात माणसे विन्चेहऱ्यांची
संवेदनारहीत कातडी कफल्या चढवलेली
इथलें आभाळहि भासते जरा उंच
आणि सूर्य तन्हेवाईक
मी फिरतोय -- फिरतोय
रस्त्यारस्त्याने कासावीस
सर्व दारेखिडक्या बंद, दुपारच्या अटळ सूर्याखाली.
आणि मग
शहराला येणाऱ्या सर्व वाटा उध्वस्त होतात.
माझ्यासकट शहर उचलले जाते अधांतरी
गरगरत राहते भिंगासारखे
एका तटस्थ नजरेसमोर त्याचें स्फटिक अस्तित्व.
रात्रीं
दूरस्थ दिव्यांच्या बाधलेल्या पिवळ्या उजेडात
रस्त्याचा डांबरी अंधार अधिकच घुमसून उठतो.
आणि रस्ता निर्मनुष्य होताना माझीच सावली करीत येते
माझ्या पराभूत पावलांचा पिशाच्च पाठलाग
घराच्या उंबरठ्यापर्यंत.
ट्रान्सप्लांट झाल्यासारखा मी निखळतोय
हळू हळू या शहरांतून.

दुपार चांदणे

अंबादास देवळे

मी होतो तसाच आहे जसे असते वर आकाश
खळाळणारी गंगा तुझी तळ तिचा दिसतो भकास
दुर्योधनी तुझ्या नजरांचे घ्यावे तरी किती नजराणे
अश्वत्थाम्याचाच वंशज मी तेलात भिजते रोज गाणे.

मी दु:खे गिळली की गिळून घेतले दु:खांनी मला
पाहता पाहता सागरच किनाऱ्यावर रुसून गेला
श्रावणमासी बरसूनही म्हणून जातात ढग वांझोटे
सावली म्हणून सोवत केलीस सांग किती खरे किती खोटे ?

मी चुकविल्या वाटा तरी चकविले वाटांनी मला
भीष्माचे अंथरुण घेऊन येथे प्रवास सुरू केला
तेव्हापासून दुपारचांदणे सावली म्हणून सोबत घेतले
रुतले चाक काढायसाठी मातीवर गुडघे टेकले.

(एक वगनाट्य)

झाला तेथिच सारा घोटाळा

ज. रा. फणसळकर

सूत्रधार –

(गण) चरणधूली गणरायाची लावोयली भाली,
हाती लेखणी, मुखी लावणी सहजपणे आली,
आता देवा श्री गणराया रंगणी तूं यावे,
कौतुक करुनी लेकराला आशिर्वच द्यावे
अहो देवा गणराज, राखा भक्ताची लाज,
द्यावा शब्दाला साज
द्यावा सुराला बाज, सिद्धी न्यावे मनोकाज,
झडकरी....
अहो विघ्नहर्ता तुम्ही, वार्ता साऱ्या त्रिभुवनी,
म्हणोन लागलो भजनी
चिंता नाही कांही मनी..क्षणभरी .(जीकार)

वरं का कारभारनी, रशिकायची काय विच्छा हाय ते आम्हाला कथन कर.

नटी – मालक, रशिक म्हणतेत.. ठांसून झाली पायजे.

सोंगाड्या – च्या मारी.. अर् र् र्, आता वग म्हंजे काय दारू ठोसून भरलेली बंदुक हाय, दाव घोडा का ठोंः दाव घोडा का ठोंः काय परीच बोलणं.

सूत्र. – तूं गप् रे.

नटी – मालक, चारक जीव रमवाया जमलेत दाते लोक, त्यांना घटका दो घटका गंमत नको देयाला ?

सूत्र – ती देऊं ग. पर आखीन थोडं जास्त दिलं तर नाराज व्हतील व्हय. काय खरयं कां नाय मंडळी

दूजे नमन रसिकांच्या पायी,
तुमच्यावीन मुळी रंगत नाही,
कृपा करा अमुच्यावर आता
शतदा चरणी लवत्रीत माथा.
गोड करूनी घ्या सज्जन हो
बोल वाकुडे बोलुनी जाता.

तर कारभारनी, तू कांही चिंता करूं नगस. अग रशिक दाते आपलं मोप कौतुक करतील.

सोंगाड्या – ये खरं, पर उगीच का झटपट, बोलाकी पटपट.

सूत्र. – ऐका.

संसाराची शोभा लेकरूं,
शोभा लेकराची त्यात नको।
आर दोन पूरे, अन् तीन अती
पर चवथ्याची वात नको.. (जीकार)

सोंगाड्या – पर बाईला का बाप्याला ?

सूत्र. – तूं गप् रे.

नटी – पर मालक मोठेमोठे म्हणत्यांत संसार खोटा हाय. मंग कोठली हाय शोभा

सूत्र – ते ग्यानी म्हणत असतील ग. पर आपल्या वहीणाबाई काय म्हणत्यात– अरे संसार संसार कोणी खोटा म्हणू नये.

सों. – घा पोरायच्या बापाला कोनी खोटा म्हणूं नये.

सूत्र. – तूं गप् रे. का हाणू सोटा.

नटी – ये बी खरंच.

सों. – सोटा ?

नटी – तूं गप् रे. मालक संसार शंभर टक्के खरा हाय. खोटे आपणच हावो, आपलं कर्म आपली बुद्धी.

सों. – बाप्पा ! पाय नं कशी चुरुचुरु बोलते... नाय पर शायन्यावानी बोलते.

सूत्र. – आता आमच्याशी दिवस रात्र गांठ आहे. तेवढं शायनपन यायचंच.

सों. – शायनपन होतं म्हून तर रात दिवसा गांठ होता.

नटी – तूं चूप रे.

सों. – राह्यलं.

नटी – बरंय तुम्हीच शायने. आता बोला पटपट. नायतर रशीक पटापट उठून चालाया लागतीन.

सूत्र – हेंचा ! ते जातात व्हय. लय पिरम कर-त्यात आपल्यावर. खरं का नाय मंडळी. ऐका..

ऐका श्रोते समस्त सुलक्षणी,
एका वेडया जीवाची कहाणी,
अहो नार पाहिली नव तरणी,
लागला तिच्या पायी झुरणी
प्रहर प्रहर नीज नाही डोळा..

सों. – झाला तेथिच सारा घोटाळा.

नटी – तूं गप् रे. फुडचं सांगून रशिकायचा बेरंग नको करू.

सों. – राह्यलं !

सूत्र – तर बर का कारभारनी....
अहो दंडकारण्यी एक गांव !

सों. – गांवाचं नांव शाहीरा न ठावं.

सूत्र – गप् रे

सों. – राह्यलं.

सूत्र – त्या गावी होते एक योगीराज मूनी.
महातपस्वी, ख्याती साऱ्या जनी,
अष्टसिद्धी, चौदा विद्याचा धनी.
सारी दुनीया लागे त्याच्या भजनी

मंडळी योगीराज गांवचं मोठं भूपण होतं. वयानं वृद्ध..

सों – च्या मारी..वृद्ध ! ..म्हातारा म्हणा की.

सूत्र – तूं गप् रे.

सों. – राह्यलं.

सूत्र – तर योगीराज वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध

सों. – आन् चार चौघांत बोलू नये ...पर तसाही वृद्धच..

सूत्र – गप्परे.. तर योगीराजाचं वय कोणालाच माहीत नव्हतं अन् बरं का..

अहो योगीराजाचा पट्टशिष्य सद्गुणी
तरणाबांड देखणा चतुर सुभाषणी,
नांव सदानंद सार्थ करी जीवनी.
परी डसला तयाला मदन सर्प काळा..(जीकार)

सों. – झाला तेथिच सारा घोटाळा

(सूत्रधार मुनी महाराजांच्या भूमिकेत जातो. सोंगाडया एक शिष्य होतो.)

मुनी – दयानंद, आत्मानंद, अरं सदा दिसत नाही कुठं ?

आत्मा – गुर्देव नदीच्या काठी फिरतोय,

दया – कोठीतरी एक टक पाहत राहतोय,

आत्मा – आपल्याशीच बोलतोय,

दया– चोरून कविता लिवतोय,

मुनी – आर र र.. ही लक्षणं ठीक नाहीत. जा शोधा त्याला, आणा माझ्या म्होर.

सूत्र – मंडळी दयानंद, आत्मानंद सदाच्या शोधांत निघाले. जंगल भटकले, नदी धुंडाळली...

सदा – राधा, ए राधा, कसली गडबड लागली.. जरा थांब की थांब म्हणतो ना..

राधा – अहो वाट कशापायी आडविता ? कोनी बघन् की.. व्हा की बाजूला.

सदा – राधा, राधा, माझ्या जीवाचा कलेजा, आस गं काय, चल की जरा गोष्टी करू पिरतीच्या.

राधा – बाई ! बाई ! बाई ! कामं थांबतील व्हयं ? आई रागवेल.. व्हा म्हणते नं बाजूला.

सदा – राधा..

तुझ्या डोळयांत मखमल, कोमल नारी ग !
परी हृदयी बोचते नजर तुझी विखारी ग !

राधा – (हंसत) मग चटकन् व्हा बाजूला फुक्कट पेटाल.. ऐका ना.

(हंसत) नटखट धीट किती,
परी मला वाटे भीती
जाणा कांही जनरीति
वाट सोडा ना..
अशी कशी तुमची प्रीति
लाज वाटे मला चित्ती,
जगी होईल फजीती
बाई सांगू कुणा.
सख्या तुम्ही माझे चित्‌चोर हो !
करा मनी कांही विचार हो !
अहो, झाडाझुडपा असती डोळे !
सख्या तुम्हा का न कळे !
भीती पायी जीव पोळे
सख्या ऐका ना...

आत्मा – दयानंद, तो बघ सदा.

दया – सदा, सदा.. गुर्देव बोलावत्यात.

सदा – मला ?

दया – नाही, बाईला (हसतो)

राधा – मेल्या !

दया – आता व बया !

गुर्देव गुर्देव हा सापडला नदीकाठी

मुनी – नदी काठी ! नदीकाठी कशापायी गेला होतास.

आत्मा – शिकारीला. हरणीची शिकार...

सदा – मी नाय वा...मी आपलं ते...

दया – तुपलं हे.. गुर्देव..

मुनी – तूं गप्प रे. सदा माझ्या ध्यानांत आलं सारं. अ र र र..बेटा तुझ्यावर मायेचं भूत सवार झालं.

सदा – गुर्देव.

मुनी – सारं जाणतो मी. अंतर्ज्ञान हाय मला. पर सदा माझं ऐक...

स्त्रीयेचा ध्यास न बरवा कुणा !
खूण ही बांधी अपुल्या मना !
नारी रूपवती शत्रु रे ।
मोक्षाची ती रोधी गती रे,
नारी घातकी, नारी पातकी
नरकाचा पथ दावी, जाण की
बोध हा ठसवी हृदयी जुना..(स्त्रीयेचा..)

संसार माया आहे बेटा, मायाजळी गुंतु नकोस.
अरे ऐक..भरमांत पडून नारद मुनीचं काय झालं..
भगवंतानी मोह दूर केला बाबा.. ऐक.

सोळा सहस्र एकशे आठ नारी !
भगवान करती प्रीत सर्वांच्या वरी !
परी पट्टराणी रुक्मिनी भगवंताची !
काहिली जीवाची होई सत्यभामेची !

म्हणून भगवंतानी सत्यभामेच्या दारी पारिजात आणला, तिचा रुसवा दूर व्हावा म्हणून परंतु..

दारी लावीयला पारिजात भामेच्या !
तोपली कामिनी, पुरावा प्रीतीचा !
परी वृक्ष डोलतो जरी दारी भामेच्या,
तरी सडा फुलांचा अंगणी रुक्माईच्या !

मग सत्यभामा खूप संतापली. (सदा घोरतो) च्या मारी हा तर चक्क झोपला.

सूत्र – बरं का मंडळी गुर्देवांनी सदाला उपदेश केला संसार माया आहे मायाजळीं गुंतु नको.. पण तो चक्क घोरत होता. मग मात्र मुनीराज विचारांत पडले.

मुनीराज बोलती काय करूं भगवंता !
सावरूं कसा शिष्याला पडली चिंता !
हा व्यर्थ तप अन् फुकाचं माझं ज्ञानं !
जर शिष्याचे ह्या दूर न हो अज्ञान !
ह्या व्यर्थची माझ्या विद्या, माझ्या सिद्धी !
लाभली सदाला ना जर कधी सद्‌बुद्धी !

अन् मंडळी विचार करून करुन गुर्देवानं ठरवलं..

मायेचे मूनि जाल पसरिती,
सदा अडकता भंवऱ्यांत !
अहो सपन दाविती योग बलाने,
ऐकून घ्यावा वृत्तांत (जीकार..)
गुरु गुंफिती सपनाच्या माळा !

सों. – झाला तेथीच सारा घोटाळा.

(सनईचे सूर... मंगलाष्टके, सुलग्न, वरातीचे स्वर... अन् मग मीलन घटिका.. 'हम तुम एक कमरे मे बंद हैं' हे सूर देऊन)

सदा – राधा आपण खरे नशीबवान !

राधा – तुम्ही नव्हं, माझंच भाग्य थोर !

सदा – राधा असाच हात घालून नदी किनारी फिरूं खेळूं.

राधा – कायतरीच, लोक म्हणतील खूळ लागलंय.

सदा – लागायलाच पायजे.

राधा – काय बोलता ?

सदा – अग तुझ्या तोंडाकडे बघून येडं लागलं नाही तर तो खरोखरीचा येडा असन.

राधा – इश्श्य !

सदा – अ हा हा ! काय गोड लाजतेस ! राधा अशीच लाजत रहा.

राधा –

राजसा, सख्या दिलवरा, प्राणपांखरा,
झाले तुमची हो झाले तुमची,
केली सात पाऊली जोड उभ्या जन्माची !

सदा –

फुलराणी, सांगू काय कानी, जवळी घेऊनी,
गुपित ग मनीचे, गुपित ग मनीचे,
तुझे माझे होते नाते शत जन्माचे !

राधा –

लपवूं मी चकोरा कशी, दिलवरा खुषी,
पिशी मी झाले, पिशी मी झाले,
रे यौवनपुष्प हे चरणी तुझ्या वाहीयले.

सदा –

शशीवदने, काय मी वदने, मीच न जाने
हृदयीचे बोल, हृदयीचे बोल
तूं स्वर माझ्या गीताचा, तूंची ताल.

सूत्र – आन् मंडळी दोन तरुण जीवाची पिरती अशी बहरली, अशी मोहरली, का प्रत्यक्ष काळ, पुढं सरकायचा थांबला. पर प्रत्येक गोष्ट कुठे तरी थांबतेच, नाही का ? ऐका

अरे, पहिली नवाळी प्रीतीची
अरे पाहता पाहता ओसरली !
सदा राधा गुंगले संसारी,
जाण मायेची ना उरली (जीकार)
काल चक्र सरकते पुढे अन्
माया दावी नाना रंग !
वर्षावर्षाला हले पाळणा,
दोघे आपुल्यातच दंग (जीकार)

चिंगी, मंगी, सखू, ठकू,
येश्या, परभ्या, रंग्या, गंगू !
वाढत गेली माळ मुलांची
काय कथा तुम्हा सांगू (जीकार)

वरं का मंडळी, पाहता पाहता घराचं गोकुळ झालं, एका तोंडाची दहा तोंड झाली अन्

रंग सोनेरी संसाराचे सारेही विटले !
रूप भयानक माया दावी दोघांना अपुले !
गेला कावून सदानंद भोळा,

सों. – झाला तेथीच सारा घोटाळा.

. . . (काळ लोटल्याचे संगीत)

राधा – अहो नुसते काय वसलांत विडचा फुकीत. रंग्या येश्या तापानं फणफणताहेत. अहो कांही दवा-दारूची सोय करा.

सदा – दवा दारू ! दवादारूला पैका लागतो.

राधा – आन् जीव काय फुकटांत येतो ?

सदा – च्या मारी, काय कटकट हाय. तरी सांगो गघडीच्यानो थंडी वाऱ्यांत हिंडू फिरू नका.

राधा – ते राहू द्या. आधी वैद्यराजाकडे जावा.

सदा – जातो. फुक्कटची विलामत..

राधा – थांबा, अन् कावो तुम्हाले सुखाची झोप कशी लागते.

सदा – च्या मारी, आता का झालं ?

राधा – चिंगी लग्नाची झाली.

सदा – मला का दिसत नाही ! पण करायचं कसं ! पैका कुठून पैदा करायचा.

राधा – पैका, पैका, पैका.

सदा – पैक्याविगर कांही खरं नाही राधा.

राधा – हाय मालुम. पर स्वस्थ वसून जमलं होय ?

सदा – तूं आता अडगी राह्य..सकाळी घणघण, संध्याकाळी कटकट.. अर परभ्या, अय परभ्या.. (परभ्या येतो) कोठी गेला शेण खायला ?

परभ्या – गेलो होतो मसनांत.

सदा – नाही, जा. पर सांगून जात जा. राम राम काय पोरगं हाय. अरं आम्ही तुम्हाला जलम दिला..

परभ्या– बापा, उपकार केले. का अर्ज इनंत्या केल्या होत्या का घालाच जलमाला म्हून. च्या मारी फुकाची घण घण..

राधा – (भडकून) परभ्या !

परभ्या – खाली पिली ओरडूं नगस.

सूत्र – कटकट तंटे बखेडे. रोज तमाशा, हाणा-मारी, चिडाचीड. मंडळी घराची शांती गेली..

राधा – (रडत) अवं चिंगीचं आलं का ध्यानांत ?

सदा – का ! का झालं बापा ! का केलं तिनं ?

राधा – आता का कराचं ठेवलं ? तरी म्हणत होतो की पोरीचं येळच्या येळी उरकून घ्या. अहो अजून चार पोरी उजवायच्या हायेत माझ्या.

सदा – तुझ्या पोरी ! माझ्या कोनी नव्हत ! बोलाव चिंगीला. भवानीच्या यतकाडांत हाणतो एक. (चिंगीचं रडणं भेकणं) अ र र र पोरी आसं करण्या-पोरीस मेली का नाहीस ? तोंडाला काळं फासलंस. आता गांवांत कसं तोंड काढू. लोक काय म्हणतील ?

सूत्र – मंडळी चिंगीला दिवस गेले होते. घरची गरीबी. गांवच्या टग्या लोकांना नादाला लावलं होतं. वैताग वैताग ! पैका नाही, घरांत पोरवडा. एकाला एक आहे, एकाला एक नाही. दोघंवी हैराण झाले. ऐका—

संसाराला विटली राधा ।
धांव म्हणे रे श्री गोविंदा ।
धांव ग अंबे, धांव श्रीरामा ।
हात लावते आपुल्या कर्मा ।
राधा रडते धायी धायी,
दैवाला परी करुणा नाही.

अन् मंडळी सदाचे हाल ऐका,—

सदा –

कोन्या जलमीचं पाप फेडतो,
सांग सख्या श्रीहरी ।
यातना साहू कशा मी तरी !
दयावंत तुज म्हणती जन रे,
मजवरी करी बा कृपा,
धांव रे धांव जगन्नायका !

पर मंडळी भगवान मुका, वहिरा बनला होता. सदाचा टाहो त्याला ऐकूं येत नव्हता. तिरीमिरीनं सदा निघाला नदीच्या काठी..

सदा – आफू खाऊ की तलावांत जीव देऊं रे ! आररर् हे कसलं जीणं, असल्या जगण्यापरीस मरण काय वाईट. आता देतो झोकून नदीत, म्हणजे सुटलो.. नको बायको नको पोरवडा .. नको संसार ..

अश्विनीकुमार – अरं कोण तूं, अविचार करूं नगस.

सदा – (चिडून) तुम्ही कोन ? नसत्या पंचाइती कराचं कारण ? सालं, जगू बी देत नाहीत सुखानं, आन् मरूं बी नाही देत.

अ. कु. – आम्ही आश्विनीकुमार. देवांचे वैद्य. इथं वनांत भटकत होतो. काय दु:ख आहे तुझं .. सांग ..

सूत्र –

सदा ऐकवी त्या दोघांना अपुली कर्मकहानी ।
स्तिमित होऊनी हंसती दोघे,
बोलती मधुर स्वरानी ।

अ. कु. – आर् वेड्या, जीव देऊन काय होणार ? आपल्या कर्माची फळं आपणंच भोगायची असतात. दुसऱ्याला दोष देऊन काय फायदा ?

सदा– पण माही का चूक झाली ? देवाचं देणं ! पोरवडा वाढला.

अ. कु.– देवाचं देणं काय ? पण देवानं अक्कलबी दिली होती. ती कुठं इकली ? तिचा उपयोग नाही का करायचा ? बरं..झालं ते झालं. निराश नग होऊस.. परं आता दुसऱ्यांना अशी चूक नको करूं देऊं.

सदा – मी काय सांगणार लोकांना ?

सूत्र –

कुमार दोघे कानी सांगती लाखाची बात ।
दु:ख विसरला सदा, परतला अपुल्या गावांत ।
सावध होऊनी पुसूं लागला,डोळ्यातील आंसू ।
मूर्खपणा आठविता आपुला ये त्याला हांसू ।

(सदा हंसतच सपनातून जागा होतो.)

दयानंद – आ र र र... हंसायला काय झालं ? खूळ लागलं काय ?

(सदा हसतच राहतो)

आत्मा – गुर्देव गुर्देव.. बघा सदा कसं करतोय ?

मुनी – सदा, अरे सदा .. काय झालं ?

सदा – (हंसत) खोटं, सारं खोटं, एकदम खोटं.

मुनी – काय खोटं ?

सदा – संसार खोटा हाय हे खोटं. गुर्देव संसार खरा हाय.

मुनी – च्या मारी ! एवढा दृष्टांत दावला तरी ?

सदा – भगवंतानं नारदाला दावला तसा ! पर गुर्देव तुमच्या दृष्टांतात एक मिस्टिक राहून गेली.

मुनी – च्या मारी !

सदा – माझ्या दृष्टांतात अश्विनीकुमार आले होते. नारदाच्या कोठी आले होते ?

मुनी – अश्विनीकुमार !

सदा – होय गुर्देव ! देवाचे वैद्य. देवाच्या पीडा दूर करणारे.

मुनी – काय म्हणाले ते.

सदा – ते म्हणाले संसार खोटा नाही. आपली कर्मं खोटी. आपण शहाणपणा दावला तर संसार सुखाचा होतो, त्यांनी दिला मला सुखाचा मंतर, त्यांनी सांगीतलं सुखाचं तंतर.

मुनी – काय मंतर, काय तंतर ?

सदा – ऐका !

संसाराची शोभा लेकरूं,
शोभा लेकराची त्यांत नको.
अर दोन पुरे आन् तीन अती
पर चवथ्याची बात नको.

[*सूचना :– ह्या वगनाटयाचा प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी आवश्यक आहे.*
पत्ता :– प्रा. ज. रा. फणसळकर, ५१ शंकरनगर, नागपूर ४४००१०.]



स्वभावानंच प्रत्येकजण तिच्या व्यक्तिमत्वाला मानीत होता. गुजावक्काचं अस्तित्व प्रत्येकाला मातृछत्राप्रमाणे सावली करत होतं.

खानावळीत वाढायचं काम देखील गुजावक्काच करायची. तिच्या हातच्या पोळ्या नेहमीच लुसलुशीत, पातळ होत. त्यांना विशिष्ट अशी खरपूस चव असायची. एखाद्याला भाकरी खायची लहर येई. मग गुजावक्का त्याची फर्माइश पूर्ण करायला उठायची.

'आई, थापून नको वुवा...हातावरची कर. अन् थोडी शेकून हवी बरं का ..कडक आणिक छान लागत्ये...' आत गेलेल्या गुजावक्काला पानावरचे गिऱ्हाईक ओरडून सांगायचे. थोड्याच वेळात त्याला हवी तशी गरमागरम भाकरी नि तिखटमसाला घातलेले गोळावरण गुजावक्का त्याच्या पानात वाढायची. गिऱ्हाईक एकदम खुष होवून जायचे.

सणावाराला गोडधोड करायला गुजावक्का कधी चुकली नाही. एखादेवेळेस तर नोकरीधंद्याच्या व्यापात गुरफटलेल्या आम्हा गिऱ्हाइकांना 'आज सण आहे' हे गुजावक्काने ताटात पक्वान्न वाढल्यामुळेच समजायचे. 'आक्का, आज तू श्रीखंड वाढलंस म्हणून आजचा सण आहे हे समजलं बघ!' —कुणीतरी म्हणायचा.

'अरे, सण असो की नसो, तू पोटभर जेव अगोदर! कर पुढं वाटी, श्रीखंड वाढत्यें ..' अन् मग गुजावक्का आग्रहाने श्रीखंड खाऊ घालायची.

पंक्तीचे ते एक दोन तास कसे फारच सुंदर वाटायचे! कामामुळे भूक लागलेली, ताटात गुजावक्काच्या हातचे चविष्ट अन्न, तिचा तो प्रेमळ आग्रह, मित्रमंडळींच्या गप्पाटप्पा....-- वातावरणात एक प्रकारचा कौटुंबिक जिव्हाळा, घरगुती आपुलकीचा ओलावा निर्माण व्हायचा!

वडलांची बहीण म्हणून असेल कदाचित, पण गुजावक्काकडे माझा जरा जास्तच ओढा झाला होता. फुरसद असली की मी रात्री कधी कधी अकरा अकरा वाजेस्तोर् तिच्याशी गप्पा करीत बसायचा. त्या गप्पांच्या ओघातून तिच्याविषयी नाही म्हटलं तरी मला आता बरंचसं कळलं होतं. गुजावक्का माझ्या वडलांची दूरची आतेबहीण. लहानपणीच पोरकी झालेली ही पोर माझ्या आजोबांकडे लहानाची मोठी झाली. पुढे आजोबा गेले. गुजावक्काचा भार कुटुंबकर्ता या नात्याने आता माझ्या वडलांवर आला. ती त्यांच्यापेक्षा चार वर्षांने थोरलीच. वडलांनी मग एक स्थळ पाहून तिचं कार्य उरकवून दिलं. पण गुजावक्काचं दुर्दैव! ते गृहस्थ चांगले निघाले नाहीत. दारूपायी त्यांनी नांव, पैसा, इज्जत सारं काही बरबाद केलं. गुजावक्कालाही घराबाहेर काढलं. ती देखील तिथं विटलीच होती. तिनं चार घरी कामं करून थोडी माया जमवली अन् मग ही खाणावळ सुरू केली. वडलांना जेव्हा हे कळलं, तेव्हा त्यांनी तिला घरी चलण्याचा पुष्कळ आग्रह केला. पण गुजावक्कालाच ते पटलं नाही. इत:पर दुसऱ्यावर आपला भार न टाकण्याचा तिनं निग्रहच करून टाकला होता. तिचा तो निश्चय पाहून वडलांचाही नाईलाज झाला. त्यांनीही मग गुजावक्काची अधिक वास्तपुस्त केली नाही. गुजावक्का अशी एकाकी झाली..! पण, तिला एकाकी तरी कसं म्हणायचं? शून्यातून सृष्टी उभी करण्याची तिची जबर हिम्मत तिची साथीदार होती. एक विधवा, त्यातही असहाय्य असूनही तिची स्वत:ची कर्तबगारी, साहस वाखाणण्यालायक होती!

गप्पांच्या ओघातून गुजावक्काची ही जीवनकहाणी जेव्हा मला समजली, मला तिच्याविषयी अधिकच आपुलकी वाटू लागली. तिच्याबद्दलची मला वाटणारी अनुकंपा द्विगुणीत झाली.

कधी कधी गुजावक्का माझी थट्टा करायची, पण त्या थट्टेलाही जिव्हाळ्याचे मखमली अस्तर असायचे! एकदा तिने विचारले होते, 'अरे बाबा, इतक्या गोष्टी बोलतोस पण बायको कधी आणणार, लग्न केव्हा करणार ते सांगत नाहीस तो?'

तिच्या या प्रश्नाने मला हसू आले. पण, आत कुठंतरी मी सुखावलो. 'आक्का, नोकरीला लागून दोन वर्षं तर झालीयत्! एव्हढी काय घाई आहे सध्याच? अन् खरं सांगू? बायको आणली ना, तर माझे जेवायचे हाल होतील बघ! खरंच सांगतोय गुजावक्का, आजकालच्या मुलींना अजिबात स्वैंपाक करायला येत नाही! तुझा स्वैंपाक किती छान असतो...! बायको आणली ना, तर खाण्यापिण्याचं हे सुखही मिळायचं नाही मला...!' माझ्या या उत्तरावर गुजावक्काही खळाळून हसली. पण कधीकधी, गोष्टीगोष्टीत ती तिच्या माहितीतल्या, तिने पाहिलेल्या, तिला आवडलेल्या उपवर मुलींची माझ्यासमोर

उगाचच जंत्री वाचायची. तिचा असा लोभ पाहिला की माझा कंठ भरून यायचा. बिचारी....! कुणी मुलंबाळं नाही, तर मलाच मुलगा समजून माझ्या सुखासाठी धडपडत रहायची!

असं सगळं सुरळीत सुरू असतांनाच एकाएकी तो काळा दिवस उजाडला! मी सकाळी नेहमीप्रमाणं गुजाक्काकडे जेवायला गेलो. पण तिथे गिऱ्हाइकांची नेहमीची वर्दळ नव्हती. समोरच्या खोलीत दोघंतिघंच काय ते ओळखीचे गिऱ्हाइक बसले होते. त्यांचे उतरलेले चेहेरे पाहून मी प्रश्नार्थक नजरेने त्यांच्याकडे बघितले. तेव्हा एक जण बोलला, 'आक्कांना बरं नाहीय्! आत झोपल्यायत्. ताप चढलाय् त्यांना. पोटात फार दुखतं म्हणतात! डॉक्टरांना निरोप पाठवलाय् आम्ही. ते येण्याचीच वाट पाहात आहोत....'

गुजाक्काला ताप आला? मी आश्चर्यचकित झालो. गुजाक्काला बरं नाही असं आजपर्यंत कधी झालं नव्हतं. मी गोंधळून लगबगीने आत गेलो—गुजाक्का बिछान्यावर तळमळत होती. पोटावर हात ठेवून कण्हत होती, 'काय होतंय् गं आक्का?' मी सहानुभूतीने विचारले. माझा आवाज ऐकून गुजाक्कानं मान वर करून पाहिलं.

'काल रात्रीपासून पोट दुखतंय् रे राजा.... फार फार दुखतंय्...सहन नाही होत, आई गं ऽऽ' गुजाक्का परत कण्हायला लागली.

'आक्का, अगं मग रात्रीच मला कळवायचं तर खरं?' तिच्या पायथ्याकडे बसत मी म्हणालो.

'वाटलं होतं, बसेल जरा वेळानं! मधून मधून नेहमीच दुखायचं. पण आता, आता मात्र हे बसेलसं वाटत नाही रे..' गुजाक्काच्या डोळ्यात पाणी आलं. पुढे म्हणाली, 'आज तुम्हाला सर्वांना उपास घडतोय् रे माझ्यामुळं...आई गं ऽ... तू जेवलास का दुसरीकडं जावून? नसला तर जेवून ये बाबा दुसरीकडं जावून .. अं ऽऽ...' बोलण्यानेही तिला धाप लागत होती.

'आक्का, तू आता स्वस्थ पड बघू. उगाच आमची काळजी करू नकोस. आता डॉक्टर येतील, तेव्हा तुला काय होतंय् ते त्यांना नीट सांग. .'—मी म्हणालो.

'डॉक्टर? .हं...' क्षीण हंसत गुजाक्का म्हणाली, 'कशाला बोलावलंत रे डॉक्टरांना?... आता काही खरं नाही माझं म्हातारीचं...'

'असं काय बोलत्येस आक्का? अगं, बरं वाटेल तुला!' मी तिच्या तोंडावर हात ठेवीत म्हणालो.

गुजाक्काच्या डोळ्यात पाणी जमा झाले होते; उदास नजर साऱ्या खोलीभर फिरत होती. एकाएकी ती म्हणाली,

'ती समोर खुंटीवर पिशवी अडकवली आहे ना, ती आणतोस का जरा?...' मी तिला पिशवी काढून दिली. त्यात बरेच कागदपत्रं होते. त्यातील एक पाकीट माझ्याजवळ देत ती म्हणाली, 'हे एवढे पाकीट तुझ्याजवळ राहू दे... त्यात महत्त्वाचे कागद आहेत. मी मागेन तेव्हा दे...' मी तिने दिलेले ते पाकीट खिशात ठेवलं.

पाच एक मिनटं गेली असतील तोच गुजाक्कानं मळमळत असल्याचं सांगितलं. तिच्या शरीराला विलक्षण घाम येवू लागला. मी तिच्यासमोर बाडगे आणून ठेवले. तिला लागोपाठ दोन उलट्या झाल्या... रक्ताच्या...! अन् त्यानंतर तिची शुद्धच हरपली!!

इतक्यात् डॉक्टर आले. त्यांनी तशाच स्थितीत तिला तपासलं. उलटी पाहिली. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले गंभीर भाव पाहून आम्ही चरकून गेलो.

'केस इज सिरीयस्...ह्यांना पोटाचा कॅन्सर असला पाहिजे...पूर्वी कधी तपासणी केली होती का?'—डॉ. नी विचारले.

आम्ही नकारार्थी मान हलवली. 'ठीकाय्..पण तुम्ही आता यांना तावडतोब हॉस्पिटलात ॲड्मिट करा... घरी अजीबात ठेऊ नका. मी ॲम्बुलन्स पाठवतो...' असं सांगून डॉ. निघून गेले. ॲम्बुलन्स येइपर्यंतचा पाच दहा मिनटाचा काळ आम्हाला एखाद्या युगासारखा वाटला.

गुजाक्काला दवाखान्यात भरती करण्यात आलं, तिथं तिला कॅन्सर असल्याचं सिद्ध झालं. गुजाक्कानं आपलं दुखणं हसण्यावरी नेलं होतं. आपली व्यथा कधीच कुणाला तिनं सांगितली नाही. पण या बाबतीतली तिची सहनशीलता तिच्याच अंगावर उलटली होती. तो कॅन्सर होता! छुप्या शत्रुप्रमाणं तिच्या पोटात तो पसरत गेला होता..!!

गुजाक्काला अखेरपर्यंन्त शुद्ध आली नाही. बेशुद्धावस्थेत ती सतत दोन दिवस मृत्यूशी झुंज देत होती. रजेचा अर्ज टाकून मी दवाखान्यातच बसलो होतो. तिची गंभीर स्थिती, दवाखान्यातील औषधांचे उग्र दर्प.. सारं वातावरण जड होवून डोक्यावर पसरलं होतं..!

दोन दिवस जाऊनही जेव्हा गुजाक्का शुद्धीवर आली नाही तेव्हा आता आशा करण्यात अर्थ नाही असं डॉक्टरांनी स्पष्टच सांगून टाकलं आम्हालाही वाटू लागलं की आता जेवढ्या लवकर देव तिला नेईल तेवढे तिचे क्लेष कमी होतील !

अखेरीस ती वेळ आली. सकाळपासून बारीक पाऊस पडत होता. उन्हही पडले होते. उनपावसाच्या त्या खेळकर सकाळी ठीक सव्वाआठ वाजता गुजाक्काची प्राणज्योत मालवली ! ऑक्सीजनच्या बाटलीतले बुडबुडे थांबले. गुजाक्काची मान उशीवरून खाली कलंडली..! अेव्हरीथींग वॉज ओव्हर..!!

× × ×

गुजाक्काला पोचवून घरी आलो. विलक्षण शीण आल्यानं सारं अंग ठणकत होतं. तरीपण टेबलाशी बसलो. गुजाक्का गेल्याबद्दल वडलांना कळवण्याकरता कार्ड लिहू लागलो. इतक्यात मला आठवण झाली.. गुजाक्कानं दिलेल्या त्या पाकीटाची ! सर्व गडबडीत ते पाकीट माझ्याजवळच राहून गेलं होतं. पॅन्टच्या खिशातून मी ते पाकीट काढलं. क्षणभर विचारात पडलो. काय असेल पाकीटात ? फोडावं की नाही ? गुजाक्कानं त्यात महत्वाचे कागदं असल्याचं सांगितलं होतं. ते फोडणं भागच होतं.

पाकीट फोडून आतल्या कागदावरून मी नजर फिरवली. ते गुजाक्काचं मृत्युपत्र होतं ! आणि... आणि त्यात तिनं कष्टानं मिळविलेले दहा हजार रुपये माझ्या नावानं 'विल्' केलेले होते ...!

ते वाचून माझा कंठ दाटून आला. मी एकटाच मोठमोठ्यानं हुंदके देत रडू लागलो... मला उगं करायला, माझ्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरवायला आता गुजाक्का येणार नव्हती..! कधीच येणार नव्हती...!!

नांच्या जिव्हाग्री 'नथ्थू-हिरा' हे नाव रूढ होऊन बसले !

वेगवेगळ्या कलाप्रांगणात नैपुण्य संपादन केलेल्या आमच्या गावात ज्या कांही चार दोन अभिमानाच्या जागा आहेत, त्यापैकी 'नथ्थू-हिरा' हीहि एक.

साधारणत: हलकंफुलकं किंवा सुगम संगीत म्हणून आपण ज्याला संबोधतो, त्या संगीताकडे तज्ञांची बघण्याची दृष्टी जरा वेगळी असते. हे अभिजात संगीत नाही; म्हणून त्याकडे उपेक्षित, तिरस्करणीय दृष्टीने पाहण्यात येते; एवंच संगीत, साहित्य, चित्र, शिल्पादि सर्वच विदग्ध कलाक्षेत्रात आत्ममान ठेवून कला– घरंदाज म्हणून मिरविणारी कला या 'बाजारू कले'पासून पृथक् राहूं इच्छित असते. शास्त्रीय संगीताच्या दुनियेत या घरंदाज गायकीला अनन्यसाधारण महत्व असल्याचे दिसून येते. बनारस, ग्वाल्हेर, इंदौर, म्हैसूर, बडोदे या संस्थानांतील निरनिराळी घराणी 'हिंदुस्थानी पद्धती'च्या संगीतात 'घराण्या'चा लौकीक सांभाळून आहेत. अब्दुल करीमखाँ, भास्करबुवा बखले, अल्लादियाँखा इ. संगीताच्या तपोमहर्षीनी भारतीय संगीताची शान वाढविली, मान उंचावविली. मोगलकाळातही तानसेन व बैजूसारख्या संगीतसम्राटांचा वारसा आम्हाला लाभला, याचा कोणत्या भारतीय मनास अभिमान वाटणार नाही ?

शांतारामबापूंच्या (व्ही. शांताराम) 'झनक झनक पायल बाजे' या संगीतनृत्यप्रधान चित्रपटाने अखिल भारतवर्षापुढे एक उत्कृष्ट अजोड कथकलीचे नर्तक म्हणून 'गोपीकृष्ण' हे नर्तक प्रसिद्धीच्या शिखरास पोहोचले. त्यांच्या नृत्यसाधनेबाबत आजच्या पिढीचे तरी सर्वोत्कृष्टतेच्या संदर्भात दुमत होण्याचे कारण नाही. पं. रविशंकर व विलायतखाँची सतार, मा. अजमिरी यांची गिटार, पन्नालाल घोषांचे बासरीवादन, आणि बिलावल रागावर एकमेव प्रभुत्व असलेल्या बिस्मील्लाखाँचे सनईवादन या वाद्यकलेतील अत्युच्च ठरलेल्या आजच्या युगाच्या नि:शंक जागा ! परंतु जाणकारांनी या जागासुद्धा अधुनमधून 'विवाद्य' आहेत, असे सूचित करून एकप्रकारे त्यांच्याकडे तिरकस नजरेने पाहिले आहे. पद्मभूषण ना. सि. फडके 'नादलुब्धां'च्या आठवणी सांगतांना 'गोपीकृष्णा'विषयी असे उद्गार काढतात – "'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटामुळे प्रसिद्ध पावलेले गोपीकृष्ण यांच्या लोकप्रिय झालेल्या नृत्यांच्या कार्यक्रमात जो नृत्यप्रकार पाहावयास मिळतो त्याला कथकलि म्हणायचं की कथ्थक म्हणायचं, की मणिपुरी म्हणायचं, को या सर्व प्रकारांचे (धेडगुजरी ?) मिश्रण म्हणायचं, याबद्दल जाणत्यांचा काय निर्णय असेल तो असो. मला स्वत:ला दिसतं एवढंच, की गोपीकृष्णांच्या नृत्यात धांगड धिंग्याचा आणि कसरतीचा भाग फार आहे. सामान्य अनभिज्ञ लोकांवर एकदम छाप टाकण्यासाठी त्याची गरज कदाचित असेलही. प्रस्तुत मुद्दा इतकाच की, तुंगा आणि मेनका यांचं जे नृत्य मला बघायला मिळालं ते फार वेगळं होतं आणि त्या काळांत (१९२५–२६) उच्च दर्जाचं खरं कथ्थक नृत्य तेच समजण्यात येत असे."

पं. रविशंकर आणि विलायतखाँ हे आजच्या जमान्यातले फार मोठे सतारिये आहेत, ही गोष्ट आप्पासाहेबांनाही मान्य आहे. परंतु घडाभर तेल संपलं तरी 'नमन' दळीत बसण्याचा 'त्यांचा' उपक्रम अप्पासाहेबांना मान्य नाही. त्या पार्श्वावर बरकतउल्लाखाँ या त्यांच्या जमान्यातील सतारियाचे मोठे आकर्षक चित्र अप्पासाहेबांनी 'हल्लीच्या सतारीयांचं नमन' सांगतांना उभं केलं आहे. आप्पासाहेब सांगतात– "बरकतउल्लांच्या वाजविण्याची जी तऱ्हा मला आठवते ती 'अशी' खचित नव्हती. जी रागिणी वाजवायची तिची छाया निर्माण करण्यासाठी, आणि हात तापविण्यासाठी लयीतलं 'जोडकाम' ते करीत, गततोडे वाजवित, वाढलेल्या लयीत 'झाले'हि वाजवित. पण किती ? फार तर वीस मिनीट !"

काशीचे अल्लाबंदेखाँ व वाकरूद्दिनखाँ या बंधुद्वयाचं गायन म्हणजे त्या काळी विद्वत्ता आणि कलानैपुण्य यांची परमावधी समजली जात असे. त्यांनी गाईलेला ध्रूपदधमार किती श्रुतिमनोहर असे याचे खुमासदार वर्णन करतांना अप्पासाहेबांनी म्हटलं आहे– "ध्रूपद धमाराचं आलापी गायन कमालीचं श्रुतिमनोहर होतं. आजच्या पिढीतल्या श्रोत्यांनी गायनाची ही तऱ्हा कधी ऐकलेली नाही. दुर्दैवी बिचारे !"

गोपीकृष्णांच्या संदर्भात पद्मभूषण ना. सि. फडके यांनी ज्या 'सामान्य अनभिज्ञ अभिरुची'चा मुद्दा सवंग लोकप्रियतेचा निकष म्हणून उपस्थित केला, त्याचा परामर्ष घ्यावयाचा इथे उद्देश नाही. शिवाय शुद्ध वा सवंग कलायुगात जन्म होणं हे कुणाच्याही हातात

नसतं. प्रत्येक पिढीचा आपल्यापरी साहित्यकलादि क्षेत्रातील सरसतेबाबत दावा असतो. मग प्रश्न असा उपस्थित होतो की जर शास्त्रीय म्हणून संबोधल्या जाणाऱ्या या घरंदाज कलांच्या प्रभावळीत अन्य ललित कला प्रकारांना कांहीच अर्थ नाही तर त्यांच्या निर्मितीचे प्रयोजन काय ? मला वाटतं 'मुळीच नाही' हे या प्रश्नाचे उत्तर नव्हे. हलक्या–फुलक्या कलेकडे तुच्छतेने पाहिल्यामुळे एक तर टोकाला जाऊन अतिशयोक्त विधानांनी अशा कलेवर अन्याय होतो, हे आपल्या ध्यानातच येत नाही. दुसरं, सर्वसामान्यांच्या अभिरुचीला डावलून निव्वळ शास्त्रीय संगीताच्या रेडीओवर तास् न तास बैठकी होत राहिल्या, तर आजच्या धावपळीच्या काळात लोक रेडीओ ऐकण्याऐवजी कानातच बोटे घालून बसण्याचा अधिक संभव आहे. नाही कां ? या तिरकस दृष्टीमुळे आणखी एक फार मोठा धोका संभवतो. कलाक्षेत्रातही एक प्रकारची वर्णव्यवस्था या उपेक्षाबुद्धीतूनच जन्मास येते. उच्च शास्त्रीय संगीत, व हलकेफुलके (Light) वा सुगम संगीत, दर्जेदार ललित साहित्य, आणि थर्ड रेट अललित लिखाण अशा जातकुळी सर्वच कलाप्रकारात निर्माण होतात, त्या निम्न कलांकडे पाहण्याच्या अस्पृष्ट दृष्टीतूनच. कलेच्या दैविक विश्वात याच भावनेतून पंथ आणि नाना प्रवृत्तींचा उगम होतो. कलाक्षेत्रात स्थिर स्वरूपाची वर्णव्यवस्था निर्माण होवून तिचे श्रेष्ठ–कनिष्ठ असे वर्गीकरण अपरिहार्य होते.

उत्पादनांची साधने ज्या मूठभर लोकांच्या हातात असतात, आणि त्यामुळं जी समाजव्यवस्था निर्माण होते, त्याचीच प्रतिआवृत्ति मग कलाक्षेत्रातही दृग्गोच्चर होवू लागते. संगीतातील या भांडवलशाही व्यवस्थेत बहुजनसमाजाच्या अभिरुचीला जर वाव नसेल, तर आजच्या समाजवादी विचारसरणीच्या युगात या उच्च स्तरीय शास्त्रीय संगीतालाही काहीच अर्थ राहणार नाही – मग ती कला कुठल्याही मोठ्या 'घराण्या'चा वारसा कां सांगत असेना – किंवा गायक कितीही महान् कां असेना ! कारण आजच्या समाजरचनेत सर्वसामान्य माणसाचा ज्यावेळी 'केन्द्रबिन्दू' म्हणून सहानुभूतीपूर्वक विचार केल्या जातो, त्या या युगात बहुजनसमाजाच्या आशाआकांक्षाप्रमाणेच त्यांच्या वैयक्तिक अभिरुचीचा विचारही डोळ्यांपुढे ठेवणे क्रमप्राप्त नाही काय ? आणि हे तथाकथित उच्च शास्त्रीय संगीत कितीही दर्जेदार असले, तरी त्याला सर्वसामान्य माणसाची दाद मिळू शकणार नाही, याचे कारण असे की ते सर्वसामान्यासाठी मुळी नसतेच. काव्यक्षेत्रात ज्याप्रमाणे काही कविता 'मॉब'साठी असतात व काही समीक्षकांसाठी व अन्य कवींसाठीच असतात, तसेच काहीसे इथे घडतांना आढळते.

प्रत्येक युगाला आपलं असं एक वैशिष्ट्य असतं. नाही म्हटलं तरी कलेच्या क्षेत्रात थोडीफार भर पडत असते. सृजनाच्या नव्या दिशा उजळतांना दिसतात. संशोधनाची प्रक्रियाही अविरत चाललेली असते. अर्थात संगीताचं क्षेत्रही याला अपवाद नसणार. अलीकडे श्यामला भावे नामक गायिका आपल्या गायकीत चित्रराग नामक रागाचा जो प्रयोग करीत आहे, राजपूत शैलीतून चित्र नि संगीत या दोन कलांचा Miniature painting च्या साहाय्याने मेळ घालण्याचा जो अनोखा समर्थ प्रयत्न करीत आहे, ती प्रतिभेच्या जीवंतपणाची खूण नाही कां ? शिवाय आप्पासाहेबांच्या युगाने रूढ रागरागीणावर प्रभुत्व मिळविले असले, तरी आजची संशोधनप्रचुरता त्या काळच्या गायक गायिकात, नृत्यसाधकात, वाद्यांच्या हजारो लकबी काढून दरवेळी नवनव्या मुरावटी निर्माण करण्यात आजच्या इतका 'काल' संपन्न होता का हा प्रश्न शिल्लक राहतोच ना ? "कैसे आऊं जमुनाके तीर" ही स्वरसम्राज्ञी लतेच्या आवाजातली 'देवता' चित्रपटातली कालची भैरवी, नि 'हर जनम यूं मिलते रहेंगे । प्यार अपना रहे सदा जवां । हम सुख–दुख मिलके कहेंगे – वादा करले बालमा तेरे बिन मैं न रहूं' हे 'हाथ की सफाई' या चित्रपटातील म. रफी व लताने गाईलेलं, जे दक्षिण भारतीय संगीतपद्धतीतील 'वसंत मुखाडीया' रागावर बांधलेलं आहे, ज्याचे कोमल, वृषभ, निषाद व धैवत हे स्वर भैरवस्वर, आणि उर्वरीत भैरवीचे स्वर आहेत ते आजच्या जमान्यातील 'हिट गीत' (आणि जे वरातीचेही लाजवाब संगीत सुद्धा) आहे ते एवढे लोकप्रिय कां ? 'मुरलीया काहे गुमान करे' हे सूरदासांचे भजन आपल्या अभिजात आवाजाने लोकप्रिय करून दाखविणारे संगीतदिग्दर्शक, गायक मानस मुखर्जी, किंवा मानस मुखर्जींच्याच संगीत निर्देशनाखाली मुखर्जीवरही तानाशाही करून जाणारे चेतन, सतीश भूतानी हे गायक आजच्या जमान्यात झपाट्याने लोकप्रियतेच्या शिखरावर चढत

असल्याची चिन्हे दिसूं लागली आहेत. विशेषत: आनंद बक्षी आणि लता – आशा – मुकेश – मन्नादा, व लक्ष्मी-प्यारे किंवा मदनमोहन, इंदिवर आणिही पुन्हा हाच गानवृंद एकत्र आला की सरासरी जी निर्मिती होते– मग ते द्वंद्वगीत असो, निखळ विरहगीत असो, किंवा सूर – कबीर – मीरेचे एखादे भजन असो. ही अपूर्व रचना आपल्या श्रृती मधुर चालीने, हृदयाची पाकळी न पाकळी उलगडणाऱ्या अर्थसंहितेने हां हां म्हणता अल्पावधीतच गगनस्पर्शी उंची गाठून जाते. वरातीचे संगीत वर्षानुवर्षे या गीतांचा नादमधुर आविष्कार करून रसिकवृंदाला पुन्हाप्रत्ययाचा पण कधीही जुना न होणारा आनंद प्राप्त करून देत असते. मराठी गायकात पं. भीमसेन जोशी, सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर (या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस कां ?), जितेन्द्र अभिषेकी (सर्वात्मका सर्वेश्वरा !) व यासम अनेक नावांनी शास्त्रीय संगीताबरोबरच सुगम संगीताचा दर्जा वाढविला असे आज निःशंकपणे म्हणता येते. लताबाईंच्या गीतांना ज्या ज्या वेळी हृदयनाथ मंगेशकर संगीत देतात, त्यावेळी निश्चीत समजावे की एक नितांतसुंदर, वैशिष्टचपूर्ण असे प्रतिभेचे अपत्य जन्म घेते आहे !

जुन्या आणि नव्या जमान्याच्या सीमारेषांवर उभं राहून आपल्या अस्सल गायकीची, ठेवणीतल्या चिजांची आम रसिकवृंदास ओळख करून देणाऱ्या अमीरबाई कर्नाटकी, बेगम अख्तर, मा. कृष्णराव, दिनानाथ मंगेशकर यांच्या शास्त्रीय गायनाबरोबरच हलक्या–फुलक्या, किंवा सुगम संगीताचा दर्जा वाढविणाऱ्या लता मंगेशकर (पैल तोगे काऊ काकताहे), सुमन हेमाडी (कल्याणपूरकर– रिमझिम झरती श्रावणधारा); रामदास कामत, विठ्ठल शिंदे, म. रफी (शोधिसी मानवा, मंदिरी राऊळी), निर्मला नामजोशी (भज मन गोविंद, मनोहरनाथ महाराज व 'माझी उदास गीते तू ऐकतोस कां रे ?)...सुगम गायक–गायिकांची ही यादी सोदाहरण द्यायचे झाले तर कितीतरी पृष्ठे भरून जातील.

अखेर सर्वसामान्यांच्या अभिरुचीचे प्रतिक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने गीत – संगीत – काव्य यांच्या कमालीच्या लोकाभिमुखतेचे जनमानसावर नोंदलेले एक कायम वैशिष्टच म्हणून स्वतंत्रपणे निर्देशिता येईल.

हलक्या–फुलक्या गीतांचे प्रयोजन आता मला वाटते बऱ्हंशी स्पष्ट झालेच आहे. संगीताच्या प्रांतातील तो एक लालित्यपूर्ण अनुभव म्हणून त्याची गरज सर्वस्तरीय आहे. संगीताच्या फुलबागेत थयथयणाऱ्या रंगीन कारंजाचे भावतुषार म्हणजे ही हलकीफुलकी गीते. सर्वसामान्य माणूस अंत:स्फूर्तीने ज्यांना साद देतो, जी बहुजनसमाजाची व केवळ बहुजनसमाजासाठीच असतात तीच ही सुगम गीते. आपलाच भूतकाळ आपल्याभोवती साकारवून एक तृप्त, थबथबता पण रक्तात थिजलेला अनुभव वितळवून, एका वेगळचा प्रसन्न आणि मनजोग वातावरणात मानवी मनाला नेऊन सोडण्याची किमया जर कुठल्या संगीतात आहे असे मला कुणी विचारले तर मी खुशाल या 'वरातीच्या संगीता'कडे बोट दाखविन. परिणामाच्या दृष्टीने ज्वालाग्राही म्हणून या संगीताचा उल्लेख करता येईल. संगीतशौकीनांच्या भावविश्वात सौंदर्याची चिरशिल्पे खोदणारा हा नादानुभव म्हणूनच मला त्याज्य किंवा तिरस्करणीय वाटत नाही.

आणि हे नादानुभव सर्वसामान्यच कां, तज्ञांनासुद्धा नादलुब्ध बनवित नसतीलच असे कसे म्हणावे ?



ह्या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मुंबईच्या सौ. मालिनी पंडित यांची 'योगसाधना' ही कथा श्रोतृवृंदांना अतिशय आवडली. मातृसेवा संघाचे श्री. पुराणिक यांनीहि उत्स्फूर्तपणे एक कथा कथन केली. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सौ. शकुंतला खोत यांनी केले.

३. नैमित्तिक कार्यक्रम :

३.१. दि. १ आगस्टला लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

३.२. दि. २ आगस्टला तुलसी जयंती निमित्त संत तुलसीदासांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

३.३. दि. १३ आगस्टला आचार्य अत्रे यांच्या जन्मदिवसानिमित्त सकाळी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे त्यांच्या छायाचित्राला विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आला.

३.४. १५ आगस्टला स्वातंत्र्य दिनानिमित्त संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' ह्यांच्या हस्ते संघमंदिराच्या शिखरावर नवीन उभारलेल्या ध्वजस्तंभावर ध्वजारोहण करण्यात आले.

३.५. ह्या वर्षाचा कविवर्य 'बी' (कै. ना. मु. गुप्ते) यांचा स्मृतिदिन नित्याप्रमाणे ३० आगस्टला पाळण्यात आला. डॉ. सौ. आशा सावदेकर यांचे 'बीं'ची काव्यदृष्टी' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ सौ. शकुंतला खोत होत्या.

४. चित्रकला समिती :

वि. सा. संघाच्या सहकार्याने दि. २२ आगस्टला सुप्रसिद्ध चित्रकार श्री. आठवले यांच्या स्कूल ऑफ आर्ट आणि आठवले आर्ट अकादमी या संस्थांतील विद्यार्थ्यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

५. सन्माननीयांच्या भेटी :

दि. १७ जुलैला मनोहर साप्ताहिकाचे संपादक श्री. दत्ता सराफ यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्या दिवशीच्या 'काव्यवर्षा' या साहित्यिक कार्यक्रमाच्या आरंभी श्री. दत्ता सराफ ह्यांचा संघातर्फे सत्कार करण्यात आला.

६. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय :

६.१. श्री. पु. य. उपाख्य बाबासाहेब देशपांडे यांनी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला देणगी म्हणून त्यांच्या पुस्तक संग्रहातील ३३३ ग्रंथ दिले.

६.२. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडून जुनी संस्कृत विषयक २४ पुस्तके ग्रंथालयाला देणगीदाखल मिळाले. श्री. पु. य. उपाख्य बाबासाहेब देशपांडे व संचालक ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य यांचा वि. सा. संघ या देणगीबद्दल अत्यंत ऋणी आहे.

७. वि. स. खांडेकर यांना श्रद्धांजली :

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांच्या दुःखद निधनाचे वृत्त संघ कार्यालयात कळताच तात्काळ डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा आयोजित कर-

ण्यात आली. प्रा. माणिकराव वंतुले, सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी या शोक-सभेत आदरांजली अर्पण केली. त्यानंतर प्रकट शोकसभा दि. ४–९–७६ ला सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहात संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' ह्यांच्या अध्यक्षते-खाली भरली. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. सुनील सुभेदार, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. या. मु. पाठक, श्री. शंकरराव डहाळे व श्रीमती केणी यांची या प्रसंगी भाषणे झाली. सभेच्या शेवटी शोकप्रस्ताव वाचून दाखविण्यात आला आणि श्रोतृवृंदांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून आपली शोकसंवेदना व्यक्त केली.

८. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा :

ही स्पर्धा वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे आणि वि. सा. संघ या संस्यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७, १८ व १९ सप्टेंबरला धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय 'भारतीय चित्रपटसृष्टीची वाढ अनिष्ट दिशेने होत आहे' हा होता. ह्या स्पर्धेत १८ महाविद्यालयाच्या ३६ स्पर्धक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ह्या स्पर्धेचे उद्घाटन संघाचे उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख यांनी केले. फिरती रौप्य ढाल नागपूरच्या विश्वेश्वरय्या रीजनल इंजिनिअरिंग महाविद्यालयाने मिळविली. कु. प्रतिभा गौरिहर, विज्ञाणी महिला महाविद्यालय यांना प्रथम क्रमांकाचे रोख रु. १०० आणि श्री. सुनील शिरसीकर, विश्वेश्व-रय्या रीजनल इंजिनिअरिंग महाविद्यालय यांना द्वितीय क्रमांकाचे रोख रु. ७५ अशी वैय-क्तिक पारितोषिके, शिवाय सर्वश्री एस. पी. हयातनगरकर, एस. ए. काशीकर, डी. बी. साठे, आर. पी. पाठक, केशव धावडे, कु. मंगला शेकदार व कु श्यामला एलकुंचवार यांना प्रशस्ती पत्रे मिळाल्याचे घोषित करण्यात आले. ह्यांचे वितरण दि. १९ सप्टेंबरला सायं-काळी ६.३० वाजता न्या. मू. देशपांडे ह्यांचे हस्ते करण्यात आले. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे आणि सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी ह्या स्पर्धेची माहिती दिली आणि आभार मानले. ह्या वाद स्पर्धेचे संचालन श्री. मधुकर राजे यांनी केले होते.

९. शाखा सभा वृत्त :

९.१. यवतमाळ शाखा सभा.

दि. २१–७–७६ ला औरंगाबादचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. भगवंतराव देशमुख ह्यांनी संघशाखेस भेट दिली.

दि. ३०–७–७६ ला झालेल्या साधारण सभेत ७६–७७ सालासाठी कार्यकारिणी निवडून आली. ती अशी :– अध्यक्ष – प्रा. गोविंदराव देशपांडे, उपाध्यक्ष.– सौ. संजीवनी देशमुख, कार्यवाह – श्री उमेश पत्की, सहकार्यवाह श्री. रमेश तारगावकर, श्री. नीळकृष्ण देशपांडे (पदसिद्ध) आणि इतर १६ सदस्य.

दि. ८ आगस्टला 'श्री वत्स प्रकाशन वणी' ह्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या प्राचार्य राम शेवाळकर यांच्या 'अग्निमित्र', 'त्रिदल' व 'अमृतझरी' ह्या तीन पुस्तकांचा प्रका-शन समारंभ डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. दे. य. गोहोकर होते. या प्रसंगी प्रा. नरहर कुरुंदकर आणि श्री. व. ना. एकबोटे यांची भाषणे झाली.

दि. ४–९–७६ शाखेतर्फे महिला समाजाच्या सभागृहात स्वर्गीय भाऊसाहेब खांडेकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

९.२. वणी शाखा सभा.

दि. २० जुलैला प्रा. भगवंतराव देशमुख, औरंगाबाद ह्यांचे गणेश व्याख्यान मालेतले तिसरे व्याख्यान 'आधी कळस मग पाया' या विषयावर झाले. त्याचवेळी श्री. ल. स.

राजगडकर धोंसा ह्यांच्या 'हितगुज' या पुस्तकाचे प्रा. देशमुख ह्यांच्या हस्ते प्रकाशन झाले. दि. १–८–७६ ला श्री. अरविंद गजेंद्रगडकर संगीत निर्देशक, आकाशवाणी नागपूर, ह्यांच्या हस्ते वणीतील प्रसिद्ध गीतकार गौतम सुत्रावे ह्यांच्या 'गीतसुधा' या गीतसंग्रहाचे प्रकाशन झाले.

दि. ८–८–७६ ला प्राचार्य राम शेवाळकर ह्यांचा, यवतमाळ येथील पुस्तक प्रकाशन समारंभात कुलगुरु डॉ. दे. य. गोहोकर ह्यांचे हस्ते शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला.

दि. १८–८–७६ ला लोकनायक अणे यांच्या जयंत्युत्सवात श्री. यदुनाथ थत्ते, पुणे ह्यांचे 'साने गुरुजींचे साहित्य' या विषयावर भाषण झाले.

दि. ७–९–७६ ला श्री. वि. स. खांडेकर ह्यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा आयोजित करण्यात आली.

दि. १४–९–७६ कै. वि. स. खांडेकर ह्यांच्या श्राद्धदिनानिमित्त त्यांच्या 'ययाति' या कादंबरीवर परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळी अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर आणि प्रमुख वक्ते प्रा. शां. सी. कवडे आणि श्री. रा. जे. कांबळे साहेब, व्यवहार न्यायाधीश हे होते.

दि. १९–९–७६ ला वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या आयोजनासंबंधी स्वागताध्यक्ष सौ. विमलाबाई गोहोकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.

९.३. गोंदिया शाखा सभा.

दि. ९–९–७६ ला सुप्रसिद्ध साहित्यिक व ज्ञानपीठ पारितोषिक विजेते श्री. वि. स. उपाख्य भाऊसाहेब खांडेकर यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा आयोजित करण्यात आली. त्या प्रसंगी प्रमुख वक्ते या नात्याने श्री. रमेश ललगूणकर यांचे भाषण झाले. याच प्रसंगी चि. त्र्यं. खानोलकर, अं. शं. अग्निहोत्री आणि त्र्यं. शं. तथा बावा वकील यांच्या दुःखद निधनानिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. ९ व १०–९–७६ ला इतिहास संशोधक श्री. बाबासाहेब ठकार ह्यांचे 'छत्रपती संभाजी महाराज – एक नवा दृष्टीकोन' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. ११–९–७६ ला शाखेच्या अध्यक्ष सौ. मनोरमा धोटे यांच्या अध्यक्षतेखाली साधारण सभा झाली. तीत १९७६–७७ साठी कार्यकारिणी निवडण्यात आली ती अशी : अध्यक्ष – सौ. मनोरमा धोटे, उपाध्यक्ष – श्री. प्र. शं. तनखीवाले, कार्यवाह – श्री. रमेश ललगूणकर व प्रा. कृष्णा चौधरी, सहकार्यवाह – सर्वश्री. वसंत मातुरकर, वसंत क्षिरे, कोषाध्यक्ष – श्री. ना. गो. बापट, वास्तु व्यवस्थापक – श्री. सुरेश आकांत; याशिवाय १३ सदस्य निवडण्यात आले.

९.४. तुमसर शाखा सभा.


ही शाखा दि. २८–२–७६ ला स्थापन झाली. तिचे प्रा. अनिल खंडकर, प्रा. व. ग. भांडे, श्री. प. व. भुरे, श्री. ल. नी. खडके व सौ. शांताबाई बावनकर हे तावत्काल कार्यकारी आहेत.

९.५ मुर्तिजापूर शाखा सभा.

दि. २५–९–७६ ला प्राचार्य श्री. विभूते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत वि. सा. संघाची शाखासभा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि १९७६–७७ ह्या वर्षासाठी श्री. मधु खोकले, अध्यक्ष; सौ. निरुपमा कुळकर्णी, उपाध्यक्ष; प्रा. श्रीकांत तिडके, सरचिटणीस; श्री. विनय देशमुख, चिटणीस आणि प्रा. गायकवाड कोषाध्यक्ष अशी कार्यकारिणी निवडण्यात आली.

अकोला, अकोट, उमरखेड, खामगाव, चंद्रपूर, चिखली, दारव्हा व बुलढाणा ह्या शाखासभांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

युगवाणी [Yugwani] Regd. No. 1174 M H.



श्री शिवाजी ग्रंथालयासमोरील वातायनीला बसविण्यात आलेल्या शिव-छत्रपतींच्या शलाकाशिल्पाच्या वर छत्रपतींच्या राजमुद्रेचेही शलाकाशिल्प बसविण्यात आले आहे, त्याचे रेखाचित्र.



कै. वि. स. खांडेकर

श्र द्धां ज ली !

ज्यांनी आपल्या लेखनकर्तृत्वाने मराठी साहित्यात स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले त्या पद्मभूषण विष्णु सखाराम उपाख्य भाऊसाहेब खांडेकरांना विदर्भ साहित्य संघाची हार्दिक श्रद्धांजली !

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२
मुद्रक : श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२
[मुखपृष्ठावरील शिवछत्रपतींच्या रेखाकृतीचे मुद्रण स्क्रीन–पद्धतीने : श्री मोहिनीराज मुद्रा मंदिर, नागपूर १२].